२०७१२८०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
क्र. नं
...कार्योत्तेजक सभा, धुळे

श्री

रामदास आणि रामदासी

ग्रन्थमाला

भाग सतरावा

# श्रीसांप्रदायिक विविध विषय

## द्वितीय खंड

REFBK-0001803
REFBK-0001803

किंमत एक रुपया

सत्कार्योत्तेजक सभा धुळे

[ श्री रामदास आणि रामदासी मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेला ]

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग सतरावा

सर दुसरा ] [ मणि सहावा

# श्री सांप्रदायिक विविध विषय

## द्वितीय खंड

REFBK-0001803

गुरुक्षेत्रींचे धोंडे पशु पक्षी श्वान ।
सर्वं पूज्यमान गुरुदासा ॥

सर्व हक्क राखून ठेविले आहेत

१८४२ चैत्र शुद्ध १

किंमत एक रुपया

हा ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या

**श्रीआत्माराम**

छापखान्यांत छापून धुळें येथें प्रसिद्ध केला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ९८०३
ठाणे

श्री ग्रंथ संग्रहालय
नं. ८८३
१२

# श्री सांप्रदायिक विविध विषय

## द्वितीय खंड

### अनुक्रमणिका

| अनुक्रमांक | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| ५८ | श्रीसमर्थांनी केलेल्या तीर्थयात्रा ... ... | १ |
| ५९ | श्रीसमर्थांची शिकवण-धडा दहावा- वंद ... | ९ |
| ६० | श्रीसमर्थांची शिकवण-धडा अकरावा- गुरूचें ठायीं अनन्यता ... ... ... ... | १७ |
| ६१ | शाम कल्याण ... ... ... ... | २२ |
| ६२ | अंगलाई देवी- चित्रासह ... ... ... | २५ |
| ६३ | श्रीरामवरदायनी ... ... ... ... | २५ |
| ६४ | शंभर वर्षांमागची सांप्रदायांतील शिकवण ... | ३३ |
| ६५ | चाफळखोऱ्यांतील एक लोकगीत ... ... | ३८ |
| ६६ | चाफळखोऱ्यांतील रामदासी संस्मरणीय वस्तु | ३१ |
| ६७ | चाफळ संस्थानचें उत्पन्न ... ... ... | ४९ |
| ६८ | श्रीसमर्थांचे शिष्य .. ... ... | ८१ |
| ६९ | श्रीसमर्थशिष्य मुसळराम ... ... ... | ८३ |
| ७० | श्रीसमर्थकृत पांगुळ ... ... ... | ८९ |
| ७१ | श्रीकल्याणशिष्य आण्णाजीबावा भालकीकर मठ भातंवरें ... ... ... ... | ९० |
| ७२ | सज्जनगडावरचें एक लोकगीत ... ... | ९२ |
| ७३ | श्रीकल्याणस्तव ... ... ... ... | ९५ |
| ७४ | श्रीसमर्थांची शिकवण-धडा बारावा-नामस्मरण | ९७ |
| ७५ | रामोपासनेचें रहस्य ... ... ... | १०४ |
| ७६ | श्रीसमर्थशिष्य आण्णाप्पा-मठ नीलंगे ... | १०५ |
| ७७ | श्रीसमर्थांचें साद्यंत चरित्र कोणाला ठाऊक आहे | ११३ |

७८ नरसोबा आत्माराम- मठ भालकी ... ... ११५
७९ नरसोबांची वाणी... ... ... ... १२१
८० आपचंद मठांतील गळांठा ... ... ... १२५
८१ श्रीसमर्थांची शिकवण-धडा तेरावा-स्वरूपीं विश्रांतीस जावें ... ... ... ... १२९
८२ श्रीसमर्थांचा सुंदर मठ कोणता ? ... ... १३७
८३ श्रीसमर्थांचे शिवराम ... ... ... १४५
८४ श्रीसमर्थांच्या मठांतील राजपुरुष ... ... १५७
८५ श्रीसमर्थशिष्य प्रल्हाद-मठ कारंजे ... ... १६१
८६ श्रीसमर्थशिष्यीण अंबिकाबाई-मठ राशिवडे व वाळवे १६९
८७ श्रीसमर्थांची शिकवण-धडा चवदावा-सावधान सावधान ... ... ... ... ... १७७
८८ श्रीसमर्थप्रताप व अफझलखानाचा वध ... १८५
८९ राघवदासकृत खेदमनोगत ... ... ... १९०
९० श्रीशिवछत्रपति व वासुदेव गोसावी... ... १९३
९१ कल्याणांचें तें सांकेतिक पत्र ... ... १९६
९२ श्रीसमर्थ व केशवस्वामी यांचा पत्रव्यवहार ... १९७
९३ भाळगांव व डोमगांव मठाचा संबंध... ... १९८
सूची ... ... ... ... ... २०१

॥ श्रीराम ॥

# श्री सांप्रदायिक विविध विषय

## द्वितीय खंड

## दोन शब्द

**आह्मी दास सज्जनाचे । सांप्रदायी रघुनाथाचे ॥**

या दृष्टीनें वाचकांनीं या विविध विषयांकडे पहावें. हे विषय ह्मणजे पुढें मागें आपणांस जें श्रीसमर्थांचें साधार व साद्यन्त चरित्र लिहावयाचें आहे त्याचीं साधनें होत. तसें चरित्र लिहिण्याची वेळ आणखी तीन वर्षांनीं यावी, असें वाटतें. तोंवर या विविध विषयांचा ह्मणजे श्रीसमर्थचरित्रसाधनांचा तृतीय खंड पूर्ण होईल.

धुळें– १८४२ चैत्र शु. १

## श्रीसद्गुरुस्तवन

पद

तो चि तो साधव रे सखया बोधक माधव रे ॥ ध्रु० ॥

प्रपंच लटिका निर्फळ दावी ।
सर्व भूतांतर आंतरभावी ॥ १ ॥

स्वधर्मकर्मी शुद्ध क्रिया करी ।
भूतकृपाघन दीनासी तारी ॥ २ ॥

ब्रह्मचर्यव्रत निस्पृहधारी ।
ब्रह्मस्थितिवर भिक्षाहारी ॥ ३ ॥

शांतिछत्रपती निशाण फडके ।
उत्तम कीर्ति दुंदुभि धडके ॥ ४ ॥

मर्दुनि षड्रिपु भजनविळासी ।
सुखरूप भवभय कल्याणरासी ॥ ५ ॥

ग्रं. क्र. ९८०३

वर्गांक ... ६४६ ...

श्री

# रामदास आणि रामदासी
## भाग सतरावा

# श्री सांप्रदायिक विविध विषय
## द्वितीय खंड

[ ५८ ]

## श्रीसमर्थांनीं केलेल्या तीर्थयात्रा

**साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ ।**
**साधु न येतां जिणें वेर्थ । तयां पुण्यक्षेत्रांचें ॥** ७-१०-११

एकस्या देशासाठीं नव्हे किंवा एकस्या धर्मासाठीं नव्हे, तर दोहों-साठीं, देशासाठीं आणि धर्मासाठीं श्रीसमर्थांनीं आपला देह जितका कष्ट-विला तितका दुसऱ्या कोणी कष्टविल्याचें मला तरी माहित नाहीं! देश आणि धर्म यांचें उज्वल स्वरूप मनीं धरून वयाच्या बाराव्या वर्षी घरदार सोडून व संसाराची देशधडी करून बारा वर्षें पुरश्चरण, बारा वर्षें तीर्थाटण आणि नंतर बारा त्रिक छत्तीस वर्षें उदंड राजकारण व धर्मकारण दुसऱ्या कोणी केलें? पुरश्चरण ह्मणजे तप आणि तप ह्मणतां च कष्टाची कल्पना प्रथम मनांत येते. त्या काळीं अखिल भरतखंडभर तीर्थाटण करणें किती साहसाचें असलें पाहिजे याची कल्पना च करावी. त्या च प्रमाणें, तत्कालीन देश-स्थितीचा विचार करतां राजकारण आणि धर्मकारण ह्मणजे केवळ सुळावरील पोळी असली पाहिजे, हें इतिहासज्ञांस निराळें सांगणें नको. जांबेचें **बालकांड**, टांकळीचें **पुरश्चरणकांड**, भरतखंडाचें **तीर्थाटणकांड**, शिवसमर्थभेटीचें **सुंदरकांड**, चाफळचें **धर्मकारणकांड**, शिवतरचें **राजकारणकांड** व श्री-सज्जनगडावरील **उत्तरकांड**, अशीं रामायणाप्रमाणें **दासायनाचीं** एकाद्या

दासोंकित चरित्रकारानें सात कांडें मानलीं, तर पहिल्या व शेवटच्या या दोन च कांडांत, श्रीरामाप्रमाणें श्रीसमर्थांना कांहीं सुख लाभलें असेल, विश्रांति मिळाली असेल, बाकी सर्व कांडांत उभयतांच्या वाट्याला कष्टावांचून दुसरें काय आलें? इतर कांडांचा प्रश्न पुढें मागें विचारास घेऊं. आज येथें तीर्थाटणकांडाचा विचार करण्याला उपयोगी पडणारें इंदुरबोधनमठांतील चोविसाव्या बाडांत आढळलेलें श्रीसमर्थकृत एक प्रकरण देण्याचें योजिलें आहे.

## ॥ तीर्थावळी ॥

स्वर्ग मृत्य आणी पाताळीं । देव राहाती तीही ताळीं ।
येक राहाती अंतराळीं रे रे रे रे । स्थळें निराळीं निराळीं रे ॥ १॥

माझा राम तो जेथें तेथें ।
आत्मारामेंवीण सर्व रितें रे रे रे रे ॥ धृ० ॥

सर्व तीर्थांमध्यें कासी ।
गती होते पूर्वजासी ।
धन्य धन्य ते पंचक्रोसी रे रे रे रे ।
अमर इछिती मरणासी रे ॥ २ ॥

रामेश्वरा कावडी नेती । पुण्य उदंड सांगती ।
देवदर्शनें होते गती रे रे रे रे । लोक उदंड बोलती रे ॥ ३ ॥

उडपेचा कृष्णनाथ । कावेरी रंगनाथ ।
वडीया जगन्नाथ रे रे रे रे । देव नांदतो समर्थ रे ॥ ४ ॥

इछा धरूनी रामअवतारीं ।
उभी राहिली कन्याकुमारी ।
तीर्थ चालतें अद्यापीवरी रे रे रे रे ।
काये सांगावी तेथील थोरी रे ॥ ५ ॥

वेंकटेशा यात्रे जाती ।
लोक उदंड कानग्या खाती ।
आणी नवेद्य उभ्यां खाती रे रे रे रे ।
रचना उदंड सांगती रे ॥ ६ ॥

श्रीशैली महिमा आहे। साटी वरु ( षे ) वाट पाहे।
लोक बहुतेक न राहे रे रे रे रे। तेथें पाताळगंगा वाहे रे॥ ७॥

आवढाचा नागनाथ। परळीचा वैजनाथ।
सोरटीचा सोमनाथ रे रे रे रे। देव नांदतो समर्थ रे॥ ८॥

सेवाळें घृष्मेश्वर।
पश्च्यमेचा भीमाशंकर।
हिमाचळीचा हिमकेदार रे रे रे रे।
तेथें महिमा तो अपार रे॥ ९॥

बारा वरुशा सींहस्तासी।
मिळे यात्रा ते गंगेसी।
जाती नासीका त्रिंबकासी रे रे रे रे।
पुण्य मोठें प्रदक्षणेसी रे॥ १०॥

लोक हरेश्वरा जाती।
घरीची घुमोंची लागती।
आंगा ब्राह्मणसमंध येती रे रे रे रे।
जन्मांतरीचें निवाडिती रे॥ ११॥

माणदेसीं माहादेव।
तेथें उदंड मोहोछाव।
मिळे यात्रा समुदाव रे रे रे रे।
सीखरीचा संभया देव रे॥ १२॥

कृष्णाउगमीं माहादेव। तळकोंकणीचा भार्गव।
गोकर्ण तें अपूर्व रे रे रे रे। धन्य होताती मानव रे॥ १३॥

शक्तीचें माणकेश्वर। लक्ष्मीचें कोल्हापुर।
सुब्रह्मणी फणीवर रे रे रे रे। पक्षतीर्थीचे खेचर रे॥ १४॥

सीवकंची विष्णुकंची।
महिमा अरुणाचळाची।
ठाईं ठाईं नरहरीची रे रे रे रे।
थोर महिमा अयोध्येची रे॥ १५॥

ज्वाळामुखीते अंबीका । सप्तशृंगीची चंडीका ।
हींगळाळते काळीका रे रे रे रे । भद्रगीरींचा राम ऐका रे ॥ १६ ॥

कामाक्षी वनशंकरी ।
मीनाक्षी जोगेश्वरी ।
आदिशक्ती भुवनेश्वरी रे रे रे रे ।
कीतीयेक त्या जळांतरीं रे ॥ १७ ॥

लोक उदंड द्वारके जाती । माया मात्रा कावे नेती ।
कृष्णाते पाहोनी येती रे रे रे रे । तीर्थमहिमा सांगती रे ॥ १८ ॥

मातापुर तुळजापुर ।
पोहा चालतो अपार ।
भक्त मिळती थोर थोर रे रे रे रे ।
तेणें दाटले देवद्वार रे ॥ १९ ॥

लिंगाकार पृथ्वी आहे ।
लिंगमहिमा कोण पाहे ।
त्यासी उपमा न साहे रे रे रे रे ।
लिंगरूप हे सकळ आहे रे ॥ २० ॥

भीमातीरीं पंढरपुर । तेथें कीर्तनाचा गजर ।
नामघोश वारंवार रे रे रे रे । भक्त मिळती अपार रे ॥ २१ ॥

ठाईं ठाईं खंडेराव । बहु जनासी उपाव ।
भरे यात्रा मोहोछाव रे रे रे रे । रोकडा तो पावे देव रे ॥ २२ ॥

क्षेत्रपाळ सांगो किती ।
देव ठाईं ठाईं असती ।
दुरी दुरीचे लोक येती रे रे रे रे ।
तेथें राकडी सप्रचीती रे ॥ २३ ॥

महीमंडळीं चिंतामणी ।
ठाईं ठाईं घातलीं ठाणीं ।
न बोलवे महिमा कोण्ही रे रे रे रे ।
लोक बोलताती पुराणीं रे ॥ २४

आदिशक्ती ठाईं ठाईं।
स्थळें सांगों कीती काईं।
तेथें होईजेना उतराईं रे रे रे रे।
भक्त दाटले ठाईंचा ठाईं रे ॥ २५ ॥

ठाईं ठाईं विष्णुमूर्ति। पुण्यक्षेत्रा नाहीं मीती।
कीर्ती पुराणें बोलती रे रे रे रे। नाममात्रें होते गती रे ॥ २६ ॥

देव नांदती अपार।
येकाहूनी येक थोर।
कीती सांगावा विचार रे रे रे रे।
भक्त पावती पैलपार रे ॥ २७ ॥

देवस्थानें उदंड होतीं। आतां जाले म्लेंछय नृपती।
ठाईं ठाईं उरुस भरती रे रे रे रे। कीर्ती उदंड सांगती रे ॥ २८ ॥

आत्माराम तो ठाईं ठाईं।
नांदे म्लेंछाचे हृदईं।
तेथें फोडुनी पाहाती काईं रे रे रे रे।
तेणें करीतां चाले सर्व ही रे ॥ २९ ॥

दास ह्मणे देव हा येक। येर सकळ हीं माईक।
पाहाणें तो अंतर्विवेक रे रे रे रे। तेणें होतसे सार्थक रे ॥ ३० ॥

काशी, रामेश्वर, उडपी, कावेरी रंगनाथ, जगन्नाथ, कन्याकुमारी, गिरी, श्रीशैल, आवंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ, सोरटी सोमनाथ, घृष्मेश्वर, भीमाशंकर, हिमकेदार, नाशिक, त्र्यंबक, हरेश्वर, माणदेशीं महादेव, शिखरशिंगणापुर, महाबळेश्वर, भार्गव, गोकर्ण, माणकेश्वर, कोल्हापुर, सुब्रह्मणी फणिवर, पक्षतीर्थ, शिवकांची, विष्णुकांची, अरुणाचळ, ठाईं ठाईं नरहरि, अयोध्या, ज्वाळामुखी, सप्तशृंग, हिंगोळ, भद्रागिरी, कामाक्षी बनशंकरी, मीनाक्षी जोगेश्वरी, आदिशक्ति भुवनेश्वरी, द्वारका, कँबे, मातापुर, तुळजापुर, पंढरपुर, ठाईं ठाईं खंडेराव, ठाईं ठाईं आदिशक्ति, ठाईं ठाईं विष्णुमूर्ति, इत्यादि

नाना तीर्थें थोरथोरें। सृष्टीमध्यें अपारें।
सुगमें दुर्गमें दुष्करें। पुण्यदायकें ॥ ८-१-३

श्रीसमर्थांनीं केलीं ! या सर्व यात्रा करण्यांत श्रीसमर्थांचा काय बरें हेतु असावा ? जेथें तेथें धोंडा पाणी । हा बोध झाला नाहीं तोंवर

**नाना तीर्थीं क्षेत्रांस जावें । तेथें त्या देवाचें पूजन करावें ।**
**नाना उपचारीं अर्चावें । परमेश्वरासी ॥** ४-५-१७

हा उपदेश तुह्मांआह्मांसाठीं आहे, तो ठीक आहे, पण ही दगदग करण्यांत श्रीसमर्थांचा हेतु, काय ठिकठिकाणीं जाऊन त्या त्या देवाचें पूजन करावें, एवढा च असेल ?

**माझा राम तो जेथें तेथें । आत्मारामेंवीण सर्व रितें रे ॥**

असें ज्यांचें सप्रचीत सांगणें त्यांनीं इतकी वणवण कशासाठीं केली असती ?

**भिक्षामिषें लाहानथोरें । परीक्षून सोडावीं ॥**

अशी शिक्षा लावणाऱ्या श्रीसमर्थांनीं यात्रामिषें लहानथोर राष्ट्रांची परीक्षा तर केली नसेल ना ? आणि त्या परीक्षेंत भारतवर्षांतील सर्व राष्ट्रांत महाराष्ट्र तेवढें च उत्कृष्ट रीतीनें टिकल्यामुळें अखेरीस त्यांनीं त्याला च आपल्या चरणांची कायमची जोड करून दिली ! श्रीसमर्थांचें चरित्र आणि त्यांची शिकवण हीं पाहिलीं ह्मणजे तीर्थाटणांत हा हि एक त्यांचा हेतु असणें सर्वथैव संभवतें. तरी पण तीर्थयात्रा करणें हें हि एक तप च आहे, या च हेतूनें मुख्यत: बारा वर्षांच्या पुरश्चरणानंतर बारा वर्षें त्यांनीं पर्यटण केलें असावें.

तीर्थयात्रा दोन तऱ्हांनीं करतां येते. एक गाजावाजा करून व दुसरें अज्ञातवास पतकरून. दुसरी तऱ्हा जास्त श्रेयस्कर होय, हें सांगणें नको. परमार्थाला अज्ञातवास किंवा एकांत अतिशय उपकारक होतो. लोकांतांत देव पावणार नाहीं तो एकांतांत पावेल ! आपण आपल्या च ठिकाणीं सावध होऊन व सुचित्त राहून, दुनियेची तऱ्हा पाहून आपल्याशीं च आनंद करीत, कोणाला वार्ता हि न लागतां, भगवत्प्रेमानें वेडावून, कौतुकानें, आत्मानंदीं मग्न होऊन तीर्थयात्रा करण्यांतलें प्रेम प्रत्यक्ष अनुभवावांचून अनुमानतां येणें कठीण होय ! वयाच्या चोविसाव्या वर्षापासून तों छत्तिसाव्या वर्षापर्यंत बारा वर्षें अशा रीतीनें तीर्थयात्रा करण्यांत खर्च करणें हें खचित लहानसहान तप नव्हे. अज्ञातवासाची गोडी अज्ञातवासी च जाणूं शकेल ! कीर्तीचा मोह अनावर होय व तो दुश्चित्तांना सुटणें कठीण आहे, तरी पण केव्हां तरी शुद्धीवर येऊन अज्ञातवासाचें प्रेम कांहीं काळ तरी प्रत्येक साधकानें

अनुभविलें पाहिजे. जें पुरश्चरणाचें कार्य तें च तीर्थयात्रांचें. दोहोंचें फळ एक च. पुरश्चरण हि तप आणि तीर्थयात्रा हि तप च होत. श्रीसमर्थांनीं अशा रीतीनें दोन तपें तप केलें ? प्रत्यक्ष श्रीरामांनीं दर्शन देऊन कांहीं आज्ञा केली आणि समर्थांनीं पुरश्चरण संपविलें आणि तीर्थाटणाला आरंभ केला ! तीर्थाटणतपाची पूर्तता हिमकेदारास झाली ह्मणावयाची ! तेथील गोष्ट वाचकांना पूर्णपणें आठवते ना ? मनांत आणा. घरदार सोडलें, बारा वर्षें पुरश्चरण झालें, यात्रा हि बारा वर्षें झाल्या, पूर्ण वैराग्य अंगीं भरलें, आतां देह ठेवून तरी काय करावयाचें, असा विचार होऊन ऐन उमेदींत, छत्तिसाव्या वर्षीं, देहाचें विसर्जन करावें ह्मणून हिमालयकुंडीं श्रीसमर्थ देह सोडणार तों च वरच्यावर रघुनाथजींनीं श्रीसमर्थांस धरिलें ! समर्थांना रामाचें करणें आवडलें नाहीं, सोडा, मला या देहाचें आतां काय प्रयोजन आहे, असें ते ह्मणाले ! आणि खरोखर कांहीं प्रयोजन नसतें तर हतभागी जगाला श्रीसमर्थांचें नांव हि ऐकूं आलें नसतें ! अशीं कैक नांवें आपण ऐकिलीं नसतील नाहीं ? असे कित्येक पुण्यात्मे आपणांस माहित न होतां हि आपला अवतार संपवित असतील नाहीं ? यावर माझा पूर्ण विश्वास आहे ! कारण अशा च एका पुण्यपुरुषाचें चरित्र मी पाहिलें आहे व तें श्रीदासविश्रामधामाची प्रस्तावना लिहितांना महाराष्ट्रास सादर करण्याचें मी योजून ठेविलें आहे; असो. आपलें कार्य संपलें असें श्रीसमर्थांना क्षणभर वाटलें, पण श्रीरामचंद्रांना ठाऊक होतें श्रीसमर्थांचा अवतार कशासाठीं होता तें. श्रीसमर्थांच्या चरणांची महाराष्ट्र वाट पहात होता ! श्रीरामांनीं आज्ञा केली कीं,

तुह्मासी जगोद्धार करणें आहे ।
तुमची तनु ते आमची तनु पाहे ।
दोनी तपें तुमची रक्षिली काया हे ।
धर्मस्थापने कारणें ॥ श्रीसमर्थप्रताप ३–८

केवळ वैराग्य तीव्रतर केलें ।
अन्नवस्त्रविवर्जित भलें ।
आतां लोक पीडा पावतील दुष्काळें ।
कां जे तुह्मी ईश्वरतनु ह्मणोनिया ॥ ९

अग्निहोत्री राजा संन्यासी ।
देव द्विज मुनि संत साधु उपवासी ।
तरी राष्ट्रभंग होईल निश्चयेंसीं ।
कां जे आत्माराम सर्व हे ह्मणोनिया ॥ १०

समस्त देवांसी उपवास पडले ।
समस्त भूदेव वस्त्रहीन जाले ।
समस्त जीव दरिद्रें पीडिलें ।
तुह्मी अन्न वस्त्र भूषणें धरावीं ॥ ११

येक वेष तुह्मी न धरावा ।
येक वेष तुह्मी न करावा ।
भोग त्याग विवेकें विवरावा ।
त्यागात्याग सर्वज्ञपणें ॥ १२

श्रीसमर्थांनीं श्रीरामाची आज्ञा शिरसा मान्य करून महाराष्ट्राला, भरतखंडाला, त्रिभुवनाला आनंदविलें, कीं जो आनंद अजून हि आपणांस लुटावयास सांपडत आहे !

श्रीसमर्थांनीं ज्या तीर्थयात्रा केल्या, त्यांपैकीं आपणांस घडतील त्या आपण हि केल्या पाहिजेत; पण त्यां हि पेक्षां श्रीसमर्थांच्या चरणस्पर्शानें ज्या स्थलांना क्षेत्रत्व प्राप्त झालें आहे तीं गुरुतीर्थें आपण अवश्य केलीं पाहिजेत. समर्थांनीं तीं तीर्थें केलीं, आपण प्रथम हीं तीर्थें करूं. जांब, टांकळी, मसूर, शहापुर, उंब्रज, चरेगांव, माजगांव, चाफळ, शिरगांव, पाली, पाटण, हेळवाक, शिवतर, रायगड, अंगापुर, करंजें, वरुण, बाहे, शिराळें, मिरज, डोमगांव, भालगांव, कण्हेरी, तीसगांव, केज, तंजावर, मन्नारगुडी, कोनुर, शिरवळ, निलंगे, दादेगांव, निगडी, भागानगर, वडगांव, ब्रह्मनाळ, श्रीसज्जनगड इत्यादि तीर्थांतील धूळ आपण प्रथम आपल्या मस्तकीं धारण करूं या ! ही च आपली काशी, हा च आपला रामेश्वर व हें च आपलें श्रीशैलस्थान !

१८३९ आषाढ शु. ११

[ ५९ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांची शिकवण

## धडा दहावा

### वंद

**स्मरणाचा वंद गेला । तो प्राणी मनुष्यांतुनी उठिला ।**
**कोणी येक वंद ढळला । ह्मणिजे खोटें ॥** सप्तसमासी

असें निक्षून सांगणारे श्रीसमर्थ, आपल्या शिष्यांना कडक नियमांनीं बांधून घेतल्यावांचून राहिले असतील, हें संभवेल तरी कसें ? वंद ह्मणजे धागा, कायदा, नियमबद्धता. स्वतः वेळेवर सावध होऊन साऱ्या राष्ट्राला सावध करणाऱ्या सद्गुरूंनीं स्वतःच्या शिष्यांना बेसावध राहूं दिले असेल, असें कोण मानील ?

**अखंड सावधानता । मनीं विधी विधानता ।**
**समस्त धारणा धरी । सदा विचारणा करी ॥** स्फु. श्लो. ३७-४

त्या श्रीसमर्थांनीं आपल्या शिष्यांना किती कडक शिस्त लावली असली पाहिजे ! ही गोष्ट अनेकदां प्रतिपादण्यांत आली आहे कीं, श्रीसमर्थांनीं जो संप्रदाय प्रवर्तित केला, तो अत्यन्त सुसंघटित होता. त्यांत कोठें यत्किंचित् सुद्धां ढिलेपणा नव्हता. या संप्रदायाचें आतां आपण जें स्वरूप पहात आहोंत, त्यावरून तत्कालीन स्वरूपाची अटकळ करूं तर सपशेल फसूं. आद्य प्रवर्तकांच्या पश्चात् कांहीं काळ ह्मणजे पिढी दोन पिढ्या त्या घटनेचें महाराष्ट्रास स्मरण होतें, पण पुढें पुढें कालगतीनें अंतरात्मा लुप्त होत होत अखेरीस घटनेचा फक्त बाह्य देखावा मात्र उरला ! त्या बाह्य देखाव्यावरून अंतरात्म्याची ओळख पटणें शक्य नव्हे !

( २ ) प्राण जाऊन नुसती कुडी उरली आहे, हें सत्य मनाला किती हि अप्रिय वाटत असलें, तरी तें जाणणें हितावह होय. कोण होतों

व कसें झालें, याचें स्मरण च बुजलें तर पूर्व स्वरूप गांठण्याची आशा च खुंटली ह्मणावयाची. तसें च, आपण आज जसे आहोंत तसे च पूर्वापार होतों, असें वृथा मानण्यांत हि आत्मवंचना होते. यासाठीं असें वाटतें कीं, जें असेल तें यथार्थ जाणणें व सांगणें हें श्रेयस्कर होय. त्यानें मनाला वाईट वाटेल, पण वाईट वाटावें हा च मुळीं हें उघड बोलण्यांत बोलणाराचा हेतु असतो. वाईट वाटेल तर कोणी वाईटाचा त्याग करून चांगलें संपादन करण्याचा प्रयत्न करील.

( ३ ) हल्लीं आपण चार प्रकारचे सांप्रदायिक पहातों.

( १ ) पूर्वजांनीं मिळविलेल्या उत्पन्नावर प्रपंचपरमार्थ चालविणारे रामदासी

( २ ) परंपरागत मंत्रद्वारा श्रीसंप्रदायाचा प्रसार करणारे रामदासी

( ३ ) कोणापासून तरी मंत्रोपदेश घेऊन व हुर्मुजी वस्त्रें धारण करून भिक्षेवर बराचसा प्रपंच व थोडासा परमार्थ चालविणारे रामदासी

( ४ ) श्रीसमर्थचरित्र मनापासून आवडतें ह्मणून संप्रदायांत प्रविष्ट होऊन, किंवा न होऊन हि, संप्रदायाचा अभिमान बाळगणारे आधुनिक अल्पज्ञ पण शिक्षित गणले जाणारे रामदासी

हल्लीं जेवढे ह्मणून रामदासी आहेत तेवढे सर्व या चार वर्गांपैकीं कोणत्या तरी वर्गांत मोडतात. प्रस्तुतचा लेखक हि त्यांच्या बाहेर नाहीं. ज्या संप्रदायावर आपला चरितार्थ चालला आहे किंवा ज्याचा आपणांस अभिमान वाटतो त्या संप्रदायाचें मूळ रूप कसें होतें व त्यास आतां कोणतें रूप प्राप्त झालें आहे, याचें यथार्थ ज्ञान या चार हि वर्गांतील रामदासियांना होणें अगत्याचें आहे. आपलें पूर्व स्वरूप त्यांना कळलें व उमगलें तर त्या स्वरूपावर अचल दृष्टि ठेवून तें गांठण्याचा ते प्रयत्न करतील व त्यांत संप्रदायाचें कल्याण आहे.

( ४ ) या चार वर्गांविषयीं बोलावयाचें ह्मणजे कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, अशी त्यांची हल्लीं स्थिति झाली आहे. कोणी च

कोणाची काळजी करीनासा झाला आहे. पूर्व स्वरूपाच्या स्मरणाचा बंद तुटल्यामुळें हे एका च सूत्रांत गोवलेले मणी आज अस्ताव्यस्त व स्थानभ्रष्ट होऊन सर्वत्र पसरले आहेत. ते सर्व मणी एका जागीं गोळा करून पुन्हां त्यांची पूर्ववत् माळा गुंफण्याचें सामर्थ्य कोणांत च उरलेलें दिसत नाहीं. अशा स्थितींत प्रत्येकानें आपआपल्या ठिकाणीं जागृत होऊन एकट्यानें किंवा चार चौघे समविचार सोबती बरोबर घेऊन पूर्व स्वरूपाकडे दृष्टि पोंचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

( ५ ) त्या प्रयत्नाला आपण लागलों, ह्मणजे पहिली गोष्ट आपल्या लक्षांत येते ती ही कीं, श्रीसमर्थसंप्रदाय अत्यन्त नियमबद्ध होता. त्यांत स्वेच्छाचाराचा शिरकाव होण्याला यत्किंचित् हि वाव नसे. त्याचा आचार, विचार ठरलेला होता. त्याच्या बाहेर कोणास जातां येत नसे. एकदां ध्येय ठरल्यावर तें प्राप्त करून घेण्यासाठीं जो प्रयत्न करावयाचा तो बेताल असतां कामा नये. ध्रुवाचा तारा गांठावयाचा निश्चय झाल्यावर जो मार्ग आक्रमावयाचा तो थेट ध्रुवाकडे च जाणारा असला पाहिजे, त्याला मध्यंतरीं फाटे फुटतां कामा नये. तद्वत्

**संसारीं दोनि साधावीं । येहलोक परत्र ही ॥**

हें एकदां साध्य ठरल्यावर हातून जी कृति व्हावयाची तिचें धोरण इहपरलोक साधण्याकडे च असावे. या दृष्टीनें व्यक्ति, कुटुम्ब, समाज, राष्ट्र यांच्या हितासाठीं श्रीसमर्थांनीं ठोकळ नियम घालून दिलेले होते. व्यक्तीपासून राष्ट्रापर्यंत सर्वांची च काळजी श्रीसमर्थांनीं वाहिली आणि ह्मणून च समर्थांचीं वचनें सर्वांना सारखीं प्रिय आणि हितकर वाटतात. जी व्यक्ति, जें घर, जो समाज किंवा देश हे नियम धुडकावून लावतो, त्याचा नाश ठेवलेला समजावा. व्यक्ति असो कीं राष्ट्र असो, त्याला कांहीं ताळतंत्र, नियम, बंद पाहिजे.

**बंद राखेना नृपती । तेणें देशाची होते फजिती ।**
**उदंड लोक कैसे जीती । कोण्या प्रकारें ॥**

हें जसें राष्ट्राचें खरें, तितकें च तें एकाद्या घराचें किंवा कुटुम्बाचें खरें असतें.

**बंद आहे तो घर। बंद ढळलियां जर्जर।**
**तेणें प्राणी लाहान थोर। कैसे सुख पावती॥**

हा कौटुम्बिक अनुभव नित्याचा आहे. ती च तऱ्हा आपल्या या जड देहाची होय.

**शरीराचा बंद ढळला। तेणें प्राणी कष्टी जाला।**
**चहुंकडे विष्टा त्याला। सुसीळता कैची॥**

अशा रीतीनें बंद आहे तोंवर, व्यक्तीचें काय किंवा समाजाचें काय, ठीक चालतें, पण एकदां कां बंद ढळून बेबंदशाही माजली ह्मणजे फजिती होण्याला वेळ नाहीं. पण काळ कसा विपरीत आला आहे पहा ! आपलीं नैतिक आणि धार्मिक बंधनें जितकीं धाब्यावर बसवावीं, तितकें समाजाचें कल्याण अधिक, असा आतां दृष्टिभ्रम झाला आहे. आतां च कां, त्या वेळीं कोठें नव्हता झाला !

**नीच प्राणी गुरुत्व पावला। तेथें आचार चि बुडाला।**
**वेदशास्त्रब्राह्मणाला। कोण पुसे॥** १४--७-२९

**ब्रह्मज्ञानाचा विचारु। त्याचा ब्राह्मणासी च अधिकारु।**
**वर्णानां ब्राह्मणो गुरुः। ऐसें वचन॥ ३०॥**

**ब्राह्मण बुद्धीपासून चेवले। आचारापासून भ्रष्टले।**
**गुरुत्व सांडून जाले। शिष्य शिष्यांचे॥ ३१॥**

**कित्येक दावलमलकास जाती। कित्येक पीरास भजती।**
**कित्येक तुरुक होती। आपले इछेनें॥ ३२॥**

**ऐसा कलयुगींचा आचार। कोठें राहिला विचार।**
**पुढें पुढें वर्णसंकर। होणार आहे॥ ३३॥**

**गुरुत्व आले नीचयाती। कांहीं येक वाढली महंती।**
**शूद्र आचार बुडविती। ब्राह्मणाचा॥ ३४॥**

**हें ब्राह्मणास कळेना। त्याचि वृत्ति च वळेना।**
**मिथ्या अभिमान गळेना। मूर्खपणाचा॥ ३५॥**

**राज्य नेलें म्लेंछिं क्षेत्रीं। गुरुत्व नेलें कुपात्रीं।**
**आपण अरत्रीं ना परत्रीं। कांहीं च नाहीं॥ ३६॥**

हें वर्णन तरी तत्कालीन देशस्थितीचें दर्शक च आहे ना ? हें वर्णन वाचून

सद्भोजनें आतां च तेवढीं होतात आणि तेव्हां होत नसतील असें वाटत नाहीं. भ्रष्टाकाराची प्रवृत्ति ही सहज असावी, पवित्रपणाचा मनुष्याला स्वभावतः कंटाळा असावा, असें वाटतें. शरीराला बंद नसावा, त्यानें वाटेल तेथें बसून शेण खावें, मनाला बंद नसावा, त्यानें अनावर होऊन वाटेल तिकडे पिसाट कुत्र्याप्रमाणें जावें, हीं स्वेच्छाचाराचीं लक्षणें सर्व कालीं व सर्व स्थलीं सारखीं च आढळावयाचीं. या पापाची परमावधि ह्मणजे पतिव्रतेला मोकळीनें हंसावें व भल्या मनुष्याची नष्टानें टवाळी करावी ! असा हा विपरीत न्याय जनमान्यता पावला ह्मणजे वास्तविक अधर्माची पण लोकप्रवादाप्रमाणें सुधारणेची सीमा झाली ह्मणून समजावें ! याहून जास्त काय ह्मणावें !

> पवित्रपणाचा कंटाळा । ह्मणे मी असेन मोकळा ।
> मग त्या अपवित्र वोंगळाला । कोण पुसे ॥ १॥
>
> मोकळेपणें मुक्ती होती । तरी अंतेज मोकळे चि असती ।
> स्वानें घरोघरीं फिरती । तयांस मुक्ति कैंची ॥ २ ॥
>
> मुक्त होावया कारणें । बोलिलीं नाना निरूपणें ।
> निरूपणें त्यागणें । पुढें कैसें ॥ ३ ॥
>
> शास्त्राधार अवघा सोडिला । ह्मणिजे प्राणी पाषांडी जाला ।
> मग कोण गती तयाला । कळत चि आहे ॥ ४ ॥

ती कांहीं स्पष्ट करून सांगावयास नको. आपण पहात च आहोंत.

> याकारणें जे कोणी भले । ते निरूपणपंथें चालिले ।
> साधन करित चि गेले । भक्तिपंथें ॥ ५ ॥
>
> हें किती ह्मणोनि सांगावें । ज्या जें रुचलें तें बरवें ।
> परी केल्या कर्माचें फळ भोगावें । लागेल पुढें ॥ ६ ॥

पुढचा तरी हवाला कशाला, केल्या कर्माचें फळ केव्हां केव्हां तत्काळ हि भोगावें लागतें ! असो; यापासून आपण जो बोध घ्यावयाचा तो इतका च कीं, आपला विचार नेमका असावा, क्रिया नेटकी असावी, आपल्या दूरदृष्टि पूर्वजांनीं आचाराविचाराला जीं बंधनें घालून दिलीं आहेत तीं आपण पाळावीं.

( ६ ) प्रपंच सुखाचा व्हावा ह्मणून जशीं बंधनें पाळावीं लागतात, तशीं परमार्थाला हि बंधनें असतात. कर्म, उपासना, इत्यादि जीं साधनें

सांगितलेलीं असतात, तीं च परमार्थाचीं बंधनें होत. हल्लीं प्रपंचाचीं बंधनें झुगारून देण्याकडे जशी प्रवृत्ति आहे, तशी ती परमार्थाचीं हि बंधनें तोडण्याकडे आहे. परमार्थी होण्याला आतां कर्मोपासनेची गरज उरलेली नाहीं! आतां परमार्थाची वाट सर्व जगाला सरीस मोकळी झाली आहे. वाटेल त्यानें त्या वाटेनें जावें. "सर्वांस रस्ता खुला नाहीं" अशी जी फळी रस्त्याच्या आरंभाला पूर्वीं दिसत होती, ती आतां काढून टाकण्यांत आली आहे. आतां त्या वाटेनें जातांना पायांतला बुट, अंगांतला कोट किंवा डोक्यावरची टोपी काढावी लागत नाहीं! ब्रह्मज्ञान होणें ह्मणजे पूर्वीं कोण दुर्घट गोष्ट होती! आधीं साधनें करतां करतां साधकाचा जीव कासावीस होत असे, ती कटकट आतां राहिली नाहीं. आतां कर्म करावें लागत नाहीं, आचार सांभाळावा लागत नाहीं व नियम पाळावे लागत नाहींत. आतां ब्रह्मज्ञान ह्मणजे परसांतली भाजी झाली आहे. ती वाटेल त्यानें पाटीशानें खुशाल खुडावी व बाजारांत नेऊन विकावी!

**आचार उपासना सोडिती। ते भ्रष्ट अभक्त दिसती।**<br>**जळो तयांची महंती। कोण पुसे॥** ५-२-५६

**कर्म उपासनेचा अभाव। तेथें भकाधेंसि जाला ठाव।**<br>**तो कानकोंडा समुदाव। प्रपंची हांसती॥ ५७॥**

शारीरिक व मानसिक दौर्बल्याचे हे सारे चोचले होत. मोकाटांची वाट त्यांना मोकळी सोडून शहाण्यानें आपला सन्मार्ग सुधारावा, हें उत्तम.

**बरें जाणत्यानें ऐसें न करावें। समजोन सन्मार्गी भरावें।**<br>**सारासार विचारें तरावें। समाधान॥**

अशा तऱ्हेनें उच्छृंखल समाजाच्या पाठीवर कोरडे ओढून त्यास सन्मार्गाला लावणारे श्रीसमर्थ आपल्या शिष्यांना कशी शिस्त लावीत, याची कल्पना करावी.

(७) श्रीसमर्थांची ही शिकवण त्यांच्या फक्त उद्धवशिवकल्याणादिक शिष्यांना च तेवढी होती आणि आतां आपणांस नाहीं, असें मुळीं च नव्हे. ते जसे त्यांचे होते तसे आपण हि त्यांचे च ह्मणवितों! तेव्हां आपण हि त्यांची शिकवण पाळली पाहिजे. आज आपणांशीं ते न बोलले तर आपण त्यांच्या ग्रन्थांना विचारिलें पाहिजे. त्यांनीं जें आपणांस सांगितलें

असतें तें च आतां श्रीमत् दासबोधादि त्यांचे ग्रन्थ आपणांस केव्हां हि सांगतील. आजचा हा धडा तरी आपण त्यांच्या सप्तसमासी नामक अप्रकाशित प्रकरणाला विचारून च लिहिला आहे. ग्रन्थांत जें कांहीं कमी पडेल तें त्यांच्या कागदपत्रांत सांपडेल व त्यांत हि जें आढळणार नाहीं तें त्यांच्या चरित्रापासून कळेल. त्यांच्या चरित्रांत जिला आधार नाहीं, अशी श्रीसमर्थांची कोणती च शिकवण नाहीं. स्वतः आचरिल्यावांचून आपण दुसऱ्यांस कांहीं शिकविलें नाहीं, ही त्यांची प्रतिज्ञा आतां सर्वश्रुत झालेली आहे.

( ८ ) तेव्हां त्यांचे ग्रन्थ, त्यांचीं कागदपत्रें व त्यांचें चरित्र यांचा आधार घेऊन हल्लींच्या चार हि वर्गांतील सांप्रदायिकांनीं आपला चरित्रक्रम ठरविला पाहिजे. स्वतःसाठीं आणि इतरांसाठीं, अशा दुहेरी स्वरूपाचा हा चरित्रक्रम असावा. स्वतःसाठीं जें करावयाचें त्यांत च इतरांचा अनायासें फायदा व्हावा व इतरांसाठीं ह्मणून जें करावयाचें त्यांत च सहजगत्या स्वहित साधावें, असें कार्याचें धोरण असावें. चार चौघांनीं एकत्र जमून, स्वतःच्या वर्तनाचे कांहीं नियम ठरवून घेऊन, तदनुसार हें कार्य आरंभिलें तर फार च उत्तम. आपल्यांपैकीं प्रत्येक जण व्यक्तिशः आपल्यावर श्रीसमर्थांची कृपा व्हावी, त्यांचा साक्षात्कार व्हावा, ह्मणून त्यांची जितकी भक्ति करील, जितकी सेवा करील, तितकी थोडी च होणार आहे. पण पांच पंचवीस जणांनीं मिळून नेमकें धोरण ठरवून श्रीसमर्थसेवा चालविली तर तिचें महत्त्व विशेष आहे. श्रीसमर्थांची तशी आज्ञा च आहे व तिचें पालन करणें हें आपलें श्रेष्ठतम कर्तव्य होय.

**आपण आवचितें मरोन जावें । मग भजन कोणें करावें ।**
**याकारणें भजनास लावावे । बहुत लोक ॥** १२-१०-३३

**आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मगावें शिष्यासी ।**
**आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥** ३४ ॥

**याकारणें समुदाव । जाला पाहिजे मोहोछाव ।**
**हातोपातीं देवाधिदेव । वोळेसा करावा ॥** ३५ ॥

( ९ ) **माझें सर्व जावो तुझें नाम राहो ।**
**हा चि माझा भावो अंतरींचा ॥** स्फु. ओ. २७,

अशा निश्चयाचे पांच पंचविस निष्ठावंत सेवक एका धोरणानें श्रीसंप्रदायाची सेवा करण्यास तयार होतील तर पुष्कळ च कार्य उरकेल. अंगसेवा, स्थानसेवा, भावसेवा व आत्मसेवा, असे जे सेवेचे चार प्रकार **श्रीरामदासपंथक्रमसार** या लहानशा ग्रन्थांत दिलेले आहेत, ते प्रत्येकानें अवश्य वाचावेत. त्या प्रकारची गुरुसेवा आपआपल्या परीनें सर्वांनीं व्यक्तिशः किंवा संघशः करावी. समुदायाकडून जी सेवा होईल ती अर्थात् जास्त होईल. समुदायानें होणारें काम जास्त पद्धतशीर होईल. एकाऱ्या अनुभवाचा फायदा दुसऱ्यास मिळून थोडक्या श्रमांत पुष्कळ काम होईल. अशा तऱ्हेचें एकादें श्रीरामदासांकित कार्यकारी मंडळ हें कार्य आपल्या शिरावर घेईल तर काय न होईल ? सर्व सांप्रदायिक मठांचें व उपमठांचें संशोधन होईल, त्यांची गुरुपरंपरा कळेल, सांप्रदायिक ऐतिहासिक महत्त्वाचीं कागदपत्रें गोळा होतील, तेणें करून श्रीसमर्थचरित्रावर व श्रीसंप्रदायावर विलक्षण प्रकाश पडेल, सर्व तऱ्हेचा प्रचंड ग्रन्थसंग्रह होईल, आज ऐकून हि ठाऊक नसलेल्या अनेक साधुसंतांचीं चरित्रें व त्यांचे ग्रन्थ उपलब्ध होऊन महाराष्ट्रवाङ्मयाचें व्यापक स्वरूप प्रत्ययास येईल, सांप्रदायिक स्थलांचा शोध लागेल, जरूर त्या स्थलांचा जीर्णोद्धार करण्याचें पुण्य पदरीं पडेल, मनांत आणूं तर वाटेल तितकें द्रव्य मिळून त्याचा विनियोग प्रकाशनाकडे व जीर्णोद्धाराकडे करावयास सांपडेल, सारांश श्रीसमर्थांचें वैभव जनतेस दिवसानुदिवस जास्त कळून आपलें व सर्वांचें कल्याण होईल !

**बोलणें वाउगें होतें । चालणें पाहिजे बरें ।**
**पुढें घडेल तें खरें । आनंदवनभूवनीं** ॥ स्फु. प्र. ५८-५६

**स्मरलें लिहिलें आहे । बोलता चालता हरी ।**
**काये होईल पाहावें । आनंदवनभूवनीं** ॥ ५७ ॥

१८३९ श्रावण शु. ११

[ ६० ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांची शिकवण

## धडा अकरावा

### — पहिला बंद —

### गुरूचे ठायीं अनन्यता

**असो गुरूचे ठाईं अनन्यता । तरी तुज कायेसी रे चिंता ।**
**वेगळेपणें अभक्ता । उरों चि नको ॥** ५-६-५२

( १ ) श्रीसमर्थचरित्र, श्रीसमर्थग्रन्थ व श्रीसांप्रदायिक कागदपत्रें यांच्या सहाय्यानें आपला आपण च आतां चरित्रक्रम ठरविला पाहिजे, आपण च एकट्यानें किंवा पांच पंचवीस श्रीरामदासांकित निष्ठावंत सेवकांनीं मिळून आपल्याला नियम घालून घेतले पाहिजेत, आपण च आपल्याला बोध केला पाहिजे. नाहीं तरी आतां आणखी दुसऱ्या कोणाला पुसावें ? किंवा, असें तरी कां ? सर्वांना विचारावें आणि अखेरचा निर्णय आपला आपण करावा. एकांतांत बसावें, चित्त शांत करावें, श्रीचरणांचें स्मरण करावें, साद्यन्त श्रीचरित्र आठवावें, श्री ग्रन्थांतील वचनें आठवावीं, कागद-पत्रांतील रहस्य मनीं आणावें आणि स्वहिताचा स्वतःशीं विचार करावा. असा विचार करूं लागल्यास पहिली गोष्ट, सर्व इमारतीचा मूळ पाया जो पहिला बंद, मुख्य निर्बंध, मनांत येतो तो उत्कट गुरुभक्तीचा होय. जींत स्वतःचा विसर पडतो, मीपणाचा लय होतो, जींत आपलें सर्वस्व श्रीगुरुचरणीं अर्पण होतें, जिच्या योगानें

**पदार्थ मनें काया वाचा । मी हा अवघा चि सद्गुरूचा ॥**

अशी निवेदनी भक्ति घडून आपलें निराळें असें अस्तित्व च उरत नाहीं, तिचें नांव उत्कट गुरुभक्ति ! करवेल ती सर्व गुरुसेवा करावी, गुरुदास्यांत देह झिजवावा, चढतें वाढतें गुरुवैभव वाढवावें, सर्वांतर्यामीं श्रीगुरूची मूर्ति खेळावी अशा रीतीनें गुरुचरित्र सर्वतोमुखीं करावें आणि हें इतकें सर्व

कोण करतो याचा नुसता कोठें अस्पष्ट उच्चार हि झाला तरी तो दुस्सह व्हावा, याचें नांव अनन्यता !

**जैसा देव तैसा गुरु। शास्त्रीं बोलिला हा विचारु॥**

त्या विचाराला अनुसरून देवाच्या जागीं गुरूची योजना करून अनन्य गुरुदासास असें वाटत असतें कीं,

**माझें सर्व जावें गुरूनें रहावें।**
**गुरूसी पाहावें भक्तपणें॥** स्फु. ओ. २२५–१
**भक्तपणें मज सद्गुरु जोडला।**
**अभ्यास मोडला सर्व कांहीं॥ २॥**
**सर्व कांहीं जावो येक गुरु राहो।**
**माझा अंतर्भावो ऐसा आहे॥ ३॥**

(२) इतकी अनन्य गुरुभक्ति घडण्याला गुरुचरणीं दृढ भाव पाहिजे, गुरुवचनीं पूर्ण विश्वास पाहिजे.

**मुख्य सच्छिष्याचें लक्षण। सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण।**
**अनन्यभावें शरण। त्या नांव सच्छिष्य॥** ५–३–१९

पूर्वी काय विचार करावयाचा असेल तो करावा, परंतु विचार करून गुरुचरणांचा एकदां आश्रय केला म्हणजे मग अनिश्चितपणा उरतां कामा नये. असें म्हणण्याचा वास्तविक प्रसंग न यावा, अशी कल्पना हि मनाला शिवूं नये. पण आज शिरडीस तर उद्यां केडगांवीं व उद्यां केडगांवीं तर परवां गोंदवल्यास आणि अखेरीस घरींच्या घरीं कोरडे च, असा प्रकार पुष्कळदां आढळतो म्हणून म्हणावें लागतें कीं, काय विचार करणें तो एकदां च पुरता करवा,

**येक गुरु येक देव। कोठें तरी असावा भाव॥**

पुन्हां त्यांत धरसोड नको. गुरुचरणांचा आश्रय करणें म्हणजे पतंग उडविणें नव्हे कीं, एक तुटला तर दुसरा जोडला ! त्या मार्गाला च वाटल्यास जाऊं नये, पण एकदां गुरुचरण जोडले म्हणजे प्राणांतीं हि ते सुटूं नयेत. सारें ब्रह्मांड जरी कोसळून पडलें तरी एकदां जेथें दृष्टि जडली तेथून ती ढळूं नये.

**लागतां सद्गुरुवचनपंथें। जालें ब्रह्मांड पालथें।**
**तरी जयाच्या शुद्ध भावार्थें। पालट न धरिजे॥** ५-३-५१

इतकी निष्ठा पाहिजे !

( ३ ) गुरुचरणीं इतकी निष्ठा असल्यावर अहंपणा उरणें शक्य नव्हे. अहंपणानें कोणतें च कार्य साधत नाहीं, उलट चांगल्या कामावर त्याच्या योगानें विरजण पडतें. अहंपणानें लौकिकाची चाड उत्पन्न होते, तो अहंपणा च नष्ट झाला म्हणजे लोकेषणा जिंकली गेली म्हणून समजावें. निष्ठावंत गुरुसेवकाला स्वतःच्या कीर्तीची चाड नसते, त्याला फक्त गुरूचा लौकिक दिसत असतो. सद्गुरूच्या वैभवापुढें आपलें स्वतंत्र अस्तित्व मिरवावें, ही त्याला इच्छा च नसते. लौकिकाची हांव मोठी अनावर असते, तिच्यावर ज्यांनीं पल्याण घातलें असे पांच पंचवीस दासांकित वीर कार्यास लागल्यावर ते आपलें काम बिनबोभाट करीत राहतील यांत शंका नाहीं. तूं थोर कां मी थोर हा वाद जेथें नाहीं तेथें भांडणाचें मूळ च नाहींसें झालें म्हणून समजावें.

**तुजला तूं थोर मजला मी थोर।**
**मी थोर तूं थोर कामा नये ॥** स्फु. ओ. १९७—१

**कामा नये कोणा आंगीं मीतूंपण।**
**पाहा थोरपण ईश्वराचें ॥ २ ॥**

**ईश्वराचें रूप पाहातां निवावें।**
**मीतूंपण द्यावें सोडूनीयां ॥ ३ ॥**

**सोडूनीयां द्यावें तें काय आपणा।**
**शाश्वताच्या खुणा पाहें बापा ॥ ४ ॥**

**पाहें बापा देव कोण निरावेव।**
**दास म्हणे भाव तेथें ठेवीं ॥ ५ ॥**

एक सद्गुरु थोर, बाकी सर्व आपण त्यांचे सारखे च सेवक होत.

( ४ ) हें असें निर्विकार मनानें काम कसें करावें, केवळ कार्यैकदक् कसें व्हावें, याचा कित्ता श्रीसमर्थांनीं च आपल्या पूर्व वयांत धर्मकारणकांड व राजकारणकांड यांत घालून दिलेला आहे. श्रीसमर्थांनीं आपल्या पूर्वचरित्राची किंचित् दिशा पंधराव्या दशकाच्या दुसऱ्या समासांत दर्शविली आहे. धर्मकारण व राजकारण श्रीसमर्थांनीं महाराष्ट्रांत थोडें थोडकें केलें नाहीं, पण नवल हें कीं, त्यांत तें कोठें च सांपडत नाहींत. कार्याचें कर्तृत्व त्यांनीं आपल्याकडे केव्हां च घेतलें नाहीं.

मतें मतांतरें सगट । प्रत्ययें बोलोन करी सपाट ।
दंडक सांडून नीट । वेधी जना ॥ १५-२-१७
नेमकें भेदकें वचनें । अखंड पाहे प्रसंगमानें ।
उदास वृत्तीच्या गुमानें । उठोन जातो ॥ १८ ॥
प्रत्ययें बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकांला ।
नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ॥ १९ ॥
परी तो कोठें आडळेना । कोणे स्थळीं सांपडेना ।
वेष पाहातां हीन दीना । सारिखा दिसे ॥ २० ॥
उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।
तेथें येशकीर्तिप्रतापें । सीमा सांडिली ॥ २१ ॥
ठाईं ठाईं भजन लावी । आपण तेथून चुकावी ।
मछरमतांची गोवी । लागों च नेदी ॥ २२ ॥
खनाळामधें जाऊन राहे । तेथें कोणी च न पाहे ।
सर्वत्रांची चिंता वाहे । सर्वकाळ ॥ २३ ॥

अशी त्यांची काम करण्याची तऱ्हा असे. स्वतःकडे कर्तृत्व न घेतां त्यांनीं लोककल्याणाची चिंता वाहिली.

**करूनि अकर्ते होऊनियां गेले ।**

ह्मणतात, तें असें. आपण हि त्यांचे ह्मणवीत असूं तर आपणांस हा धडा शिकला पाहिजे. केवळ कार्यासाठीं कार्य करावें, सेवेसाठीं सेवा करावी, संशोधनासाठीं संशोधन करावें. कोण करतो याची नुसती वार्ता हि नको.

( ५ ) बोलणें सोपें आहे, करणें फार कठीण आहे. इतकी निस्सीम कार्यैकनिष्ठा असणें सर्व काळीं च कठिण, पण त्यांतल्या त्यांत पडत्या काळांत, अहंमन्यतेच्या काळांत विशेष च कठीण होय. एक प्रसंग आठवतो. एकदां एका संप्रदायप्रसिद्ध क्षेत्राचे ठिकाणीं एका श्रेष्ठ गुरुदासांची भेट झाली होती. त्यांची दिसण्यांत येणारी दिनचर्या विशेष मनांत भरण्यासारखी नव्हती, परंतु क्षणभर त्यांच्याशीं संभाषणाचा योग आल्यावर त्यांच्या विलक्षण गुरुभक्तिप्रेमळ हृदयाची ओळख कोणाला हि पटे. त्यांचें दर्शन, त्यांचें संभाषण, त्यांचा सहवास हीं सर्व च सुखदायक होतीं. एकदां त्यांच्या भेटी-

आलेल्या एका गृहस्थानें त्यांच्या जवळ सहज इच्छा प्रदर्शित केली कीं, आपलें अप्रत्यक्ष दर्शन तरी नित्य घडावें ह्मणून कृपा करून आपला एकादा " फोटो " मिळावा. त्यावर त्यांनीं जें उत्तर दिलें तें फार मार्मिक होतें, तें त्यांच्या उत्कट गुरुभक्तीला साजेसें च होतें, त्यावरून त्यांची श्रीचरणनिष्ठा उत्कृष्ट व्यक्त होते व प्रसंगवशात् ही गोष्ट येथें सांगण्यांत आमचा हेतु इतका च कीं, या त्यांच्या उदाहरणावरून गुरुनिष्ठा किती श्रेष्ठ प्रतीची असावी, याचा आपणांस बोध व्हावा. ते ह्मणाले, " ज्यांना आपली भेट घ्यावयाची असेल त्यांना आपण श्रीसद्गुरुसमर्थचरणांगुष्ठाचे ठायीं भेटूं, तेथें ज्यांना आपण आढळणार नाहीं, त्यांना आपण दुसरीकडे कोठें च भेटणार नाहीं ! फोटोंत काय आहे, श्रीचरणाचे ठिकाणीं दिसत असेन तर पहा व दिसत नसेन तर मी दर्शन घेण्याला आणि देण्याला योग्य च नव्हे ! " यावरून त्यांनीं असें जाणविलें कीं, आपण श्रीगुरुरूपापासून वेगळे नव्हेत, बोलणें, चालणें, वगैरे आपल्या यच्चयावत् सर्व क्रिया तत्स्वरूपपर झाल्या, गार जशी पाण्यांत विरघळावी तद्वत् आपण तद्रूपीं समरस होऊन गेलों ! कल्याणकृत संतमाळेंत आपण व आपले बंधु दत्तात्रय यांचें स्थान कोणतें याविषयीं कल्याणांनीं जे उद्गार काढले आहेत, त्यांची या गोष्टीवरून वाचकांना आठवण होईल; असो.

( ६ ) आपल्या सर्व कार्याला तें च श्रीसमर्थांचें अधिष्ठान कल्पून दासांकित कार्यकारी मंडळानें संप्रदायाची बिनबोभाट सेवा केली पाहिजे. संप्रदायाचें मूळ स्वरूप आज लोकदृष्टीच्या आड झालें आहे, तें दृष्टीसमोर आणून, सर्वांना मार्गदर्शक होईल असें करणें, हें सांप्रदायिकांचें कर्तव्य होय. तें कर्तव्य बजावण्यांत त्यांनीं स्वतःला विसरलें पाहिजे, केवळ श्रीकार्यावर आपली दृष्टि अचल ठेवली पाहिजे, हा मुख्य निर्बंध होय. रामरूप आणि दासरूप हीं एक च होत, ह्मणून ह्मणतों—

लपावें अती आदरें दासरूपीं ।
भयातीत निश्चीत ये सस्वरूपीं ।
कदा तो जनीं पाहतां ही दिसेना ।
सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना ॥ १८५ ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

[ ६१ ]

॥ श्रीराम ॥

# शाम कल्याण

(१) मागील लेखांक ४६ त कल्याणस्वामींच्या डोमगांवमठाची हकिकत देतांना स्वामींच्या ज्या कित्येक शिष्यांची कविता डोमगांवीं मिळाली त्यांचीं नांवें देऊन त्यांची व त्यांच्या कवितेची ओळख पुढें मागें करून देऊं, असें आश्वासन दिलें होतें. त्याप्रमाणें लेखांक ५२ त **सामराज कल्याण** व लेखांक ५७ त **शिव कल्याण** यांचा महाराष्ट्रास किंचित् परिचय करून दिला व आज **शाम कल्याण** यांच्या विषयीं दोन गोष्टी बोलाव्या, असें मनांत येतें.

(२) पूर्वीं अनेकदां सांगितलें त्याची च आणखी एकवार पुनरुक्ति करावयाची कीं, या असल्या टांचणांत साद्यन्त अशी माहिती कोणाविषयीं च देतां येणें शक्य नव्हे. या टांचणांचा हेतु इतका च असतो कीं, त्यांच्या योगानें जास्त संशोधन करण्यास प्रोत्साहन मिळावें व संशोधनाची दिशा कळावी.

(३) प्रस्तुत शाम कल्याण यांचीं अवघीं चार पदें मिळालीं आहेत. त्यांपैकीं दोन सद्गुरुस्तवनपर ह्मणजे कल्याणस्तवनपर आहेत, एक कल्याणांच्या पश्चात् डोमगांवमठपति झालेले मुद्गलस्वामी यांची आरती आहे व चवथें पद उपदेशपर आहे. तीं चारी पदें येथें क्रमशः देतों, कारण तीं सर्वांना आवडावीं अशीं आहेत. शेवटचें उपदेशपर पद तर फार च गोड आहे. गायनकला अवगत असणाऱ्या एकाद्या रामदासी हरिदासांनीं तें ह्मटल्यास श्रोतेजन “ रागा न येतां ” उलट तल्लीन होतील, याविषयीं मला मुळीं च शंका नाहीं.

डोमगांव मठ ] ( १ ) [ बाड ११

**तगतो धणि माझा धणि माझा । कल्याण सद्गुरुराजा ॥ ध्रु० ॥**

**भमहरणीतिरिं साजे । ज्याची समाधि हो विराजे ॥ १ ॥**

ब्रह्मचर्यव्रतधारी । जो कां निसंग निर्विकारी ॥ २ ॥
निस्पृह महंत विरागी । जो कां संगातीत निसंगी ॥ ३ ॥
रामउपासक ज्ञानी । ज्याचे शतपथ तो गुण वानी ॥ ४ ॥
शाम ह्मणे मी ज्याचा । चाकर आज्ञाधारक साचा ॥ ५ ॥

डोमगांव-मठ व दुर्गाबाई ] ( २ ) [ अनुक्रमें बाड २९ व २

धन्य हा सद्गुरुपाणी कल्याण मोक्षदानी ॥ धृ० ॥
माथां ठेउनियां हात । श्रवणीं सांगोनियां मात ।
केला स्वरूपीं येकांत । ऐसी ज्याची पै करणी ॥ १ ॥
होतें पातक वाताहात । केला संसार निःपात ।
शामा ह्मणे जगंनाथ । जेणें दाविला नयनीं ॥ २ ॥

डोमगांव-मठ ] ( ३ ) [ बाड ५६

सगुणस्वरूपें भूतळीं विष्णु अवतार ।
वामनाकृति भास साचार ।
पुण्यपरायण ज्याची कीर्ति अपार ।
वर्णिति बुध जन साधु निर्जर विकार ॥ १ ॥
जय देव जय देव जय मुद्गलस्वामी ।
ध्यान निरंतर राहो मम अंतर्यामीं ॥ धृ० ॥
उत्तम स्थिति कोमळता शांति क्षमा दांति ।
हरिगुरुब्राह्मणपूजा प्रेमळ गुरुभक्ति ।
ध्यान निरंतर हृदई श्रीराममूर्ति ।
भूतदयाघन आर्जव सम सर्वां भूतीं ॥ २ ॥
बहु श्रमहारक ह्मणुनी नामें श्रमहरणी ।
पूर्ण तटाकीं वास केला गुरुचरणीं ।
निरुपम निज महिमा हे अगणित गुणखाणी ।
शाम ह्मणे कल्याण पावन तव चरणीं ॥ ३ ॥

डोमगांव-सावळाराम ] ( ४ ) [ बाड ९

पावन जन्मा नर आला परि उपाय नाहीं केला ।
गृह धन जाया संपत्ति देखुनि भुलला त्या विषयांला ।
देहमद अंगीं भरला ताठागर्वें उन्मत जाला ।
अंतीं येमजाचणी मोठी कोण सोडवी त्याला ॥ १ ॥

ऐसें मज सांगा मज सांगा येउं नका तुह्मि रागा ॥ धृ० ॥
लटिकी माया नश्वर काया भोगिती नाना भोगा ।
चंदन चोवा कस्तुरि बुका केशर लाविती अंगा ।
नाना पुष्पें सुगंध तेलें करिती हो अभ्यंगा ।
सेवटिं रक्षा होइल याची येइल कोण्या हें उपेगा ॥ २ ॥
कोठ हुडे नर बांधिती बळकट रक्षण चौकीदार ।
पालखी वहिली वाजी वारण संनिध तो दळभार ।
लोडें तिवाश्या आणि जमखाने भोगिती सौख्यें फार ।
ऐसें वैभव टाकुनि जाती सेखीं कोणाचा आधार ॥ ३ ॥
ऐसे नानापरि उपभोग भोगिती अवघे पाहीं ।
मी मी ह्मणती नर अभिमानें स्वहित न जाणती कांहीं ।
गेलें पळपळ निघोनि आयुष्य पडिले भवप्रवाहीं ।
सर्वांसी हरिनाम तारक तें कां कळलें नाहीं ॥ ४ ॥
शामदास ह्मणे अरे तूं मना सावध हो सज्ञाना ।
भावें शरण जातां गुरुसी चुकेल यमयातना ।
निश्चळ निजपद भोगीं अक्षै सायोज्यकल्याणा ।
येणें जाणें मग तुज नाहीं सत्य चि हें निधाना ॥ ५ ॥

(४) हीं चार पदें वाचल्यानंतर वाचकांना असें वाटत नाहीं काय कीं, शाम कल्याणांनीं कांहीं एवढीं च चार पदें केलीं नसावींत! आणखीं अशीं किती तरी पद्यें त्यांनीं केलीं असलीं पाहिजेत! हे शाम कोठील, कोण, हें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. मागील लेखांक ५० त कल्याणांच्या महंतांची जी यादी दिली आहे, तींतील ३७ वे महंत शामजी गोसावी जवळेकर हे च बहुधा आपले शाम असावेत, असें वाटतें. समर्थप्रतापाच्या दहाव्या समासांतील ८६ व्या ओवींत कल्याणांच्या " परमार्थपंथें विचरणाऱ्या " शिष्यांमध्यें शाम यांचा समावेश केलेला आढळतो.

(५) या माहितीच्या दृष्टीनें सांप्रदायिकांनीं जास्त संशोधन करावें.

१८३९ अ. भाद्रपद शु. ११

[ ६२ ]

॥ श्रीराम ॥

# अंगलाई देवी

अंगापुरच्या डोहांतून श्रीसमर्थांनीं दोन मूर्ति काढल्या : एक श्रीरामाची व दुसरी देवीची. श्रीरामाची स्थापना चाफळीं केली व देवीची सज्जनगडावर केली. तिला च अंगलाई देवी ह्मणतात. श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिमा मनाच्या श्लोकांच्या पुस्तकांत मागें च दिलेली आहे. देवीची प्रतिमा देणें राहिली होती, ती आज देत आहे.

मूर्ति महिषासुरमर्दिनीची असून सायुध चतुर्भुज आहे. वरच्या डाव्या हातानें महिषाची जीभ आसडून धरली आहे. महिष बसलेला असून त्याच्या पाठीवर श्रीचा डावा पायआहे. असें हें मनोहर ध्यान आहे.

प्रतापगडची रामवरदायनी देवी अष्टभुजा आहे. तिची प्रतिमा रा. ब. दत्तात्रय बळवंत पारसनीस यांच्या ' इतिहाससंग्रहांतील ' २० व्या ऐतिहासिक स्फुट लेखासोबत आलेली आहे. तिजविषयीं किंचित् विशेष माहिती आज च पुढील लेखांकांत देण्याचें योजिलें आहे.

---

[ ६३ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीरामवरदायनी

**प्रसिद्ध तुळजा माता । श्रीरामवरदायनी ।**
**कुळासी पाळिलें मुळीं । आतां आह्मासी पाळिते ॥**

( १ ) श्रीरामवरदायनी ह्मणजे मूळची खरोखर तुळजाभवानी होय. तिला श्रीरामवरदायनी हें अभिधान कसें प्राप्त झालें याची उपपत्ति ग्रन्थांतरीं कोठें आहे कां नाहीं, तें मला माहीत नाहीं, पण कोणच्या तरी एकाद्या पुराणांत हा कथाभाग आला असावा, असें वाटतें. या नांवाची उपपत्ति

श्रीसमर्थांनीं मात्र ६७ व्या स्फुट प्रकरणांत दिली आहे. राम आणि लक्ष्मण हे सीताशुद्धीसाठीं हिंडत असतां एकदां त्यांची वनामध्यें एका रूपलावण्य-संपन्न अशा कुमारीशीं गांठ पडली. न्यायनीतिप्रवर्तक व धर्मसंस्थापक असे ते सूर्यवंशींचे विख्यात राजे

**परस्त्री नाणिती दृष्टी ॥**

हें काय सांगावें ! तिचा आणि त्यांचा संवाद झाला त्यांत

**मनाच्या कामना होती । सीताशुद्धी करा तुह्मी ॥**

असा तिनें त्यांना वर दिला व तिला

**जननी रामवरदानी । तधीपासुनी बोलिजे ॥**

( २ ) क्षात्रधर्माची श्रीसमर्थांची जी सुप्रसिद्ध शिकवण आहे, तिच्या शेवटीं हि या नांवाची अशी च उपपत्ति दर्शविली आहे. ती शिकवण, अशुद्ध रीतीनें कां होईना, पण इतरत्र छापलेली असल्यामुळें पुष्कळांच्या अवलोकनांत आहे. आपल्या मालेंत ती अजून छापावयाची आहे. तिच्या शेवटीं श्रीसमर्थ ह्मणतात:—

**विवेकविचारसावधपणें । दीर्घ प्रेत्न केला चि करणें ।**
**तुळजावराचेनि गुणें । रामें रावण बुडविला ॥ १९ ॥**
**ऐसी हे तुळजाभवानी । प्रसन्न रामवरदायेनी ।**
**रामदास ध्यातो मनीं । इदं निमित्य ॥ २० ॥**

आणि श्रीसमर्थांनीं तुळजाभवानीवर जितकीं ह्मणून स्तोत्रें रचिलीं आहेत त्या सर्वांत बहुधा श्रीरामवरदायनी हें विशेषण आलेलें आहे.

( ३ ) या संबंधांत ३६ व्या स्फुट प्रकरणाची आज आठवण व्हावी हें अगदीं साहजिक आहे. हें प्रकरण ह्मणजे तें, ज्यांत शिवरायानें धर्मस्थापनेसाठीं ऐहिक वैभवाचें शिखर गांठलेलें आपण पहावें, अशी श्रीसमर्थांनीं अत्यन्त आतुरतेनें तुळजामातेची प्रार्थना केली आहे ! श्रीसमर्थांनीं केलेली प्रार्थना वायां कशी जाईल ! जसें ज्याचें पुण्यबल तशी त्याची इच्छाशक्ति परिणामकारक असते ! परमेश्वरानें आपलें ह्मणणें ऐकावें, असें आपणांस वाटत असेल तर, आपण परमेश्वराचे लाडके व्हावें, अनन्य भक्त व्हावें ! ह्मणून मनाला वारंवार विषाद वाटतो कीं, आत्मोद्धाराचे बहुविध प्रयत्न चालू असतां, या च प्रयत्नाकडे तेवढें आपलें दुर्लक्ष व्हावें, हें ठीक आहे काय ? किंबहुना, इतर सर्व प्रयत्नांना या प्रयत्नाचें अधिष्ठान पाहिजे ! श्रीसमर्थांच्या,

आतां सर्वतोमुखीं झालेल्या, त्या ओवीचा अर्थ असा च होतो ना ? असो. तुळजाकुलदेवतेनें आपणांस लहानाचे मोठे कसें केलें तें सांगून श्रीसमर्थ ह्मणतातः—

सदानंदीं उदो जाला । सुखसंतोष फावला ।
पराधेनता गेली । सत्ता उदंड चालिली ॥ ८ ॥
उदंड ऐकिलें होतें । रामासी वरु दीधला ।
मी दास रघुनाथाचा । मज हि वरदायेनी ॥ ९ ॥

रामाला जर तुळजाभवानीनें वर दिला होता, तर रामाच्या दासाला ती वरदायनी कां न होईल ? तुळजेच्या वरानें रामानें रावणाला बुडविलें आणि श्रीसमर्थांनीं कोणता वर मागितला होता ?

येक चि मागणें आतां । द्यावें तें मजकारणें ।
तुझा तूं वाढवीं राजा । सीघ्र आह्मा चि देखतां ॥ १७ ॥
दुष्ट संव्हारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों ।
परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवीं ॥ १८ ॥
देवाचीं राहिलीं सत्वें । तूं सत्त्व पाहसी किती ।
भक्तांसी वाढवीं वेगीं । इछा पूर्ण परोपरीं ॥ १९ ॥
रामदास ह्मणे माझें । सर्व आतुर बोलणें ।
क्षमावें तुळजे माते । इछा पूर्ण चि ते करीं ॥ २० ॥

श्रीसमर्थांची ही इच्छा त्यांच्या डोळ्या देखत कशी पूर्ण झाली हें सर्वांना विदित च आहे.

( ४ ) श्रीसमर्थांनीं जी जी इच्छा करावी ती ती तुळजामातेनें पुरवावी. अनन्यगतिक मुलाचे लाड माते वांचून कोण पुरविणार !

बाळका वाढवी माता । जेथें तेथें परोपरीं ।
स्वभावें जीवीचें जाणे । अंतरीं विवरे सदा ॥ ३७-१ ॥
बाळका बोलतां येना । हीत तें हि कळेचिना ।
हेंकाड बावळें वेडें । मातेला प्रिय होत असे ॥ २ ॥
अन्याई अवगुणी खोडी । कुश्चीळ रडतें सदा ।
अंतरीं माय लोभाळु । लोभें गुणासी वाढवी ॥ ३ ॥
नागिवें उघडें लोळे । हागे वोके अव्हासव्हा ।
तैशास नेटकें दावी । लेववी नेसवी सदा ॥ ४ ॥
मातेचा कळवळा मोठा । लोभासी तुळणा नसे ।
आळसेना विसंभेना । कंटाळेना कदापि हि ॥ ५ ॥

**त्रैलोक्य बाळका पाळी । वाढवी शाहाणें करी ।**
**कुळें चि पाळिलीं किती । कुळदेव्या ह्मणोनियां ॥ ६ ॥**
**त्रिलोकीं पुरली आहे । त्रैलोक्यजननी पहा ।**
**ते चि हे तुळजामाता । भक्तांसी पाळिते सदा ॥ ७ ॥**

अशा मातेला सर्वांनीं अनन्यभावें शरण असावें !

( ५ ) आपल्या मनांत जसें येतें ना, तसें च श्रीसमर्थांच्या हि मनांत येत असे.

**समर्थ भवानी माता । समर्थां वरु दीधला ॥**

इत्यादि गोष्टी आपण उदंड ऐकिल्या आहेत, पण आपणांस तशी कांहीं प्रचीति हवी ना ?

**मला तों प्रत्ययो नाहीं । मानेना या च कारणें ।**
**मानेना अनुमानेना । काय कैसें कळेचिना ॥ ६७-४४**

आपण तरी आज असें च ह्मणतों कीं नाहीं ? फरक इतका च कीं, त्यांचें हें म्हणणें स्वतःसाठीं नसून केवळ तुमच्या आमच्या साठीं आहे, निदान त्यांना प्रत्यय आला आणि आपण मात्र बहुधा असें च म्हणत राहणार ; ऐकलेल्या गोष्टीचा समर्थांना प्रत्यय आला. ते म्हणतात, आपण

**अंतरीं कल्पना केली । येकांतीं बोलिलों बहु ॥**

काय, तर

**रक्षिता देव देवांचा । त्याचा उछाव इछिला ॥ ४५ ॥**

अशी त्यांनीं इच्छा केली व ती त्यांची इच्छा पूर्ण झाली.

**इछा पूर्ण करी माता । वाढवी बहुतांपरीं ।**
**दयाळु मयाळु माता । स्वभावें जाणती कळा ॥ ४६ ॥**
**जीवींचा पुरला हेतु । कामना मनकामना ।**
**घमंड जाहलें मोठें । घबाड साधलें बळें ॥ ४७ ॥**

इतकें च काय, पण

**बोलतां भवानी माता । महींद्र दास्य इछिती ।**
**बोलणें हें प्रचीतीचें । अन्यथा वाउगें नव्हे ॥ ५२ ॥**

असे श्रीसमर्थांचे प्रतीतीचे बोल आहेत.

( ६ ) श्रीरामाला वर देणारी तुळजापुरची जी भवानी ती च प्रताप-गडावरील देवी होय. तुळजापुर मानेना ह्मणून तें सोडून जगन्माता प्रताप-गडीं येऊन राहिली.

**तुळजापुर ठाकेना । चालिली पश्चिमेकडे ।**
**पारघाटीं जगन्माता । सह्य येउनी राहिली ॥** ३६-११

प्रतापगडचा किल्ला शक १५७८ त बांधला गेला व किल्ल्यावर देवीची स्थापना शक १५८३ मध्यें श्रीसमर्थांच्या सांगण्यावरून झाली, असें

**रामवरदायनी माता । दासें धुंडुन काढिली ॥**६७-४७


या वचनावरून माझें अनुमान आहे.

**प्रतापगिरीचे ठाईं । आदिशक्ती विराजते ।**
**कामना पुरती तेथें । प्रचीती रोकड्या जनीं ॥** ६७-२२
**तुळजापुरीची माता । प्रतापें चि प्रगटली ।**
**आदिशक्ती माहंमाया । कुळींची कुळस्वामिणी ॥ २३ ॥**

तुळजापुरची मूळची श्रीरामवरदायनी देवी च प्रतापगडीं प्रगट झाली. असा प्रतापगडावरील देवीच्या स्थापनेचा इतिहास आहे.


**( ७ )** ही स्थापना श्रीसमर्थांनीं करविली या माझ्या अनुमानाला बळकटी आणणारें एक प्रत्यंतर उपलब्ध झालेलें आहे. बोरगांवच्या चिटणीसांच्या दप्तरांत एक महत्त्वाचा अस्सल मोडी कागद मिळाला आहे, तो असा:--

श्री













तळीखाली

चंदरराव मोरे याणी सीके प्रतापगडी वरदायनी

देवीचे गल्यात सीके बांधून राज्य गेले ते वेलेस ठेविले ते तैसे च होते ते ग्राट साहेब इंग्रेज याणी पाहावयास आणवीले ते जावलीचे मामलेदारानी पाठवीले ते हे उठवीले छ २१ सवाल सुा इहीदे अशरीन मया तैन व अलफ तारीख १ आगष्ट सन १८२० इसवी

हे शिक्के आजपर्यंत अनुपलब्ध होते. दोन शिक्के व दोन मोर्तब आहेत. मोर्तबांतील मजकूर एक च आहे, पण शिक्क्यांत शब्दांचा किंचित् फरक आहे, अर्थ मात्र एक च आहे. ऐतिहासिक दृष्ट्या हे शिक्के फार महत्त्वाचे आहेत. शिक्क्यांतील एकोन एक शब्द व श्रीसमर्थकृत श्रीरामवरदायनीचीं स्तोत्रें व इतर उल्लेख हीं मननपूर्वक वाचून व ताडून पाहून मला असें निश्चित वाटतें कीं, या शिक्क्यांतील प्रत्येक शब्द श्रीसमर्थांचा आहे, हे शिक्के श्रीसमर्थांच्या आज्ञेवरून पाडले आहेत. तीं स्तोत्रें स्वतः वाचून वाचकांनीं आपआपल्यापरी निश्चय करावा.

( ८ ) भवानीच्या स्तुतिपर श्रीसमर्थकृत दोन अप्रकाशित पदें उपलब्ध झालीं आहेत, तीं योजिल्याप्रमाणें या ठिकाणीं वाचकांस सादर करितों. त्यांपैकीं दुसरें पद,त्यांतल्या त्यांत,आजच्या प्रसंगाला विशेष अनुरूप असें आहे.

डोमगांवमठ ] ( १ ) [ बाड १३ वें

**पवित्र ठाणक[1] । माहोर । दुसरें तुळजापुर ।**
**तेथें नांदती । सुंदर । संताचें माहेर ॥ १ ॥**
**अंबे नाम तुझें । चांगलें । मन माझें रंगलें ।**
**मी तरी तुझें वो । बाळक । न करीं जन पांगिले[2] ॥ ध्रु०**
**तिसऱ्यानें गाईन मी । आंउद । लागला तुझा छंद ।**
**मूळपीठ सीखरीं । भवानी । तूं माझी स्वामिणी ॥ २ ॥**
**चौथ्यानें गाईन मी । रेणुका । सप्तश्रीचंडिका ।**
**गोंधळ घालीन मी । भवानी । ध्यान तीहीं लोका ॥ ३ ॥**

---

१ ठाणक = एकाद्या दैवताचें स्थान. २ पांगिला=ज्याच्या गरजा दुसऱ्यानें भागवाव्या असा. मला परस्वाधीन करूं नकोस, मला लोकांच्या तोंडाकडे पहावयास लावूं नकोस, असा या चरणाचा भावार्थ दिसतो.

तुज मी ध्यातसे । आंतःकरणीं । तूं माझी स्वामिणी ।
दास करितसे । विनवणी । दोन्ही कर जोडुनी ॥ ४ ॥

(२)

आश्विन शुद्ध पक्षीं । अंबा बैसली सिंह्यासनीं वो ॥
प्रतिपदेपासुनि । घटस्छापना करुनि वो ॥
नवरात्रीं बैसली । घटस्छापना करुनी वो ॥
मूळमंत्रें करुनी । दैत्य मारिले निर्वाणीं वो ॥ १ ॥

उदो ह्मणा उदो ह्मणा । अंबाबाई माउलीचा वो ॥
आनंदें नाचती । काये वर्णूं महिमा तिचा वो ॥ ध्रु० ॥

द्वितीयेचे दिवसीं । मिळती चौसष्ट योगिणी वो ॥
सकळांमाजी श्रेष्ठ । फरेशरामाची जननी वो ॥
कस्तुरीमळिवट । भांगीं सेंदुर भरुनी वो ॥
उदकारें गर्जती । सकळ च्यामुंडा मिळोनी वो ॥ २ ॥

त्रितीयेचे दिवसीं । बाईनें सीनगार मोडिला वो ।
सेली व पातळ । चोळी वरिता हार मुक्ताफळा वो ॥
कंठीचें पदक । कासे पीतांबर पीवळा वो ॥
अष्ट भुजा शोभती । बाईची दिसती सुंदर कळा वो ॥ ३ ॥

चतुर्थीचे दिवसीं । विश्वव्यापक भोवानी वो ॥
नवरात्र करिती । निराहार निर्वाणी वो ॥
त्यांसी तूं प्रसन्न । जगन्माता मनमोहनी वो ॥
भक्तांची तूं माउली । सुरवर येती लोटांगणी वो ॥ ४ ॥

पंचमीचे दिवसीं । व्रत उपांग ललिता वो ।
भक्तां पुनःस्कार । तुझें चिंतन करिता वो ।
नीसींचे समईं कीर्तन । जागरण हरिकथा वो ।
आनंदें नाचती । प्रेम आलेंसे निजभक्तां वो ॥ ५ ॥

षष्ठीचे दिवसीं । भक्तां आनंद वर्तला वो ।
करीं घेउनी दिवट्या । हरुषें गोंधळ घातला वो ।
कवडीया दर्शनें । हार मिरवे मुक्ताफळा वो ।
जोगवा मागतां । प्रसन्न जाली निजभक्तां वो ॥ ६ ॥

सप्तमीचा दिवसीं । सप्तशृंग गडावरी वो ।
तेथें तूं राहासी । भोंवतीं पुष्पें नानापरीं वो ।
जाई जुई सेवती । पूजा रेखिली बरवी वो ।
पडणी पडतां । झेलुनी घेसी वरिच्या वरी वो ॥ ७ ॥

अष्टमीचा दिवसीं । अष्टभुजा नारायेणी वो ।
श्रीरामवरदायनी[१] । सींह्याद्रीपर्वतीं वो ।
मन माझें मोहिलें । शरण आलों तुजलागुनी वो ।
स्छनपान घेउनी । सुखें निवालों अंतकर्णीं वो ॥८॥

नवमीचे दिवसीं । नवां दिवसांचें पारणें वो ।
सप्तशतीचा जप । होमहवनादि करुनी वो ।
आच्यार्या ब्राह्मण । तृप्त केला जगदंबेनें वो ।
पक्वान्ननैव्यद्ये । केलें कुमारीपूजन वो ॥ ९ ॥

दसमीचे दिवसीं । अंबा सीलगनां निघाली वो ।
अश्वारूढ होउनी । करीं शस्त्रें झळकती वो ।
मारिले दानव । शुंभ निशुंभ ऐसे किती वो ।
रामीरामदासां । बाईनें धरियेलें हातीं वो ॥ १० ॥

( ९ ) सरते शेवटीं, असें वाटतें, आपण हि आपली इच्छा, आजचा सुमुहूर्त पाहून, श्रीसमर्थांच्या च शब्दांत, श्रीरामवरदायनीचे चरणीं निवेदन करणें वावगें होणार नाहीं. ती पूर्ण होणें न होणें सर्वस्वीं त्यांच्याकडे आहे.

अंतरीं कल्पना केली । येकांतीं बोलिलों बहु ।
उद्धर्ता राष्ट्रधर्माचा । त्याचा गौरव इछिला ॥

---

धुळें–१८३९ विजया दशमी

---

१ मुळांत हें चरण गळालेलें आहे. प्रस्तुतचें चरण योजिलें आहे. बरोबर असेल काय ?

[ ६४ ]

॥ श्रीराम ॥

# बरोबर शंभर वर्षांमागची सांप्रदायांतील शिकवण

शक १५४९ त श्रीशिवछत्रपति जन्मास आले व तेव्हां च या सांप्रदायाचा आरंभ झाला असें ह्मणावयास हरकत नाहीं; कारण श्रीसमर्थांचे पहिले शिष्य उद्धव स्वामी त्या च सुमारास श्रीसमर्थांच्या आशीर्वादेंकरून जन्मास आले. या सांप्रदायाचा इतिहास लिहिण्याची जेव्हां वेळ येईल तेव्हां त्याचे तीन ठळक भाग पाडावे लागतील: ( श्री ) १५३० ते १६०३ पर्यंतचा श्रीसमर्थांच्या प्रत्यक्ष अवताराचा काळ, ( रा ) १६०३ ते १७३९ पर्यंतचा महाराष्ट्रराज्याचा काळ व ( म ) १७३९ ते १८३९ चा नंतरचा काळ. आपलें हल्लीं जें संशोधन चालू आहे तें पहिल्या दोन च काळाविषयीं होय. त्या काळांतील सांप्रदायाचा इतिहास लिहिण्यास उपयोगी पडणारीं जीं जीं साधनें हस्तगत होतील तीं तीं प्रकाशित होणें अत्यंत आवश्यक आहे. दुसऱ्या काळाच्या अगदीं अखेरचीं व तिसऱ्या काळाला आरंभ होण्याच्या वेळचीं चार लिखितें श्रीसमर्थदासांकडून आह्मांकडे आलीं आहेत. तीं त्यांना आत्मारामसहाराजांच्या येकेहाळीमठांत मिळालीं. आत्माराम महाराज केवढे महान् साक्षपी होते याची साक्ष त्यांचा प्रचंड ग्रन्थ **दासविश्रामधाम** च देत आहे. हीं चार लिखितें चार जीर्ण कागदांच्या तुकड्यांवर आहेत.

पहिला कागद आत्माराम महाराजांनीं आपल्या समस्त शिष्यवर्गास लिहिलेलें पत्र आहे व दुसऱ्या तीन कागदांत त्यांनीं आपल्या शिष्यांना व्यक्तिशः केलेला उपदेश आहे. त्यांपैकीं पहिल्या कागदाचा मथळा फाटला आहे, दुसऱ्याच्या शिरोभागीं '२ शडिंब' व तिसऱ्याच्या शिरोभागीं '३ कलबरगा' असें लिहिलेलें आहे. यावरून असें अनुमान निघतें कीं, महाराजांनीं आपल्या इतर ठिकाणच्या हि शिष्यांना अशीं सूचनापत्रें पाठविलीं असलीं पाहिजेत. पण तीं आपणांस उपलब्ध नाहींत. दुसऱ्या कागदाच्या शेवटीं " माघ शुध दशमी ईश्वर नाम संवछर " व तिसऱ्याच्या शेवटीं " ईश्वर नाम संवछर माघमास " असें आहे. शक १७३९ ला ईश्वरनाम संवत्सर होता व तो च हा संवत्सर असला पाहिजे, कारण त्या नंतरच्या ईश्वरसंवत्सरीं आत्मारामसहाराज नव्हते व पूर्वीच्या ईश्वरसंवत्सरीं असल्यास बाल असतील. त्यांचा **दासविश्रामधाम** ग्रन्थ १७२५ च्या सुमाराचा आहे.

मला असें वाटतें कीं, आपला अंतकाळ समीप आला असें जाणून सर्व शिष्यांना एक सामान्य उपदेशपत्र व ठिकठिकाणच्या शिष्यांना निरनिराळीं

सूचनापत्रें अशीं हीं आत्माराममहाराजांनीं पाठविलीं असावींत. आत्माराममहाराजांचा अधिकार पाहतां त्यांचीं वचनें, त्यांचा उपदेश, त्यांच्या सूचना ह्या आज हि आपणांस बोधप्रद आहेत. त्या सर्व उघड आहेत, त्यांच्या स्पष्टीकरणाची आवश्यकता दिसत नाहीं. सांप्रदायिकांना अनुसरण्यासाठीं व इतिहासभक्तांना अनुमानें काढण्यासाठीं ते चारी कागद येथें देतों. सर्वांनीं त्यांचें मनन करावें अशी विनंति आहे.

१ ] श्रीरामसमर्थ

जयराम शडिंबसह

चिरंजीव विजयवंत परमार्थमंडळीस प्रति आत्माराम गोसावी असिर्वाद उपरी समर्थस्वामींचे ग्रंथादिश्रवणचर्चामनन करित आहा सकळ धर्म विदित होत च आहे मु+वळख क्रिया वरून आहे प्रस्तुत ॥ वोवीवचन आमुची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी । आमुच्यामागें रघुनाथासी । भजत जावें ॥ १ ॥ तंववरी रे तंवरी न घडे आवज्ञा । जंव ते कांहीं आज्ञा केली नाहीं ॥ १ ॥ कोणाचें मन मोडू नये मागणेचा तगादा लाऊं नये जे काय देतील ते चि घ्यावें इत्यादिक ऐसीं वचनें समर्थांची बहुतादि + + + + + स आले सांभाळ करणें अगत्य आता श्रीमंत लोक व सरदार लोक व धनवंत लोक जमीदार उदमी साहुस सवाल करावी तर कोण्या येक स्थळी प्रवेश च नाहीं कोठें अनहित प्रयोग करणारे कोठे हितशत्रुत्व करणारे कित्तेक स्थळी मत्तस्छी आटोपिले आणि थोर बला हे च कीं वाचाळलुबऱ्यानी लोभ्यास आवडतें ज्ञान नाना कापव्य वचन सिकविले आहेत ते चि पुढें पडत आहे कोणाचें म्हणणें हे च कीं द्रव्य इछील तो साधु नव्हे कोणी देव चि देणारा कोणी सित्धी अनुसरा कोणी तुम्ही चिंतिलें अपसया होईल कोणी देणार घेणार कोण. कोणी उपासना काशास पाहिजे ऐसें ठकपणाचे लक्षणानें बोलत आहेत त्यास हित सांगावें तर वाद उठतो काशासाठी मागतात हे ध्यानास आणीत नाहींत यास्तव आपण मागण संक्षे केलियां सर्व सौख्य जालें आंणीक येक समर्थाचें सिकवण कीं देह धड असतां उपासनेस विघड होऊं नये कांहीं गुरुसेवा घडावी यास द्रव्यांविण उपाय नाहीं पारंपर्य + + चालत आलेली पत्धती राहविता येत नाहीं यासि युक्ति ह्मणावीं तर सत्शिष्यलोकांनीं इलाज प्रयत्न अनकुल असलीयां वंचना

करीत नाहीत भक्तवर्ग असतील ते सेवा इछित च आहेत आसोन विन्मुख होत नाहीत भले परोपकारी लोक जे बोलून चालून स्वअंगे स्वहित जाणोन सानकुल करितील निखळ देखोवेखांचे ठकडे असतील त्यांचें अवलक्षण पुढ पडणार नाहीं हे असो निःशेष द्रव्यांशाचा त्याग च करावा तर साधुसंताच्या चित्तास येणार नाहीं संतोषवृत्तीन होईल ते होवो तुह्मास सुचवण हें च कीं अपूर्व नरदेहास येऊन परमार्थ विदित जालें आहे सावधपणान वृत्तीस सांवरून इहपरस्वहित संपादून कीर्तिवंत व्हावे येविषई समर्थआज्ञा कीं शिष्यलोकांस बुद्धिवाद सांगावा तिरस्कार करू नये हितचिंतन करावें नानापरीन सांभाळावे यास्तव उघड लिहिलें असे यद्यपि मज पामराला बलत्कारे करून मारुतिरा (यानी) गुरुत्व दिल्हाकरितां सलक्षणी क्रिया उमटली नाहीं ज्या योगे परमार्थ विटून बहुताचें मन मोडे ऐसा छंद केला मनधरणी करायाची सोय थोर थोर वळावयाची सोय कळली नाहीं परंतु समर्थस्वामीचा सांप्रदाय जगप्रसिद्ध आहे आणि मारुतिराय साह्य करायास सिद्ध आहे तिकडे लक्ष देऊन एवं जन्माचें सार्थक करून घ्यावें साधुसंत आप्तवर्ग हितचिंतक जे असतील त्यास प्रयत्नपूर्वक नमन अशिर्वाद सांगावें श्रीरामस्थापना व सज्जनगडयात्रेचा हेतु राहिला तो घडवायाचा हरीइत्छा संकट आणि संशय अनुमान अश्रद्धा दृष्टीस न आणावे ॥ कांहीं कामनेचा अडताळ असलेया अंतरी च अंतरी लाज न धरिता उच्चार करावे ह्मणिजे साध्य असाध्य कळोन सन्मार्ग मोकळा होईल आणि गु ( रुत्छा ) न पाहवया + + + रटाचा दर्शन करावया प्रशस्त यो + + + + + + + +

२ ] ( श्रीरामसमर्थ )

( दोन ओळी फाटण्यांत गेल्या आहेत )

+ + + + + + णें चा ( तुर्यल ) क्षणें अनुमान स + + + + + न धरणे त + + दयाळु श्रीराम (स)मर्थ आहे कळावें ॥

१ अनंत मौनी ॥ श्रवण मनन करून क्रिया लक्षात आणणे ॥ अनाधिकाऱ्यास राग करणें सांगणें अगत्य नाहीं ॥ जें कांहीं सांगणें स्वहितास जाणावें ॥ मानसीक तरी सेवचा

ह्व्यास असावा ॥ रामजन्म व ळळीत व वान्नरकाला पा-
ठांतर करणें ॥ देव करील तरी उत्छाव समीप आला ॥

१ पांडुरंगभट्ट ॥ कळल आहे तितुक्यात सौख्य मानून सन्मार्गी वर्ताव सकळ जाणावें

१ पांडुरंगभट्ट ॥ दासबोध लिहिणें जाला आसेल किंवा बाकी आसेल ॥ येथवर येऊन जाणे ॥ चैत्री उत्छावाचा योग घडलीया उत्तम नाही तर गंगायात्रेस जाण आहे

१ श्रीनिवासभट्ट ॥ कोणत्या ही येक दीक्षामध्ये राहिला चिंता नाहीं ॥ मनानें तरी गुरूस गुरुस्थानी उपासना चालायास सुकृतबळानें हितचिंतन करणें ॥ मार्तोडभट्ट व शंकरभट्ट यास परमार्थ ध्यानात राहेसारिख बुद्धिवाद सांगणें ॥ मार्गास लागून परतणें आश्चिर्य आहे ऐस न व्हावें + + + येक विश्वासानें सर्व सफळ आहे

१ जी + + ॥ नेम निष्ठा संपादून सौख्यपद पावावें ॥ इष्ट-मित्रास नमन व आशीरवाद सांगणे भरवसा केला तो दे-वानी सत्य करो

१ कृष्णाजीनाा ॥ येक जाणण्यात सर्व ही आहे अप्पाराव मं-डळीसहित कासीस गेला किंवा कोठें आहे कळल नाहीं वर्तमान कळवणें ॥ यजमानास व शरणबसप्पास पत्र पो-ह्चाउन मिष्ट भाषणेन वृतांत सांगणें ॥ नारायणराव उप-नाव मंठाळ यास आशीरवाद सांगणें

१ रुक्मिणीबाई ॥ कीर्तिवंत होणें

१ महिपती ॥ येक बुद्धिच्या ठाई सर्व योचना सर्व जाणणें सर्व विहिताचार कळत आहे ॥ जे कमाई करावी ते होयाचे दिवस हे च आहेत ॥ आळस आश्रत्धा कामाच च नव्हे ॥ सदरी लिहिलं ते धानास आणणें ॥ वासुदेव नाईक व ताई व विठोबा नाा व कासप्पा ॥ कोठे आहेत कळल नाही भेटीस ही फार दिवस जाले भेटतील तर आशीरवाद सांगणें ॥

१ केशवराव ॥ रुबरु जे सांगायाच सांगीतल च आहे ॥ गुरु-स्थानाकडील स्थिति गती विदित चि आहे ॥ सर्वत्रास

इतुक ही लिहिणे + + + होत परंतु + + तेनें लिहिल आसे + + + + + या + + + + फिरणारा + + + + + + + + असिरवाद + + +

( आरंभाच्या च मागच्या येथील दोन ओळी फाटण्यांत गेल्या आहेत. )

३ ] २ शडिब

ग घडुन सर्वानुमत येकवटलीया रिक्तहस्ताचा परमार्थ साधन सांग न घडल्याचा व अपराधस्मरणेचा व सीक्षेचा अनुमान संशय विकल्प न धरणे तारिता दयाळु श्रीराम समर्थ आहे कळावें ॥

१ कृष्णाजी ॥ जे सांगायाच सांगीतल आहे स्मरणात असो देणे ॥ इष्टत्व मंडळीस नमन सांगावे ॥ तुमच्या मंडळीसह इकडील जे आसतील त्यास आशीरवाद सांगणे

१ इसण्णा ॥ कमाई सर्व सफळ होय

१ उमापती ॥ सर्वत्रास लिहिल ते चि आपुल

१ अंबका ॥ नामी प्रीत फार असावी

१ शिवप्पा ॥ नेमनिष्ठेनें वर्तोन कीर्ति करावी

१ कृष्णाजी मदनीकर ॥ स्मरण आसो देणे

१ चंदना ॥ उदार भावानें येश घ्यावा

१ अश्वत्थभट्ट ॥ सर्वत्रास आसिरवाद पोहचावणे

१ भवानीबाई ॥ सर्व सार विश्वास होय

२ गिरेम्मा व कमळप्पा ॥ विचारवंतास सर्व सुलभ आहे जन्म साफल्य करून घ्यावें ॥

१ भीमराव ॥ जाणता होऊन वर्तावें नाम करावें

विशेष काय लिहिणें आपुल्या आपल्या सौख्य समाचार प्रत्योत्तरी विदित करावें ॥ छ ॥

माघ शुध्द दशमी ईश्वर नाम सवछर

४ ] ३ कलबरगा

१ श्रीपती ॥ सर्वसार भजन भक्ति आहे त्यास न विसंबणे योग घडलीया भेट घेऊन जाणे इष्टमित्रमंडळीस नमन आशीरवाद सांगणे ।

१ विठोबा बरेगाल ॥ भक्तीचा जिव्हाळा जाणे तो पुरुष धन्य त्यास इहपर सौख्य काय उणें ॥ सदरी लिहिल ते ध्यानात आणोन विश्वासास भरते करणे सीनपास. आशीरवाद सांगणे भोळ्यापणानें जे होयाच जाल आहे जालें ते घट्ट आसावें इष्टमित्रास क्षेम सांगणें

१ बाळा सुलतानपूर ॥ वृत्तीस पालट होऊ न देणे

१ दिवाकरपंत पदकी । सर्वसार स्मरण आहे ॥ गुरुपुत्रानी संकटात पडणें पालट होणें आश्चिर्य आहे अंतरस्थिती मोडू न देता वर्तावें ॥ विश्वासासारिखें फळ प्राप्त विशेष आहे

१ जीव + + रोजा ॥ सर्व काळ गुरुसांप्रदायस्छामध्ये च फिरत आहा क्रममार्ग विदित च आहे मुख्य कीर्ति संपादन केलें पाहिजे ॥

विशेष काय लिहिणें आपल्या आपल्या सौख्यसमाचार प्रत्योतरी विदित करणें कळावें ॥

ईश्वर नाम संवछर माघ मास

धुळें-१८३९ कार्तिक शु. ११

---

[ ६५ ]

॥ श्रीराम ॥

## श्रीसमर्थरामदासस्वामी व छत्रपतिशिवाजीमहाराज यांज संबंधानें

# चाफळखोऱ्यांतील एक स्त्रीगीत

[ संशोधक- विश्वनाथ काशीनाथ राजवाडे ]

१ खालील स्त्रीगीत चाफळास रा. बापूराव उपाध्ये यांच्या येथील एका मुलीच्या तोंडून ऐकिलें. गाणें कोण्या रंगनाथगुरुबाई नामक कवयित्रीनें केलें. गाणें जुनें आहे असें चाफळचे लोक सांगतात. कवयित्री कोण कोठील वगैरे माहिती चाफळास कोणास नाहीं. याचा अर्थ असा कीं गाणें जुनें आहे. भाषे वरून गाणें शंभर वर्षांचें जुनें आहे कीं दोनशें वर्षांचें जुनें आहे कीं पांचपंचवीस वर्षांतलें आहे, ह्या त्रिविध शंकेचा परिहार करतां येणें मुष्कील आहे. कारण भाषा बरीच अर्वाचीन दिसते. गाणें रामदास-

काळीं रचिलें असून उत्तरोत्तर जुनी भाषा अर्वाचीन होत जाऊन ती अगदीं अलीकडील बनली असण्याचा संभव आहे.

२ गीतांत वर्णिलेला प्रसंग असा:— रामदास एकदां कोणत्याशा दुखण्यानें आजारी होते. दुखण्या वर वाघिणीचें दूध हवें होतें. तें पैदा करण्याचें अवघड कृत्य कोणा हि ब्राह्मणशिष्याच्यानें होई ना. ही वार्ता छत्रपति शिवाजीमहाराजांच्या काना वर गेली. तेव्हां महाराज चाफळास तातडीनें आले. शिंगणवाडीच्या मारुतीच्या जवळील रानांत वाघीण होती व ती नुकतीच व्याली होती. तिच्या कडे परमभक्तोत्तम शिवाजीराजे गेले व तिची काकुळतीनें दुधा करितां त्यांनीं विनवणी केली. महाराजांच्या प्रेमळ विनवणीनें वाघिणीचें मन मेणाहून हि मऊ झालें व ती उग्र वाघीण गाईहून हि गाय बनली. शिवाजी महाराजांच्या ठाईं अपत्यप्रेमाची भावना वाघिणीला झाली व पान्हा फुटून पिलां प्रमाणें ती महाराजांना चाटूं लागली. महाराजांनीं मग तिचें दूध काढलें व तें आपल्या गुरुमाउलीला समर्पण केलें.

३ असें हें कवित्व आहे. ह्यांत वास्तविकभाग किती व कवित्वभाग किती, तें पृथक् करण्याचें काम वाचकां वर च सोंपविणें बरें. कदाचित् पाळीव वाघिणीचें दूध दरवेश्यां कडून महाराजांनीं पैदा करविलें असेल. कुत्रीच्या प्रमाणें पाळीव वाघिणीचें दूध दरवेशी कारण पडल्यास काढतात ह्मणून सांगतात. गीतांत रानांतल्या वाघिणीचें दूध महाराजांनीं काढलें ह्मणून ह्मटलें आहे, तें कदाचित् कवित्व असूं शकेल. एवढें मात्र खरें कीं, श्रीसमर्थ व श्रीशिवराय यांची एकमेका वरील भक्ति इतकी अपूर्व होती कीं ती प्रेमळ अश्या एका तत्कालीन कवयित्रीच्या प्रतिभेला उद्दीपित करती झाली. शकुंतलेला पाखरांनीं दूध पाजिलें किंवा रॉम्यूलसाला लांडगीनें थान दिलें, ह्या पुराणकथां हून शिवसमर्थांची ही कथा जास्त विश्वसनीय भासते. लोकांचीं मनें वश करण्याची कला शिवराजाच्या ठायीं असामान्य होती. हिंस्रपशूंना हि द्रव आणण्याची कला महाराजांच्या आटोक्यांत नसेल कशा वरून ? तत्रापि, एकदम एखाद्या रानांतील वाघिणीला महाराजांनीं आपल्या करामतीनें गाय बनवावें, हें जरा अद्भुत दिसतें. परंतु, कविसृष्टींत अद्भुत हें च वास्तविक असतें, या बाबी कडे लक्ष्य दिल्यास, शंका रहाण्याचें कारण रहात नाहीं.

## गीत

वाघिणि ग मज बाळातें निजदुग्ध चि दे गे माये ।
व्याकुळ व्यथेनें केलें । रामदासगुरुमायेला ।

तुझिया स्तनिचें दुग्ध । औषध असे हें त्याला ।
तद्दुःखें बहु घाबरलों । तुज पाशीं धांवत आलों ।
रूपातें तुझिया भ्यालों । काकुळती येतों माये ।
वाघिणि ग मज बाळातें निजदुग्ध चि दे गे माये ॥ १ ॥
गर्जना माझिया रागे । करिता वन सर्व दणाणे ।
तरि बाई नाहिं मी आलों । तुज पाशीं कपटपणानें ।
जिजाबाई माउली पेशी । मानिली लीनपणानें ।
भक्षावें मम देहासी । मग तुजला इच्छा कैसी ।
देउनि दुग्ध गुरूसी । मग येतों मी लवलाही ।
वाघिणि ग मज बाळातें निजदुग्ध चि दे गे माये ॥ २ ॥
त्या करुणावचनें तेव्हां । पाषाण तरु पाझरले
रामदासगुरुमायेचें । हृदय बहु प्रेमें भरलें ।
गाय जशी वाघिण जाली । निष्ठुरपण तिचें सरलें ।
पाडसास प्रेमें जैशी । इच्छेनें चाटी त्याशी ।
कनवाळुपणानें पाहें । ( शिवपुण्य फळाला आलें ) ।
वाघिणि ग मज बाळातें निजदुग्ध चि दे गे माये ॥ ३ ॥
हेरंब षण्मुख तिसरा । नृप होय उमेचा तान्हा ।
पात्रांत धार काढी । गोकुळीचा जैसा कान्हा ।
तुंब पात्र भरुनि राहे । वाघिणीचे वंदुनि पाये ।
पण घेउनि सत्वर जाये । रंगनाथगुरुबाईला ।
वाघिणि ग मज बाळातें निजदुग्ध चि दे गे माये ॥ ४ ॥

४ तिसऱ्या प्रहरीं करमणुकेच्या वेळीं घरांतील व शेजारच्या आयाबाया व मुलीबाळी व तान्हुलींपान्हुलीं एकत्र जमलीं असतां हें स्त्रीगीत आठदहा वर्षांच्या कोंवळ्या मुली प्रेमळपणानें व भक्तिभावानें गातात. काव्यदृष्टीनें पहातां गीतांत शांतरस, करुणरस व अद्भुतरस तुडुंब भरले आहेत हें सांगणें नलगे. मुद्दाम सांगावयाची गोष्ट ह्मणजे ह्या काव्यांत इतिहासरस हि ओतप्रोत प्रतीयमान होतो. शिवाजी कोण व रामदास कोण यांची ओळख अर्भकांना हें गीत करून देतें. आजपर्यंत चाफळखोऱ्यांतील अर्भकांना ह्या गीतानें राष्ट्रपितर जे शिवसमर्थ त्यांची ओळख करून दिली. ह्या पुढें नागपुरापासून तुंगभद्रेपर्यंतच्या व पश्चिमसमुद्रापासून माहुरपर्यंतच्या महाराष्ट्रांतील अखिल बाळबाळिकांना हें गीत राष्ट्रितिहासाचें बाळकडू पाजणार नाहीं काय ?

[६६]


॥ श्रीराम ॥

# चाफळक्षेत्राच्या हद्दींतील श्रीसमर्थांच्या संस्मरणीय वस्तू

( लेखक–विश्वनाथ काशीनाथ राजवाडे )

श्रीरघुवीर रामचंद्र, श्रीरघुवीरपत्नी सीतादेवी व श्रीरघुवीरदास हनुमंत यांच्या हस्तस्पर्शानें, पादस्पर्शानें व वसतीनें पवित्र झालेल्या व मानलेल्या वस्तू भारतवर्षांत हिमालया पासून कुमारी पर्यंत व बलुचिस्थाना पासून ब्रह्मदेशा पर्यंत अक्षरशः लाखों आहेत. पर्वत, डोंगर, शिखरें, घाट, पठारें, नद्या, ओढे, शहरें, खेडीं, देवळें यांना हजारों स्थलीं राम, लक्ष्मण, सीता व मारुती यांचीं नांवें असलेलीं दृष्टीस पडतात. श्रीकृष्ण व पांच पांडव यांचा हि ठसा भारतवर्षांतील स्थलांत हजारोनें मोजतां येतो. ह्या दोहोंच्या खालो-खाल बुद्धाच्या संस्मरणीय वस्तू ह्या देशांत सांपडतात. ऐतिहासिक थोर पुरुषांचें स्मारक करण्याची ही पद्धती नामांकित संत, साधु, शककर्ते, कवि, शास्त्रज्ञ, श्रेष्ठी, यांच्या हि बाबतींत अवलंबिलेली स्थलोस्थलीं अनुभवास येते. तुकाराम, ज्ञानोबा, दासोपंत, एकनाथ, शिवाजी, बाजीराव, नाना फडणीस, अहल्याबाई, इत्यादि अनेक थोर व्यक्तींच्या संस्मरणीय वस्तू त्या त्या स्थलीं प्रसिद्ध आहेत. मानभावांनीं चक्रधराच्या देखील संस्मरणीय वस्तूंची याद करून ठेविलेली मी छापिली आहे. तशी च एक याद पर्वां चाफळास अस-तांना श्रीसमर्थरामदासस्वामी यांच्या संबंधानें चार लोकांना पुसून मीं केली आहे. याद माझ्या मतें पूर्ण नाहीं. परंतु ती पूर्ण व्हावी, लोकांनीं व भक्तांनीं तींतील व्यंगें व उणिवा सुचवाव्या एतदर्थ ती छापून काढणें जरूर आहे. याद चाफळक्षेत्रा पुरती च तेवढी केली आहे. चाफळक्षेत्र ह्मणजे चंद्रगिरीच्या डोंगरा पासून रामपेठ पर्यंतचा मांडनदीच्या दोन्ही तीरचा टापू, असा अर्थ मी करतों. समर्थ व क्वचित् समर्थशिष्य व समर्थवंशज यांच्या कोणत्या हि कृत्यानें, स्पर्शानें व संगतीनें पवित्र झालेल्या वस्तूंची ही याद ह्या टापू पुरती तेवढी आहे असें समजावें. ह्या सबंद टापूला चाफळखोरें असें नांव आहे.

१ खुद्द चाफळखोरें. खोऱ्याच्या पूर्वेस कृष्णानदी व उंबरजगांव. कृष्णानदी वरून चाफळखोऱ्या कडे पश्चिमेस पाहिलें असतां तें खोरें सद्दाच्या आंकड्या सारखें दुबेळकें दिसतें. मांडनदीच्या उत्तरेस सुखठाणा पासून पर्वताची रांग निघून पश्चिमेस रामपेठे वरून रामघळ व वाघदरा या दोन स्थानांतून मांडनदीच्या दक्षिणेस पर्वताची रांग संपते. मधें पश्चिमेस डोंगराचा चिंचोळा भाग निघतो त्या मुळें खोऱ्याचें दुबेळकें झालें आहे व मूळ पश्चिम पर्वता पासून निघणारे दोन पाणलोटं झा ले आहेत. ह्या दोन पाणलोटांचा चाफळगांवा पाशीं संगम होतो. संगमाच्या वरती दक्षिणेकडील पाणलोटाला मांडनदी ह्मणतात. ह्या मांडनदीला नाणेघोळा कडील ह्मणजे उत्तरे कडील पाणलोट मिळतो. मांडनदी चाफळ व चरेगांव घेऊन उंबरजेच्या दक्षिणेस कृष्णेला मिळते. चाफळखोऱ्याचा ठोकळ नकाशा:—




चाफळखोरें समर्थांच्या उद्योगाची मूळ कर्मभूमि. सबंद खोरें च रामदासी हवेनें कोंदाटलेलें आहे. चाफळखोऱ्याच्या पर्वत-

शिखरां वरून उत्तरेस महाबळेश्वर पर्यंत, दक्षिणेस वारणे पर्यंत, पश्चिमेस कोयनाखोऱ्या पर्यंत व पूर्वेस माणदेशांत शिखर-शिंगणापुरा पर्यंत नजर पोहोंचते. समर्थांच्या नजरेनें आनंदवन-भूवनाचा जो प्रांत पवित्र झाला तो सर्व प्रांत प्रेक्षकाच्या नजरेचा व भक्तीचा विषय होतो.

२ **रामदासांचा मठ.** प्रथम ही केवळ कुटी होती. येथें प्रथम राहून दासांनीं रामाच्या देवालयाचा व महाराष्ट्रधर्मप्रसाराचा व्याप केला. सध्यां ह्या मठाच्या जागेवर मठ ह्मणून इमारत आहे.

३ **रामाचें देवालय**

४ देवालयाच्या घुमटा खालील **योगविवरिका.** हींत समर्थ कधीं कधीं ध्यानस्थ बसत असत.

५ देवळा खालील भुयार ऊर्फ **तळघर.** येथें हि समर्थ बसत.

६ रामा पुढील **दासमारुती.** समर्थांनीं बसविलेला.

७ रामा मागील **प्रतापमारुती.** ह्या देवळांतील प्रत्येक अणूरेणूला समर्थांचा पादस्पर्श, हस्तस्पर्श, पृष्ठस्पर्श व शरीरस्पर्श झालेला आहे. ही जागा समर्थांना फार प्रिय असे.

८ मागील मारुतीच्या पुढील डाव्या बाजूचा **बकुळीचा** महान् जीर्ण वृक्ष. हा समर्थांनीं स्वतः लाविलेला. बकुळीला बहार आला असतां, येथें भ्रमर गुंजारव करतात.

९ मागील मारुतीच्या पुढील उजव्या बाजूच्या वृंदावनाच्या चार बाजूला असलेल्या **मारुतीरायाच्या मूर्ती.** मूर्ती समर्थांच्या वेळच्या. वृंदावन पुनःपुनः वेळोवेळीं बांधलेलें.

१० रामाच्या देवळांतील **रामाच्या मूर्ती.** खुद्द समर्थांनीं स्थापिलेल्या.

११ समर्थांचें **अस्थिस्थानचें वृंदावन.** समर्थांचें देहावसान व दहन परळीस झालें. परंतु चाफळास शिष्यवृंदानीं काशीस नेण्याकरितां अस्थि ज्या जागेवर आणून ठेविल्या त्या जागेवर वृंदावन बांधिलें.

१२ **शिंगणवाडीचा मारुती.** समर्थस्थापित.

१३ शिंगणवाडीच्या मारुती पुढील **जोत्याचा वृक्ष.** ह्या जोत्या वर झाडाच्या छायेखालीं समर्थ बसत. हे झाड चाफळखोऱ्यांत

आपल्या जातीचें एक च आहे ह्मणतात. समर्थांनीं कोठून आणून लाविलें कोणास ठाऊक ?

१४ शिवाजी महाराजांस उपदेश ज्याच्या तळवटीं झाला तो **चिंचा-वृक्ष.** हा जीर्ण वृक्ष शिंगणवाडीच्या मारुतीच्या रस्त्या वर आहे. वृक्ष समर्थांच्या वेळीं च दोन चार शें वर्षांचा वृद्ध होता. आतां त्याला जीर्ण ह्मणण्या पेक्षां जख्ख ह्मणणें जास्त शोभेल. सध्यां वृक्षाच्या फांद्या कुजून, वृक्ष वार्धक्यानें अगदीं क्षीण व संकुचित झाला आहे. शिवसमर्थकालीं वृक्ष पूर्ण ऐश्वर्यात होता. ह्या वृक्षाचें वय सध्यां सात आठ शें वर्षांचें असावें. ह्मणजे या वृक्षानें देवगिरीच्या यादवांचा काळ पाहिला होता. सिंघणवाडी हें नांव च मुळीं यादववीर जो सिंघण त्याच्या वरून पडलें आहे. या झाडा खालून, सिंघण, शिवाजी, समर्थ, वगैरे इतिहासप्रसिद्ध महाराष्ट्रीय पुरुष गेलेले आहेत. महाराष्ट्रधर्मरक्षण्याचा पहिला बीरमंत्र शिवराजास समर्थद्वारा ह्या पुण्यवान व चिरंजीव वृक्षा खालीं मिळाला.

१५ **साखरबाव**–शिंगणवाडीच्या मारुतीकडे जातांना वाटेंत लागते.

१६ **दासघळ**–शिंगणवाडीच्या मारुतीच्या मागें जो डोंगर आहे त्यांत असलेली.

१७ **रामघळ**–दोन मजली आहे ती.

१८ **सिंघणवाडी**–येथें मठ असून त्याभोंवतीं समर्थनिर्मित विस्तीर्ण पुष्पवाटिका होती. त्या ठिकाणीं त्यांच्या व शिवाजीराजाच्या वारंवार भेटी होत, कारण रायगडाहून चाफळास येतांना आधींच शिंघणवाडी लागे. राजांचा रस्ता विजापूरच्या ताब्यांतील उंबरज वगैरे पूर्वेकडील गांवातून प्रथम प्रथम नसे.

१९ **कुबडीतीर्थ**–रामघळीपासून जवळ च आहे.

२० केळोली येथील **रामपेठ**

२१ जांभळी खालील **ह्मसोबा**

२२ कुंभारकीच्या शेतांतील **ह्मसोबा**

२३ महाराच्या **पादुका**

२४ रहाटगाडग्याचा **नरसोबा.** दाजीबा सांगलीकर समंध झाले,

त्यांच्या नांवानें या नरसोबाची स्थापना केवळ अलीकडील आहे. समर्थांशीं संबंध नाहीं.

२५ मालवणच्या मुंज्यांनीं बांधलेला **नदीचा घाट व तट.** मुंजे हे मालवणचे वडे सावकार. यांचीं गलबतें समर्थांनीं सुरक्षित बंदरास आणिलीं. या च तटाचा उद्धार पुढें उंबरजकर केशवस्वामींनीं केला.

२६ माजगांव येथील **मारुती.** मारुती शेजारील चार समाधि माजगांवच्या पाटलांच्या आहेत. हे समर्थशिष्य होते.

२७ **सुखठाणें.** अंगापुरा हून रामाच्या मूर्ती आणितांना विसाव्या करितां ज्या जागीं ठेविल्या ती जागा.

२८ केळोली येथील **गौतमेश्वर.** समर्थांनीं उद्धार केला.

२९ नाणेगांव येथील **लक्ष्मेश्वर.** समर्थांनीं उद्धार केला.

३० चाफळ येथील **चाफेश्वर.** समर्थांनीं उद्धार केला.

३१ माजगांव येथील **विस्कटेश्वर.** समर्थांनीं उद्धार केला.

३२ **दिवाकर गोसाव्यांची जागा.** समर्थांनीं दिवाकरास मठा शेजारीं दिलेली.

३३ ढवळयांच्या मळ्यांतील **रामरंग** यांची **समाधि.** हे रामरंग रत्नागिरी प्रांतांतील वेळवंडच्या ढवळयांच्या कुळांतले. यांच्या कडे प्रत्येक एकादशीस निरूपण करण्याचें काम होतें.

३४ **देवमळा**

३५ **हणमंतओढा**

३६ **रामटांकें**—मांगवाड्या जवळील

३७ **रामटांकें** शेरडुका जवळील

३८ जाळगेवाडी येथील **दिवाकराचें शेत.** समर्थांनीं दिलेलें.

३९ **वनवासवाडी**

४० **रथ**

४१ **रथाचें वावर**

४२ शहापूर येथील **उत्सवमूर्ती**

४३ **शेवरीचें ऊर्फ घुसळखांबाचें झाड.** येथें कल्याणांनीं दासबोधाची पहिली नक्कल केली.

४४ हत्तीखाना. येथें शिवाजी महाराज आले असतां कधीं कधीं त्यांचा हत्ती बांधीत. पुढें समर्थपश्चात् येथें हत्तीखाना च झाला. हत्तीचें महातपण करणारें एक मुसुलमान घराणें येथें आहे. मुसुलमान हिंदुग्रामाचे अवयव बनून गेले होते.

४५ बहिरु महार याचा धोंडा. सदाशिवशास्त्र्याशीं महारानें वाद करून शास्त्रीबावाची रग जिरविली ती जागा. हा धोंडा लोक अद्याप मानतात.

४६ मुंढेघळ ऊर्फ मुंढ्याच्या बाजूची घळ.

४७ रायघाट. शिवाजी राजे पाली वरून चाफळास येत तो घाट. रायगडा हून महाराज खालील मार्गानें चाफळास येत:— रायगड–बीरवाडी–प्रतापगड–कोयनेचें डावें पठार–पाली–चाफळ. घोड्या वरून सुमार १०।१२ तास लागत. महाराज तलख घोड्या वरून प्रवास फार जलद करीत. रायगडा हून पुण्यास महाराज चार तासांत येत. पुण्यास येण्याचा रस्ताः—

| | | | |
|---|---|---|---|
| रायगडमाथा—रायगडतळ | ( डोलींतून ) | ·।· | तास |
| रायगडतळ—बोचाघोळतळ | (घोड्यावरून) | ·।· | तास |
| बोचाघोळतळ—बोचाघोळमाथा | (पायीं) | १ | तास |
| बोचाघोळमाथा—एल्याची पेठ | (घोड्यावरून) | ·।।· | तास |
| एल्याची पेठ—पाब्याचा घाट–मुळामुठानदी | ,, | १ | तास |
| मुळामुठानदी—पुणेंकसबा | ,, | १ | तास |

कृष्णेच्या पलीकडील मुलूख जों पर्यंत महाराजांच्या ताब्यांत आला नव्हता, तों पर्यंत चाफळास महाराजांना पाली वरून रायघाटानें यावें लागे.

४८ चंद्रगिरि–वसंतगड.

४९ दिवाकराच्या येथील पट्टाभिरामाच्या मूर्ती.

५० दिवाकराच्या येथील सीताराममूर्ती. षट्चक्रांकित शालिग्राम.

५१ बहिरेवाडीचा बहिरोबा. येथें कल्याणांना सर्पदंश झाला.

५२ समर्थांनीं राममूर्तिस्थापनकालीं आवाहन केलेल्या ग्रामदेवता:–

( १ ) खोनोलीची निनाई

( २ ) कारव्याची धानाई
( ३ ) दुसाळ्याची जानाई
( ४ ) चाफळची नांदलाई
( ५ ) दाढोलीची खंडूआई
( ६ ) दाढोलीची सोमजाई

ह्या स्थलदेवतांचा समर्थांच्या राममंदिरांत आदर झाला.

५३ **कुंभारडोह.** हा डोह हणमंतओढा व मांडनदी यांच्या संगमाजवळ होता. या डोहा वर देवालया करितां समर्थांनी स्थलशुद्धि केली व तत्रस्थ पितृदेवतांना गति दिली. कुंभारडोहांत समर्थ स्नान करीत. त्या काळीं डोहांत खोल पाणी असे. सध्यां डोह भरून गेला आहे.

५४ मांडनदीच्या पुला जवळचा **वटवृक्ष.** समर्थकालीन. ह्या वटवृक्षावरील मर्कटांच्या लीला समर्थ पहात.

५५ **महारुद्रस्वामींची समाधि.** तींत पश्चिमाभिमुख पहिल्या लक्ष्मणस्वामींची समाधि व पूर्वाभिमुख दुसऱ्या लक्ष्मणस्वामींची समाधि. उत्तरेस हणमंतस्वामींची स्त्री राजसबाई इचें वृंदावन आहे. पूर्वेस साखरे नांवाच्या संन्याश्याची समाधि आहे.

५६ चाफळगांवास कसबा केला त्या वेळेस पेठेंत **मारुतीची** स्थापना समर्थांनीं केली.

५७ **भावेवाडीचा वेताळ.** येथें श्रीसमर्थांनीं विठ्ठल गोसावियास चाफळक्षेत्रीं रामसेवा करीत यावन्मरण रहावें ह्मणून आज्ञा करून दिवाकर गोसावी पारपत्याधिकारी यांचे स्वाधीन केलें.

५८ **बाजार.** रामाच्या देवळासमोरील पटांगणांत समर्थांनीं बाजार भरविण्याची वहिवाट पाडली व चाफळ कसबा ह्मणजे पेठेचा गांव केला.

मूळ एक लहानशी चाफळवाडी होती. तिला महाक्षेत्रत्व समर्थांच्या मुळें आलें. समर्थांच्या पूर्वी चाफळखोऱ्यांत नाणेघोळ हें मुख्य तर्फेचें गांव असे. तर्फ नाणेघोळ अशी भाषा होती. नाणेघोळास देशमुख, देशपांडे रहात. समर्थ चाफळास आल्या वर तर्फ नाणेघोळ कागदपत्रांत व मायन्यांत तसें च राहिलें. परंतु खोऱ्यांत महत्व चाफळास आलें. चाफळास मोठी

ब्राह्मणवस्ती होऊन पेठ वसली. तेव्हां नाणेघोळचे देशपांडे मागें पडले व नवे देशपांडे चाफळास नांदूं लागले. देशमुख नाणेघोळास च राहिले. समर्थांच्या संस्मरणीय अश्या ५८ वस्तू वर नमूद केल्या आहेत. त्यांना चाफळ येथील ब्राह्मणवस्ती व वाणीउदम्यांची पेठ, या वस्तूची पुष्टि दिली ह्मणजे चाफळखोऱ्यांतील संस्मरणीय वस्तूंची संख्या ५९ होते. समर्थांच्या चरित्रांतील आणीक किती तरी संस्मरणीय वस्तू या खोऱ्यांत असतील. त्यांचा तपास एकदम एका खेपेस होणें शक्य नाहीं. एखाद्या वृक्षा शेजारीं, शेतांत, घळींत, दगडा पाशीं, जातींत किंवा देवळा पाशीं सहज गोष्टी निघतां निघतां समर्थसंबंधक उल्लेख सहज कोणी तरी बोलून जातो. असे उल्लेख जमविण्यास खोऱ्यांत वर्ष सहा महिने राहिलें पाहिजे, गांवांत व रानांत व लोकांत व घाटावर हिंडलें, फिरलें व बोललें पाहिजे. यात्रा, सण, रथ, उत्सव, कुळधर्म, श्राद्धें, काठ्या, पताका, द्वारें, गौरी, गणपती, इत्यादि अपूर्व प्रसंगीं प्रश्न करून माहिती काढिली पाहिजे. कारण नसतांना समर्थ संबंधानें नवीन कांहीं माहिती सांगा, असा प्रश्न करून माहिती मिळण्याचा संभव अगदीं नसतो. माहिती सहजासहजीं कारणपरत्वें काढिली तर च मिळते. वर ५९ वस्तू दिल्या आहेत. पैकीं कांहींचा तपशील दिला आहे. कांहींचा तपशील रामदासांच्या बखरींत व इतरत्र दिला असल्यामुळें दिला नाहीं.

संस्मरणीय वस्तू पैकीं कांहीं वस्तू आतां अगदीं जीर्ण झाल्या आहेत. त्यांचा पुनरुद्धार जर लवकर न केला तर त्या अल्प काळांत नामशेष हि रहाणार नाहींत. उदाहरणार्थ, श्रीशिवछत्रपतींना श्रीसमर्थांनीं ज्या चिंचावृक्षा खालीं प्रथमोपदेश केला तो चिंचावृक्ष खालीं नवें जोतें घालून व खणून मूळांस खत घालून जगेल तितक्या दिवस जगविला पाहिजे व इतकें हि करून लवकर मेला च तर मृत्यू पूर्वीं त्याच्या पुढें डांब रोवून तत्स्मारक अशी एखादी पाटी उभारली पाहिजे. साकरबाव, सिंगणवाडीच्या मारुती पुढील अनामक वृक्ष, अस्थिवृंदावन, मुंज्यांचा घाट, कुबडीतीर्थ, रामघळ, रामाच्या देवळाच्या गच्ची वरील भेग, वगैरे सर्व च वस्तू आतां थोड्या फार जीर्ण झाल्या आहेत. त्यांचा उद्धार लवकर केला नाहीं तर, समर्थ व शिव यांच्या संबंधीच्या चाफळ एथील संस्मरणीय वस्तु फक्त मीं केलेल्या यादींत राहतील. सबब या कामा करितां एखादें उद्धारकमंडळ स्थापणें जरुर आहे.

[ ६७ ]

॥ श्रीराम ॥

# चाफळ संस्थानचें उत्पन्न

( लेखक–वि. का. राजवाडे )

(१) चाफळ एथील रा. मेढे यांच्या कागदांच्या गळाठ्यांत सुहुर सन तिस्सा अर्बैन मया तैन व अलफ ह्मणजे शक १७७०।१७७१ त लिहिलेला एक चाफळ संस्थानच्या उत्पन्नाचा खर्डा सांपडला. हनुमंतस्वामींचे कारभारी रंगोपंतदादा मेढे यांनीं हा खर्डा मूळ तयार केलेला आहे. शके १७७० त सातारचें राज्य खालसा झालें व नंतर १७७१ त सातारा इलाख्यांत इंग्रजी सुरू झाली. त्या वेळीं चाफळ संस्थानचें एकंदर उत्पन्न किती वं तें उत्पन्न कसकसें केव्हांकेव्हां कोणीकोणी दिलें याचा एकंदर खर्डा कमिशनर कडे चाफळसंस्थानांतून गेला. शक १७७० त चाफळसंस्थानचें एकंदर वसूली उत्पन्न १४६५८।≈ रुपये होतें. शक १७७० पासून शक १८३९ पर्यंतच्या ६९ वर्षांत संस्थानचें उत्पन्न बहुतेक आहे तेवढें च आहे. धान्याचे दर तिप्पट चौपट वाढले असून संस्थानच्या उत्पन्नांत विशेष वाढ झाली नाहीं, हें आश्चर्य आहे. वस्तुत: उत्पन्नांत वाढ निदान तिप्पट व्हावी, ह्मणजे आजमित्तीस सुमारें ४०००० चाळीस हजार रुपये उत्पन्न व्हावें. परंतु, तशी वाढ झाली नाहीं. इतर लहानमोठ्या इनामदारां प्रमाणें व जहागीरदारां प्रमाणें संस्थानानें आपलें उत्पन्न वाढविलें नाहीं किंवा संस्थानाला आपलें उत्पन्न वाढवूं दिलें नाहीं. त्यानें संस्थानांतील शेतकऱ्यांचा चांगला च फायदा झालेला आहे. इनामदार व जहागीरदार यांच्या कुळांचा असा सर्वत्र फायदा झालेला दिसतो व तो तुलनेनें जास्त नजरेंत भरतो. इनामी गांवांतलीं कुळें व शेंजारच्या खालसा गांवांतलीं कुळें यांच्या रहाणींत एकदम फरक दृष्टीस पडतो. इनामदारांचीं कुळें टुमटुमीत दिसतात व खालसा कुळें उपासमार झालेलीं दिसतात. कारण उघड आहे. इनामदारांच्या कुळांचा सारा खालसा कुळांच्या साऱ्या इतका वाढलेला नाहीं. असो. कोणाचीं कुळें आर्थिक दृष्ट्या जास्त गबर झालीं आहेत हा प्रस्तुतचा मुद्दा नाहीं.

चाफळसंस्थानच्या उत्पन्नाच्या प्रस्तुत खर्ड्यांत शिवाजीमहाराजांचा उल्लेख आला आहे, हा प्रस्तुत मुद्दा आहे.

खर्ड्यांच्या पहिल्या तीन चार ओळी व मधील सुमारें एक बंद गहाळ झालेला आहे. त्यांत शिवाजी महाराजांचा दोनदां उल्लेख असावा. गहाळ झालेल्या बंदांतील दोन उल्लेख व शाबूत असलेल्या बंदांतील सात उल्लेख मिळून छत्रपती शिवाजीमहाराज ह्यांनीं समर्थसंस्थानाला दिलेल्या देणग्यांचे एकंदर नऊ उल्लेख ह्या खर्ड्यांत आले आहेत. देणग्यांत विशेष हा आहे कीं, सर्व देणग्या राजशक ५ पांच यांतील आहेत असे रंगोपंतदादा मेढे लिहितात. रा. देव यांनीं प्रसिद्ध केलेल्या श्रीसंप्रदायाच्या कागदपत्रांत शक १६०० कार्तिकशुद्ध १ चा २७ वा लेखांक व शक १६०१ चैत्रवद्य १ चा २८ वा लेखांक असे दोन लेख राजशक ५ मधील आहेत. २७ व्या लेखांकांत रामचंद्रभटाला रुद्राभिषेक सांगितला आहे व २८ व्या लेखांकांत रघुनाथभट अग्निहोत्री यांना धर्मादाय दिला आहे. ह्या दोन्ही पत्रांत चाफळ-संस्थानास गांव वगैरे इनाम दिल्याचा मजकूर असण्याचें कारण नाहीं. श्रीसंप्रदायाच्या कागदपत्रांत राजशक ५ मधील हीं दोन च काय तीं पत्रें आहेत. तेव्हां रंगोपंतदादा मेढे यांनीं राजशक ५ मधील उल्लेख केलेलीं इनामपत्रें रा. देव यांनीं प्रसिद्ध केलेल्या श्रीसंप्रदायाच्या कागदपत्रांत नाहींत हें स्पष्ट झालें. उपाध्ये यांच्या संग्रहांतील २७४ पत्रें देव यांनीं छापिलीं. दिवाकर गोसावी हे समर्थसंस्थानाचे पारपत्याधिकारी ह्मणजे कुलमुख्त्यार कारभारी होते. कारभाऱ्या कडे जीं कामें असत त्यांचें सर्व लिखाण बहुश: कारभाऱ्याच्या दफ्त-रांत राही. प्राय: कारभाऱ्याच्या घरांत च कारभाऱ्याची कचेरी व दफ्तर असे. ह्या मुळें मुख्य यजमानांच्या दफ्तरां पेक्षां हि कारभाऱ्यांच्या दफ्तरांत अव्वल महत्वाचें कच्चें लिखाण सांपडण्याचा जास्त संभव असतो. यजमानाच्या दफ्तरांत केल्या कारभाराच्या परिसमाप्तीचे तेवढे कागद रहात. कायम झालेले अस्सल तहनामे, हिशेब, सनदा, इत्यादि शेवटचे निकाल यजमा-नाच्या ह्मणजे मुख्य मालकाच्या दफ्तरांत सांपडतात. व तत्पूर्वीच्या कारवाईचे सर्व कागद कारभाऱ्यांच्या दफ्तरांत सांपडतात. कधीं कधीं शेवट-च्या निकालांच्या नकला हि कारभाऱ्याच्या दफ्तरांत संदर्भा करितां संग्रह केलेल्या आढळतात. मराठी रियासतींत प्राय: कारभारी वंशपरंपरा असत, निदान दोन च्यार पिढ्या तरी असत. तेव्हां कारभाऱ्याच्या घरीं ह्मणजे

ग्रं. क्र. १८०३

त्याच्या कचेरींत कागद असले काय व यजमानाच्या दफ्तरांत कागद असले काय, दोन्ही ठिकाणचे कागद सरकारी च समजले जात. नाला-यकी मुळें किंवा गैरमर्जी मुळें कारभारी बदलला, तर सरकारी कामाचे कागद नवीन कारभारी जुन्या कारभारी घराण्यांतून हक्कानें नेई. असा प्रकार असे. तेव्हां दिवाकरपंतांच्या दफ्तरांत प्रस्तुत खर्ड्यांत राजशक पांचांतले नऊ ठिकाणीं उल्लेखिलेले सनदांचे नकल केलेले कागद किंवा अस्सल हि कागद असावयास पाहिजे होते व ते रा. देव यांच्या हातीं यावयास हवे होते. परंतु, आलेले नाहींत. तेव्हां एक च अनुमान रहातें. तें हें कीं, राजशक पांचांतील या सनदा चाफळकर स्वामींच्या दफ्तरांत शक १७७० पर्यंत असाव्या. त्या खेरीज रंगोपंतदादा तरी राजशक पांचांतील सनदांचा उल्लेख कसा करतो ? खर्ड्यांत नऊ ठिकाणीं जे उल्लेख आले आहेत ते खालील प्रमाणें आहेत.

१ राजशक ५ वावदऱ्याची सनद
२ राजशक ५ चाफळची सनद
३ राजशक ५ नाणेगाव, जालगेवाडी, डेरवण, सोनगांव व सायगांव यांच्या सनदा
४ राजशक ५ कळंबें, बनघर, सोनेवडी, पाडली, कारी, रहि. मतपुर, माजगांव, तांबवे, सुपने, बाहे, सास-पड यांच्या सनदा
५ राजशक ५ मेढ्याच्या जकातीची सनद
६ राजशक अनिश्चित वसूली देण्याच्या सनदा
७ राजशक ५ दहीफळची सनद

नवीन अधिकाऱ्यांनीं नूतन राजपत्राचा आक्षेप ह्या सात हि ठिकाणच्या सनदा संबंधानें शाहू वगैरे महाराजांच्या कारकीर्दींत केलेला रा. देव यांनीं छापिला आहे. तेव्हां आतां राजशक पांचांतील मूळ सनदा तेवढ्या प्रसिद्ध व्हावयाच्या राहिल्या. चाफळकर स्वामींच्या दफ्तरांतून त्या जर नष्ट झाल्या असल्या, तर प्रस्तुत खर्ड्यांतील उल्लेखां खेरीज त्या नष्ट सनदांची खूण रहा-णार नाहीं. कारण रायगड एथील शिवाजींचा दफ्तरखाना शक १७३९ त जळून गेला. कदाचित् सातारकर महाराजांच्या दफ्तरांतील काळीसंबंधांच्या इनामाच्या सनदा पुणें येथें अलीएनेशन दफ्तरांत समाविष्ट झाल्या त्यांत ह्या सनदा असण्याचा संभव आहे. कारण, रायगडाहून शाहू वगैरे महाराजांच्या

कारकीर्दींत शिवकालीन दप्तरें साताऱ्यास कारणपरत्वें आणल्याचा पुरावा सांपडतो.

( २ ) असें दिसतें कीं, राजशक ५ त चाफळ व सज्जनगड या दोन अधिष्ठानांना कायमच्या सनदा शिवाजींनीं दिल्या. तत्पूर्वीं शक १५९४ पासून चाफळसंबंधानें शिवाजीमहाराजांनीं जे कागद करून दिले, त्यां पैकीं कांहीं रा. देव यांनीं छापिले आहेत. परंतु शक १५९४ पूर्वींचे कागद रा. देव यांच्या हातीं लागले नाहींत असें ह्मणण्यास प्रमाणें आहेत. चाफळउपाध्ये यांच्या दप्तरा पैकीं लेखांक ३० त खालील शब्द वापरले आहेत:—

॥ चाफलीं श्री चा माहांनौमीचा उत्सव ॥
होता ( तो ) त्यासी सामग्री व द्रव्य पहिलेपासून ॥
देत अहेती ॥

पहिले पासून ह्मणजे चाफळास रामाची स्थापना शके १५७० त झाली तेव्हां पासून. चाफळास रामाची स्थापना झाल्या पासून शिवाजींचें लक्ष्य रामा कडे होते व तेव्हां पासून सामग्री व द्रव्य महाराज पोंचवीत असत. कित्येक वर्षें दर वर्षीं मोईनीचा आंकडा नवीन ठरविला जाई. मोईनीचा हा वार्षिक आंकडा दत्ताजी त्रिमळानें महाराजांच्या आज्ञे वरून शक १५९९ त कायम ठरावून देऊन ठरावाची सनद हि करून दिली. कायम ठराव १५९९ त करण्याचें कारण असें घडलें कीं, शक १५९७ त समर्थांना भेटण्यास महाराज आले असतां रामाचा नित्य उत्सव व यात्रा उत्सव महाराजांनीं च करावा अशी समर्थांनीं आज्ञा केली. १५९८ पर्यंत उत्सवाची सर्व जबाबदारी समर्थ स्वतःच्या शिरा वर घेत असत. राजांच्या कडून सामग्री व द्रव्य कांहीं येई, त्याची गणना इतर सामान्य जनांच्या मदतीच्या मासल्याची असे. उत्सवाचा सर्व खर्च व देखरेख १५९८ पर्यंत स्वामी स्वतःच्या जबाबदारी वर करीत. ती जबाबदारी शक १५९८ नंतर स्वामींनीं महाराजांच्या शिरा वर सर्वस्वीं सोंपविली. या पुढें महाराजांच्या अधिकाऱ्यांच्या तर्फे उत्सव चालविला जाई. गुजारत स्वामींच्या शिष्याची. तात्पर्य, चाफळच्या रामाचा नित्य व वार्षिक उत्सव एव्हां पर्यंत खासगी होता तो १५९८ पासून सरकारी झाला. बाकी शिवाजींचा चाफळच्या उत्सवाशीं संबंध मूळ स्थापने पासूनचा आहे. शिवाजींनीं मूळ स्थापने पासून उत्सवा करितां सामग्री व द्रव्य जें पुरविलें त्याचे दाखले रायगड एथील राज-

दप्तरांत, कऱ्हाड एथील सुभेदाराच्या दप्तरांत व चाफळ एथील समर्थांच्या दप्तरांत अवश्यमेव असले पाहिजेत. हे दाखले अद्याप रा. देव यांच्या हातीं यावयाचे आहेत.

( ३ ) शक १५९४ च्या पूर्वींचे आणीक एका प्रकारचे कागद उपलब्ध व्हावयाचे आहेत. चाफळउपाध्ये यांच्या दप्तरांतील लेखांक १७, १८ व २१ यांत खालील नोंदी आल्या आहेत:---

## लेखांक १७

" या खेरीज कदीम त्यांचा इनाम कारकीर्दी
इदलशाही चालत आला असे तो चालविणे बिा

मौजे मसूर बिघे ऽ११
मौजे उबरज बिघे ऽ५
मौजे सिरगाउ बिघे ऽ११
मौजे शाहपुर देखील बाग ऽ१२
मौजे कोरटी बिघे ऽ५

एकून चावर ·।१४ पाव चावर चौदा बिघे "

## लेखांक १८

" या खेरीज कदीम त्याचा इनाम कारकीर्दी
इदलशाही चालत आला असे तो चालवणे बीतपसील जमीन चावर बिघे ·।१२

कसबे चाफल देखील बाग ऽ१८
वाडी करवजे कसबे चाफल ऽ१
मौजे सींगणवाडी ऽ३
मौजे चरेगाउ ऽ१५
माजगाउ ऽ५

एकून पाव चावर बारा बिघे "

लेखांक २१

" पुरातन भोगवटा इनाम बिघे

८११ मसूर

८१२ शाहापुर देखील बाग

८९ उबरज

८५ कोरटी

८११ सीरगाउ

------

.।१४

हें कदीम ऊर्फ पुरातन ऊर्फ इदलशाही इनाम समर्थांच्या हातीं आलें कोठून ? हें कदीम इनाम इदलशाही कारकीर्दी पासून समर्थांच्या ताब्यांत चालत होतें असा उल्लेख वरील तिन्ही लेखांकांत आहे. मसूर, उंबरज, शिरगांव, शहापूर, कोरटी, चाफळ, करवजे, शिंघणवाडी, चरेगांव, माजगांव ह्या दहा गांवीं समर्थांनीं मारुतीची स्वतः स्थापना केली व मठ केले व त्या त्या गांवीं कांहीं बिघे जमीनी नैवेद्या करितां व स्वास्थ्या करितां श्रीनीं ह्मणजे समर्थांनीं देविल्या असा उल्लेख लेखांक १७ त आहे. दिल्या असा उल्लेख नाहीं, देविल्या असा उल्लेख आहे. देविल्या ह्मणजे देवविल्या. कोणा कडून देवविल्या ? इदलशाहा कडून देवविल्या, कीं खासगी इसमा कडून देवविल्या, कीं त्या त्या गांवकऱ्यां कडून देवविल्या, कीं त्या त्या प्रांताच्या इदलशाही सुभेदारां कडून देवविल्या ? देणाऱ्यांचे हे चार च वर्ग त्या कालीं संभवतात. पैकीं खुद्द इदलशाहां पैकीं कोणा हि पातशाहाचा व समर्थांचा साक्षात् कोणता हि संबंध कधीं हि आलेला कोणी हि उल्लेखिलेला नाहीं; परंतु इदलशाही सुभेदारांचा व समर्थांचा संबंध उल्लेखिलेला आढळतो. चाफळउपाध्ये लेखांक ५२ त खालील नोंद आहे:—

" राजश्री ह्यानतराउ याणी श्री कारणे उबरज व कोरटी येथे दोन चावर इनाम रामराया बराबर पत्र पाठविले त्या मध्ये दोही गावी पांच पांच बिघे मान्य केले व घोरपडे बाजीराजे याणी गंगाराम हवालदार याज बराबर पत्र पाठविले इनाम मौजे चरेगाव चावर येक व माजगाव येक चावर त्या मध्यें चरेगावी पंधरा बिघे व

माजगावी पाच बिघे ऐसे मान्य करून श्री च्या नावे
पत्रे आणविली वरकड सर्व पावले ह्मणून उत्तर लिहिले
त्या दिवसापासून इनामाची खटपट करून श्री चे स्थली
सुखरूप आहो ”

समर्थांचे विठ्ठल ह्मणून शिष्य होते. ते चाफळास श्रीरामाची स्थापना झाली तेव्हां पासून समर्थां जवळ होते. त्यांना यावद्देह श्री चे स्थलीं राहाण्याची समर्थांनीं आज्ञा केली. ते उंबरज, कोरटी, चरेगांव व माजगांव एथील जमीनीचा वसूल करून चाफळास असत. विजापूरचा द्यानतराव ह्मणजे धर्मराव नांवाचा सरदार व मुत्सद्दी होता. त्याणें उंबरज व कोरटी एथील जमीनी शक १५७१ च्या सुमारास समर्थांना इनाम दिल्या व विजापुरचा बाजीराजे घोरपडे ह्मणून दुसरा एक सरदार व सुभेदार होता त्यानें चरेगांव व माजगांव एथील जमीनी समर्थांना इनाम शक १५७१ च्या सुमारास च दिल्या. चारी गांवच्या सनदा रामदासगोसावी यांच्या नांवें झाल्या होत्या. असा हा समर्थांचा व विजापुरी सरदार व सुभेदारांचा संबंध होता. परंतु द्यानतरावाच्या व बाजी घोरपड्याच्या सनदा अद्याप उपलब्ध झाल्या नाहींत. बाकी जीं सहा गांवें राहिलीं त्यांचा संबंध गावकऱ्यांशीं व खासगी इसमांशीं असावा. ह्या सहा गांवीं समर्थांनीं देवा करितां व मठा करितां जी इनामी जमीन मिळवून दिली ती खासगी इसमां कडून मिळालेली किती व संबंध गांवकऱ्यां कडून मिळालेली किती, या बाबींचा निकाल करण्या जोगीं साधनें आपणा जवळ नाहींत. हीं हि साधनें शोधून काढावयाचीं आहेत. हे च कागद अद्याप उपलब्ध व्हावयाचे आहेत. हे कागद मिळाले च तर खालील ठिकाणीं मिळावयाचे. (१) चाफळकर स्वामींचे दफ्तर, ( २ ) चाफळकर स्वामींच्या तत्तत्कालीन कारभाऱ्यांचीं दफ्तरें, ( ३ ) देणगी देणाऱ्या इसमांच्या घरचीं कागदपत्रें, ( ४ ) इदलशाही दफ्तरांत इनामें समर्थांच्या मठा कडे व देवा कडे गेल्याचीं आक्षेपपत्रें, ( ५ ) इदलशाही सुभेदारांचीं दफ्तरें, ( ६ ) त्या त्या गांवच्या व प्रांताच्या पाटीलकुळकर्ण्यांचीं व देशमुखदेशपांड्यांचीं दफ्तरें, (७) आणि शेवटीं शिवाजींच्या ताब्यांत तीं तीं गांवें आल्या वर त्या त्या सुभेदारांनीं कदीम सनदा करितां केलेल्या मागण्या. अशा सात ठिकाणीं कदीम इनामांचीं कागदपत्रें सांपडावीं.

(४) समर्थ गांवकऱ्यां वर व खासगी इसमां वर कशी छाप बसवीत व त्यांचें लक्ष्य देवा कडे व मठा कडे कसें लावून घेत तें हि समजण्यास किंचित् मार्ग आहे. चाफळउपाध्ये यांच्या दफ्तरांतील ५२ व्या लेखांकांत खालील मजकूर आहे:—

> " श्री ची स्थापना चाफली जाली ते समई नरसींगराउ आबरखानी मुद्राधारी व परांजी देशमुख व नागोजीपंत देशकुलकर्णी व नागोजी भावे नाईकवाडी नानेघोलकर या पांचा जणा कडून श्री च्या पुष्पा वर श्री नीं हस्त ठेविले कीं या अधिष्ठानाची भक्ती परंपरा करावी सर्व साह्यता करावी कानू कानूनाती यात्रेत होउ न द्यावी सर्वस्वेसी साहे असावे ह्मणून पुष्पा वरी हात पाचा जणानी ठेविले ते काली पांचा जणानी श्री स उभे राहून प्रार्थना केली की आह्मा कडून श्री च्या पुष्पा वरी हात ठेविले तरी श्री नी हि या स ( प्रकार ) श्री च्या अधिष्ठानाची उदासीनता केली न पाहिजे ये विषी श्री नी हि श्री च्या प्रसादपुष्पा वरी मान्य ह्मणून हास्यवदने संतोषपूर्वक हस्त ठेविला ॥

वरील मजकुरा वरून गांवकरी लोकांना स्वसंस्थेंत समर्थ कसे गोंवून घेत त्याचा एक प्रकार दिसतो. अन्य ठिकाणीं अन्य प्रकार समर्थांनीं केले नसतील असें नाहीं. लोकांना स्वसंस्थेंत गोंवून घेण्याचा वरील मजकुरांत एक प्रकार दिला आहे एवढें च. चाफळास रामाची व मठाची स्थापना केल्या वर चाफळखोऱ्यांतील प्रमुख गृहस्थांस ह्मणजे राजपक्षीय व प्रजापक्षीय पुढाऱ्यांस समर्थांनीं रामाच्या पुढें एके दिवशीं गांठलें. ह्या पुढाऱ्यांत राजपक्षीय नरसो मलनाथ कमावीसदार होता. हा ब्राह्मण गृहस्थ विजापुरसरकारचा कमावीसदार होता. प्रजापक्षीयां मध्यें प्राणजी देशमुख, नागोजी देशपांडे व नाणेघोळचे नायकवाडी होते. ही सर्व मंडळी रामा पुढें बसलीं असतां ह्मणजे सध्यां जेथें लांकडी भव्य सभामंडप आहे त्याच्या

आंतील रामाच्या मूर्ती पुढें बसली असतां, रामाच्या अंगा वरील एक प्रसादपुष्प खालीं पडलें. प्रसादाच्या फुलाची किंवा माळेची किंवा तुळशी-पत्राची किंमत महाराष्ट्रांतील गांवकरी किती मोठी समजतात तें सांगावयास नको, सर्वत्र मश्हूर आहे. त्या पुष्पा वर वरील मंडळीचे हात समर्थांनीं स्वतः ठेवविले व त्यांना भाक घातली कीं, इतउत्तर अधिष्ठानाची साह्यता सर्व प्रकारें तुह्मीं करावी. शकुनाच्या व प्रसादाच्या फुला वर हात ठेवून हें बोलणें झालें, सबब ग्रामपुढाऱ्यांनीं तें भक्तिभावानें मान्य केलें. परंतु ही मान्यता दर्शवितांना नाणेघोळकर गांवकरी पुढाऱ्यांना असा संशय आला कीं, आपल्यां शिरा वर अधिष्ठानाचा सर्व भार व जबाबदारी टाकून ही स्वारी स्वतः निसटून गेली तर काय करा ? कारण समर्थांची उदासीन दिनचर्या गांवकऱ्यांना पूर्ण समजून चुकली होती. आल्या दिवसा पासून हा दिवसपर्यंत समर्थांच्या पायाला लागलेला भोंवरा खळलेला गांवकरी यांनीं पांच चार वर्षांत कधीं च पाहिला नव्हता. तेव्हां गांवकऱ्यांनीं समर्थांची काकलुतीनें विनवणी केली कीं, आह्मी श्री ला कधीं हि विसंबणार नाहीं, परंतु आपण हि श्री च्या ह्मणजे संस्थानाच्या ठायीं उदासीनता कधीं हि न करावी. स्वतःचें महत्व जाऊं न देतां, दुसऱ्यांचें अंतःकरण आपल्या ठाईं ओढून घेण्याचें समर्थांचें हें असें कौशल्य असे. गांवकऱ्यांनीं व पुढाऱ्यांनीं रामाचें देऊळ स्वतःच्या खर्चानें व शिवराजाच्या ५००होनांच्या मदतीनें बांधलें होतें. पुढें देवाची यात्रा, उत्सव, दिंड्या, सिंहासनें, वगैरे सर्व सोहोळे या गांवकऱ्यांनीं च केले व चाफळ, सिंगणापूर वगैरे ठिकाणीं इनामी जमिनी देवाला करून दिल्या. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, स्थापनेच्या मूळारंभीं चाफळखोरें विजापूर सरकारच्या ताब्यांत होतें व नरसो मलनाथ हा विजापूरसरकारचा अमलदार होता. असें असून त्यानें शिवाजीराजांचें साह्य देवळाच्या स्थापने साठीं कसें घेतलें व शिवराजानें दिलेल्या द्रव्याचा विनियोग शिवराजाच्या इच्छे प्रमाणें निष्ठेनें कसा केला ? ह्याला उत्तर एक च. ही सर्व करामत श्रीमत् योगेश्वर जे समर्थ त्यांची होती. नरसो मलनाथ घाबरेल व देशमुखदेशपांडे बिचकतील हें जाणून समर्थांनीं विजापूरचा ब्राह्मण मुत्सद्दी द्यानतराव व मराठा सुभेदार बाजीराजे घोरपडे यांचें हि मन आपल्या कार्या कडे वळवून घेतलें.

(५) हे दियानतराव ऊर्फ द्यानतराव व बाजीराजे घोरपडे ऊर्फ बाजी घोरपडे कोण तें सांगितलें पाहिजे असें नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाच्या साध-

नांच्या आठव्या खंडाच्या प्रारंभीं शक १५७८ तील दोन पत्रें ज्याचीं छापिलीं आहेत तो हा दियानतराव. दियानतराव हा किताब आहे व सध्यां हि मोंगलाईत हा किताब धारण करणारें एक घराणें असावें असें वाटतें. हा पातशाही मुत्सद्दी होता व याच्या कडे कृष्णातीराच्या बाजूला कांहीं वतन होतें. बाजीराजे घोरपडे महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचे आहेत. शहाजीमहाराजाला मेजवानीला बोलावून धरून देणारे शूरबहाद्दर ते हे च. शक १५७० च्या सुमारास चाफळखोऱ्यांत व चाफळखोऱ्याच्या आसपासच्या प्रांतांत ह्या दोघांचीं वतनें व अंमल होता. चाफळखोऱ्यांतील सरकारी तर्फेदार जो नरसो मलनाथ व प्रजेचे पुढारी जे देशमुखदेशपांडे व पोलिसाचे मुख्य जे नाईकवाडी त्यांच्या मनाची खंबीरता, त्यांच्या वरिष्ठ अंमलदारांची सक्रिय सानुभूति मिळवून, समर्थांनीं सुदृढ केली. शक १५७० च्या सुमारास विजापुरचे द्यानतराव व बाजी घोरपडा हे दोघे हि समर्थांच्या हुकमतींत आलेले होते. कारण, ह्या च सुमारास समर्थसंस्थानाला त्यांनीं इनाम जमिनी बहाल करून दिल्या. ज्या इनामांना पुढें छत्रपतींनीं कदीम इनाम ह्मणून ह्मटलेलें आहे, तीं इनामें हीं च. कदीम या शब्दाचे अर्थ दोन. आपल्या पूर्वींचीं इनामें तीं कदीम इनामें असें शिवरायानें ह्मटलें असेल. किंवा द्यानतराव व बाजी घोरपडे यांच्या ताब्यांतल्या प्रांतांतील आदिलशाही कदीम इनामे असा हि अर्थ असेल. समर्थसंस्थानाला ह्या सरदारांनीं ज्या जमिनी इनाम करून दिल्या त्या पूर्वीं च दुसऱ्या कोणाच्या तरी इनाम जमिनी असाव्या व त्या धारण करणाऱ्या इनामदारांचा नष्टांश झालेला असावा व तीं सरकारांत अनामत पडलेलीं इनामें ह्या सरदारांनीं समर्थसंस्थानाला पुनरपि इनाम करून दिलीं असावीं. कांहीं असो, शक १५७० च्या सुमारास ह्या दोन विजापुरी सरदारांनीं समर्थसंस्थानास इनामें करून दिलीं व हे दोघे सरदार समर्थांच्या शिष्यवर्गांत प्रविष्ट झाले, हें खरें. ह्या च १५७० च्या श्रावणवद्य प्रतिपदेस ( जेधे यांची शकावली ) बाजीराजे घोरपड्यानें शहाजीराजे भोंसल्यांस कपटानें धरून दिलें; ह्या नंतर बराबर नऊ महिन्यांनीं शिवाजीराजे भोसले यांस समर्थांचा अनुग्रह शक १५७१ च्या वैशाखशुद्ध नवमीस झाला; आणि पुढें महिन्या भरानें शक १५७१ ज्येष्ठशुद्ध पौर्णिमेस शहाजीमहाराजांची सुटका झाली. ( जेधे यांची शकावली). शहाजी फक्त दहा महिने अटकेंत होते, डफ ह्मणतो त्या प्रमाणें चार वर्षें अटकेंत नव्हते. शहाजींची सुटका मुरार जगदेव याच्या मध्यस्थीनें झाली. मुरार जगदेव

ह्मणजे च दियानतराव. हा मुरार जगदेव वाई प्रांतांतील चंदन येथील वतनदार असून ( मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ८, लेखांक १ ) धोम येथील जोइयांच्या कडे बालपणीं वाढला होता ( मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड २०, लेखांक १७६ ). मुरारपंताचा व शहाजींचा पुरातन स्नेह होता. तशांत मुरारपंत समर्थांचा अनुग्रहीत होता व शिवाजीराजांना समर्थांचा अनुग्रह मिळाल्या वर तो शिवाजीराजांचा गुरुबंधु झाला. गुरुबंधुत्व उत्पन्न झाल्या वर एका महिन्यानें शहाजींची सुटका झालेली आहे. हा केवळ काकतालीय न्याय दिसत नाहीं. ह्या सुटकेंत समर्थांचें अंग असावें, असा संशय येतो. शहाजींची सुटका होण्याचीं बखरींतून व इतिहासांतून दोन कारणें दिलेलीं आढळतात. मुरारपंताचा व शहाजींचा पुरातन स्नेह हें एक कारण, व दिल्लीच्या मोगलाशीं शिवरायानें संधान बांधलें हें दुसरें कारण. ह्या दोन कारणांना छत्रपति व दियानतराव यांचें समर्थशिष्यत्व हें तिसरें कारण जोडावें, असा पुरावा शक १५७० व १५७१ तील दस्तऐवजां वरून जमत चाललेला दिसतो.

( ६ ) समर्थांनीं आपल्या पंथांचें मुख्य ध्येय धर्मरक्षण केलें होतें हें सर्वश्रुत आहे. ध्येयाच्या सिद्धीला त्यांनीं तीन उपाय सांगितले आहेत, (१) भक्ति, ( २ ) राजकारण, ( ३ ) व सर्वां विषयीं सावधानता. पैकीं भक्तीच्या उपायाची सिद्धता रामोपासना प्रचलित करून त्यांनीं साधिली, हें आपणास ठाऊक आहे. दुसरा उपाय जो राजकारणाचा तो समर्थांनीं कसा साधला, हें शक १५७० तील व १५७१ तील वरील हकीकती वरून ताडण्यास किंचित् मार्ग होतो. समर्थ भक्तिपंथद्वारा गुप्तपणें राजकारणांत खटपट करून धर्मरक्षणाचें काम व धर्मरक्षक जो कोणी दिसेल त्याचें साहाय्य करीत. आनंदवनभूवनीं अवतीर्ण झाल्या तागायत समर्थांच्या हालचालींचा विचार केल्यास ह्या बाबी वर बरा च प्रकाश पडतो. शक १५६६ तारणनामसंवत्सरीं आनंदवनभूवनाच्या ज्या भागांत समर्थांनीं प्रथम वास्तव्य केलें तो भाग महाबळेश्वर हा होय. येथें चंद्रराव मोरे हे त्या कालीं राजे होते. महाबळेश्वरास प्रथम वास्तव्य करण्यांत समर्थांचा मुख्य हेतु, चंद्ररावाच्या द्वारा सावधतेनें भक्ति व राजकारण यांची कितपत सिद्धता होते तें पहावें, हा होता. रायगडा पासून पन्हाळगडापर्यंत सह्याद्रीचा भाग चंद्ररावाकडे होता, चंद्ररावाच्या पदरीं लढाऊ मराठे मा-

वळे सैन्य होतें, व त्याच्या राज्याची घडी दोन अडीच शें वर्षे चांगली बसलेली होती, नव्यानें बसवावयाची नव्हती. राजकारणाला अधिष्ठान तर बरें दिसलें. परंतु भक्तीचें अधिष्ठान चंद्ररायाच्या ठाईं कितपत आहे तें पहावयाचें राहिलें होतें. महाबळेश्वरास राहून समर्थांनीं ह्या दुसऱ्या बाबीची परीक्षा केली; तींत त्यांना असें आढळून आलें कीं, धर्म, न्याय, क्षमा, दया, शांति, इत्यादि भक्तिपोषक जे गुण त्यांचा चंद्ररायांच्या ठाईं अभाव आहे. ह्या अवधींत महाबळेश्वरा पासून शिवतरखोऱ्या पर्यंतचा चंद्ररायाच्या ताब्यांतील प्रदेश समर्थांनीं बारकाईनें तपासला. आणि महाबळेश्वरास सामान्यजनांत मारुतीस्थापनद्वारा फक्त भक्तीचा रोपा लावून, राजकारणाचा रोपा लावण्या करितां इतरत्र प्रयाण केलें. चंद्ररायां कडे समर्थांची प्रथम दृष्टि वळली त्याला एक कारण झालें. तें कारण केवळ नामसादृश्याचें होतें. चंद्ररायांची कुलदेवता श्रीरामवरदायिनी होती व समर्थांचें कुळदैवत राम होतें. तेव्हां आपल्या श्रीरामाला हि वर देणारी अशी जी जगन्माता तिचा भक्त धर्मकारणाला उपयोगी पडेल या आशेनें समर्थ चंद्ररायाच्या राज्यांत गेले. परंतु नुसत्या नाममात्रांत विशेष मतलब नसतो, याचा अनुभव आल्या वर, धर्म रक्षी ऐसा राजा आनंदवनभूवनांत कोठें सांपडतो कीं काय तें शोधण्याकरितां समर्थ पुनः प्रवासास निघाले, ते शहापूर, मसूर करीत करीत चाफळखोऱ्यांत कांहीं काल रमले. तेथें दोन चार वर्षें धर्म रक्षी ऐसा राजा तर त्यांना आढळला नाहीं, पण एकनिष्ठ अशी स्त्रीपुरुष भक्तमंडळी पैदा झाली. ह्या च सुमारास दियानतराव व बाजी घोरपडे हे समर्थांचे शिष्य बनले. धर्म रक्षी ऐसा राजा न भेटला तर न भेटो, निदान पातशाही मोठे सरदार तरी धर्माचे अभिमानी आपणास करून सोडतां येतील असें समर्थांनीं तात्पुरतें समाधान करून घेतलें. पुढें थोड्या च महिन्यांत समर्थांची व शिवाजीराजांची गांठ पडली. ह्या होतकरु मराठा क्षत्रियाची गांठ पडल्या पासून उत्तरोत्तर समर्थांना अनुभव येऊं लागला कीं, धर्म रक्षी ऐश्या राजाची आपणास एकदांची महत्प्रयासानें जोड झाली. या पुढें समर्थांचें लक्ष्य शिवराजाच्या ठाईं कायम ठसावलें व समर्थांनीं आपले सर्व उद्योग शिवराजाच्या साहाय्यार्थ जोरानें, धिम्मेपणानें व साक्षेपानें चालविले. समर्थांनीं शिवरायाच्या धोरणाला साहाय्य कसें केलें त्याची स्थूल रूपरेषा अशीः नागपूरपासून तुंगभद्रेपर्यंत च नव्हे, तर काशी पासून रामेश्वरा पर्यंतच्या प्रांतांत मठ स्थापून त्या त्या स्थलींच्या ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रांना रामभक्तीच्या सूत्रांत घेतां येईल तितकें गोंवून घेतलें.

भक्तिसूत्रानें चातुर्वर्णिक बांधला गेला ह्मणजे धर्माच्या स्थापनेस व रक्षणास योग्य असें जें कोणतें राजकारण असेल व जो कोणता राजा असेल त्याला साक्षेपानें व सावधानतेनें साहाय्य करण्याची प्रवणता व संवय त्यांना घालून दिली. लोक एका सूत्रांत आकर्षिण्यास समर्थांचा पहिला उपाय भक्ति. आकर्षिलेल्या लोकांचा धर्मरक्षणार्थ उपयोग घडून येण्यास समर्थांचा दुसरा उपाय राजकारण. मोंगलाची लष्करी किंवा मुलकी नोकरी करणें हें समर्थांचें राजकारण नव्हतें. समर्थांचें राजकारण ह्मणजे धर्म रक्षी ऐसा जो शिवाजी-राजा त्याला साहाय्य जेणें कडून होईल तें राज कारण. मठ व मठपति यांच्या द्वारा ब्राह्मणमंडळ्या, क्षत्रियमंडळ्या, वैश्यमंडळ्या व शूद्रमंडळ्या जागोजाग स्थापून शिवराजाचें राजकारण जेणें कडून सुगम व सफल होईल अशी परिस्थिति समर्थांनीं उत्पन्न केली. समर्थांनीं हें जें यंत्र निर्माण केलें त्याच्या योगक्षेमाचा बोजा समर्थांनीं शिवराजावर एका पैचा हि टाकला नाहीं. शेवटपर्यंत यंत्रांतील मठाधिपतींनीं आपला योगक्षेम केवळ भिक्षे वर चालविला. लोकांची मनोरचना धर्मराज्यप्रवण व स्वराज्यप्रवण करण्याची ही पूर्व तयारी आपल्या अमलांत नसलेल्या प्रांतांत शिवराजाला आणि कोणत्या हि राजाला करतां येणें साध्य नव्हतें. ही पूर्व तयारी समर्थां सारखे योगिराज च गुप्त व प्रकट संस्था स्थापून करूं शकतात. समर्थांच्या संस्थेचा उपयोग काय व कसा होतो, त्याचा दाखला शक १५७१ त पितृबंधविमोचनाच्या कार्यांत शिवराजाला, अनुग्रह घेतल्या पासून एका महिन्याच्या अवधींत च, आला होता. १५७१ नंतर तर असले दाखले शिवराजाला हरघडीस येत गेले. तेव्हां कृतज्ञबुद्धीनें उतराई होण्या करितां जमिनी, गांवें, मोईनी, इत्यादींच्या रूपानें शिवराजानें समर्थां वर देणग्यांचा वर्षाव केला. परंतु, समर्थांनीं आपलें यंत्र असें च रचिलें होतें कीं तें यंत्र चालण्यास कोणाच्या हि देणग्यांची जरूर नव्हती. यंत्र स्वयंसिद्ध होतें. तेव्हां देऊं केलल्या अनेक देणग्या समर्थांनीं शिवराजाच्या शिवराजास परत केल्या. हजार बाराशें प्रकट मठ व किती गुप्त त्यांचा पत्ता नाहीं, असल्या मठराज्याचा योगक्षेम छत्रपतींच्या देणग्यांनीं भागण्या हि सारखा नव्हता. समर्थांनीं आपल्या संस्थांचें एवढें मोठें जाळें निर्माण केलें होतें कीं, शिवरायाला आपल्या पूर्ववयांत तें खचित पोसतां आलें नसतें. शिवाय, समर्थांनीं निर्मिलेली संस्था शिवराजाच्या राज्याचें खातें बनण्या सारखी नव्हती. यंत्र यज्ञमय होतें. देशा-

करितां, धर्मा करितां, राष्ट्रा करितां, संस्कृती करितां, हजारों तरुणांनीं स्वार्था-च्या व सर्वस्वाचा यज्ञ आरंभिलेला होता. राजाच्या व कोणाच्या कोणत्या हि देणग्यांची त्यांना अपेक्षा नव्हती.

(७) असलें हें यज्ञयंत्र बनविणाऱ्या समर्थांत व इतर तत्पूर्वगामी व तत्कालीन संतांत भेद कोणता तें शिवराजाच्या प्रथम प्रथम लक्ष्यांत आलें नाहीं. तें लक्ष्यांत यावें एतदर्थ समर्थांनीं राजांची रवानगी देहूस तुकाराम-बाबा कडे केली. तेथील अनुभव घेऊन, राजांना पक्कें कळून चुकलें कीं, आपण समर्थसंप्रदायाचे अनुयायी बनण्यास लायक आहों, तुकोबाचे अनुयायी बनण्यास स्वभावानें, वर्णानें, परिस्थितीनें लायक नव्हों. समर्थांत व इतर संतांत भेद जो होता तो मोठा सूक्ष्म किंवा गूढ होता असें नव्हे. भेद अगदीं उत्तान होता. हा उत्तान भेद समान्तरकलमांनीं स्पष्ट भासतो.

| पूर्व संत | समर्थ |
|---|---|
| १ अद्वैत वेदान्ती | १ अद्वैत वेदान्ती |
| २ विश्वबंधु | २ महाराष्ट्रबंधु |
| ३ अजातशत्रु | ३ शत्रुमित्रभाववान् |
| ४ द्रोह करणाऱ्यां वर उपकार करणारे | ४ द्रोह करणाऱ्यांना शासन करणारे |
| ५ फक्त सत्याग्रहानें चालणारे | ५ जश्यास तसें चालणारे |
| ६ राजकारणविन्मुख | ६ राजकारणसन्मुख |
| ७ भक्तिमार्गी | ७ भक्तिमार्गी |
| ८ प्रायः कर्मसंन्यासी | ८ सर्वस्वीं कर्मयोगी |
| ९ प्रपंचपराङ्मुख | ९ प्रपंचोन्मुख |
| १० परमार्थोन्मुख | १० परमार्थोन्मुख |
| ११ अनवधान | ११ सावधान |
| १२ निःशस्त्र उपकारी | १२ सशस्त्र शत्र्वपकारी |
| १३ धर्मरक्षणेच्छू | १३ धर्मरक्षणेच्छू |
| १४ रामरहिमपरमोपासक | १४ रामैकोपासक |
| १५ एकाकी | १५ मंडली करणारे |

समर्थांत व पूर्वसंतांत हीं अशीं भेदसाम्यें होतीं. पूर्वसंत तीन प्रकारचे असत. एक केवळ कर्मसंन्यासी, दुसरे कर्मसंन्यासी होऊं पहाणारे तर

खरे च, परंतु प्राधान्यानें केवळ भक्तिमार्गी व तिसरे लोकोपकारी. पहिल्या दोहोंची दृष्टि लोकांच्या बऱ्या वाईटा कडे बिलकुल नसे. भक्तिमार्गानें किंवा कर्मसंन्यासानें स्वतःला मोक्ष मिळविण्याचा त्यांचा हव्यास असे. तिसरे लोकोपकारी जे संत त्यांच्यांत व समर्थांत किंचित् साधर्म्य आढळतें. तें साधर्म्य ह्मणजे लोकोपकारबुद्धि. तिसऱ्या कोटींतील ह्या लोकोपकारी संतांची लोकोपकार करण्याची पद्धति समर्थांच्या पद्धती हून निराळी असे. यवनांनीं जुलूम केला, अन्याय केला, मारहाण केली, स्त्रिया भ्रष्टविल्या, देवळें जमीनदोस्त केलीं, पाणी बाटविलें, तर हे संत आपली शांति चळूं न देतां, लोकांना हि शांति ढळूं न देण्याचा उपदेश करीत. ते ह्मणत कीं, स्वतःच्या कृतीची लाज वाटून, अन्याय करणारा शेवटीं अन्याय करण्याचें सोडून देईल. दुष्टांच्या कृतीला दुष्टकृति ह्मणून ह्मणण्याचें हि वैषम्य त्यांना शक्य नसे. त्यांच्या मानानें वर्तमानकालीन सत्याग्रही परम जहालांत मोडतील. कारण, वर्तमानकालीन सत्याग्रही तें च तें च सत्य वर्तन आग्रहानें करून अन्यायप्रवर्तकाची अडवणूक करण्याचें रभसाचरित करतात. लोकोपकारी संतांच्या ठाईं ही अडवणुकेची बुद्धि बिलकुल नसे. अडविल्या शिवाय अन्यायप्रवर्तक न्यायप्रवृत्त होईल अशी त्यांची समजूत होती. अशीं देवमाणसें ज्यांचे पुढारी त्या महाराष्ट्रांतील जनतेच्या ठाईं दया, शांति, सोशीकपणा, इत्यादि गुण वृद्धिंगत झाले हें खरें आहे, आणि आंतून त्यांच्या मनाला पीळ पडला हें हि खरें आहे. परंतु अन्यायानें छल करणाऱ्यांच्या जुलमी स्वभावांत त्यानें विशेष फरक पडला असें मात्र दिसत नाहीं. कारण उघड आहे. कोणत्या हि दर्जाचा सत्याग्रह असो—फिका असो कीं जहाल असो—त्याची मर्यादा ह्मटली ह्मणजे अन्यायप्रवर्तकाच्या ठाईं निपजणारी लज्जेची भावना. सत्याग्रहानें जुलम्याच्या अंतःकरणांत आपल्या दुष्टकृती बद्दल लज्जा उत्पन्न झाली तर बरें! न झाली तर सत्याग्रह लुला पडतो. महाराष्ट्रांतील पूर्वसंतांचा सत्याग्रह मुसुलमानांच्या पुढें लुला पडला हें इतिहासांतील हजारों दाखल्यांनीं स्पष्ट झालेलें होतें. हा स्पष्टपणा समर्थांच्या लक्ष्यांत उत्कटत्वानें उतरला, त्यांनीं पूर्वसंतांचें हें सत्याग्रहाचें कुसुमास्त्र निर्माल्यवत् लेखिलें, आणि धर्मद्रोह, न्यायद्रोह व देशद्रोह करणाऱ्यांना सशस्त्र प्रतिकार करण्याचा व करविण्याचा विडा उचलला. धर्मद्रोही तितुके कुत्ते, बुडाला औरंग्या पापी, वगैरे त्यांच्या उक्तया प्रसिद्ध आहेत. समर्था-

ज्या तालमींत तबेंज झालेल्या शिवराजानें जिझिया कर बसविणाऱ्या औरंगझेबाची, देवता फोडणाऱ्या अफजलखानाची व हनुमंताच्या वानरांची थट्टा करणाऱ्या शाहिस्तेखानाची कोण दुर्दशा करून सोडिली, ती हि इतिहासप्रसिद्ध आहे. असा हा पूर्वसंत आणि समर्थ व समर्थशिष्य ह्यांच्यांतील भेद आहे. पूर्वसंतांचा हि हा कांहीं मोठासा दोष नाहीं. अनुभवानें शहाणपण संतांना सुद्धां येतें. विनवण्या, सत्याग्रह, निःशस्त्र प्रतीकार व सशस्त्र प्रतीकार ह्या धर्मरक्षणार्थ उद्योगाच्या पायऱ्या शक १२१८ पासून १६१८ पर्यंत महाराष्ट्रानें एका पुढें एक अनुभवानें आक्रमिलेल्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत.

(८) आतां रंगोपंतदादाच्या ज्या खर्ड्यांच्या अनुषंगानें समर्थांनीं शिवराजाचें साहाय्य आपल्या संस्थांच्या द्वारा कोणत्या प्रकारें केलें तें अल्पांशानें हि समजण्यास मार्ग सांपडला, त्या खर्ड्यांत मूळच्या ह्या कदीम देणगीवाल्यांचीं नांवें यावीं. परंतु दियानतराव व विशेषतः बाजी घोरपडे यांचा नामनिर्देश समर्थांच्या हिशोबाच्या खर्ड्यांत पुढें न येण्याचें कारण असें असावें कीं ते पातशाही खिजमतगार असून बाजी घोरपड्यानें तर शिवाजी महाराजांचें देहान्त वैर संपादन केलें होतें. सबब त्यांचीं नांवें १५७१नंतर शिवछत्रपतींच्या निरतिशय प्रेमामुळें गाळलीं गेलीं असावींत. समर्थसंस्थान अत्यन्त शैशवावस्थेंत असतांना भक्तिभावानें प्रथम ज्या उदारधी स्त्रीपुरुषांनीं निरपेक्ष साहाय्य केलें, त्यांच्या देणग्यांची मतब्बरी विशेष समजली पाहिजे. महत्पद मिळाल्या वर देणगी देऊन महत्पदाचे वाटेकरी होणारे पुष्कळ. पण अल्पपद असतां, कोणत्या हि महत्वाच्या आशेनें हुरळून जाण्याचा मोह नसतांना, जे देणगी देतात ते धीरोदात्त स्त्रीपुरुष वंद्य होत. समर्थसंस्थान छत्रपतींचें गुरुगृह झाल्या वर त्याला ज्या देणग्या मिळाल्या त्यांचा निर्देश रंगोपंतदादाच्या ह्या खर्ड्यांत झाला आहे. अशा भाग्योत्तर देणगीवाल्यांची याद खालीं देतों. ती वरून उत्तरोत्तर समर्थसंस्थाना कडे जनतेचें लक्ष्य कितपत होतें त्याचा अंदाज होईल. प्रारंभ अर्थात् शिवाजीमहाराजां पासून करतों.

१ श्रीशिवछत्रपति १५७१-१६०२
२ श्रीशंभुछत्रपति
३ श्रीराजारामछत्रपति
४ श्रीशिवछत्रपति
५ श्रीशाहूछत्रपति
६ श्रीशाहाजीछत्रपति
७ श्रीप्रतापसिंहछत्रपति
८ बाळाजी बाजीराव

९ मराव जिवाजी चिटणीस
१० उ/ज् दिवाण, किले सज्जनगड
११ प .राम लक्ष्मण, किले सज्जनगड
१२ यश्वंतराव जाधव हवालदार, सज्जनगड
१३ भवानी जाधव हवालदार, सज्जनगड
१४ खंडेराव जगन्नाथ
१५ रघुनाथ गोसावी वडगावकर
१६ चरेगावकर डुबल
१७ विठोजी सुर्वे, व्याघ्रगड
१८ देशपांडे, चाफळ
१९ विष्णुगोसावी ढवळे, चाफळ
२० व्यंकटराव राजे घोरपडे, कुमठें
२१ शेषोपंत खुलासे पोतदार, कीडगांव
२२ व्यंकटराव पाटणकर, दिवशी
२३ हरीभाई गुजर, सातारा
२४ विष्णुदासभाई गुजर, सातारा
२५ लक्ष्मणदास पुणेकर
२६ कुंभारगांवकर
२७ मानगांवकर
२८ ऐतवडेकर
२९ चरेगांवकर
३० पाडळीकर
३१ धामणेरकर
३२ संताजीराव घोरपडे सेनापती
३३ रताजीराव चव्हाण हिमतबहादर
३४ उमाबाई चव्हाण हिमतबहादर
३५ नारायणराव घोरपडे सेनापती
३६ इंदूराव घाडगे
३७ माधवराव बल्लाळ प्रधान
३८ देशमुखदेशपांडे, अंबड

इतक्या देणगीवाल्यांचा उल्लेख रंगोपंतदादांच्या खर्ड्यांत झालेला आहे. ह्या देणग्या फक्त चाफळसंस्थाना पुरल्या झाल्या. समर्थांच्या इतर मठांच्या व शिष्योपशिष्यांच्या मठांच्या देणग्यांची जर यच्चयावत् याद केली तर ती प्रस्तुत यादीहून किती तरी दशकांनीं व शेंकड्यांनीं फुगेल. समर्थसंस्थेवर महाराष्ट्रांतून व महाराष्ट्रीयांकडून देणग्यांचा हा जितका महान् वर्षाव झाला तितका वर्षाव महाराष्ट्रांतील ज्ञानदेव, नामदेव, दासोपंत, एकनाथ, तुकाराम, मोरयागोसावी, श्रीपादश्रीवल्लभ, किंबहुना श्रीशंकराचार्य यांच्या संस्थानांवर हि झालेला नसेल. तंजावरास तर एका रामदासी मठाला अर्ध्या पाऊण लाखा वर वार्षिक जहागिरी उत्पन्न आहे. आणि इतकी संपत्ति असून भक्ति, राजकारण व सावधानता यांच्या कडे किती मठांचे लक्ष्य आहे बरें ?

## उत्पन्नाचा खर्डा

\+ \+ \+ \+ \+ \+ \+ \+ \+ \+

\+ \+ \+ \+ \+ \+ \+ \+ \+ \+

देवपूजा नैवेद्य नंदादीप व अतीतअभ्यागत वगैरे खर्चास इनामी गाम्र व जमीनी व वर्षासने वगैरे चालत आहेत ते सुा तिसा अबैन मया तैन व अलफ ताा

१०६३५।।।·।। इलाखा सातारा

८५४३८।· गावगना वसुली बेरीज

२४२।। मौजे वावदरे ताा परळी येथील रुाा २५३।। पैकी वजा तश्रीफ वगैरे ११ बाकी वसुली देणे श्री स सीवाजीराजे महाराज छत्रपती + + + +
\+ + + + + +
\+ + + + + +

१७१८।।। काा चाफळ काा नाणेघोळ एथील गल्लया सुधा रुाा १९६५।।।≈।। पैकी वजा गाव निाा खर्च रुाा कची वहीवाट संस्थानची सबब रुाा २४२८≈।। बाकी वसुली देणे दरोबस्त गाव श्री स सीवाजीराजे महाराज छत्रपती याचे राजशके ५ त्याप्रमाणे काही दिवस चालले मधे राजक्रांती मुळे दरोबस्त चालले नाही मोकासबाब व साहोत्रा सरदेशमुखी + + + + + + + + लत होती पुढे श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस बालाजी बाजीराव प्रधान याणी पूर्ववत प्राो करून देऊन चालविले सन खमस खमसैन मया व अलफ

५२९१८≡ देह सुमारी ५ हे श्री स सीवा-
जीराजे महाराज छत्रपती याणी द-
रोबस्त करून दिल्हे राजशके ९ त्या
प्रो काही काल चालले पुढे राज-
क्रांती मुळे मोकासबाब व साहोत्रा
व सरदेशमुखी वगैरे अमल व काही
जमीन एणे प्रो चालले दरोबस्त
चालले नाही पुढे महारुद्रस्वामी
याचे वेळेस शाहाजीराजे महाराज
छत्रपती याणी नगारखाना व हाती
श्री स दिल्हा ते समई उछाहास
वगैरे खर्चास + + दरोबस्त ++
++ देऊन चालविले देहे बिा

८९८८।· काा नाणेगाव बुा
काा नाणेघोळ

७५०।।।‑ मौजे जालगेवाडी
काा नाणेघोळ ग-
ल्लुया सुधा

७९९।।।·। मौजे डेरवण ताा
हवेली प्राा कराड
गल्लुया सुधा

२१८१।।।· मौजे सोनगाव
साा निंब एथील
शाा २१९१।।।·
पैकी वजा तश्री-
फे बदल शाा १०
बाकी वसुली

६६०॥।-॥ मौजे सायगाव
ता। मेळे एथील
रुा ६७०॥।-॥
पैकी वजा तश्री-
फे बद्दल रुा १०
बाकी

५२९१८≡

१२९०॥।। देहे सुमारी तीन उछाहमहोछाहाचे
वगैरे खर्चास दरोबस्त श्रीमहारुद्र-
स्वामी याचे वेळेस शाहाजीराजे
महाराज छत्रपती याणी दरोबस्त
करून देऊन चालविले राजशके
१६९ सन सलास अबैन मया तैन
व अलफ कर्यात नाणेघोळ पैकी

६१५।।। मौजे नाणेगाव खुर्द
३५५।≡। मौजे
३१९॥।।॥ मौजे खोनोली

१२९०॥।।

८५४३८।।

८४०८।। जमीनी गावगना आहेत त्यांचे उत्पन्न

५५०८।। देणे श्री स सीवाजीराजे महाराज
छत्रपती याचे राजशके ५ व मौजे
अंबवडे एथे शाहूराजे महाराज छत्र-
पती याणी पांच बिघे जमीन राज-
शके ७१ दिल्ही त्या सुधा देहे

४४ मौजे अंबवड ता॥ परळी

६१॥ मौजे कळबे ता॥ तारळे

६५ मौजे बनघर ता॥ परळी

२५ मौजे सोनवडी ता॥ परळी

४६।॰ मौजे पाडळी ता॥ सातारा

१७॥ मौजे कारी ता॥ परळी

१७ का॥ रहिमतपुर

२१॥।–। मौजे माजगाव ता॥ तळबीड

४७॥ मौजे तांबवे ता॥ हवेली कराड

२९॥≈ मौजे सुपने ता॥ हवेली कराड

६० मौजे बाहे ता॥ वाळवे

४० मौजे सासपड

७४॥।॰ का॥ मसूर

———

५५०८।॰

३०॥॰ देणे श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस शाहूराजे महाराज छत्रपती याणी गावगना जमीनी देऊन चालविले ते राजशके ७४

२०॥॰ मौजे देहगांव ता॥ सातारा

१० मौजे रेटरे हरणाक्ष

———

३०॥॰

७९ देणे श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस राम-

राव जिवाजी चिटणीस याणी जमीन दिल्ही ती

६३ मौजे बोरगाव प्रा। शिरोळ पै। शके १७०० सन तिसा सबैन मया व अलफ

१६ मौजे माजगाव का। तळबीड सन समानीन मया व अलफ

---

७९

१०॥ मौजे कातवडी ता। परली एथे जमीन श्रीलक्ष्मणस्वामीचे वेळेस अज दिवाण किले सजनगड याणी दिल्ही सन इहिदे सितैन मया व अलफ

१५॥ देणे श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस परशराम लक्ष्मण किले सज्यनगड याणी सन तिसा मया तैन व अलफ

१० मौजे गनवडी ता। परळी

५॥ मौजे आरे ता। परली

---

१५॥

२२ का। परली ता। मा।र एथील जमीन श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस यशवंतराव जाधव हावलदार व कारकून किले सज्यनगड याणी दिल्ही सन खमस सितैन मया व अलफ

७६।· देणे श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस भवानी

जाधव हावलदार किले सज्यनगड याणी
जमीन दिल्ही

२२ मौजे हवेली ता। परली शके
१६८४ चे साली

५४।· मौजे नांदगाव ता। सातारा
सन इहिदे खमसैन मया व
अलफ चे साली

७६।·

१८ मौजे + + पुर कर्यात + + एथे जमीन श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस खंडेराव जगंनाथ याणी दिल्ही सन सबा खमसैन मया व अलफ ए विसी सरकारी ताकीद आहे

२२॥· देणे श्रीहनुमतस्वामी याचे वेळेस रघुनाथगोसावी वडगावकर याणी दिल्ही ती शके

१७॥ मौजे शेणोली प्रा। कराड

५ मौजे मोहोदरे प्रा। कराड

२२॥

२ मौजे चरेगाव प्रा। कराड एथील जमीन श्री डुबल चरेगावकर याणी दिल्ही शके

६ मौजे कडगुण एथील जमीन श्रीमहारुद्रस्वामीचे वेळेस मौजे मा।र एथील

२॥· मौजे कांबरी ता। वंदन

·।· मौजे लावघर ता। परली

५ मौजे कालवडे पेटा कराड

८४०।·

१२५२॥।· वर्षासने नक्त व ऐनजिनस मिळोन

७२५ हुजूर मामला प्रांत कराड एथे नेमणुकी ऐवज एत होता तो हाली हुजूर सातारियाहून एतो देणे लक्ष्मणस्वामी याचे वेळेस शाहूराजे महाराज छत्रपती याणी करून दिल्हे राजशके ७४

७ किले व्याघ्रगड एथील नेमणुकी पै॥ हाली हुजूर सातारियाहून एतात देणे लक्ष्मणस्वामी यांचे वेळेस विठोजीराव सुर्वे किले व्याघ्रगड याणी नेमणूक सोला रु॥ ची करून दिल्ही त्या पै॥

६४ जकात तर्फ मेढे एथील नक्त एतात देणे श्री स शिवाजीराजे महाराज छत्रपती याचे दरोबस्त त्या पै॥ हाली नेमणुकी एतात ते राजशके ५

११६८=पेटा सातारा एथील किलेमजकूरचे देवस्थाना बद्दल एकदर नेमणूक३५३॥।≈।· पै॥ वजा किलेमजकूरचे देवस्थाना कडे व कामाटी गड्या बद्दल २३७॥।<।· बाकी संस्थानी श्रीकडील खर्चा बद्दल एतात ते श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस शाहूराजे छत्रपती याणी सातारा सुभ्याहून राजशके ७१ साली ६२५ रु॥ नेमणूक करून दिल्ही त्या प्रा॥ काही दि-

वसे चालले हाली किल्याचे देवस्थानाचे
खर्चाचे पोटात खर्च एडोन एतात ते

४० देशपाडे का। चाफळ का। नाणेघोळ
हे पूर्वी उछाहांतील दशमीचा दिवस द-
रोबस्त खर्च करीत होते पुढे लक्ष्मण-
स्वामीचे वेळे पासून नादारीस आले
सबब आपले हकदारी बद्दल च्यालीस
रुा संस्थानी देत आहेत ते

२० विष्णुगोसावी ढवले हे पूर्वी उछाहातील
शष्ठीचे दिवसी खर्च दरोबस्त वडिलोपा-
र्जित करीत होते पुढे लक्ष्मणस्वामी याचे
वेळे पासून नक्त वीस रुा देत आहेत

१२५ सरकार छत्रपती खासगी कडून
१०० उछाहात नवमीचे दि-
वसा बद्दल
२५ फाल्गुण शुा ८ श्री-
हनुमतस्वामीचे पुण्य-
तिथी बद्दल

१२५

एणे प्रमाणे हाली एतात पूर्वी लक्ष्मण-
स्वामीचे वेळेस जामदारखान्या कडून
उछावास वगैरे ३००० तीन हजार
रुपयाचे सालाबादी करून दिल्हे ते
काही दिवस चालले हाली नेमणूक खा-
सगी कडून देतात ती सदरी लिहिली
आहे व कारणपरत्वे खर्चास लागल्यास
समयाचे समई देऊन चालवीत आहेत

१०० मौजे कुमटे एथील नक्त रुा व्यंकटराव राजे घोरपडे मुधोलकर याज कडून उ-छाहा बद्दल एत आहेत

११ मौजे कीडगाव ता। सातारा एथील शे-षोपंत खुलासे पोतदार याणी श्रीमहारु-द्रस्वामीचे वेळेस करून दिल्हे शके १७५५

७॥· मौजे दिवसी खुर्द ता। पाटण एथील ऐन-जिनस यांत केली ·।· ऐनजिनस एत हे श्रीमहारुद्रस्वामी याचे वेळेस व्यंकटराव पाटणकर याणी करून दिल्हे शके १७६८

१४॥।~नंदादीपा बद्दल तेल सातारकर गुजर याज कडून सालाबाद ऐनजिनस एत आहे वजन कचे ·।४

८३ हरीभाई गुजर
८३ विष्णुदासभाई
८३ लक्ष्मणदास पुणेकर
·।४

श्रीहनुमतस्वामीचे वेळे पासून चालत आहे

२२।· भिक्षे बद्दल गावकरी यानी नक्त रुा करू-न दिल्हे ते श्रीलक्ष्मणस्वामीचे वेळे पासून

५ मौजे कुंभारगाव प्रां कोळेवळीत
१२ मौजे मानगाव का। तळबीड
१ मौजे ऐतवडे पेटा वाळवे
१। मौजे चरेगाव पेटा, कराड
१ मौजे पाडळी ता। सातारा

२ मौजे धामणेर साा कोरेगाव

२२।·

१२५२।।।·

१०६३५।।।·।।

२५७।।। इलाखा करवीर

७२ मजरे ठाणेचीवाडी काा कापसी एथील जमीन रुाा १०० पैकी हाली लागण आहे ती देणे श्रीमहारुद्रस्वामी याचे वेळेस संताजीराव घोरपडे शेनापती याणी इनाम करून दिल्ही सन सलास सलासीन मया तैन व अलफ शके १७५४

५० ठाणेकरमळी प्राा अजरे एथील जमीन आकार रुाा १०० पैाा हाली लागण आहे ती देणे श्रीमहारुद्रस्वामी याचे वेळेस रताजीराव चव्हाण हिमतबहादर याणी वर्षासन शंभर रुपयाचे करून दिल्हे ते हाली इनाम जमीन करून दिल्ही सन तिसा अशरीन मया तैन व अलफ

२५ मौजे रेटरे ताा वारूण देणे सौ उमाबाई चव्हाण हिमतबहादर याणी जमीन इनाम करून दिल्ही सुाा सलास सलासीन मया तैन व अलफ

३।।। मौजे सिपूर काा उडतर एथील जमीन आकार रुाा २५ पौ हाली पड आहे देणे श्रीमहारुद्रस्वामी याचे वेळेस नारायणराव घोरपडे शेनापती याज कडून सन समान सलासीन मया तैन व अलफ

३२ मजरे बेलवडी काळम्मा काा कापसी

एथील जमीन देणे श्रीमहारुद्रस्वामी याचे वेळेस नारायणराव घोरपडे शेनापती याज कडून सन तिसा अशरीन मया तैन व अलफ

० मौजे कातोळी एथील इनाम जमीन आकार रुा २५ पैकी हाली पड देणे महारुद्र-स्वामी याचे वेळेस रताजीराव चव्हाण हिंमतबहादर याणी

७५ नक्त वर्षासन श्रीहनुमतस्वामी याचे वेळे-स इंदूराव घाटगे याणी करून दिल्हे रुा ५०० त्या प्रो काही दिवस चालले पुढे निर्वेध चाले ना सबब नानासाहेब घाटगे चिखलीकर + + + + +
+ + + + + + +

( येथून पुढें बरा च मजकूर गहाळ )

+ + + + + +
+ + + + + + +

१५९५।·

खर्चाबद्दल रुा वजा ४९०॥~॥ बाकी वसू-ली देणे श्री स सीवाजीराजे महाराज छत्रपती याचे दरोबस्त परंतु राज्यक्रांती मुळे दरोबस्त चालले नाही मोकासबाब सरदेशमुखी वगैरे अमल चालत होते पुढे श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस माधवराव बलाल प्रधान याणी पूर्ववत करार करोन दिल्हे त्या प्रो चालत आहे सन सलास सितैन मया व अलफ शाके १,६++

५० मौजे दहीफल प्रा शेवली हा गाव दरोबस्त श्री स सीवाजीराजे महाराज छत्रपती याणी दिल्हा राजशके ५ परंतु दरोबस्त चालले नाही हाली मोकासा व बाबती सरदेशमुखी वगैरे अमल चालत आहे वसूल हिस्सेरसदी प्रो येतो

५० नक्त वर्षासना बद्दल प्रो आंबड एथील गावगना रुा एक प्रो रुा २४० श्रीलक्ष्मणस्वामी याचे वेळेस देशमुख देशपांडे याणी करून दिल्हे पो हाली आंबड एथून रोख चालत आहेत ते

१२०४॥=॥

१४६५८।≡

तपसील

१६५० असमानीसुलतानी बद्दल गावगना नादारी बद्दल सूट पडती ती

८०० इलाखा सातारा

८०० इलाखा इंग्रजी सरकार एथील मौजे हिंगणगाव को कवठेमहांकाल

५० इलाखा मोगलाई पो आंबड एथील

१६५०

१३००८।≡ बाकी वसूली

१४६५८।≡

एकूण चवदा हजार साहा शे अठावन रुा सात आणे व गावगना राबते महार व चरढे व जोडे चर्मी व उछाहाची वगैरे वेठबेगार व लाकडे मोळ्या व गुरवा कडील पत्रावली चालत आहेत

(९) ज्यांनीं तयार केलेल्या खर्ड्यां वरून समर्थसंस्थाना संबंधानें ही इतकी नवीन माहिती मिळण्याची सवड झाली त्या रंगोपतदादा मेढे यांची हकीकत एथें देण्या सारखी आहे. रंगोपंतदादा मेढे हे मूळचे कापशीचे

रहाणारे. हनुमंतस्वामींचें पहिलें कुटुंब संकेश्वरा जवळील नेरलीकरांच्या घराण्यांतील. या प्रथम कुटुंबाच्या लग्याबांध्यानें रंगोपंतदादा हे प्रथम चाफळास आले व तेथें च हनुमंतस्वामींच्या मर्जींत चढून त्यांचे कारभारी झाले. रंगोपंत संस्कृतज्ञ असून, मोरोपंती थाटा वर आर्या करण्याचा यांना चांगला नाद असे. चाफळसंस्थानांतील कागदपत्रें व टिपणेंटापणें पाहून ह्यांनीं रामदासांच्या बखरीचा खर्डा तयार केला. तो च खर्डा पुढें हनुमंतस्वामीकृत रामदासांची बखर ह्मणून प्रसिद्ध झाला. वस्तुतः सर्व कारवाई रंगोपंतदादांची होती. यांचा व उपाध्यांचा किंचित् बेबनाव होता, सबब उद्धवादि समर्थशिष्यांची बाजू यांनीं किंचित् खुलवून लिहिली, असा आक्षेप उपाध्ये यांच्या बाजूच्या मंडळीचा पडला. उद्धव व दिवाकर यांच्यांतील कलह समर्थांच्या निधना नंतर जो एकदां चव्हाट्या वर आला तो कित्येक पिढ्या तसा च राहिला. रंगोपंता वर हनुमंतस्वामींची कालान्तरानें इतराजी झाली. तेव्हां पंत रुसून साताऱ्यास छत्रपतींच्या कडे गेले. तेथें छत्रपतींच्या दरबारीं त्यांचा रुबाब इतका बसला कीं, छत्रपती कधीं कधीं रंगोपंतांच्या खांद्या वर हात ठेवून त्यांशीं संभाषण करीत असत. रंगोपंतदादा हे दिसण्यांत भव्य व बोलण्यांत गंभीर असत. छत्रपतींच्या विनंती वरून महारुद्रस्वामींनीं पुढें रंगोपंतास चाफळास परत बोलाविलें. त्या प्रसंगा संबंधानें एक पत्र रा. गणपतराव मेढे यांच्या दफ्तरांत आढळलें तें एणे प्रमाणें:—

श्रीरामसमर्थ

महारुद्रनाम्ना

चिरंजीव राजश्री रंगो लक्ष्मण मेढे यासी—

अनेक आसीर्वाद सुा सबा अशरीन मया तैन व अलफ श्रीमत् छत्रपती याणीं समक्ष सांगितल्या वरून व तुह्मी संस्थानचे एकनिष्ठ सेवक आहात हे मनात आणोन तुह्मास परत आणविणे बदल इकडून मुदाम गोविंद। सावंत व राघू शेलार पाठविला आहे मनात काहीं शंका न आणिता निघून यावे ह्मणजे सातारियास जाऊन श्रीछत्रपती महाराज यांचे समक्ष तुमचे मनांतील विकल्प काढून टाकिता येईल तुह्मा कडे पेशजी पासोन सनदे प्रमाणे शंभर रुपयांचें इनाम जमीन आहे ती सुरक्षितपणे चालेल असा बंदोबस्त होईल अशी तजवीज करू सिवाय नेमणुके बदल भोजनखर्चा

सिवाय १५० रुपये पेशजी पासोन चालत आहेत त्या प्रमाणे तुमचे वंशपरंपरेने घेऊन सुखरूप रहाणे इकडून काहीएक अंतर होणार नाही सदर्हू जमीनी बदल चिरंजीव राजश्री धोंडी कुत्रुक यास व जमीनीतील कर्दे कुळास अलाहिदा संस्थानातून ताकिदी दिल्ह्या आहेत त्या प्रमाणे सालमजकुरी संस्थानी आदा जाहलेला वसूल चिरंजीवा कडून तुह्मास मिळेल व पेस्तर साला पासून तुह्मी जमीनीची व्यवस्था करून वसूल घेत जाणे इकडून हरकत होणार नाही ७ २५ रजब बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद

---

मर्जीत असताना हनुमंतस्वामींनीं रंगोपंतास खालील सनद करून दिली होती:—

श्रीरामसमर्थ

श्रीरामदासस्वामी

हनुमतनाम्ना

चिरंजीव राजश्री रंगो लक्ष्मण मेढे यासी:—

अनेक आसीर्वाद सुा तिसा तिसैन मया व अलफ तुह्मी समक्ष विनंति केली की माझे संसारखर्चास संस्थानातून काही उत्पन्न असावे त्याज वरून मनास आणिता तुह्मी कुटुंबवत्सल व संस्थानचा बहुत प्रकारें उपयोग केला आहे हे जाणून तुह्मास कसबे चाफळ पैकी जमीनी दिल्या त्या बिा

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | चाफळपैकी मळई माहादजी व जोती पाा याची साहा मण आकाराची | ३० | मौजे गनोवाडी एथील मोडे याची जमीन साहा मण आकाराची |
| ३५ | मजरे भांबेवाडी एथील अंकुशनायकाची मळई व पद्या व परसे व माळ | ५ | मजरे गायकवाडवाडी पैकी एक मण आकाराची जमीन |
| ६५ | | ३५ | |

१००

एणे प्रमाणे शंभर रुपये आकाराची जमीन तुह्मास संसारखर्चास इनाम

करून दिल्ही त्यातील उत्पन्न जे होईल तुह्मी पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने अनभऊन सुा राहाणे जाणिजे छ ११ रजब

मोर्तब
सुद

---

या नंतर कांहीं वर्षांनीं हनुमंतस्वामी व रंगोपंतदादा यांच्यांत वितुष्ट पडलें. तेव्हां शेता बद्दल खटके उडू लागले. त्या संबंधानें एक पत्र एणेप्रमाणें उपलब्ध आहे:—

श्री

श्रीभवानीप्र॥
श्रीराजाशाहूछत्र
पति महींपाल + +
अंताजीसुत वासु
देव ++++

आज्ञापत्र राजश्री वासुदेव अनंत ता। मोकदम मौजे चाफळ सुा। सन अर्बा अशर मया तैन व अलफ राजश्री रंगो लक्ष्मण मेढे रा। चाफल याणी हुजूर विदित केले की चाफलचे स्वामी याणी इनाम जमीनी दिल्या आहेत त्या प्रमाणे चालत असता जोती नायकवाडी हा आपली ह्मणून तकरार करितो त्या वरून मेढे याचे कागदपत्र पाहता नायकवाडियाचा जमीनीत समंध नाही सबब हे आज्ञापत्र सादर केले असे तरी नायकवाडियासी पुना खटला न करणे विसी ताकीद करून असलपत्र मेढे यास देणे जाणिजे छ १५ रमजान

मोर्तब
सुद

---

इतराजी झाल्या वर आपले कागदपत्र व पोथ्या पुस्तकें घेऊन रंगोपंतदादा कांहीं दिवस कापशीकडे जाऊन राहिले होते. तेव्हां कापशीस रंगोपंतदादानीं नेले असल्यास कांहीं रामदासी कागद सांपडण्याचा संभव आहे.

[ ६८ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांचे शिष्य

**समर्थें कितेक गुप्त शिष्य केले । ते ते समर्थांसि विदित भले ।**
**भरतखंडीं प्रगट जे जाले । ते ते निवेदन करूं ग्रन्थार्थीं ॥**

( १ ) प्रत्यक्ष श्रीसमर्थांचे एकंदर शिष्य किती होते त्यांची नक्की मोजदाद केव्हां च करतां यावयाची नाहीं, कारण खुद्द त्यांच्या हि वेळीं त्यांची कृपा कोणकोणावर झाली होती, याची बरोबर कल्पना त्यांच्या शिवाय दुसऱ्या कोणास नव्हती. कांहीं कल्पना कल्याणांना असे, इतरांना फार च थोडी माहिती होती, आणि त्यांतल्या त्यांत शिवछत्रपतींना तर अगदीं निकटच्या हि शिष्यांची वार्ता नसे. त्यांना ही गोष्ट मुद्दाम कळविली जात नसे. श्रीसमर्थांची तशी आज्ञा होती. याचें एक कारण उघड आहे. राज्यकारभारांत जी मंडळी होती, तीपैकीं बरे च जणांनीं श्रीसमर्थांचें अंतेवासित्व पतकरिले होतें, पण ही गोष्ट छत्रपतींना ठाऊक नव्हती. ती गोष्ट त्यांना ठाऊक झाली असती तर राज्यकारभारांत ढिलेपणा आला असता. आपल्या हाताखालील अमुक एका गृहस्थास श्रीसमर्थांचा अनुग्रह झालेला आहे हें ठाऊक असल्यावर त्याच्या दोषांकडे छत्रपतींचा कानाडोळा होईल, किंबहुना त्याच्या कडे पाहण्याचा राजांचा दृष्टिकोन च बदलेल, हें श्रीसमर्थ जाणून होते, आणि म्हणून अमुकांवर श्रीची कृपा आहे ही गोष्ट राजांच्या पासून लपवून ठेवण्यांत येई.

( २ ) यासंबंधाचा एक मनोरंजक प्रसंग श्रीदासविश्रामधामाच्या ५९ व्या प्रकरणांत वर्णिला आहे. त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. आमच्या प्रेमळ वाचकांनीं तो मुळावरून च वाचावा हें बरें.

( ३ ) अशी स्थिति असल्यामुळें ज्या ज्या मठांत " श्रीसमर्थांचे शिष्य " म्हणून जी जी यादी सांपडेल ती ती संशोधकानें मिळवून प्रकाशित केली पाहिजे. प्रत्येक यादींत कांहीं तरी नांवें नवीन असणार च हें नक्की समजावें. डोमगांव मठांतील एक दोन बाडें व श्रीसमर्थप्रताप यांच्या सहाय्यानें ८९ शिष्यांची नोंद, आपण मागें श्रीरामदासी मालेंतील तिसऱ्या भागाच्या

प्रस्तावनेंत केलेली आहे. तेव्हांपासून आतांपर्यंत आणखी बरीं च नवीन नांवें आपणांस समजलीं आहेत. त्या सर्वांची एकत्र नोंद पुढें मागें केव्हां तरी करूं.

( ४ ) आज येथें नीलंगे मठांतील एक यादी द्यावयाची आहे. ती अशी:—

॥ श्रीराम ॥

## श्रीरामदासस्वामीचे मुख्य शिष्य

कल्याणस्वामी डोंमगांवकर
आणापास्वामी निलंगेकर
गीरी गोसावी
मुनि गोसावी अनंत मौनी मनीगुंडीकर[1]
जयवंत गोसांवी वराडकर
त्रींबक गोसांवी
देवदास गोसांवी दादेगांवकर
दिनकर गोसावी
मुनीराम भोळाराम वेंगरूळकर
( भानुदास[2] ) गोसावी
निरंजन गोसावी तेगुर प्रा कितुर
उधव गोसांवी टांकळीकर
वासुदेव बावा कन्हेरीकर
मेरु[3] गोसावी चंदावरकर
निळकंठ गोसावी
पीलाजी बावा कोकण
रोकडेराम[4] वराड
बाळकराम वराडकर
मुसळ गोसावी
गोपाळपंत शाह०
( भीम ) रावे[5] नाना चं०
( कुडा ) ळकर देशपांडे
आनंदराव हवालदार
शाहापुरकर बाई
वेणाबाई मीरजकर
चीमाबाई आका[6] शाहापुरकर

( ५ ) यादी समर्थकालीन दिसत नाहीं. तशी ती असती तर मेरु व रोकडाराम हे प्रशिष्य असतां शिष्य ह्मणून दिले नसते. मेरु हे अनंत-

---

१ मन्नारगुडीकर. २ नांव फाटण्यात गेलें आहे, परंतु जो अवशिष्ट भाग दिसतो त्यावरून "भानुदास" असें नांव असावें, असें ठरविलें आहे. ३ हे समर्थशिष्य नसून प्रशिष्य होत. ४ हे हि प्रशिष्य च होत. ५ नांव फाटण्यांत गेलें आहे. पण चंदावरचे दुसरे कोण असणार ? ६ आका खरोखर कऱ्हाडच्या.

मौनींचे शिष्य व रोकडाराम हे बाळकरामांचे शिष्य होत, याबद्दल आतां शंका नाहीं. रोकडारामाबद्दल अशी च चुकी हनुमंतस्वामीकृत बखरींत हि झालेली आढळते. या यादींत

| | |
|---|---|
| जयवंत गोसावी वराडकर | नीळकंठ गोसावी |
| भानुदास गोसावी | पीळाजी बावा कोकण |
| निरंजन गोसावी तेगुर प्रा कितुर | आनंदराव हवालदार |

हीं सहा नांवें अगदीं नवीन आहेत. वऱ्हाडांत, तेगुरास, कोकणांत आणि हवालदारा विषयीं बहुधा गडावर तपास करण्यास हें साधन झालें.

( ६ ) या यादीवरून आणखी एक चांगला उलगडा होतो. त्रिंबक गोसावी ते च भोळाराम होत असा जो समज झालेला आहे, तो चुकीचा आहे, असें आपण प्रतापादि ग्रन्थांवरून ठरविलें आहे, त्या मतास या यादीनें पुष्टि मिळते. भालगांवमठपति ते त्रिंबक गोसावी होत. ते च भोळाराम होत असा भालगांवकरांचा हि समज असावा, हें जरा चमत्कारिक दिसतें. भोळारामांचें या यादींत नांव व गांव हीं दिलीं आहेत. बेंगरूळास ह्मणजे बंगलोरास त्यांच्या विषयीं बारकाईनें तपास केला पाहिजे.

---

[ ६९ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थशिष्य मुसळराम

मुसळ करीं मुसळ नामा । मुसळीं हनुमानाचा दावी महिमा ।
गंगातीरीं धोंडरींत सामर्थ्यसीमा । माहापुरीं मुसळ रोविलें ॥

स. प्र. १०-५१

( १ ) उद्धवस्वामींच्या टांकळीमठांतील बाड अनुक्रमांक १ यांत मुसळरामांचे सात अभंग आढळले. ते वाचून असें वाटलें कीं, अशी आणखी **मुसळरामांची** किती तरी कविता असली पाहिजे. काय त्यांनीं एवढे सात च अभंग केले असतील ? आजपर्यंत दुसरीकडे कोठें हि मुसळरामांची कविता आढळली नव्हती व हे मुसळराम कोठील, त्यांचा मठ कोठें होता,

वगैरे माहिती हि पूर्वी कोठें दिलेली आढळण्यांत नव्हती. हे सात च अभंग नुसते काय द्यावे, कांहीं जास्त शोध करावा, मुसळराम कोठें होऊन गेले याचा पत्ता लावावा व इतर माहितीसह मग हे अभंग प्रसिद्ध करावे, असें ठरवून ते सात अभंग तसे च दप्तरांत राहूं दिले.

( २ ) मथळ्यावर दिलेली समर्थप्रतापांतील ओवी आठविली. गंगातीरीं **धोंडरी** गांव कोठें असावें, याचा शोध केला. तों मोगलाईत आंबड्च्या दक्षिणेस गंगेचे कांठीं **धोंडराई** गांव आहे, असा शोध लागला. तेथें एकास मुद्दाम पाठविलें. तेव्हां तेथें रोगाची सांथ होती व गांव बाहेर पडलें होतें. गंगेच्या पात्रांत च मध्यभागीं तेथें मारुतीचें स्थान आहे. लोकांना कांहीं माहिती नाहीं, पण हें च तें स्थान असावें कीं जेथें मुसळरामांनीं सामर्थ्यबळें महापुरांत मुसळ रोविलें ! **धोंडराईत** मठ वगैरे कांहीं नाहीं, पण जवळ च कोस दीड कोस **गवराई** म्हणून ठिकाण आहे, तेथें राममंदिर आहे, एवढी माहिती मिळवून गेलेले श्रीसमर्थभक्त परत आले. ते गवराईस पुढें गेलें नाहींत, कारण ते वेळीं गवराईस तर सांथीचा कहर उसळला होता, असें त्यास कळले. गवराईस शोध व्हावयाचा राहिला होता, तो योग नुकता च आला. पौष शु. १५ श्रीसमर्थदास तेथें गेले होते. फार आशा होती कीं, गवराईस कांहीं तरी संग्रह मिळेल ! न जाणों, मुसळरामांची विपुल कविता मिळेल, श्रीसमर्थांचीं कैक बाडें उपलब्ध होतील, महत्त्वाचीं कागदपत्रें सांपडतील, काय मिळेल आणि काय नाहीं कोणी सांगावें! पण सर्वथैव निराशा झाली. श्रीसमर्थदास लिहितात " येथें फक्त श्रीराममन्दीर आहे, मूर्ति पट्टाभिषेकरामाच्या आहेत. मन्दिराचा जीर्णोद्धार दोन वर्षांमागें जाला आहे, पण मठपतींचें सर्व कुटुंब बारा वर्षांपूर्वी प्लेगनें नष्ट झालें ! त्यांच्या मठास सरकारी कुलुप पडून सर्व सामानाची वाताहात जाली. कांहीं सरकारजमा जालें. वार्षिक ३२ रुपये उत्पन्नाची इनाम जमीन होती ती येथील रामकृष्ण नाईक तरवडे यांचे नांवें पुन: बहाल जाली आहे. इतकी च हकीकत येथें समजली. मुसळरामांचें नांव देखील येथील कोणा हि मनुष्याला माहीत नाहीं. "

( ३ ) अशा रीतीनें मुसळरामांचा मठ **गवराईस** होता, इतकें समजलें, पण मठाची वाताहात होऊन मठांत कांहीं उरलें नाहीं ! नुसती परंपरा सांगण्यास हि कोणी उरलें नाहीं. तेव्हां आतां ते सात अभंग जवळ ठेवून काय करावयाचें आहे, असें जाणून ते आज श्रीसमर्थभक्तांना सादर

करण्याचें योजिलें आहे. उद्धवकल्याणादिकांच्या इतपत तरी माहिती मुसळरामांची मिळावी, असें फार वाटत होतें. पण तूर्त तरी ती माहिती मिळणें नशिबीं नाहीं. प्रयत्न करून हि पूजेचें इतर सामान कांहीं च न मिळाल्यामुळें केवळ हीं सात पुष्पें श्रीसमर्थचरणीं आज अर्पण करीत आहे, तीं, अंतरींचा भाव जाणून, ते मान्य करोत !

## ( १ ) बेइमान[1] जीव

धन्य राम नाम हराचा विश्राम । उदासाचा धर्म राम पाळी ॥ १ ॥
रानीं वनीं जनीं दासांचा पाळक । त्रैलोक्यनायक रामचंद्र ॥ २ ॥
गर्भामाजि जेणें पाळिलें नव मास । सोहं ऐसा सोस विसरलों ॥३॥
नव मास दुःखिस्छ वाट संकोचित । तुज भजे ह्मणत बाहेर आलों ॥ ४
मायेचा पवन लागतां आंगासी । स्तनपान पोसी मायारूपी ॥ ५ ॥
वाढवितां त्याला शुद्धि नाहि याला । ह्मणोनि काळाला कोप चढे ॥ ६॥
वाढत वाढत तारुण्यें व्यापीला । स्त्रीयेसि विकिला जीव प्राण ॥ ७ ॥
देखतां मानसीं आनंद वाटत । तीपुढें भगवंत कैचा याला ॥ ८ ॥
बाळत्व तारुण्य वार्धक्य पै जाण । निदानीं मरण खरें आलें ॥ ९ ॥
निळाजिरा पाहे कोण्या तोंडें उभा । पाकीटाकीउभामां[2]जिआला ॥१०
ऐसा बेयीमान तीनुगे[3] फिरलो । पारि नाही शरण गेलों रामचंद्रा ११
म्या सर्वस्व हारविलें तुज निरविलें । मुसळ ठेविलें नाम तुवां ॥ १२ ॥

---

## ( २ ) स्त्रीसंग

स्त्री दुःखाचा डोंगरु । स्त्री शोकाचा सागरु ।
स्त्रीसंगें पैलपारु । न पवे प्राणी ॥ १ ॥
स्त्री दुःखाचें बंधन । स्त्री अविद्या प्रपंच जाण ।
स्त्री दुःखाचें निधान । पुनः पुन्हा ॥ २ ॥
स्त्री दैन्याचें बिढार । स्त्री दारीद्राचें घर ।
स्त्रीकेरितां[4] पैलपार । न पवे प्राणी ॥ ३ ॥
स्त्री घेऊनि विषयांचा सोंटु । भोंवतां नाचवी जैसा मर्कटु ।
स्त्री परमार्थाचा घोंटु । न घोंटवी कदा ॥ ४ ॥
स्त्री घालुनियां कज्जळ । उभारील विषयांचें जाळ ।
नाना चेष्टेचें खळाळ । वाहविला प्राणी ॥ ५ ॥

---

१ अभंगांतील विषयानुरूप अभंगांचीं नांवें संपादकानें ठेविलीं आहेत. २ हे चरण लागले नाहीं. ३ तीन युगें. ४ स्त्रीमुळें ५ आंब्याची वगैरे पोळी.

स्त्रीकरितां संतती । स्त्रीकरितां घरें बांधती ।
स्त्रीकरितां व्यापारीं गुंतती । स्त्री दुःखालागि ॥ ६ ॥
स्त्रीसंगें साहेब[1] मारी । स्त्रीसंगें बहुतांचा वैरी ।
स्त्रीसंगें भरोभरी । घराश्रम ॥ ७ ॥
स्त्रीसंगें नित्य उदेगी[2] । स्त्रीसंगें यातना भोगी ।
स्त्रीसंगें जाला रोगी । निज तत्त्व हारउनि ॥ ८ ॥
स्त्रीसंगें व्याही जावायी । स्त्रीसंगें पशु गायी ।
स्त्रीसंगें मन पायीं । बांधलें काळाचे ॥ ९ ॥
स्त्रीसंगें खोटें नीट । स्त्रीसंगें लागली चट ।
स्त्रीसंगें खटपट । सर्वज्ञ जाणती ॥ १० ॥
स्त्री दुःखाचा अतिलोभ । श्रीरामेंवीण करी गर्धभ ।
तयासि काळाचा क्षोभ । देहांतीं जाणवे ॥ ११ ॥
ह्मणोनि विकृति त्या मुसळा । सांडूनि सर्व पळाला ।
रामरूपीं लपाला । मजला न देखों कोण्ही ॥ १२ ॥

## ( ३ ) संसार

संसाराचें सुख मानीला हरीख । अंतीं तुज दुःख निश्चयेसीं ॥ १ ॥
संसारीं आनंदु परमार्थी विनोदु । विषयांच्या छंदें जन्म गेला ॥२॥
जन्म तुझा गेला काबाड वाहातां । कां रे सीताकांता अव्हेरिलें ॥३॥
गेले थोर थोर प्रतापें ईश्वर । आपुला निर्धार कोठवरी ॥ ४ ॥
कोठवरी आतां सीणसी संसारीं । अंतीं तुझी नारी तुज नव्हे ॥५॥
तुझें नव्हे कोण्ही सखें परलोकीं । कां रे काकुलती करितोसी ॥६॥
सेत घर ठाव सर्व ही राहील । सांडुनि जासील कळेवरें[3] ॥ ७ ॥
माता पिता पुत्र कांता धन मित्र । राहील स्वतंत्र येथें बापा ॥ ८ ॥
मागें थोर थोर राजे धीर क्रूर । काय ते उदार घेउनि गेले ॥ ९ ॥
मिथ्या मायाजाळ विस्तार विशाळ । देखोनियां पळ साधुसंता ॥१०
काय ते मूढ........नि पळाले । देखोनि जळाले मायाजाळ ॥११॥
कर्मरेखादोरी खुंटाया उपाय । परतोनि पाहे मूळाकडे ॥ १२ ॥
आतां वाहे राम मुसळा हें चि काम । रामें सर्व काम पूर्ण जालें॥ १३ ॥

---

१ धनी. २ उद्वेगी. ३ शरीर.

## ( ४ ) भक्ति

संसार दुस्तर भयानक थोर । कैसेनिया पार पाविजेल ॥ १ ॥
पाववील राम दीनाचा कैवारी । दुःख हें संसारीं नको आतां ॥ २ ॥
नको मज आतां दुर्जनाचा संग । ज्यांच्यानि विरंग रामराणा ॥ ३ ॥
द्यावी भक्ति आतां अनाथ केवळ । दास हें मुसळ नाम माझें ॥ ४ ॥

## ( ५ ) उपदेश

रामेवीण नरा सर्व ही पसारा । सांडुनियां वरा सर्व जासी ॥ १ ॥
संतती संपती विद्या वैभव जाण । अंतीं कोण कोण आठविसी ॥२॥
आठवेल तेथें नाहीं कोण्ही जेथें । कैचें सर्व व्यर्थ अंतकाळीं ॥ ३ ॥
अंतोचिये वेळे जायिल कळेवर । न होतां करी थार मुसळ ह्मणे ॥

## ( ६ ) करुणासागर राम

भक्तजनसखा जीवाचा सांगाती । त्यासी काकुलती यावी माझी॥१॥
माझी सर्व चिंता श्रीरामासी लागो । तो चि नित्य जागो आत्मरूपीं॥
करुणेचा सागरु मनाचा गंभीरु । भवसिंधूचा पारु पाववील ॥ ३ ॥
जेथें उभा दास तेथें राहे सहज । रामा हें चि काज दास पाळी ॥४
पाळिलें प्रल्हादा नाना संकटांत । धन्य तूं अनंत काय वर्णू ॥ ५ ॥
संकटीं द्रुपदी आकांतीं ते बाहे । कृष्णा ये रे पाहे कोण्ही नाहीं॥६॥
आकांतीं धांवसी सांडुनियां सर्व । ऐसें हें अपूर्व भक्तिचेड ॥ ७ ॥
आकांत गजेंद्रा संकट मांडलें । तै गरुड सांडिलें वेग केला ॥ ८ ॥
अजामेळ पापी पुत्राचे प्रीतीन । बाहातां बंधन तुटे त्याचें ॥ ९ ॥
शुकसनकादीक रुषिकुळीं अनेक । मनाचा बोधक सत्यरूप ॥ १० ॥
अनाथ जाणोनि राघवाच्या भजनीं । मुसळ नसोनि राम[1] ठेवी ॥ ११ ॥

## ( ७ ) रामाची प्रार्थना

सीतापतीराया शरण तुझ्या पायां । व्यर्थ गेला वायां जन्म माझा॥१
नव मास उदरीं वाहिलें शरीर । ते ही जाली दुर अंतकाळीं ॥ २ ॥
अंतकाळीं माझें सखें कोण्ही नाहीं । विचारूनि पाहीं सीतापती॥३॥
सीतापती तुझें नाम हें तारक । मुसळा अच्चूक बुडों नेदी ॥ ४ ॥

---

१ 'नाम' होतें त्याचें 'राम' केलें आहे.

( ४ ) या संप्रदायाचें अजून एक शतांश संशोधन झालें नाहीं, ही गोष्ट शब्दशः खरी आहे. श्रीसमर्थांचे इतके शिष्य होऊन गेले, पण किती थोड्या जणांची किती अल्प माहिती आपणांस आहे ! केवढाले अधिकारी, एकनिष्ठ, कार्यकर्ते गुरुभक्त होऊन गेले ! पण आपणांस त्यांची कांहीं तरी वार्ता आहे काय ? जगाला आपल्या अधिकाराची पारख होवो वा न होवो, त्याची त्यांनीं कधीं पर्वा च केली नाहीं. सर्व कसे श्रीसमर्थचरणीं लीन होऊन गेले !

लपावें अती आदरें रामरूपीं ।

हा उपदेश त्यांनीं पूर्ण आचरणांत आणला. चवथ्या दशकाच्या आठव्या समासांत वर्णिलेली सख्य भक्ति त्यांनीं खरी केली ! ते खरे भक्त होते ! **भक्त ह्मणिजे विभक्त नव्हे** । याचा अर्थ कोणास समजत नसला तर त्यानें श्रीसमर्थभक्तांचीं चरित्रें पहावीं. श्रीसमर्थांहून वेगळें असें त्यांना अस्तित्व च उरलें नव्हतें. श्रीसमर्थप्रतापांत सर्वांचा प्रताप समरसला ! **सर्व कांहीं जावो येक देव राहो** । हा च ज्याचा त्याचा अंतर्भाव ! वरील अभंगांपैकीं दुसऱ्याच्या शेवटीं श्रीमुसळराम ह्मणतात च,

**ह्मणोनि विकृति त्या मुसळा । सांडूनि सर्व पळाला ।**
**रामरूपीं लपाला । मजला न देखों कोण्ही ॥**

आपल्याला कोणी पाहूं नये, आपण कोणाच्या नजरेस पडूं नये, ही च ज्यांची इच्छा त्या श्रीसमर्थशिष्यवरांची माहिती आतां आपणांस कोठून व्हावी !

( ५ ) असें जरी आहे तरी आपणांस वाटत असतें कीं, या सर्वांचें स्वतंत्र स्वरूप पहावें, स्वतंत्र चरित्र जाणावें, स्वतंत्र लीला वर्णाव्या ! त्यांचा शोध कोठें घ्यावा ? ते दुसरीकडे कोठें हि आढळणार नाहींत ! त्यांचे निवासस्थान एक च. श्रीसमर्थचरणकंज हें च त्यांचें विश्रांतिस्थळ ! पाहतां येईल तर त्यांना तेथें पहावें, तेथें संशोधन करावें, ध्यास त्या स्थानाचा घ्यावा, ह्मणजे ते आपणांस आढळतील, त्यांचें चरित्र कळेल आणि आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील !

धुळें १८३९ पौष व. ४ गुरुवार

---

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थकृत पांगूळ

भरत गा खंडामाजी । शरयूतीर वा गांव ।
धर्माचें नगर तेथें । राज्य करी रामराव ।
पांगुळां पाय देतो । देव जानकीचा नाथ ।
जाईन मी तया ठाया । देवा उत्तम तो ठाव ॥ १ ॥

राघवाचा धर्म जागो । (सर्व) अधर्म भागो ।
अज्ञान निरसोनियां । विज्ञानीं लक्ष लागो ॥ ध्रु० ॥

मीपणाचे मोडले पाय । ह्मणउनि पांगुळ जालों ।
तूंपणाची कीर्ति देई । ऐकोनियां शरण आलों ।
मीतूंपण निरसी माझें । भजनभिंतीवरी बैसलों ।
प्रेमफडकें पसरोनियां । कृपादान मागों आलों ॥ २ ॥

जनीं येक तूं चि दाता । ह्मणुनि आलों मागावया ।
मागणें निरसे जेणें । ऐसें दे गा रामराया ।
नवविधाहुभतें देई । भावहलगा बैसावया ।
ज्ञानकाठी देई करीं । वैराग्यवोलें पांवराया ॥ ३ ॥

दासीहातीं देवविसी । तें मीं नेघें सर्वथा ।
द्वैतदान नेघें जाण । दोन वेळ आणीतां ।
अपूर्णता देऊं नको । पूर्ण करी निःकामता ।
आपणा ऐसें दान देई । तूं तरी इछेचा दाता ॥ ४ ॥

तुझे कृपेचा कांबळा देई । मज पांगुळाकारणें ।
माया मोहो हींव वातें । तें हें निवारे जेणें ।
निःकामभाकर देई । कामक्षुधा हारे जेणें ।
बोधाचें ताक पाजीं । शब्द खुंटे धालेपणें ॥ ५ ॥

रामदास पांगुळासी । रामें दीधलीयां दान ।
घेणें चि निरसलें । कैंची मागण्याची खूण ।
देणें घेणें निरसोनीयां । पूर्ण केलें परीपूर्ण ।
दाता ना याचक तेथें । सहजीं सहज संपूर्ण ॥ ६ ॥

हें श्रीसमर्थकृत अप्रकाशित व अनुपलब्ध प्रकरण निष्ठावंत गोभक्त श्रीरामभक्तिपरायण श्रीबाळकृष्ण महाराज चौंडेबुवा यांना वाई येथें श्री-शेकडोबा मारुतीचे मठांतील दप्तरें चाळीत असतां जे कागदपत्र मिळाले त्यांत सांपडलें व तें प्रकाशनासाठीं त्यांच्या आज्ञेवरून तत्काळ सभेकडे आलें. चौंडेबुवांसारखे अधिकारी सांप्रदायी श्रीच्या वाङ्मयसंशोधनाकडे किंचित् जरी लक्ष पुरवितील तरी संशोधनकार्याला केवढी मदत होणार आहे ! प्रकरणाच्या प्रेमळपणाविषयीं मी कांहीं सांगावयास नको, तो स्वयं-सिद्ध आहे. असें प्रेमळ काव्य सांप्रदायिकांच्या पाठांत अवश्य असावें.

१ वोल=ओल=वस्त्र, रकटें.

१८३९ फाल्गुन शु. ९

---

[ ७१ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीकल्याणशिष्य आण्णाजीबावा भालकीकर

## मठ भातंबरें

( १ ) बालाघाट प्रांतीं लातूरच्या आग्नेयी दिशेस दहा कोसांवर नीलंगे ह्मणून एक गांव आहे. तेथें हि एक पुरातन श्रीसमर्थसांप्रदायिक मठ आहे, पण त्याची हकिकत पुढें केव्हां तरी देऊं. नीलंग्याचे पूर्वेस चवदा कोस व माणिकप्रभूंच्या हुमनाबादेच्या उत्तरेस आठ कोस भातंबरें नांवाचें मोगलाईतील एका जहागीरदाराचें गांव आहे. त्या गांवीं श्रीकल्याणशिष्य आण्णाजी बावा यांचा मठ आहे. मागील विषयानुक्रमांक ५० यांत आण्णजी बावा भालकीकर ह्मणून जे २३ वे शिष्य नमूद आहेत, ते च हे होत. आण्णाजी बावा पूर्वीं भालकीस रहात असत. भातंबऱ्यापासून भालकी दीड कोस आहे. आण्णाजी बावा व इतिहास-प्रसिद्ध रामचंद्रराव जाधव हे समकालीन होत. रामचंद्ररावांचा कबिला भालकीस गढींत असे व ते स्वतः भातंबरें गांवीं किल्ल्यांत रहात. त्यांच्या च आग्रहावरून आण्णाजी बावा भातंबरें येथें रहावयास गेले. किल्ल्याच्या उत्तरेस आण्णाजी बावांकरितां जाधवांनीं मठ बांधून देऊन मठास साट

बिघे जमीन इनाम दिली होती. भालकीस हि साठ बिघे जमीन इनाम होती, पण ती पुढें खालसा झाली.

( २ ) मठाची परंपरा अशी:—

श्रीसमर्थ
|
कल्याण
|
आण्णाजी
|
बावजी
|
बापूजी
|
राघोजी
|
रावजी
|
आपाजी
|
नागनाथ
|
माणिक बावा ( विद्यमान )

( ३ ) किल्ल्याच्या उत्तरेस रानांत आण्णाजी बावांची समाधी आहे. पूर्वी तेथें वस्ती होती पण पुढें तेथून ती उठून किल्ल्याच्या पूर्वेस आली आणि तेव्हां च हल्लींचा मठ हि नवीन वस्तींत आला. आण्णाजी बावा ब्रह्मचारी होते. पंढरपूरच्या यात्रेहून परत भातंबऱ्यास येत असतां महामारीच्या उपद्रवानें मार्गांत च गोरठे गांवीं त्यांचा अंत झाला. दहन गोरठ्यास च झालें, पण समाधी मात्र भातंबऱ्यास बांधली. समाधिमंदिर फार सुंदर आहे.

( ४ ) स्थान रम्य आहे. मठ अतिजीर्ण झाला आहे. जीर्णोद्धार होणें आवश्यक आहे. विद्यमान मठपतींनीं, सांप्रदायिकांनीं व तत्प्रांतीय निष्ठावंत धनिकांनीं जीर्णोद्धाराचें कार्य मनावर घेऊन तें तडीस नेलें पाहिजे. मठांत कागदपत्र मुळीं च नाहींत. मुळीं च नव्हते असें नाहीं, पण आतां

राहिले नाहींत ! खुद्द आण्णाजी बावांचें डोमगांवीं मिळालेलें एक अस्सल पत्र श्रीसंप्रदाच्या कागदपत्रांत लेखांक ४५२ ह्मणून नुकतें च प्रकाशित झालें आहे, तें पाहिलें ह्मणजे बावांचा व्याप कांहीं लहान होता, असें दिसत नाहीं. अशा स्थितींत मठांत संग्रह विपुल असावयास पाहिजे होता, पण मुळीं च नाहीं, हें खरें ! दुर्दैव आपलें ! कागदपत्र नाहींत ह्मणतांना व नाहींत ह्मटलेलें ऐकतांना मनाला जें दुःख होतें, त्याला पारावार नसतो. मठपतींची परंपरा सुद्धां कुळकर्ण्यांच्या दप्तरांतून आणावी लागली ! इतकी दुर्दशा काळानें व आमच्या अनास्थेनें आमची केली आहे ! नाहीं ह्मणायाला, ग्रन्थराजाची एक हस्तलिखित पोथी मात्र मठांत आहे. श्रीकल्याणशिष्य आनंदमूर्ति यांच्या एका शिष्यानें १६८८ च्या आश्विन वद्य १० स इंदुवासरीं पोथीचें लेखन समाप्त केलें असा शेवटीं उल्लेख आहे. आनंदमूर्ति ह्मणजे च बहुधा आण्णाजी बावा होत. यावरून सहज वाटतें, १६८८ च्या पूर्वी च आण्णाजी बावांचा अंत झाला असावा.

( ५ ) या मठाची वरील माहिती पुरविल्याबद्दल मी श्रीसमर्थदासांचा ऋणी आहे.

१८३९ फाल्गुन शु. १०

---

[ ७२ ]

॥ श्रीराम ॥

# सज्जनगडावरचें एक लोकगीत

( वि. का. राजवाडे )

चाफळास सज्जनगडावरचें खालील गाणें घरोघर मुलींना व बायांना येतें. समर्थांची समाधि खालीं तळघरांत व वरच्या मजल्यावर श्रीरामाच्या मूर्ति, अशी स्थिति समर्थांनीं समाधि घेतल्यापासूनची आहे, कदाचित् तत्पूर्वीची हि आहे. कारण समर्थांनीं तळघरांत आपलें समाधिस्थान मृत्यू पूर्वीं च सिद्ध करून ठेविलें होतें व त्या स्थानाच्या वर रामाच्या मूर्ति स्थापिल्या होत्या. रामाच्या मूर्ति तंजावराकडून येऊन त्यांची स्थापना झाल्या नंतर समर्थांनीं देह ठेविला. अर्थात् प्रस्तुत गाणें रामाच्या मूर्तींची स्थापना झाल्या

नंतरचें आहे. समर्थ हयात असताचें हें गाणें नाहीं कारण माघी नवमीचा यांत उल्लेख आहे. गाणें अमुक एका व्यक्तीनें रचिलें असें ह्मणण्यास पुरावा यत्किंचित् नाहीं. मला वाटतें, हें गाणें लोकस्फूर्तीचीं जीं गाणीं, ह्मणी, वचनें, असतात त्यांपैकींचें आहे. कांहीं ह्मणी, वचनें व गाणीं अशीं असतात कीं, तीं समाजांत एकसमयावच्छेदानें एकदम बहुतेक सर्वांना सुचतात. अमुक एका व्यक्तीची कारागिरी त्यांच्यांत दिसणें शक्य नसतें. समर्थ, समर्थांचा सज्जनगड, सज्जनगडावरील समाधी, समाधीवरील रामाच्या मूर्ति, समर्थसंस्था, समर्थशिष्य, समर्थचरित्रें, समर्थचारित्र्य, समर्थांचें चालणें बोलणें, कुबडी, मेखळा, पादुका, रुमाल, असें जें जें ह्मणून कांहीं समर्थांचें होतें तें तें उरमोडीच्या तीरच्या बायकापोरांच्या इतकें परिचयाचें झालें होतें कीं, समर्थासंबंधानें कांहीं शब्द व कांहीं विचार व कांहीं गाणीं अक्कलवंत अश्या स्त्रीपुरुषांना एका च वेळीं एका च शब्दांत सुचण्यासारखीं होतीं. व्यक्तिकृत गीतें व लोकनिर्मित गीतें यांत अंतर असतें तें हें असतें. प्रायः असलीं लोकगीतें, उत्सवप्रसंगीं भक्तिभावानें तल्लीनता प्राप्त झाली असतां व सामाजिक मन एकतान झालें असतां, निर्माण होतात. अर्थात्, कोणा हि एका व्यक्तीला अशा गीतांवर हक्क सांगतां येत नाहीं.

प्रस्तुत लोकगीत असें:--

**मुख्य स्थान सज्जनगड। रामचंद्र तिथें रघुवीर।**
**दर्शनासि दत्तदिगांबर। रंगनाथ सेवा करिती।**
**खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ।**
**दत्तदिगांबरमारुती।**
**खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ॥ १ ॥**

**माघमासीं नवमीदिवशीं। मुख्य दिवस आहे त्या दिवशीं।**
**साधुसंतदर्शनासीं। महाद्वारीं गजर करिती ।**
**खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ।**
**दत्तदिगांबरमारुती।**
**खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ॥ २ ॥**

**काशीहुनी गंगा आली। समर्थांना स्नान घाली।**
**दत्तात्रयानीं कुबडी दिधली। भरजरी मेखळा वरती।**
**खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ।**

दत्तदिगांबरमारुती ।
खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ॥ ३ ॥

समर्थांचा छळ जे नर करिती । शिष्य सोडुनी वानर करिती ।
गर्वपरिहार करिती । + + + + + + ।
खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ।
दत्तदिगांबरमारुती ।
खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ॥ ४ ॥

आक्काबाई वेणूबाई । समर्थांच्या लागती पाईं ।
देवरूपी केल्या ठाईं । दूरवर त्यांची केवढी कीर्ती ।
खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ।
दत्तदिगांबरमारुती ।
खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ती ॥ ५ ॥

चवथ्या कडव्यांतील चवथी ओळ मला मिळाली नाहीं. कोणाला उपलब्ध झाल्यास कळवावी.[1]

गाण्यांत खालील मुद्दे लक्षांत ठेवण्या सारखे आहेत:—

( १ ) समर्थांच्या पश्चात् संप्रदायाचें मुख्य स्थान सज्जनगड बनलें.

( २ ) तेथें रामचंद्राला मुख्यतः रघुवीर या संज्ञेनें ओळखिलें जातें, जयजय रघुवीर समर्थ, ह्या हाकेला अनुलक्षून वरील विधान तत्कालीन लोकांनीं केलें तें रास्त च आहे. रामदासी पंथांत मुख्य उपासना वीर राघवाची आहे.

( ३ ) दत्तदिगांबरमारुती व राम यांच्या मूर्ती समर्थांच्या समाधी-वर आहेत ह्मणून ह्मटलें आहे. वरच्या मजल्या वर राम व मारुती यांच्या मूर्ती आहेत. दत्तदिगांबराची मूर्ती वर नाहीं. कदाचित् गीत रचलें गेलें त्या कालीं असेल.

( ४ ) रामाच्या मूर्ती असा अनेकवचनी प्रयोग आहे. अर्थात् राम हा शब्द एकशेषसमास आहे. राम म्हणजे राम, लक्ष्मण, सीता, मारुती, अशीं चार दैवतें. तुळशीबागेंत रामाच्या मूर्ती आहेत, असा एकशेष समास सध्यां हि बोलण्यांत येतो.

---

1 तोंवर वाटल्यास **ऐसी छत्रपतीस प्रचीती** अशी ओळ वाचावी.

( ५ ) आक्काबाई व वेणूबाई यांची कीर्ती गाणें रचण्याच्या काळीं दिगन्त पसरली होती, व त्या जागच्या जागीं देवतात्व पावल्या होत्या. त्यांच्या समाधी सज्जनगडावर आहेत. समर्थांचें दर्शन घेणारे लोक त्यांना विसरत नाहींत.

---

[ ७३ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीकल्याणस्तव

श्रीकल्याणस्वामींचे शिष्य नरहरि, दिगंबर, केशव व जनार्दन (समर्थ-प्रताप १०-८४ पहा) यांनीं सद्गुरुस्तवनपर केलेलीं पांच पदें आज येथें देण्याचें योजिलें आहे.

डोमगांव ] ( १ ) [ बाड १२

सद्गुरु वर्णवेना । ज्याचा पार चि न कळे कोणा ॥ ध्रु० ॥
सा आठरा आणि चार । तेहि न कळे ज्याचा पार ॥ १ ॥
जो कां अनंत अपार । स्वामी निर्गुण निर्विकार ॥ २ ॥
धर्मस्थापनेकारणें । जेहीं अवतार चि घेणें ॥ ३ ॥
रामदासांचिये वंशीं । स्वामी कल्याण अहिर्निशीं ॥ ४ ॥
वृत्ति निवृत्ति निमाली जेथें । जाला नरहरि तल्लीन तेथें ॥ ५ ॥

डोमगांव ] ( २ ) [ बाड १२

गुरुराज राज राज विराज रे । ध्रु०
ज्याचेनि सत्य त्रैलोक्य जालें ।
त्यास मी बोलों काये रे काये रे काये रे ॥ १ ॥
त्रिभुवनि पावनी व्यापुनि अनुरेणी ।
श्रुति तूं तटस्त धाय रे धाय रे धाय रे ॥ २ ॥
कल्याणस्वामी ध्यात तो अनुदिनीं ।
दिगंबर शरण जाय रे जाय रे जाय रे ॥ ३ ॥

डोमगांव ] ( ३ ) [ बाड ५२

कल्याण तो स्वामी प्राप्त होये कैसा ।
जरी घडे ऐसा भक्ती भाव ॥ १ ॥
भावें भक्ती घडे नवविधा जरी ।
ते चि पै विवरी परीक्षिती ॥ २ ॥

परीक्षितीराया श्रवण घडलें ।
कीर्तन जोडलें नारदासी ॥ ३ ॥
नारदाच्या मुखें प्रल्हादा श्रवण ।
अखंड चिंतन हरीनाम ॥ ४ ॥
हरीचे पै चरण करी संवाहन ।
लक्षुमी आपण निजहस्तें ॥ ५ ॥
निज हस्तें अर्चन पृथुरायें केलें ।
वंदन घडलें अक्रूरासी ॥ ६ ॥
अक्रूरा वंदन घडलें देवाचें ।
दास्य राघवाचें हनुमंता ॥ ७ ॥
हनुमंता दास्य भक्तीचें घडलें ।
सख्यत्व जोडले अर्जुनासी ॥ ८ ॥
अर्जुनासी सख्य देवासी जोडलें ।
आत्म निवेदीलें बळीरायें ॥ ९ ॥
बळीराया ऐसा करितां निश्चये ।
तरी मग काये भवभये ॥ १० ॥
भवभये कैचें राघवाच्या नामीं ।
कल्याण तो स्वामी केशवाचा ॥ ११ ॥

डोमगांव ] (४) [ बाड ५३

सद्गुरु दयाळ मोठा गे बाईये ॥ ध्रु० ॥ सखी पुसे सखीयेसी ।
सद्गुरूची महिमा कैसी । गुह्य सांग मजपासी गे ॥ १ ॥
सद्गुरूचे चरण धरी । भूत भूत विवरी । चुकती चौऱ्यासी फेरी गे ॥
सखी ह्मणे आवो बाई । शरण जा सद्गुरुपाई । जन्ममृत्य मग नाहीं गे
मीपणाचा सोडी ताठा । सद्गुरु कृपाळु मोठा । बैसवी सायोज्यपटा गे
कायावाचामनोभावें । सद्गुरूसी शरण जावें । पूर्वजासी उधरावें गे ॥
जना ह्मणे सखीयेसी । विश्वासें कल्याण होसी । सद्गुरु तो पापनासी गे

डोमगांव ] (५) [ बाड ५३

सद्गुरु माझा कल्याण दीनानाथ । धणीवरी आठऊं रघुनाथ ॥ध्रु०
गुरु माझा परब्रह्मवासी । जीवीं माझे जडला आहिर्णीसीं ॥ १ ॥
गुरु माझा संचला निराकार । ब्रह्मादिकां न कळे त्याचा पार ॥ २
गुरु माझा अनंत अपार । होते जाते माया चराचर ॥ ३ ॥
वेदश्रुति न कळे त्याचा अंत । अंतर्बाह्य व्यापक सदोदित ॥ ४ ॥
जना ह्मणे हें रंक नवाजिलें । मोक्षपदीं नेउनी बैसविलें ॥ ५ ॥

[ ७४ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांची शिकवण

## धडा बारावा

### नामस्मरण

**स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।**
**नामस्मरणें पावावें । समाधान ॥** ४-३-२

हल्लींच्या काळीं बहुतेकांना हा धडा पटण्यासारखा नाहीं, पण आपणांस तर तो लिहिला पाहिजे. श्रीसमर्थांची शिकवण सर्वांना आवडते, पण कोणती ? राजकारण, परोपकार, समाजसेवा, लोकसंग्रह, प्रयत्न, सावधपण, प्रपंच, एतद्विषयक श्रीसमर्थांचीं वचनें ऐकण्यास सर्वांची तयारी असते. संप्रदायाच्या त्रिविध लक्षणांपैकीं दुसरें लक्षण जें राजकारण व तिसरें लक्षण जें सर्वविषयीं सावधपण, अशीं दोन्हीं लक्षणें सर्वांना मान्य होतात, पण पहिलें जें मुख्य लक्षण हरिकथानिरूपण त्याच्या कोणत्या हि अंगाचा विचार करण्यास हल्लीं कोणाला श्रद्धा असो वा नसो, पण सवड मात्र नसते. श्रद्धा असो वा नसो, असें संदिग्ध तरी कां ह्मणा, श्रद्धा नाहीं हें च खरें, आणि ह्मणून कोणाला सवड हि नाहीं. श्रद्धा असती तर सवड झाली असती. आपली इच्छा पुष्कळ आहे कीं, हा हि धडा सर्वांनीं वाचावा, पण त्याचा मथळा पाहून च पुष्कळांचें मन त्यापासून पराङ्मुख होणार आहे. या मुरडणाऱ्या चिकित्सक मनाची खात्री पटविण्याचें सामर्थ्य या लेखणींत नाहीं. उच्छृंखल काळाला आळा घालण्याचें काम ज्यांचें असेल त्यांच्या कडे सोंपवून, जे कोणी भोळे, भाबडे, भाविक असतील, जे कोणी आत्मसंतुष्ट असतील, जे बाहेर हि पहातात पण क्वचित् प्रसंगीं आंत हि पहात असतील, कांहीं तरी भाग्य होतें ह्मणून ज्यांना गुरुचरित्राची गोडी लागली असेल, अशा थोड्या वाचकांसाठीं आजचा हा धडा योजिला आहे.

( २ ) नवविधा भक्तींपैकीं नामस्मरण ही तिसरी भक्ति होय. सर्व भक्तींत ही भक्ति अति सोपी आहे. पण ती जरी सोपी आहे तरी तिजवर सर्वांचा सारखा विश्वास बसण्याला ती अति कठीण आहे. श्रवण करावें, कीर्तन करावें, गुरूची सेवा करावी, देवाची पूजा करावी, देवाला नमस्कार करावा, देवाचें दास्य करावें, देवाशीं सख्य करावें, हें तत्त्वतः कोणाला कबूल तरी होतें, पण देवाचें नुसतें नांव घेत बसावें, हें ऐकण्याला आतां कोणी तयार नाहीं, मानण्याइतका कोणाचा विश्वास नाहीं व आचरण्याचें तर कोणी नांव हि काढ़ं देत नाहीं. अशी ही साधी खरी; पण गहन भक्ति आहे. तिचें गहनत्व सुलभ करून दाखविण्याचा माझा हेतु नाहीं, कारण तितकें मजजवळ भांडवल नाहीं. मी फक्त, दुस्तर संसार तरण्याला नामस्मरण हें कसें सुलभ साधन आहे, त्यांत हि रामनामस्मरण हें कसें सुलभतर आहे, त्याचें फळ काय, तें केव्हां व कसें करावें, आजपर्यंत तें कोणीं केलें, इत्यादि अगदीं सामान्य गोष्टी श्रीसमर्थवचनाधारें सांगाव्या असें ह्मणतों.

( ३ ) इतर सर्व साधनें कष्टसाध्य आहेत. श्रवण, कीर्तन, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, हीं सर्व साधनें कमी अधिक प्रयासाचीं आहेत. नामस्मरण एवढें एक च साधन असें आहे कीं, ज्याला ग्रन्थावलोकनाची आवश्यकता नसते, पाठांतर लागत नाहीं, पूजासामुग्री लागत नाहीं, देह कष्टवावयास नको, सोवळें ओवळें पाळावें लागत नाहीं, काळ वेळ पहावी लागत नाहीं, कांहीं नाहीं, ज्याला दुसऱ्या कोणाची साथ लागत नाहीं, दुसऱ्या कशाची अपेक्षा नसते, जें बसल्या ठायीं होतें ! खरें च, थोडासा विचार करून पाहिला ह्मणजे, इतकें सोपें दुसरें साधन नाहीं, हें मनाला तेव्हां च पटतें ! कोठें हि असा , घरीं असा नाहीं तर दारीं असा, रानांत असा कां वनांत असा, आगगाडींत असा नाहीं तर आगबोटींत असा, चार भिंतींच्या आंत असा कीं बाहेर असा, कांहीं हि करीत असा, वाचीत असा कीं लिहीत असा, बसले असा कीं उठले असा, बोलत असा कीं चालत असा, दळत असा कीं कांडत असा, निवडीत असा कीं पाखडीत असा, कशा हि स्थितींत असा, सुखांत असा कीं दुःखांत असा, वैभवाच्या शिखरावर असा कीं हीनावस्थेच्या खोल दरींत असा, नामस्मरण हें एवढें च एक साधन आहे कीं, ज्याला कोणी हि

प्रत्यवाय करूं शकत नाहीं, जें कोणी हि आपणापासून हिरावून घेऊं शकत नाहीं, मनांत आणूं तर चोवीस तास हि, कोणाची पर्वा किंवा अपेक्षा न करतां, आपण नामस्मरण करूं शकूं ! इतकें सोपें, इतकें स्वतंत्र आणि इतकें अमोघ खचित दुसरें साधन नाहीं. नामस्मरणाला जात गोत हीं पहावीं लागत नाहींत, वर्णाश्रमधर्मांची आडकांठी येत नाहीं, लहान मोठा असा भेद ठाऊक नाहीं, शिक्षित आणि अशिक्षित, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर *असल्या द्वैताची त्याला ओळख नाहीं ! नामस्मरणापाशीं स्त्री आणि पुरुष हा हि भेद नाहीं !*

**चहुं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लाहान थोर ।**
**जड मूढ पैलपार । पावती नामें ॥ ४-३-२४**

इतकें हें साधन च सोपें आणि सर्वांना करतां येण्यासारखें आहे. तशांत आणखी राम हें नाम तर फार च साजिरें, स्वल्प आहे. मला वाटतें, एकादा मुका मनुष्य जरी असला तरी तो नुसतें तोंड उघडून मिटेल तर **रा म** च त्याच्या वदनीं येईल !

( ४ ) असें हें साधन सोपें असून त्याचें फळ मात्र किती मोठें आहे !

**क्षण येक राम आठवितां चित्तीं । तेणें उधरती कोटी कुळें ॥ ३३-१**
**कोटी कुळें वाट पाहाती तयाची । आवडी जयाची रामनामीं ॥ २**
**रामनामें तुटे कुळाचें बंधन । पुत्र तो निधान हरिभक्त ॥ ३ ॥**
**हरिभक्त येक जाहाला प्रल्हाद । जयाचा गोविंद कैवारी ॥ ४ ॥**
**कैवारी हरी राखे नानापरी । ऐसा भाव धरीं आलया रे ॥ ५ ॥**

नामस्मरणानें देवाला भक्ताचें सांकडें पडतें, तो कृपासागर भक्ताचे सर्व अपराध पोटांत घालतो ! नामस्मरणाच्या चेटुकानें देव एकदा भक्ताधीन झाला ह्मणजे भक्त मुक्त, निःसंग, निष्काळजी झाला, असें समजावें. मग त्याची काळजी देवाला लागते. मग

**जनीं दास देखोनियां दैन्यवाणा ।**
**मनामाजि वोसावतो देवराणा ॥** रामायण १३-८३

श्रीसमर्थ ह्मणतात, या गोष्टी नुसत्या बोलून काय करावयाचें आहे, ज्याची त्यानें प्रचीति पाहून खात्री करून घेतली पाहिजे.

( ५ ) समर्थांच्या वडील बंधूंना हि या साधनावर फार भर होता.

दिनकरकल्याणादि शिष्यांना हें साधन पटलेलें होतें. नामस्मरण हें श्रीसमर्थांचें फार आवडतें साधन होय !

अनाथांचा नाथ भक्तांचा कैवारी । सिंहासनावरी शोभताहे ॥२०-१
शोभतसे राम प्रतापें आगळा । दिसे सौम्यकळा सत्वगुणी ॥ २ ॥
सत्वगुणी होणें सात्विकांकारणें । कोपें संहारणें दुर्जनासी ॥ ३ ॥
दुर्जना संहार सज्जना आधार । भाविकांसी पार पाववीतो ॥ ४ ॥
पाववीतो पार या भवसिंधूचा । राघव दीनाचा दीनानाथ ॥ ५ ॥
दीनानाथ हरी पतीतपावन । योगीयां जीवन योगलीळा ॥ ६ ॥
लीळा वेषधारी भक्तांचें माहेर । ध्यानीं गौरीहर चिंतीतसे ॥ ७ ॥
चिंतीतसे राम नाम पूर्णकाम । पावला विश्राम रामनामें ॥ ८ ॥
रामनामें हरु विश्रांती पावला । हें तों समस्तांला श्रुत आहे ॥ ९ ॥
श्रुत आहे राम योगाचें मंडण । संसारखंडण महा भय ॥ १० ॥
महा भय कैचें रामासी भजतां । हें जाण अन्यथा वाक्य नव्हे ॥११॥
नव्हे सोडवण रामनामेंवीण । रामदास खूण सांगतसे ॥ १२ ॥

' हें जाण अन्यथा वाक्य नव्हे ' अशी श्रीसमर्थांची प्रतिज्ञा आहे ! आपल्या जीवींची ते ही खूण सांगत आहेत. खूण ह्मणजे स्वतःला पटलेली गोष्ट ! आणखी एका ठिकाणीं त्यांनीं ही च खूण सांगितली आहे.

काय करावे ते संपत्तीचे लोक । जानकीनायक जेथें नाहीं ॥१०५-१
जेथें नाहीं माझा श्रीराम समर्थ । त्याचें जीणें वेर्थ कोटीगुणें ॥ २ ॥
कोटीगुणें वेर्थ जीणें त्या नराचें । जानकीवराचें नांव नाहीं ॥ ३ ॥
नाम नाहीं मनीं नाहीं जो कीर्तनीं । तया कां जननी प्रसवली ॥ ४ ॥
प्रसवली परी जाला भूमिभार । दुस्तर संसार उलंघेना ॥ ५ ॥
उलंघेना येक रामनामेंवीण । रामदास खूण सांगतसे ॥ ६ ॥

काय ह्मणावें ! श्रीसमर्थांनीं आपल्या मनांतील गोष्ट दोनदां सांगून हि ती आपणांस जर न पटेल तर पटणार तरी केव्हां ? तिसऱ्यांदा सांगून तरी पटेल काय ?

राघवाचें नाम राखसील जरी । तुज राखे तरी देवराणा ॥स्फु.ओ.१३०-१
देवराणा माझें जीवींचें जीवन । आवडीनें खूण सांगतसे ॥ २ ॥
सांगतसें खूण माझे अंतरींची । सर्व हि सुखाची सुखमूर्ती ॥ ३ ॥
सुखमूर्ती राम सोडूं नको कदा । तुज तो आपदा लागों नेदी ॥ ४ ॥
लागों नेदी कष्ट आपुल्या दासांसी । रामी रामदासीं साहाकारी ॥५॥

१८०३०१.

श्रीसमर्थांनीं इतक्या कळवळ्यानें आपल्या अंतरींची खूण सांगून हि या साधनावर आमचा विश्वास न बसेल तर आमच्यासारखे हतभागी आम्ही च ह्मणावयाचे !

( ६ ) श्रीसमर्थांना हें साधन पटलेलें होतें यांत काय नवल आहे ह्मणा, कारण पटल्यावांचून त्यांनीं कोणती गोष्ट दुसऱ्यांस सांगितली आहे ? हें खरोखर आपलें मोठें भाग्य होय कीं, आपला कळवळा येऊन त्यांनीं आपल्या मनांतील हें परम गुह्य आपणांस सांगितलें आहे ! श्रीसमर्थांच्या मनांतील गोष्ट, जीवींचें जीवन, अंतरींची खूण, आज आपण ऐकत आहोंत, हें आपलें केवढें भाग्य ! तशांत आज रामनवमी !

रामाचेनि स्वामीपणें । मी हें ब्रह्मांड मानी ठेंगणें ।
त्रैलोक्य तें हि वाटे उणें । महिमा वर्णितां ॥ सगुणध्यान १०४
राम सर्वांगें सुंदरु । राम करुणेचा सागरु ।
दीन अनाथांचा उद्धारु । येक श्रीराम कर्ता ॥ १०५ ॥
राम जीवींचा जिव्हाळा । राम मनींचा कोवळा ।
राम जाणे अंतर्कळा । निजदासाची ॥ १०६ ॥
राम पुण्यपरायण । राम लोकत्रयांचा प्राण ।
रामें दास बिभीषण । चिरंजीव केला ॥ १०७ ॥
राक्षेस केले देशधडी । देव सोडविले तेतीस कोडी ।
राज्यीं स्थापिला आवडी । शरणांगतु ॥ १०८ ॥
राम सुरवरां कोवसा । राम मंडण सूर्यवंशा ।
राम जप भवानीशा । सप्रचीत रामनामें ॥ १०९ ॥
नामें तारिलें पाषाण । नामें पतित पावन ।
नामें मुक्त विश्वजन । शिवाचेनी उपदेशें ॥ ११० ॥
शुकमीसें रामवाणी । ह्मणतां पावन कुंटणी ।
अंतकाळीं सकळ प्राणी । रामनामें उत्धरती ॥ १११ ॥
हो कां ज्ञाते विरक्त । हो कां साधु जीवन्मुक्त ।
हो कां भावीक साबडे भक्त । नामेंवीण वृथा ॥ ११२ ॥
सकळांमधें थोर । तो नाम सेवी शंकर ।
तेथें मानव ते किंकर । बापुडे किती ॥ ११३ ॥
नामें होय चित्तशुधी । नामें तुटे देहेबुधी ।
नामें होये कार्यसिधी । निजध्यासें ॥ ११४ ॥

**नामें स्वहित फावे । नामें निश्चयो दढावे ।**
**नामस्मरणें सीघ्र पावे । देवराव ॥ ११५ ॥**
**ऐसें हें रामनाम । परम गुह्य विश्राम ।**
**मथुनी काढिलें वर्म । शतकोटीचें ॥ ११६ ॥**
**सावध ऐका श्रोते जन । परम गुह्य माहा गहन ।**
**नाममात्रें होती दहन । पापरासी ॥ ११७ ॥**
**येदर्थी संशये धरी । तो माहापापी दुराचारी ।**
**तयासी प्राप्त येमपुरी । विकल्पें होये ॥ ११८ ॥**

किती गोड, किती प्रोत्साहक, किती हृदयस्पर्शी ह्या ओव्या ! नित्य ह्मणाव्या असें कोणास नाहीं वाटणार ! श्रीसमर्थांच्या जीवींचें हें परम गुह्य आपण आपल्या हृदयीं धरून तदनुसार वर्तन करण्याचा संकल्प करावा, हें च योग्य होय.

( ७ ) नामस्मरणाचा संकल्प केला, पण तें केव्हां आणि कसें करावें तें केव्हां करावें यासंबंधानें इतकें च ह्मणावयाचें कीं, तें करूं नये अशी वेळ च नाहीं. तें सर्वकाळ करावें. प्रत्यहीं योजिलेल्या वेळीं तर तें करावें च, पण इतर हि सर्व वेळीं करावें. योजिलेल्या वेळीं नामस्मरण शांतपणें, एकांतांत, प्रसन्न चित्तानें व एकाग्र मनानें होईल, इतर वेळीं तितकें तसें होणार नाहीं, तरी पण तें सकाळीं, दुपारीं, सायंकाळीं, रात्रीं, सर्व काळीं करावें. बोलतां चालतां, कामधंदा करितां, खातां पितां, सर्व काळीं नामस्मरण सांडूं नये. लक्षांत असूं द्यावें कीं, नुसता नामोच्चार सांगितला नाहीं, तर नामस्मरण सांगितलें आहे. उच्चार हवा, पण आधीं स्मरण हि हवें. चरित्र आठवून नामोच्चार करावा.

**स्वरूप रामाचें मनीं आठवावें । नाम उच्चारावें रात्रंदिस** ॥ शत ८-९१
हा च क्रम सर्वत्र सांगितला आहे. दोन्ही क्रिया एककालीं व्हाव्या.

**सर्व काळ राम मानसीं धरावा ।**
**वाचे उच्चारावा नामघोष** ॥ ४६-४

मथळयावर जी ओवी दिली आहे तींत हि स्मरण आणि जप हीं दोन्ही सांगितलीं आहेत. नामस्मरण कसें करावें तें याहून जास्त कांहीं आपणांस सांगतां येत नाहीं. त्यासाठीं

**दास ह्मणे आतां गुरु करी** ॥ १९८-५

( ८ ) असें हें साधन आजवर पुष्कळांनीं केलें. सर्वांनीं च केलें, नाहीं कोणी केलें ! वाल्मीकीनें केलें, प्रल्हादानें केलें, वानरांनीं केलें, मारुतीनें केलें ! तेरा कोटी जप करून श्रीसमर्थांनीं तर संप्रदायाला कित्ता च घालून दिला ! तो जितका गिरवितां येईल तितका प्रत्येकानें गिरविला पाहिजे. जेवढे ह्मणून तरले तेवढे सर्व या च उपायानें तरले. पाषाण तरले, मग आपणांसारखे मानवदेहधारी तरतील यांत काय नवल आहे ! विषबाधा शमविण्यासाठीं सर्व प्रयत्न करून पाहिले पण गुण कांहीं येईना, तेव्हां अखेरीस शंकरानें हा च उपाय केला ! रावणाच्या बंदिशाळेंतील देव हताश झाले होते, त्यांचे सर्व उपाय थकले, तेव्हां शेवटीं त्यांना हि ही च मात्रा घ्यावी लागली.

**बहुत प्रेत्न पाहिले। परंतु सर्व राहिले।**
**विबुधपक्षरक्षणा। श्री राम राम हें ह्मणा॥** स्फु. श्लो. १--५

( ९ ) ज्या मार्गानें सर्व साधुसंत गेले, त्या च मार्गानें जाण्याची बुद्धि आपणांस हि व्हावी. या मार्गाला लागल्यावर परतीर गांठलें जाणार नाहीं, असें कधीं झालें नाहीं व पुढें कधीं होणार नाहीं ! श्रीसमर्थ अशी हमी देत आहेत ! परतीराला जाण्याच्या इतर हि वाटा असतील पण ही वाट फार सोपी आहे. या वाटेनें स्त्रीनें जावें पुरुषानें जावें, लहानानें जावें थोरानें जावें, शूद्रानें जावें ब्राह्मणानें जावें, दुबळ्यानें जावें बलवंतानें जावें, कोणीं हि जावें, धोका असा मुळीं च नाहीं. ‘ धुरु ’ बाळ या च मार्गानें गेलें, या च मार्गानें जाऊन ‘ कुंटणी ’ तरली, पापी ‘ अजामेळाला ’ या च मार्गानें जाऊन सद्गति मिळाली ! महाराज, एकवार हात धरून या मार्गावर आणून सोडाल काय ? मनाचा निश्चय होईल काय ? अनन्य किंकराची श्रीसमर्थांनीं कधीं तरी उपेक्षा केली आहे काय ?

**उपेक्षा कदा रामरूपीं असेना।**
**जिवा मानवा निश्चये तो वसेना।**
**शिरीं भार वाहेन बोले पुराणीं।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥**

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

१८४० श्रीरामनवमी

[ ७५ ]

॥ श्रीराम ॥

# रामोपासनेचें रहस्य

स्मरण धरावें । स्वयें उत्धरावें ।
अंतरें अंतर विवरावें रे ॥ १ ॥
अंतरें शोधितां देव । मीपण चि जालें वाव ।
देवाधिदेव प्रगटला रे ॥ २ ॥
जनाचें अर्चन । तो चि तो जनार्दन ।
प्रगट निशाण राघवाचें रे ॥ ३ ॥
येकीं अनेक येक । पाहों जातां येक बेक ।
शोधावा विवेक सज्जनाचा रे ॥ ४ ॥
रामदास्य फळा आलें । सर्व हि कल्याण जालें ।
साक्षत्व विरालें रामपायीं रे ॥ ५ ॥

हें पद कल्याणस्वामींच्या डोमगांवीं सावळारामबुवांकडील अकराव्या बाडांत मिळालें. पद बहुधा कल्याणकृत असावें. त्याच्या पहिल्या कडव्यांत उद्धरेदात्मनात्मानम् । सांगितलें आहे, दुसऱ्यांत

ज्याचें नाम घेसी तो चि तूं आहेसी ।
पाहें आपणासी शोधूनियां ॥ २४४-१
शोधितां शोधितां मीपण चि नाहीं ।
मीपणाचें पाहीं मूळ बरें ॥२ ॥
मूळ बरें पाहा नसोनियां राहा ।
आहा तैसे आहा सर्वगत ॥ ३ ॥
सर्वगता आत्मा तो चि तूं परमात्मा ।
दास अहं आत्मा सांगतसे ॥ ४ ॥

या श्रीसमर्थकृत अभंगाचें सार आलें आहे, तिसऱ्या कडव्यांत जनीं जनार्दनाचें स्वरूप प्रगट केलें आहे, चवथ्यांत सर्व उपासनांची एकात्मता दाखविली आहे, शेवटच्या कडव्यांत गुरुशिष्यांचें ऐक्य झालें आहे आणि सर्व पद मिळून रामोपासनेचें मर्म श्रीकल्याणांच्या मुखानें सहज प्रगट झालें आहे. श्रीसमर्थांच्या कवितासमुद्राचें मंथन करून कल्याणांनीं हें जें उपासनेचें रहस्य आपणांस या पदांत सांगितलें आहे, तें नित्य हृदयीं सांठविल्यास श्रीसमर्थांच्या कवितासमुद्रांत स्वतः अवगाहन केल्याचें पुण्य वाचकांस लागणार आहे.

१८४० चैत्र शुद्ध ११

[ ७६ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थशिष्य आणाप्पा

## — मठ नीलंगे —

### परंपरा, ग्रन्थसंग्रह, कवन, वगैरे

**आणपा नामें महंत । नाना उत्तम गुणें आळंकृत ।**
**शिष्यसमुदायें कित्तेक प्रांत । उद्धरिला कीर्ति ॥** स. प्र. १०–३०

( १ ) श्रीसमर्थशिष्य आणाप्पा यांचा मठ बालाघाट प्रांतीं नीलंगे येथें आहे. आह्मी तेथें लांबच्या मार्गानें गेलों होतों, पण निलंग्यास जाण्याचा जवळचा मार्ग म्हणजे बार्शी लाइट रेल्वेच्या लातूर स्टेशनवर उतरून जावें. लातूरच्या सरासरी आग्नेयेस दहा अकरा कोसांवर नीलंगे आहे. तेथून तसें च पुढें आग्नेयेस आठ कोस पूर्णानंदांच्या शिवरामांचें कल्याणी गांव आहे व आणखी पुढें तितक्या च अंतरावर माणिकप्रभूंचें हुमणाबाद गांव लागतें. तेथून पुढें बेदर, येकेहाळी वगैरे प्रसिद्ध ठिकाणें आहेत. त्या एकंदर प्रांतांतील संस्कृति फार पुरातन असल्यामुळें संशोधनाला तो प्रांत फार सुपीक आहे. एक दोन संशोधकांचें जन्मभर त्या प्रांतीं चांगलें चालेल; असो.

( २ ) इतर श्रीसांप्रदायिक विद्यापीठांप्रमाणें हें हि विद्यापीठ, आपल्या वैभवकाळीं, त्या प्रांतांतील विद्याव्यासंगी तरुणांचीं मनें आकर्षून घेत असे. पण आतां त्या वैभवाचा गंध हि उरला नाहीं. हा मठाची परंपरा अशी:—

श्रीरामदास–आण्णाप्पा–जयराम–रामाजी–हरि–मनोहर–कोनेर

कोनेर:
- बापुजी | बाबाजी | आण्णाजी
- बाळाजी | आप्पाजी | महारुद्र | आप्पाजी ( विद्यमान )
- आत्माराम: तात्याजी, हरि

मनोहर हे आण्णाप्पांचे पुतणे होते. कोनेरपर्यंतची शिष्यपरंपरा दिसते. कोनेर

व मनोहर, रामाजी व कोनेर, मनोहर यांना बापु म्हणून पुत्र होते ते व कोनेर, बापुजी व बाळाजी, यांच्यामध्यें मठाच्या अधिकारासंबंधानें वाद उत्पन्न झाले होते व हे सर्व वाद चाफळमठपतींच्या अनुमतीनें छत्रपति किंवा श्रीमंत यांनीं मिटविले, असें कागदपत्रांवरून दिसतें. या सर्व वादांच्या मुळाशीं संस्थानचें उत्पन्न होय हें उघड आहे. भांडणें झालीं तीं उत्पन्नासाठीं, परमार्थासाठीं नव्हत! केवळ भिक्षेवर मठ चालवावयाचे असते तर कलहाला कारण च होतें ना !

( ३ ) आण्णाप्पांचें चरित्र फार च थोडें उपलब्ध आहे. या मठांत जो संग्रह मिळाला त्यांतील पहिल्या बाडांत **पादुकाख्यान** म्हणून एक प्रकरण आढळलें. तें दुसरें तिसरें कांहीं नसून **आण्णाप्पांचें** चरित्र होय! पण सांप्रदायिक चरित्रांच्या बाबतींत आपलें नशीब असें कांहीं शिकंदर दिसतें कीं, आपलें पूर्ण समाधान असें कधीं होऊं च नये ! नवल हें कीं, **आण्णाप्पांच्या** या चरित्राचें अवघें दीड पृष्ठ असून बाडांतील मधलीं च पुढचीं चार पानें अजिबात फाटलीं आहेत ! सबंध बाड शाबूत असावें व ज्यांची आपणांस अत्यन्त अपेक्षा तेवढीं च मधलीं नेमकीं पानें फाटलेलीं असावींत, हा आपल्या दैवाचा चमत्कारिक खेळ नव्हे काय ? असो; हें असें आहे खरें. **पादुकाख्यान** लागलें, वाचूं लागलों, आनंद वाटला, काय भाग्य कीं आण्णाप्पाची इतर कांहीं माहिती नसतां नेमकें चरित्र च मिळावें असा मनांतल्या मनांत आनंद करीत चवदावा श्लोक संपला आणि पुढें काय? निराळें च प्रकरण लागलें ! चार पानें समूळ फाटलेलीं ! माझ्या आनंदाला कारण होणारीं तीं चार पानें बाडांत पुढें तर कोठें नाहींत ना? म्हणून बाड च काय, पण त्या चार पानांसाठीं संग्रहांतील कागदाचा तुकडा आणि तुकडा पाहिला, पण तीं पानें किंवा त्यांतील मजकूर कोठें आढळला नाहीं! वाचक हो, ते चवदा श्लोक ऐकून पुढें काय झालें तें जाणण्याविषयीं तुमच्या मनाची जी स्थिति होईल, तीवरून माझी एकदम कोण निराशा झाली असली पाहिजे याची तुह्मांस कल्पना झाली तर होईल ? कल्पना झाली तर होईल, असें अशासाठीं म्हणतों कीं, मी तुमची आधीं च निराशा करून ते श्लोक वाचा म्हणतों, तुम्हांला आधीं च ठाऊक झालें आहे कीं, तुम्हांला चवदा च श्लोक वाचावयाचे आहेत. माझें तसें नव्हतें ! ऐका.

**वंदूनिया विमळ सद्गुरुच्या पदांतें ।**
**वर्णीन त्याउपरि तत्पदसंपदांतें ।**

ज्या चिंतनें हरति सर्व हि आपदातें ।
जे दाविती अपुलिया मग चित्पदातें ॥ १ ॥
बहूतांपरी वंदुनी पाय भावें । शुभाख्यान तें बोलिजे पैं स्वभावें ।
जयाची कथा हे महा पुण्य गंगा । सदा ऐकतां कल्मषें जाति भंगा २
स्वधर्माश्रमी योग जो का वरिष्ठ । सुसन्मार्गकर्ता स्वयें ब्रह्मनिष्ठ ।
द्विजाचे कुळीं जन्म कौंडिण्य गोत्रीं । स्वयें घेउनी भूषवी जो धरित्री ॥
जन्मापासुनिया प्रमाण करिता अष्टादशाब्दें जया ।
जाली तो मग चिद्विलास गमला आत्मप्रबोधीं तया ।
तेव्हां सर्व हि संपदा सुखमयी मानूनिया वोखटी ।
श्रीमद्रामउपासना मग स्वयें संपादिजे गोमटी ॥ ४ ॥
कृष्णातिरीं रामदासावतारी । दीक्षा त्याची चित्प्रबोधाधिकारी ।
देहीं ऐसें नाम तेव्हां समर्थें । संस्थापीलें विश्वआनंदकर्तें ॥ ५ ॥
तदारभ्य श्रीमत्सुखानंदमूर्ती । स्फुरद्रूप जो चित्प्रकाशाभि कीर्ती ।
जगद्व्यापिनी ते स्वसामर्थ्य माया । जगीं विस्तृता पै त्रिलोका तराया
उपाधी नसे पाहतां ज्यास कांहीं । विना रावबावांचूनी काम नाहीं ।
बहुतापरीचे बहु ते विकारी । असंभाव्य ते तारिले देहधारी ॥ ७ ॥
धीरोदार वरिष्ठ निस्पृह सदा सद्वृत्ति सद्वासना ।
भक्त ज्ञान विराग यापर नय अन्यत्र कांहीं मना ।
सच्छास्त्रश्रवणीं निरंतर रती धर्मानुपंथस्थिती ।
ऐसा काळ कितेक तो गत पुढें देशांतराची गती ॥ ८ ॥
वर्णाश्रमा जीं अनकूळ कर्मैं । तीं आचरावीं सहसा स्वधर्मैं ।
संन्यासिलीं मानसकाम्यकर्मैं । ऐसीं च कीं सज्जनसाधुवर्मैं[1] ॥ ९ ॥
पुढें चालतो त्या दिशा पूर्व पंथें । पथीं तारिलीं तें कित्येकें अनाथें ।
तनूपोषणार्थासि भीक्षा अहारी । विनासैंधवी[2] पानग्यातें स्विकारी ॥१०
युवावस्था ऐसे रिति च विघडे हो विवरितां[3] ।
तदा देवग्रामी आगमन घडे हो अवचितां ।
असे ही ते कांहीं दिवस अटवीमाजि वसुनी ।
कथानामोच्चारें जन निववीलें शुध्द मननीं ॥ ११ ॥
चिद्विलास हा नातुडे कहीं । या चि कारणें लुब्ध सर्व हीं ।
भाविती मनीं देव हा खरा । भक्त वंदिती पाय सत्वरा ॥ १२ ॥

---

१ गीतारहस्यकार याहून कांहीं निराळें वर्म सांगतात काय? २ मिठावाचून.
३ 'विचरितां' लिहावयाचें असेल?

**ऐकमेक ते सांगती मुखें। हा चि सांठवा अंतरीं सुखें।**
**याविना नसे देव दूसरा। भक्त वंदिती पाय सत्वरा॥ १३॥**
**यापरि ते बहु साधक प्रेमळ येवोनिया दृढ अंकित जाले।**
**सार असार मनोमळ निर्मळ (त्यागुनि) निश्चळ होउनि ठेले।**
**दीन पतीत अपार जडोर्मिस त्यागुनिया मनिं पूर्ण निवाले।**
**चिरसुखदायेक हा सकळास हि तारुनिया पुढती मग चाले॥१४॥**

पुढती मग चाले। पण कोठें, काय, त्याला आपण दुर्दैवानें मुकलों आहोंत. या चवदा श्लोकांपासून इतका च बोध झाला कीं, आण्णाप्पांचें गोत्र कौंडिण्य होतें, वयाच्या अठराव्या वर्षीं च संसार वोखटा मानून श्रीसमर्थचरणांला ते शरण गेले, आनंद असें श्रीसमर्थांनीं त्यांचें नांव ठेविलें, कित्येक वर्षें श्रीचरणांपाशीं राहून " युक्ति बुद्धि " शिकून ते देशांतराला निघाले, तनुपोषणार्थ मार्गांत भिक्षा मागावी व श्रीसमर्थांचा निरोप सर्वांना सांगून त्यांचा उद्धार करावा, कधीं गांवांत रहावें तर कधीं अरण्यांत च, **सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं**। या शिकवणी प्रमाणें आयुष्य कंठून देवगांवीं सहज त्यांचें आगमन घडलें, त्यांची ती शांत पण भव्य, तेजस्वी मूर्ति पाहून **याविना नसे देव दूसरा**। असा निश्चय करून मार्गांत जे लोक शरण येत, त्यांना करावयाचा तो उपदेश करून **आनंदमूर्ति** पुढें गेले! आनंदमूर्तींना जे शरण आले ते **मनिं पूर्ण निवाले**, पण आह्मांस मात्र त्यांनीं चटका लावून मध्यें च सोडिलें, एवढें खरें! आमची योग्यता च तितकी त्याला ते तरी काय करणार!

( ४ ) हें गोड चरित्र पाहून दोन तीन गोष्टी मनांत येतात. ज्या वयाला आमचीं मुलें Matric ला बसतात, त्या वयाला **आण्णाप्पांनीं** श्रीसमर्थचरणांचा आश्रय केला, ज्या वयाला आमचीं मुलें प्रपंचाचा भार आपल्या शिरावर घेतात त्या वयाला **आण्णाप्पांनीं** स्वतः वनवास पतकरून राष्ट्रोद्धाराचा मार्ग स्विकारला!

**महंतें महंत करावें। युक्तिबुद्धीनें भरावें।**
**जाणते करून विखरावें। नाना देशीं॥**

तें हें असें. श्रीसमर्थांची ही एक मोठी यंत्रणा (organisation) होती, याला कांहीं पुरावा पाहिजे काय? या घटनेला जर दुसरें तिसरें कांहीं धोरण नव्हतें तर, या सर्व शिष्यांना आपआपल्या गांवीं राहून **राम राम सीताराम** ह्मणत राहतां नसतें कां आलें? आण्णाप्पा राहणारे कोल्हा-

पुराकडील असें त्यांच्या आरतीवरून दिसतें आणि त्यांची योजना होते मोगलाईत निलंग्यास ! अगदीं उघड आहे कीं, तरुण मंडळी शरण आली ह्मणजे आपल्या जवळ २।४ वर्षें त्यांना ठेवून घेऊन, तरबेज करून, मग त्यांना प्रांत नेमून देऊन, लोकोद्धारार्थ पाठवावयाचे, अशी ही श्रीसमर्थांची भारतसेवकमंडळाची ( Servants of India Society ) योजना होती. कागदपत्रांवरून, स्फुट प्रकरणांवरून, ग्रन्थांवरून, व चरित्रांवरून ही गोष्ट आतां अगदीं सिद्ध झाली आहे.

( ५ ) मठांत संग्रह फार थोडा आहे. भक्तिरत्नावली व शिवकवच असे दोन संस्कृत ग्रन्थ आहेत. सोळा सतरा बाडें, दोन तीन पोथ्या, मूठभर कागदाचे तुकडे व दोन मुठी गळांठा इतका संग्रह एका श्रीसमर्थसेवकानें मिळवून पाठविला व श्रीसमर्थदासांनीं १०।१२ अस्सल सनदापत्रांच्या नकला करून पाठविल्या. सनदापत्रांचा समावेश श्रीसांप्रदायिक कागदपत्रांत करूं. इतर जो संग्रह मिळाला त्यांत एकनाथांचें रुक्मिणीस्वयंवर वगैरे अवधुतात्मजसुहृदकृत कृष्णावर पद, आनंदतनयाचीं बरीच स्फुट कविता, गंगाजी कोनेर यांचें एक अत्यन्त बहारीचें पद, गोविंद्चिंतामणींचे सुलोचनागहिंवर, कृष्णदास मुद्गलांच्या रामायणाचा कांहीं भाग, त्रिमलसुतांचीं पदें व रागमालिका, मध्वनाथांचीं कांहीं प्रकरणें, पदें, अभंग, वगैरे, मोरोपंतांचीं स्फुट प्रकरणें, पुरंधरविठ्ठलांचीं कानडी पदें, माधवांचें गजगौरी आख्यान, माधवनंदनांचें अनसूयाचरित्र, पंडितराम सिरसाळकर यांची शिवरात्रीकथा, मुक्तेश्वरांच्या पर्वांपैकीं कांहीं आख्यानें व आदिपर्व सर्व, वामनांचीं कांहीं प्रकरणें, वेणीस्वामींचीं सीतास्वयंवर, कौल व रामगुहसंवाद हीं तिन्हीं प्रकरणें, शिवरामपूर्णानंदांचा प्रबोधसुधाकर व स्फुट पदें, श्रीधरकृत स्फुट प्रकरणें, मेघश्याम यांचीं आपले गुरु श्रीसमर्थशिष्य अनंतमौनी यांच्यावर फार च प्रेमळ पदें, सखारामसुतांचें रुक्मिणीस्वयंवर इत्यादि प्रकाशित व अप्रकाशित कविता असून शिवाय त्यांत अनंत, अनंतसुत, उद्धव, अमृतेश्वर, जीवन्मुक्त, गोविंद, केशव, जगमैत्रनागा, गिरिधरप्रभु, गोसावीनंदन, गोविंदात्मज, जयरामजयसुतांकित, तुका, नामा, नागेशात्मज, नामयाची दासी, त्रिंबक, नाथात्मज, मालो, मेरु, बाळकृष्ण, महामुद्गलभट्ट, बस्वलिंग, माधवदास, रमावल्लभदास, शिवराम कोकिळ, सदाशिव, बालात्मज, सज्जनरंजन, रंगनाथ, हरि कवि, विठ्ठल इत्यादि ज्ञात आणि अज्ञात कवींची कांहींना कांहीं कविता आहे.

प्पावर एक पद आहे व त्यांच्यावर त्यांचे शिष्य जयराम यांनीं केलेली एक आरती मिळाली आहे. तें पद आणि आरती येथें देतों:—

**गुरुरायाचें नाम सार सेवी। चित्त गुरुपदांबुजीं ठेवी॥ ध्रु०**
**मग काळाचें भय तुज नाहीं। गुरुकृपें तरसिल पाही॥ १॥**
**गुरु सच्चिदानंद आनंदमूर्ति। नको विसरूं तयाची चरणकीर्ति॥२॥**

## आरती

**सुरवाल श्रीयाल करवीरापासी। गोत्र कौंडिण्येसी अवतार घेसी।**
**अनंतरूप अनंत नामातें धरिसी। जडमूढ तारावया देहगांवा येसी॥**
**जय देव जय देव जय सद्गुरुराया। तुझिया पदावरुनि कुरवंडिन काया**
**अनेक लीला विचित्र कौतुक केले। विवेक वैराग्यासी ध्वजा लावीले।**
**पाषांड खंडूनी भक्ती स्थापीले। आनंद जयराम निज भेटी जाहाले॥ २**

हे जयराम मोठे विद्वान् आणि नामांकित कीर्तनकार होते अशाविषयीं आख्यायिका सांगतात. श्रीशाहुछत्रपतीकडून यांनीं च मठाला उत्पन्न मिळविलें.

( १० ) मठ गांवांत नीलकंठेश्वराच्या पुरातन देवालयापाशीं आहे व समाधी उत्तरेला गांवाबाहेर एका शेतांत आहेत. तें शेत मठाला इनाम आहे. तेथें एकंदर चार समाधी आहेत. पैकीं मोठी पूर्वाभिमुख आहे ती आण्णाप्पांची. त्या समाधीवर " श्रीराम " अशीं अक्षरें आहेत. तीपुढील वृंदावन जयरामांचें होय. दुसऱ्या दोन समाधी आहेत त्या कोणाच्या हें कोणास सांगतां येईना. मार्गशीर्ष वद्य ३ ही आनंदस्वामींची पुण्यतिथी होय व फाल्गुन वद्य १४ ही जयरामांची होय. मठाला लांबोटें गांव इनाम होतें व त्याबद्दल निजामसरकारांतून ३७५ रुपयांची नक्त नेमणूक आहे. शिवाय ५।७ शेतजमिनी इनाम आहेत.

( ११ ) या मठाखालचे अकरा मठ आहेत असें सांगतात. बेदराकडे कोहेर ह्मणून गांव आहे तेथील मठ या मठाखालचा होय, असें ह्मणतात. इतर मठ कोठें आहेत, हें कोणास ठाऊक नाहीं. स्वतंत्रपणें शोध केला पाहिजे. आण्णाप्पांच्या संबंधानें सुद्धां शोध करण्यास खुद्द निलंग्यास च अजून जागा आहे. एका च खेपेंत एकाद्या स्थलाचा संपूर्ण शोध लागूं लागला, तर होत आहे त्यापेक्षां दसपट संशोधन एकदम च नाहीं होणार ! असें कधीं होत नसतें. संशोधकांना हि त्यांच्यापरी दिव्य करावें लागतें, तेव्हां कोठें संशोधनदेवता किंचित् प्रसन्न होते !

धुळें- १८४० वैशाख शुद्ध १०

[ ७७ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांचें साद्यन्त चरित्र कोणास ठाऊक आहे ?

## चाफळच्या रामाला

**जन्मा येउनि येकवार तरि चाफळक्षेत्रीं जावें रे ॥**

सबंद चाफळखोरें इतकें रम्य आहे कीं, तें पहातां क्षणीं च कोणाच्या हि मुखांतून सहज वरील उद्गार निघावेत! कोणत्या हि दृष्टीनें चाफळखोऱ्याकडे पहा, तें स्थान च असें आहे कीं, तेथें गेल्यावर कोणाचें हि चित्त रमावें! खोऱ्यांतील सृष्टिसौंदर्य प्रत्येकाचें मन रिझवील च, पण खोऱ्यांत पाऊल टाकतां च पूर्वजस्मृति होऊन, उद्विग्नता आणि प्रसन्नता अशा परस्परविरुद्ध भावनांनीं ज्याच्या चित्तांत खळबळ उडणार नाहीं, असा निर्विकार महाराष्ट्रीय विरळा! चाफळखोऱ्यांत जिकडे पहावें तिकडे श्रीसमर्थ दिसतात, त्यांचीं पाऊलें स्पष्ट उमटलेलीं दिसतात! ते पायीं चालतांना दिसतात आणि घोड्यावर स्वार झालेले दिसतात. निर्जन अशा डोंगरांत एकांतांत आसन घालून बसलेले दिसतात तर समाराधनेची व्यवस्था ठेवतांना गर्दींत असलेले दिसतात. एकादे वेळीं शिष्यमंडळींना भोंवताली घेऊन उपदेश करीत असलेले दिसतात तों एकाद्या दिवशीं मांडनदीला अचानक पूर येऊन वाहून जाणाऱ्या व बुडणाऱ्या महाराच्या पोराला काढण्यासाठीं पुरांत उडी टाकून त्याला खांद्यावर घेऊन बाहेर येतांना दिसतात. कोणे दिवशीं पहावें तों शिवराजांशीं शिंगणवाडीच्या आंबराईत हितगुज करिताहेत, तों एकादे दिवशीं एकटे च सारे डोंगर तुडवीत आहेत. चाफळखोऱ्यांत जिकडे पहावें तिकडे श्रीसमर्थ दिसतात, श्रीशिवछत्रपति दिसतात, श्रीसमर्थांचे उद्धवकल्याणदिवाकरादि हजारों शिष्य दिसतात! जाऊन पहा दिसतात कीं नाहीं आणि मग नाहीं ह्मणा. यांत एक अक्षर अतिशयोक्तीचें नाहीं. हे सारे प्रसंग तेथें घडलेले आहेत व ज्याला दृष्टि दिलेली असेल त्याला ते केव्हां हि तेथें दिसतील! १८४० ह्या शकाकडे डोळे उघडून पहावें च कशाला? १५७१ ते १६०२ पर्यंतचें च चाफळखोरें डोळे मिटून पहावें

( ६ ) या संग्रहांत श्रीमत् दासबोधाचीं कांहीं जीर्ण पानें आहेत तीं आण्णाप्पांच्या हातचीं आहेत. याशिवाय खुद्द मठांत आण्णाप्पांच्या हातचा दासबोध ग्रन्थ आहे. तो तंतोतंत कल्याणस्वामींच्या हातच्या मूळ प्रतीप्रमाणें आहे. तसें च एक जीर्ण बाड आण्णाप्पांच्या हातचें असून त्यांत श्रीसमर्थकृत **अंतर्भाव, आत्माराम, पंचसमासी, निर्गुणध्यान, सगुणध्यान, मानसपूजा, क्षात्रधर्म,** संभाजी राजे यांना पत्र, **जनस्वभावगोसावी** हीं व आणखीं दोन अप्रकाशित स्फुट प्रकरणें आहेत. हीं सर्व प्रकरणें श्रीसमर्थकृत लघुकाव्यांचा भाग तयार करतांना उपयोगीं पडणार आहेत. एकंदर संग्रहांत श्रीसमर्थांचीं मराठी व हिंदुस्थानी पदें विपुल आहेत. त्यांत नवीन हि पुष्कळ आहेत. सहाव्या बाडांत गजेंद्रमोक्ष ह्मणून प्रकरण आहे त्याच्या मथळ्यावर **रामदासकृत** असें लिहिलेलें आहे. प्रकरण वाचून पाहिलें पण तें श्रीसमर्थांचें असावें असें वाटत नाहीं. त्याचे ७९ श्लोक आहेत. शेवटच्या श्लोकांत ह्मणे रामदास आहे, पण ७७ व्या श्लोकांत श्रीसमर्थांचें स्तवन आहे. शेवटचे तीन श्लोक असे:

**नसे उपमा सद्गुरु रामदासा । जयाचेनि हा तूटला जन्मफांसा ।**
**सदा सर्वदा पैं भजावें तयासी । जया वेद[१] ये मुक्ति होतील दासी ७७**
**यथासांग हे श्लोक जाले गजाचे । अती आदरें हे पढा नित्य वाचे ।**
**प्रितीनें बहु पाठ आधीं करावे । निसीदीन पैं हे चि वाचे धरावे ७८**
**गजेंद्रास हा पावला देव जैसा । जसा जो भजे त्यासि पावेल तैसा ।**
**धरीतां मनीं होइजे पापरूपा । ह्मणे रामदास यद्थीं विकल्पा ॥७९॥**

तेव्हां हें प्रकरण कोणाचें याचा निर्णय झाला पाहिजे. मन असें सांगतें कीं, तें श्रीसमर्थशिष्यांचें असावें.

( ७ ) बाड १० पृष्ठ १७३ वर खुद्द आण्णाप्पांचें अवघ्या बारा ओव्यांचें **स्वप्नमंदोदरी** ह्मणून प्रकरण आहे. तसें च आण्णाप्पांचें ह्मणून एक च पद उपलब्ध आहे.

**भज भावें श्रीगुरुराया रे ॥ ध्रु० ॥**
**कृपाअंजन घालुनि नयनीं । वारि भयानक माया रे ॥ १ ॥**
**सस्वरूपीं मन उन्मन जालें । निरसुनिया सविकाया रे ॥ २ ॥**
**आनंदस्वामी परात्परदाता । केलि कृपेची छाया रे ॥ ३ ॥**

---

१ (?) " सेवितां " असा पाठ मी सुचवितों.

( ८ ) तेरावें बाड फार महत्त्वाचें आहे. त्यांत एका कवीचे ७०० श्लोक आहेत. सध्यां जरूर तितकें स्थळ नसल्यामुळें या कवीविषयीं पुढें सविस्तरपणें लिहूं. सर्वांचा च कोठें उल्लेख करा! पण आणखी एका कवीचा उल्लेख करून संग्रह तूर्त बाजूला ठेवूं. जयवंत ह्मणून कोणी कवि होते. त्यांचीं मराठी, हिंदुस्थानी आणि कानडी अशा तीन भाषांत पदें आहेत. कानडी मला कांहीं च समजत नाहीं, तेव्हां त्या पदांत काय आहे तें सांगतां येत नाहीं. कोणी कानडी मित्रानें पाहून सांगितलें पाहिजे. यांच्या मराठी व हिंदुस्थानी पदांचा मासला सहाव्या बाडांतून येथें देतों.

( १ )

रामनामें आनंदरूप उ[1]ठावें रे। सावधानें भजन तें करावें रे।
भावबळें देवाला वोळखावें रे। ध्यानीं मनीं अखंडरूप ध्यावें रे॥ध्रु०
लोकांमध्यें शोधावा इहलोक रे। लोकांमध्यें भेदावा संतलोक रे।
लोकांमध्यें छेदावा दुःखशोक रे। लोकांमध्यें साधावा परलोक रे॥१
काळ जातो आलेया घडी घडी रे। अंतकाळीं होईल तडातडी रे।
येम जाची करील झोडाझोडी रे। राघवाची करावी सीघ्र जोडी रे॥
सोडविता अंतिचा राम सखा रे। वैभवानें स्वहित चुकों नका रे।
भाग्यमदें पावाल पुढें धका रे। नित्यानित्य विवेक बरा तुका रे॥३॥
देवभक्त शोधितां मूळतंत रे। ठाईं पडे विचारें तो आनंत रे।
कल्पनेसी होतसे अंतवंत रे। संतसंगें निवाले जयवंत रे॥४

( २ )

हम तो बैरागी बाबा। रामजुके दर्बारी।
सब जनकुं हमारी॥१॥ राम राम सीताराम॥ ध्रु॥
बैकुंठ शोभत ठाण बैठे पांउं। नाम जपत कहुं। राम राम०॥२
मौज दर्याउमे जयवंत झूलत। गावत ध्यावत॥
राम राम सीताराम॥ ३॥

जयवंतांची वाणी फार जोरदार आहे. हे जयवंत कोण याचा माझ्याशीं अजून निश्चय होत नाहीं. आण्णाप्पांचे शिष्य जयराम ते तर हे नाहींत ना, असें एकवार मनांत येतें व श्रीसमर्थांचें हि जयवंत असें नांव होतें, तेव्हां जयवंत ह्मणजे श्रीसमर्थ तर नव्हत, असें हि क्वचित् वाटतें.

( ९ ) असें या संग्रहाचें एकंदर स्वरूप आहे. त्यांत खुद्द आण्णा-

---

१ जगावें. २ मानवा.

 प्पावर एक पद आहे व त्यांच्यावर त्यांचे शिष्य जयराम यांनीं केलेली एक आरती मिळाली आहे. तें पद आणि आरती येथें देतों:—

**गुरुरायाचें नाम सार सेवी । चित्त गुरुपदांबुजीं ठेवी ॥ ध्रु०**
**मग काळाचें भय तुज नाहीं । गुरुकृपें तरसिल पाहीं ॥ १ ॥**
**गुरु सच्चिदानंद आनंदमूर्ति । नको विसरूं तयाची चरणकीर्ति ॥२॥**

## आरती

**सुरवाल श्रीयाल करवीरापासीं । गोत्र कौंडिण्येसी अवतार घेसी ।**
**अनंतरूप अनंत नामातें धरिसी । जडमूढ तारावया देहगांवा येसी ॥**
**जय देव जय देव जय सद्गुरुराया । तुझिया पदावरुनि कुरवंडिन काया**
**अनेक लीला विचित्र कौतुक केले । विवेक वैराग्यासी ध्वजा लावीले ।**
**पाषांड खंडूनी भक्ती स्थापीले । आनंद जयराम निज भेटी जाहाले ॥ २**

हे जयराम मोठे विद्वान् आणि नामांकित कीर्तनकार होते अशाविषयीं आख्यायिका सांगतात. श्रीशाहुछत्रपतीकडून यांनीं च मठाला उत्पन्न मिळविलें.

( १० ) मठ गांवांत नीलकंठेश्वराच्या पुरातन देवालयापाशीं आहे व समाधी उत्तरेला गांवाबाहेर एका शेतांत आहेत. तें शेत मठाला इनाम आहे. तेथें एकंदर चार समाधी आहेत. पैकीं मोठी पूर्वाभिमुख आहे ती आण्णाप्पांची. त्या समाधीवर " श्रीराम " अशीं अक्षरें आहेत. तीपुढील वृंदावन जयरामांचें होय. दुसऱ्या दोन समाधी आहेत त्या कोणाच्या हें कोणास सांगतां येईना. मार्गशीर्ष वद्य ३ ही आनंदस्वामींची पुण्यतिथी होय व फाल्गुन वद्य १४ ही जयरामांची होय. मठाला लांबोटें गांव इनाम होतें व त्याबद्दल निजामसरकारांतून ३७५ रुपयांची नक्त नेमणूक आहे. शिवाय ५।७ शेतजमिनी इनाम आहेत.

( ११ ) या मठाखालचे अकरा मठ आहेत असें सांगतात. बेदराकडे कोहेर ह्मणून गांव आहे तेथील मठ या मठाखालचा होय, असें ह्मणतात. इतर मठ कोठें आहेत, हें कोणास ठाऊक नाहीं. स्वतंत्रपणें शोध केला पाहिजे. आण्णाप्पांच्या संबंधानें सुद्धां शोध करण्यास खुद्द निलंग्यास च अजून जागा आहे. एका च खेपेंत एकाद्या स्थलाचा संपूर्ण शोध लागूं लागला, तर होत आहे त्यापेक्षां दसपट संशोधन एकदम च नाहीं होणार ! असें कधीं होत नसतें. संशोधकांना हि त्यांच्यापरी दिव्य करावें लागतें, तेव्हां कोठें संशोधनदेवता किंचित् प्रसन्न होते !

धुळें- १८४० वैशाख शुद्ध १०

[ ७७ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांचें साद्यन्त चरित्र
## कोणास ठाऊक आहे ?

### चाफळच्या रामाला

**जन्मा येउनि येकवार तरि चाफळक्षेत्रीं जावें रे ॥**

सबंद चाफळखोरें इतकें रम्य आहे कीं, तें पहातां क्षणीं च कोणाच्या हि मुखांतून सहज वरील उद्गार निघावेत! कोणत्या हि दृष्टीनें चाफळखोऱ्याकडे पहा, तें स्थान च असें आहे कीं, तेथें गेल्यावर कोणाचें हि चित्त रमावें! खोऱ्यांतील सृष्टिसौंदर्य प्रत्येकाचें मन रिझवील च, पण खोऱ्यांत पाऊल टाकतां च पूर्वजस्मृति होऊन, उद्विग्नता आणि प्रसन्नता अशा परस्परविरुद्ध भावनांनीं ज्याच्या चित्तांत खळबळ उडणार नाहीं, असा निर्विकार महाराष्ट्रीय विरळा! चाफळखोऱ्यांत जिकडे पहावें तिकडे श्रीसमर्थ दिसतात, त्यांचीं पाऊलें स्पष्ट उमटलेलीं दिसतात! ते पायीं चालतांना दिसतात आणि घोड्यावर स्वार झालेले दिसतात. निर्जन अशा डोंगरांत एकांतांत आसन घालून बसलेले दिसतात तर समाराधनेची व्यवस्था ठेवतांना गर्दींत असलेले दिसतात. एकादे वेळीं शिष्यमंडळींना भोंवताली घेऊन उपदेश करीत असलेले दिसतात तों एकाद्या दिवशीं मांडनदीला अचानक पूर येऊन वाहून जाणाऱ्या व बुडणाऱ्या महाराच्या पोराला काढण्यासाठीं पुरांत उडी टाकून त्याला खांद्यावर घेऊन बाहेर येतांना दिसतात. कोणे दिवशीं पहावें तों शिवराजांशीं शिंगणवाडीच्या आंबराईत हितगुज करिताहेत, तों एकादे दिवशीं एकटे च सारे डोंगर तुडवीत आहेत. चाफळखोऱ्यांत जिकडे पहावें तिकडे श्रीसमर्थ दिसतात, श्रीशिवछत्रपति दिसतात, श्रीसमर्थांचे उद्धवकल्याणदिवाकरादि हजारों शिष्य दिसतात! जाऊन पहा दिसतात कीं नाहीं आणि मग नाहीं ह्मणा. यांत एक अक्षर अतिशयोक्तीचें नाहीं. हे सारे प्रसंग तेथें घडलेले आहेत व ज्याला दृष्टि दिलेली असेल त्याला ते केव्हां हि तेथें दिसतील! १८४० ह्या शकाकडे डोळे उघडून पहावें च कशाला? १५७१ ते १६०२ पर्यंतचें च चाफळखोरें डोळे मिटून पहावें

आणि मग ज्याला, आह्मी ह्मणतों तो प्रत्यय येणार नाहीं, त्यानें आह्मांस खोटें ह्मणावें. इतकी पवित्र भूमि त्रिभुवनांत दुसरी नाहीं. महाराष्ट्राच्या राजकारणाची आणि धर्मकारणाची ती जन्मभूमि होय. शरीर तेथें जाऊन पडावें ! मनानें अहोरात्र त्या खोऱ्यांत भटकत रहावें !

असो; अशा त्या खोऱ्यांत,' श्रीसमर्थांचें चरित्र जाणावें हा च छंद घेतलेला एक दीन किंकर, एके दिवशीं श्रीरामापुढें चौखांबींत, श्रीसमर्थांचें चरित्र आपणांस कोण सांगेल ह्मणून विचार करीत कपाळावर हात ठेवून बसला होता. १५३० चैत्र शु. ९ च्या मध्यान्हकाळापासून तों १६०३ माघ वद्य ९ च्या दुपारपर्यंतच्या प्रत्येक क्षणाचें त्यांचें चरित्र आपणांस कोण सांगेल ! तें कोठें आयतें लिहिलेलें आढळेल काय ? शिवछत्रपतींचा एक मनुष्य श्रीसमर्थांजवळ राहून प्रत्यहीं श्रीसमर्थांची दिनचर्या लिहून छत्रपतीकडे पाठवीत असे, ते सर्व कागद अचानक मिळतील काय ? असें होईल तर काय न होईल ! इतकें आपलें भाग्य कोठून असणार ! अशा रीतीनें क्षणैक आशा आणि क्षणैक निराशा यांच्या तांवडींत सांपडलेल्या त्याच्या अंतःकरणाला सहज श्रीसमर्थांच्या त्या पत्रांतील एका वाक्याची आठवण झाली.

" आपण जाला समाचार रघुनाथजीस विदित केला "

या वाक्याचा दुसरा अर्थ काय होणार ? ही च ती श्रीरामाची मूर्ति, जिच्या पुढें बसून श्रीसमर्थ सर्व इत्थंभूत हकिकत निवेदन करीत ! हे च ते राम ज्यांच्याशीं श्रीसमर्थ मन मोकळें करून बोलत ? श्रीसमर्थांना ' रघुनाथजी वेगळें कोण्ही जिवलग ' नव्हते. जें काय घडेल तें त्या जिवलगाला विदित करावयाचें, कांहीं अडचण आली तरी त्याचा सल्ला विचारावयाचा, कोणतें हि संकट आलें तरी तें निवारण्याचा भार त्याच्यावर घालावयाचा, असा श्रीसमर्थांचा क्रम होता. तेव्हां आतां सांगा, श्रीसमर्थांचें सारें चरित्र चाफळच्या रामावांचून दुसऱ्या कोणास ठाऊक असणार ! ज्याला तें चरित्र जाणावयाची इच्छा असेल त्यानें तें त्यांना विचारिलें पाहिजे ! ते आपणांस सांगतील काय ?

ते सांगतील किंवा नाहीं हा प्रश्न निराळा, पण त्यांना मात्र श्रीसमर्थांचें सारें चरित्र अवगत आहे. ज्याला तें जाणावें अशी तळमळ वाटत असेल त्यानें त्यांचें मग प्रसन्न करून घेतलें पाहिजे. दुसरा मार्ग नाहीं.

[ ७८ ]

# नरसोबा आत्माराम

## — मठ भालकी —

**नर कुणबियाचा पोर। हातीं पादुका समोर॥**

( १ ) मागील विषयांक ७१ यांत श्रीकल्याणशिष्य **आण्णाजीबावा भालकीकर** यांची हकीकत देतांना **भालकी** गांव कोठें आहे तें सांगितलें होतें. त्या भालकीस गांवाबाहेर श्रीभालकेश्वराच्या देवालयाशेजारीं **नरसोबांचा** मठ आहे. **नरसोबा** हे श्रीदासविश्रामधामकर्ते **आत्माराम** महाराज येकेहाळीकर यांचे शिष्य होत. **आत्माराम** महाराजांजवळ ते घोडा सांभाळावयास असत. ते जातीचे मराठे होते व त्यांच्या मठाची परंपरा आजतागाईत मराठ्यांच्या च कडे आहे. सुप्रसिद्ध हुमनाबादकर **माणिकप्रभु** यांचे ते समकालीन होते. या उभयतांचा सहवास वरचेवर होत असे. **नरसोबा** हे **हल्याळी** गांवच्या पाटलाचे चिरंजीव. पूर्वपुण्येंकरून लहानपणीं च त्यांच्या ठिकाणीं तीव्र वैराग्य उत्पन्न होऊन, तशांत सत्समागम लाभल्यामुळें, ते आमरण ब्रह्मचारी च राहिले.

( २ ) त्यांची पूर्वोत्तर शिष्यपरंपरा अशी:—

श्रीसमर्थ
|
कल्याणस्वामी—मठ डोमगांव
|
शिवराम—मठ आपचंद
|
रामचंद्र— ,,
|
आत्माराम— मठ येकेहाळी
|
**नरसोबा**—मठ भालकी
| ( पुण्यतिथि श्रावण व. १ )
महादेव ( ,, चैत्र व. ३ )
|

ज्ञानदेव ( ,, श्रावण व. १२ )
|
गणपतीबोवा ( ,, श्रावण व. १० )
|

| माणिकबोवा | भीमबोवा |
|---|---|
| विद्यमान | विद्यमान |
| वय वर्षें १५ | वय वर्षें १३ |

( ३ ) या मठाची गादी ब्रह्मचाऱ्याची आहे.

**नाना पदार्थ आणि लेंकुरें । देवालयीं समर्पावीं ॥**

या वचनानुसार नरसोबापासून तों आतांपर्यंत या मठाचे जे अधिपति होऊन गेले, तीं सर्व मुलें लहानपणीं च त्यांच्या आईबापांनीं मठाला अर्पण केलीं होतीं, असा येथील इतिहास आहे. विद्यमान दोन्ही मुलें चार पांच वर्षांचीं असतांना च मठाला वाहिलेलीं आहेत.

( ४ ) आपल्या ह्या प्रांतांतील लोकांना या मठाची ओळख करून देण्याला एक साधन आहे. दोन वर्षांपूर्वींपर्यंत जे जे श्रीसज्जनगडावर गेले असतील त्यांना तेथील **बापु रामदासी** यांचें दर्शन घडलें च असेल. **बापु रामदासी** अत्यन्त निष्ठावंत व अधिकारसंपन्न होते. ते जातीचे मराठे होते. त्यांची यापूर्वीं च आपण आठवण करावयास पाहिजे होती ! पण आज या निमित्तानें त्यांचें स्मरण होत आहे, याचा आनंद वाटतो. शके १८३८ वैशाख वद्य ३० स **बापु** समाधिस्थ झाले. ते वेळीं, न जाणों, त्यांचें वय शंभराजवळ असेल. कैक वर्षें ते गडावर च होते. अहोरात्र ते आपल्या च नादांत असत, भजनांत मग्न असत. आत्माराममहाराजांच्या दासविश्रामधामाची माहिती आह्मांस प्रथम बापूंनीं दिली. सर्व लोक विश्रांतीला गेले ह्मणजे रात्रीं व पहाटेस श्रींच्या समाधीपुढें जेव्हां बापु '**रामदास रामदास** ह्मणून,' गाहिंवरून सारखे पुकारीत असत, तेव्हां पाहणाराचा व ऐकणाराचा कंठ भरून आल्यावांचून रहात नसे. बापु गडावर जेथें रहात त्या च जागीं आतां त्यांची समाधी आहे. तिला देहेंवीण लोटांगण असो. असों; सांगावयाचें इतकें च होतें कीं, भालकी हें बापूंचें माहेर होय, नरसोबांचे शिष्य जे महादेवबोवा त्यांचा बापूंना अनुग्रह होता. अजून हि त्या प्रांतांतील मराठे मंडळींत या मठाचें वजन फार आहे.

(५) या मठाची कांहीं कांहीं हकिकत बापु सांगत, पण तेव्हां ती कांहीं समजे व कांहीं समजत नसे. बापूंनीं एकदां एक गोष्ट सांगितली होती. "नागूरच्या देशमुखानें येका रामनवमीस नरसोबांना आमंत्रण देऊन ऐन वेळेवर तयारी केली नाहीं, त्यामुळें नरसोबांना अति दुःख झालें, नवमी राहते कीं काय अशी त्यांना भीति पडली. धुळे गांवच्या पाटलास दृष्टांत होऊन तो तसा च धांवत नरसोबापाशीं आला तों हे व्याकुळ होऊन एका झाडाखालीं मूर्च्छित पडले होते! कांहीं वेळानें देहावर येऊन परस्परांचीं बोलणीं होऊन ती रामनवमी धुळे गांवीं थाटानें झाली; पण नागूरच्या देशमुखानें आपल्या भक्ताचा केलेला अपमान संप्रदायाभिमानी मारुतिराय यांना सहन न होऊन लंकादहनाची किंवा पाडळीगांवची आवृत्ति नागूरास निघाली". बापु सांगत, "नरसोबा आपला शिष्य महादेवबुवा, ह्मणजे बापूंचे गुरु, यांना उघड्या ह्मणत. 'उघड्या, नागुरावर लाल घोडा फिरणार आहे, तेव्हां तेथें देशमुखाच्या वाड्यांत आपला दासबोध आहे तो लवकर जाऊन आण' अशी नरसोबांनीं महादेवांना आज्ञा केली. दासबोध वाड्याबाहेर पडला आणि समोरच्या बुरुजावर अनिलसुताची स्वारी येऊन गर्जना करूं लागली! तत्काळ देशमुखाची सर्व चीजवस्त रामश्वशुरांनीं आपल्या स्वरूपांत मिळवून घेतली"! बापूंचें सांगणें, जसें समजलें तसें दिलें आहे, पण आतां ही च हकीकत ताडून पाहण्यासाठीं, नंतर उपलब्ध झालेले पुढील तीन अभंग येथें देतों.

(१)

नवमी हे राहिली समाचार आला।
धैर्य घसरला महामेरु ॥ १ ॥
धीर हा बुडाला दिसे अंधकार।
सुचेना उपाय अश्रु वाहे ॥ २ ॥
श्वास हा सांडिला जाला अचेतन।
वाटे गेला प्राण देहांतुनी ॥ ३ ॥
ऐसें दुःख राम जाणे अंतरींचें।
आतां मी कोणाचें काय सांगूं ॥ ४ ॥
समजावीस करी दीन पोटीं धरी।
फिरे दिगांतरीं नरसोबा ॥ ५ ॥

( २ )

उत्साव मोहोत्साव करिताती संत।
सामर्थ्य अद्भुत त्यांचे आंगीं॥ १ ॥
दुर्बळ मी रामा नांदतों जगांत।
सामोग्री संचीत कांहीं नाहीं॥ २ ॥
नाहीं ठाव गांव मिरास वतन।
माझें तजतन (?) पाय तुझे ॥ ३ ॥
माझी लाज चिंता रामा रे तुजला।
त्रिभुवनीं मला नाहीं कोणी ॥ ४ ॥
घाबरला मनीं बहु चिंतातुर।
रामा देई धीर बोलावूनी ॥ ५ ॥
सद्गदित कंठ नयनीं नीर वाहे।
दाही दिशा पाहे रामा तुज ॥ ६ ॥
धांवोनिया राम धरियला हात।
पुरवीन हेत सर्व तुझे ॥ ७ ॥
ब्रीद हें बांधिलें धरी अभिमान।
नरसी जतन निरंतर ॥ ८ ॥

( ३ )

भक्ताचा विसर न पडे देवासी।
धांवे अंतर्साक्षी गजेंद्रासी ॥ १ ॥
नाना संकटांत रक्षिले पांडव।
द्रौपदीची धांव ऐकियली ॥ २ ॥
प्रल्हादासी पिता बहुत गांजिला।
अंतर्बाह्य जाला आपण चि ॥ ३ ॥
वनीं वाट पाहे अहिल्या शबरी।
तयासी उत्धरी राम माझा ॥ ४ ॥
ध्रुवबाळ हाक मारी अरण्यांत।
कळवळोनी हात धरियला ॥ ५ ॥
तैसा नरसोबा जळतां मानुरांत।
दाखविला पंथ धुळेनगरीं ॥ ६ ॥
विश्वसाक्षी लोक पाहे कवतुक।
अंतराचें दुःख राम जाणे ॥ ७ ॥

आमचे बापु जी गोष्ट सांगत तिला या तीन अभंगांत पुष्कळ आधार सांपडतो, नाहीं?

( ६ ) नरसोबांच्या अभंगांची एक फाटकी वही व वरप्रसाद म्हणून एक लहानसा ग्रन्थ, याशिवाय मठांत दुसरा संग्रह राहिला नाहीं! अभंग उतरून आणावे लागले व वरप्रसाद ग्रन्थ प्रसाद म्हणून मिळाला. नरसोबांचे कोणी अनंत म्हणून गुरुबंधु होते त्यांनीं हा लहानसा ग्रन्थ केला आहे. त्याचे तीन समास व अनुक्रमें २३+१४+५३ मिळून ९० ओव्या आहेत. गुरुप्रसाद, सद्गुरुलक्षणें व सच्छिष्यलक्षणें हा ग्रंथांतील प्रतिपाद्य विषय आहे.

सच्छिष्यलक्षणांपैकीं कांहीं लक्षणें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत:—

गुरुआश्रमीं पादरक्षा घालूं नये ।
सैरावैरा फिरों नये ।
फिरों नये म्हणोन स्वस्थ बसूं नये ।
कांहीं श्रवण करावें ॥ ८ ॥

गुरुसन्मुख गुरुआज्ञेवीण ।
कोणास प्रबोध करूं नये आपण ।
दीक्षा व्याख्या प्रभुत्व आपुलें जाण ।
न पुसतां वर्णूं नये गुरुसन्मुखें ॥ ९ ॥

गुरुआश्रमीं पर्यंकावरी निजूं नये ॥ १० ॥

गुरूसी समर्पण न करितां भक्षूं नये ॥ १२ ॥

कृतनिश्चय करूनि गुरूसी कांहीं देतो ।
पुन्हा लोभ धरूनि मागतो ।
तो मार्जार होऊनि घरोघरीं फिरतो ।
अन्न मिळेना समयासी ॥ १५ ॥

गुरुपादुका आपण घालूं नये ।
गुरुआसन घालून बैसूं नये ।
गुरुवस्त्रादि पांघरूं नये ।
प्राण गेल्यानें राघवा ॥ १८ ॥

सद्गुरुपुढें आपण जाऊं नये ।
गुरुच्छाया उलंघूं नये ।
गुरुवचनास त्रासूं नये ।
प्राण गेल्यानें राघवा ॥ १९ ॥

सद्गुरु राहा ह्मणतील ज्या देशीं ।
त्या देशीं राहावें निश्चयेसीं ॥ २२ ॥
गुरुनिंदकास जाणें ।
यथाशक्ति शिक्षा करावें आपणें ।
शिक्षा होत नाहीं आपणाकडून ।
मग शाप द्यावें तपोबळें ॥ २३ ॥
आपणास सामर्थ्य नाहीं हे दोन्ही ।
उठूनि जावें तत्क्षणीं ।
गुरुनिंदा ऐकूं नये कानीं ।
सत्य जाण राघवा ॥ २४ ॥
सद्गुरुसन्मुखें मोठ्यानें बोलूं नये ।
सद्गुरुसन्मुखें हळु बोलों नये ।
सद्गुरूसीं निग्रह करूं नये ।
कोण्हेयेकविषयीं ॥ ४८ ॥

इत्यादि. ग्रन्थाचा शेवट असा आहे:—

श्री आत्माराम सद्गुरु । हृदयस्थ होऊनि सांगे विचारु ।
अनंत कल्पनेचा संव्हारु । निरसूनि टाकिला क्षणमात्रें ॥ ५० ॥
जे कां अभक्त अति चंचळ । धूर्त पाषांड नास्तिक खळ ।
मंदबुध्दि दुर्जन मूर्ख केवळ । त्यासि सांगूं नये हे गुरुबोधें ॥ ५१ ॥
अवंचक सुपक्कमती । प्रेमयुक्त कारितो सद्गुरुभक्ती ।
तयासि सांगावें अति प्रीति । सत्य जाण राघवा ॥ ५२ ॥
इति श्री वरदप्रसाद ग्रंथ । कर्तें करविते दास समर्थ ।
भावासि आणा हो रहस्य अर्थ । आत्मानंत तुष्टेल ॥ ५३ ॥

( ७ ) नरसोबांचे चौचरणी ७७ व दोचरणी ७९ मिळून १५६ अभंग त्या वहींत होते. वहीचीं शेवटचीं पानें फाटलेलीं असल्यामुळें पुढें जे अभंग होते त्यांना आपण तूर्त किंवा कायमचे च मुकलों आहोंत. सुदैवानें नरसोबांचे हे जे १५६ अभंग लाभले आहेत, त्यांवरून नरसोबा हे महान् अधिकारी गुरुभक्त होते, याची पूर्ण साक्ष पटते. हे अभंग कधीं काळीं छापले जातील न जातील, यासाठीं नरसोबांच्या प्रेमळ वाणीचा व एकनिष्ठ अंतःकरणाचा किंचित् परिचय पुढील लेखांकांत करून देऊं.

धुळें–शके १८४० ज्येष्ठ शुद्ध ११

[ ७९ ]

॥ श्रीराम ॥

# नरसोबांची वाणी

आमचे नरसोबा मराठा जातीचे होते. त्यांनीं पेशवाईची अखेर व इंग्रजीचा आरंभ पाहिला होता. मागील लेखांत कबूल केल्याप्रमाणें त्यांच्या अंतःकरणाची किंचित् ओळख पटावी ह्मणून या ठिकाणीं त्यांचे निवडक तेरा अभंग देण्याचें योजित आहे.

## ( १ ) नरसोबा परदेशी

कोण देश कोण्या खंडांत । कोणें पाहिला अनंत ॥ १ ॥
कोठें आहे राम माझा । कोणी सांगा कीं रे वोजा ॥ २ ॥
शास्त्रें पुराणें पाहिलीं । सकळ तीर्थें हि धुंडिलीं ॥ ३ ॥
अनंत बोलती वाचाळ । कोणी दावीना तात्काळ ॥ ४ ॥
ऐसीयासी पुसूं काय । वांज लेकुराची माय ॥ ५ ॥
नाहीं प्रत्ययाचें ध्यान । जेथ तेथ अनुमान ॥ ६ ॥
संतजनीं भरवसा । येथ होईल खुलासा ॥ ७ ॥
नरसोबा परदेशी । आला संतांचे सभेसी ॥ ८ ॥

## ( २ ) नरसोबा भारी जाजावला

दुःखाचे डोंगर सांगूं कोणापासी । जाणे अंतर्साक्षी राम माझा ॥१॥
किती आठवावें जन्मोजन्मीं दुःख । नाहीं कोठें सुख रामावीण ॥ २॥
काय माझें दुःख सांगूं या जनासी । ह्मणती मजपासी दुगणा आहे ॥
कोण आहे सुखी पाहातां जगांत । नांदतो विख्यात चिरंजीव ॥ ४ ॥
त्रैलोक्य शोधितां सुखी आढळेना । आतां नारायणा जन्म पुरे ॥५॥
दुःख हें सरलें तुज ऐसें करी । नरसोबा भारी जाजावला ॥ ६ ॥

## ( ३ ) नरसोबा झुरे भारी

कैसा राम विसरला । कोण्या ठायीं गुप्त जाला ॥ १ ॥
जन्मा येउनीया काय । नाहीं पाहियले पाय ॥ २ ॥
विश्व दिसत साकार । कोण दाखवील सार ॥ ३ ॥
जन्मोजन्मीं त्याचा दास । होइन माझ्या स्वहितास ॥ ४ ॥
त्याच्या पायाचें प्रायतन । देह टाकीन वोवाळून ॥ ५ ॥
नरसोबा झुरे भारी । कधीं भेटेल कैवारी ॥ ६ ॥

## ( ४ ) नर बुडाला सागरीं

राम ह्मणतां वैखरी । देह पडो धरणीवरी ॥ १ ॥
लोक ह्मणती विकारी । प्रेम अधीक दे अंतरीं ॥ २ ॥
नको लोकिकाची चाड । मना लागो तुजें वेड ॥ ३ ॥
ह्मणती पिसाटी भिकारी । अनुताप चढो भारी ॥ ४ ॥
जन्ममरण येरझारा । आतां पुरे विश्वंभरा ॥ ५ ॥
माझा अभिमान तुला । कोणी नाहीं देवा मला ॥ ६ ॥
नर बुडाला सागरीं । रामा काढी तूं बाहेरी ॥ ७ ॥

## ( ५ ) नरसोबा दुःखवत्

मज कीर्तनाच्या वेळीं । रामा राहे तूं जवळी ॥ १ ॥
नको सोडुनि जाऊं दूर । सदा राहावे समोर ॥ २ ॥
काल कीर्तनाचा रंग । रामा जाहाला वीरंग ॥ ३ ॥
घालुनि दुःखाच्या डोंगरीं । कोठें गेलासी तूं दुरी ॥ ४ ॥
ऐसा नको करूं घात । जवळी राहावे सांभाळीत ॥ ५ ॥
वाटे तोडावें मोडावें । देह करवतीं घालावें ॥ ६ ॥
जळो जळो हें शरीर । नाहीं कीर्तनीं गजर ॥ ७ ॥
नरसोबा दुःखवत । जाउनि पडावें अग्नींत ॥ ८ ॥

## ( ६ ) नरसोबाचें माहेर

व्यास विधी विष्णु शंकराचे ध्यानीं । अयोध्याभुवनीं नांदताहे ॥१॥
तो चि माझा सखा आहे माय बाप । अयोध्येचा भूप सूर्यवंशी ॥२॥
रात्रंदिवस जीव झुरे निरंतर । आठवे माहेर शरयुतीर ॥ ३ ॥
कधीं मायबाप पाहीन मी डोळा । जीव उतावेळा घाबरा हे ॥ ४ ॥
पुसे हकीगत आलिया गेल्यासी । राम अयोध्येशीं सुखी आहे ॥५॥
कोणी तरी माझा वर्तमान सांगा । अयोध्येसी न्या गा राम पाहूं ॥ ६
करितो काकुलती पडतो मी पाया । कोणी रामराया भेटवा हो ॥७॥
पाहे नरसोबा माहेरीची वाट । सासुरवासीं वीट फार आला ॥ ८ ॥

## ( ७ ) नरसोबा मार्ग काढी

ध्रुव प्रल्हाद ते तुजे । आह्मी काय देवा दुजे ॥ १ ॥
तया स्मरणाचें सुख । आह्मा संसारांत दुःख ॥ २ ॥
मी हि तुजेचो लेकरूं । नको कल्पांतीं वीसरूं ॥ ३ ॥

आणीक देव कोण आहे । आम्हां हीना दीना माय ॥ ४ ॥
सकळ संतांचे आगाढी । नरसोबा मार्ग काढी ॥ ५ ॥

## ( ८ ) नरा लागलीसे गोडी

अनंत ब्रह्मांडा बाहेरी । देव नांदतो अंतरीं ॥ १ ॥
रोमोरोमीं तो भरला । चर्मचक्षूसी चोरला ॥ २ ॥
तयावीण ठाव रिता । कोणी सांगा ना कां आतां ॥ ३ ॥
ऐसी योगियाची खूण । इतर तो काय जाण ॥ ४ ॥
नरा लागलीसे गोडी । रामरूपीं दिली बुडी ॥ ५ ॥

## ( ९ ) नरसोबा ध्यानारूढ

कसा नरदेह गमाविती जन । रामा तुझें ध्यान विसरती ॥ १ ॥
नाना विषयांचे लागोनिया पाठी । रामा तुज दृष्टी पाहीनाती ॥ २ ॥
नाना यत्न करिती समजेनाती जन । मज वाटे शीण तुजवीण ॥ ३ ॥
कामधेनु घरा आली मंदिरासी । परि ते पापरासी पीटवीती ॥ ४ ॥
काय पुण्य होता परिस धरिला । अभागी फेंकिला धोंडा ह्मणुनी ॥५॥
आतां काय करूं सांग रामा जना । नरसोबा ध्यानारूढ सदा ॥ ६ ॥

## ( १० ) नरसोबा हाका मारी

अग्नि लागल्या गृहांत । कैसे निजले निवांत ॥ १ ॥
माझी माय माझा बाप । स्वप्नीं घोरला अमूप ॥ २ ॥
शेतवाडा घरदार । माझे सोईरे अपार ॥ ३ ॥
अग्नि घेरला भवता । कैची कन्या कैचा सुता ॥ ४ ॥
तुटती अग्नीची हिल्लाळा । पडती येकमेका गळा ॥ ५ ॥
जागे उठोनी बैसेना । कोणी नाहींत आपणा ॥ ६ ॥
युगायुगीं लागली झोंप । बहुत जळाले अमूप ॥ ७ ॥
लिंगदेहासी यातना । येम घालिती पतना ॥ ८ ॥
निघा निघा रे बाहेरी । नरसोबा हाका मारी ॥ ९ ॥

## ( ११ ) ब्राह्मण कां मामलेदार ?

ब्रह्म जाणे तो ब्राह्मण । ऐसें श्रुतीचें वचन ॥ १ ॥
राजा राजपदीं राहे । सहज सदा चालताहे ॥ २ ॥
ब्राह्मण ब्रह्मरूप आहे । भेद अनामीक वाहे ॥ ३ ॥

पदीहून ढळूं नये । हा चि साधन उपाय ॥ ४ ॥
नाहीं तरी मामलेदार । पुढें फजीती हो फार ॥ ५ ॥
नाना तालुकेसरदार । मोसबा निघतां पैजार ॥ ६ ॥
ऐसें कासया करावें । राज्य अधिकार व्हावें ॥ ७ ॥
स्वप्नीं राज्यपद जाय । नरसोबा जागा होय ॥ ८ ॥

तात्पर्य, ब्राह्मणांनीं आपल्या ब्रह्मपदापासून ढळून मामलेदार होण्याची व पैजार खाण्याची हांव धरूं नये, असें नरसोबा सांगतात.

## ( १२ ) आत्माराम महाराज

कुबेर नाम मुर्खा सांगे । घरोघरीं भीक मागे ॥ १ ॥
ऐसा नव्हे सद्गुरु माझा । पूर्ण योगियांत राजा ॥ २ ॥
आत्माराम नाम साजे । त्रिभुवनीं कीर्ति गाजे ॥ ३ ॥
दासविश्रामधामांत । पाहा महिमा अद्भुत ॥ ४ ॥
रामदासाचा अवतार । खूण दाविली निर्धार ॥ ५ ॥
नर कुणबियाचा पोर । हातीं पादुका समोर ॥ ६ ॥

## ( १३ ) श्रीसमर्थ

रामदासा ऐसा भारी । कोण आहे भूमीवरी ॥ १ ॥
सकळ देव येती भेटी । राम समान ज्याची कोटी ॥२ ॥
दत्तात्रय आणि नारदा । याच्या भेटी होती सदा ॥ ३ ॥
दासमहाराजांचे गुण । गेले आकाश भरून ॥ ४ ॥
सदा नरसोबा पाहे । दासमहाराजांचे पाये ॥ ५ ॥

या तेरा अभंगांवरून नरसोबांच्या अंत:करणाची कोणास हि परीक्षा करितां येईल. त्यांची तळमळ, त्यांचें प्रेम, त्यांची आतुरता त्यांची गुरु-निष्ठा, त्यांची परोपकारबुद्धि इत्यादि गुणांची साक्ष हे तेरा अभंग देत आहेत. नरसोबांच्या पूर्वकालीं जे साधुसंत होऊन गेले त्यांच्या अभंगांत काय जास्त आहे व नरसोबांच्या अभंगांत काय कमी आहे हें सांगणें कठीण आहे. तेव्हां आमच्या कुणबी नरसोबाचे हि सर्व अभंग छापले गेले पाहिजेत असा हट्ट सांप्रदायिकांनीं धरून त्यांच्या पैकीं च कोणी तरी एकानें ते छापण्याचा खर्च सोसण्यास तयार झाले पाहिजे.

[ ८० ]

॥ श्रीराम ॥

# आपचंद मठांतील गळांठा

## ( श्रीसमर्थदास )

कल्याणांचे शिष्य शिवरामस्वामी ह्मणजे दासविश्रामधामकर्ते आत्माराम महाराज यांचे आजे गुरु त्यांचा हा मठ होय. आपण या मठीं संशोधन करून गेला होता. मी केवळ शिवरामांच्या समाधीच्या दर्शनार्थ तेथें गेलों होतों. परंतु मठांत कांहीं दसरें दिसल्यामुळें तीं पहावीं अशी इच्छा झाली व मठपतींनीं मोठ्या आनंदानें परवानगी दिली. आपण नेलेल्या संग्रहाची यादी आढळली व त्यापैकीं कांहीं ग्रन्थ आपण परत पाठविलेले हि पाहिले. तेव्हां ग्रन्थ पाहण्यांत वेळ-खर्च न करितां मी फक्त गळांठा चाळला. तो आपल्या हि हातून गेला होता, पण या आमच्या विद्यापीठांतील केर कितीदां जरी काढला तरी दर खेपेस कांहीं तरी नवीन सुवर्णकण यदृच्छेनें दृष्टीस पडावयाचे असा मला भरंवसा वाटत असल्यामुळें, श्रीसमर्थस्मरण करीत एक एक कागदाचा तुकडा चाळून पाहिला, त्यांत चार कण संग्राह्य वाटले, ते आपणाकडे पाटवीत आहे. या च मठांतील काय, पण कोणत्या हि मठांतील संग्रह कितीदां जरी पाहिला तरी पुन्हां कोणास त्यांत कांहीं आढळावयाचें नाहीं, अशी हमी, आपल्याप्रमाणें च मी हि देऊं शकणार नाहीं; असो.

जे चार सुवर्णकण आढळले ते आपल्या वाचकांस सादर करितों.

### ( १ ) श्रीसमर्थकृत एक पद

रजंक[1] तुमचा नफर[2] फुकाचा।
टुकडा हि न लगे आह्मा थोरपणाचा ॥ १ ॥
अरे मी नफर आसतां कां मळिण दीसतां।
मैळे[3] द्याल किं न द्याल मी नय मागुता ॥ २ ॥
आस जो करी दंभ जो धरी।
मूर्ख त्या सरि[4] नाहिं दुसरी ॥ ३ ॥

---

१ परीट. २ नफरः किंकरः स्मृतः । राजव्यवहारकोश. ३ मलीन कपडे. ४ उपमा.

वृति वळेना अभिमान गळेना।
स्नेह लागलें तें डाग ढळेना ॥ ४ ॥
रामदास रे। राम त्यास रे।
भेदबुद्धि आढळेना आसपास रे ॥ ५ ॥

श्रीसमर्थ या पदांत, आपणांस परीट ह्मणवीत आहे! मोलावांचून लोकांचीं मनें स्वच्छ धुऊन निर्मल करण्याचा आपण धंदा पतकरिला असतां लोकांनीं मलिन दिसावे हें योग्य नव्हे, आपण एक च फेरी करणार, पुन्हां येणार नाहीं, तेव्हां प्रत्येकानें आपल्या मलिन वासना श्रीचरणीं अर्पण करून निर्मल व्हावें, असें जो न करील त्याच्या मूर्खपणाला पारावार नाहीं, प्रपंचांत गुरफटून राहून ज्याच्या मनावर अभिमानरूपी तेलाचे डाग पडले आहेत ते एरव्हीं निघावयाचे नाहीत, असें या पदांत श्रीसमर्थ सांगत आहेत. तेव्हां ज्यांना आपलीं मळकट मनें स्वच्छ, शुद्ध, निर्मळ व्हावीं, असें वाटत असेल त्यांनीं श्रीचरणांचा आश्रय करावा, हें योग्य होय.

या पदांतील " मी नये मागुता " हें वाचून प्रथम माझ्या मनाला दुःख वाटलें, पण तें क्षणभर च टिकलें. श्रीसमर्थ पुन्हां येणार नाहींत असें कसें होईल ! लोकांनीं आपआपले मळकट कपडे लवकर काढून द्यावें ह्मणून त्यांनीं तो नुसता धाक घातला असला पाहिजे ! आमचे कपडे घाणेरडे असावे, आमचीं मनें अस्वच्छ असावीं, आह्मी भिकाऱ्यासारखे वावरावे, हें काय त्यांना पाहवणार आहे ह्मणता ? नव्हे, मुळीं च नव्हे ! तो नुसता धाक घातला आहे, मनापासून नव्हे. कृपाळुपणें अल्प धारिष्ट पाहे। इतकें च.

## ( २ ) श्रीसमर्थकृत रामाची आरती

भूमिपती भूजापती भूपति रतिवीरा।
सुरपतिरंजन भृगुपतिगंजन रणधीरा।
सरितापतिदंडणा रजनीचरहारा।
वानरपतिमंडण निर्जरशृंगारा ॥ १ ॥
जय देव जय देव सुरवरदा रामा।
मुनिजनमानसहंसा सुंदरगुणधामा ॥ ध्रु० ॥

शरणांगतवत्छळा तरणोत्पळनयना ।
तरणिवंशाभूषण धरणीधरशयना ।
करणीकारण तारण जडजाड्याहरणा ।
दासा पंजर लोभा पर दुस्तरणा ॥ २ ॥

किती हि संशोधन करा, श्रीसमर्थांच्या कवितेचा अंत आपण पाहिला असें कधीं च कोणास ह्मणतां यावयाचें नाहीं, असें जें आपण ह्मणत असतां तें अगदीं खरें आहे.

## ( ३ ) मम रामदास

श्रीसमर्थपंचायतनांतील रंगनाथस्वामी किंवा कारंजे मठांतील रोकडाराम यांनीं जसे श्रीसमर्थांवर कटाव केलेले आहेत, तसा च एक कटाव आत्मारामहाराजकृत आढळला आहे. त्यांतील प्रत्येक कडव्याच्या प्रत्येक चरणाच्या आद्यन्त अक्षरांत मम रामदास हा मंत्र जपला आहे.

महत्सुककर दृढतर जपतां रामदास नाम ।
मरण जनन या विरहित होउनि पावति निजधाम ॥ ध्रु० ॥
राणिव संपत्ति विषवत ज्याला न मनें धन दारा ।
राजसादि गुण आत्मस्थितिनें हरिला त्या थारा ।
राजिव जिवनीं स्थित परि जनिं वनिं करि जो विहारा ।
राखी भक्ता पावउनी भवसागर परपारा ॥ १ ॥
ममता सर्पिणी छेदी शस्त्रें दैवीकर नेमें ।
मनोजघातें साधुनि निवटी दंभादिक काम ।
मत्त निवारुनि मार्ग दाविला सुगम बोध परम ।
मंगळ दायक वचनें निरसी अहंकृती ( धाम ) ॥ २ ॥
दाता वस्तु अमोल्य अगोचर सांगत ( से ) वेदा ।
दाह शमन करी त्रयतापाचा वर्षुनि शेजलदा ।
दाउनि सद्रूप हृदयालित जे धारी द्वय भेदा ।
दाटित माया दापुनिया बळ वियोग हरि अपदा ॥ ३ ॥
सद्गुरु समर्थ सनाथ करी बहु लीला विलास ।
सद्गुण सत्क्रिय आचरुनी पथ दावी जनास ।

सतत सदोदित सज्जन हृदस्थळिं करि जो निवास ।
सर्वैं भाव जडतां वोपी स्वात्वामृत रस ॥ ४ ॥

## ( ४ ) कल्याणांची आरती

भवहरणा सुखकरणा निजस्मरणा वरदा ।
तव चरणाप्रति शरणांगत करुणानिरदा ।
आकळे लीले विग्रह निगमागम वादा ।
स्थावर जंगम जग या नाकळसी भेदा ॥ १ ॥

जय देव जय देव जय जी कल्याणा ।
भावातीतानंता सहजा परिपूर्णा ॥ ध्रु० ॥

हरिहरब्रह्मादिका न कळे पद्महिमा ।
विंशतिशत रसना हि नेणे तंव सीमा ।
कुंठित होय वाचा नाकळवे नेमा ।
पुरुषोत्तम तव कृपे विगळितरूपनामा ॥ २ ॥

श्रीसांप्रदायिक विविध विषय लेखांक ५० यांत श्रीकल्याणस्वामींच्या महंतांची जी यादी दिली आहे तींत पुरुषोत्तमांचें नांव नाहीं. या आरतीचे कर्ते पुरुषोत्तम यांचें नांव नव्यानें आपणांस ऐकूं येत आहे. ते कोठील, कोण, याचा बोध होण्यास मार्ग नाहीं. संशोधनान्तीं केव्हां तरी शोध लागेल, असें मानून स्वस्थ असावें.

श्रीसमर्थशिष्यांत कल्याणांची योग्यता विशेष होती. आतांपर्यंतच्या संशोधनावरून व प्रकाशित ग्रंथावरून हा समज दृढतर झाला आहे. कल्याणांची शिष्यपरंपरा हि मोठी होती. कल्याणांच्या परंपरेंतील जितके मठ अजून हि आढळतात तितके मठ दुसऱ्या कोणा हि शिष्याच्या परंपरेंतील आढळत नाहींत. कल्याणांच्या जेवढ्या शिष्यांचीं नांवें उपलब्ध होतील त्या सर्वांचा पूर्ण शोध केला पाहिजे. आपल्या प्रमाणें च मला हि वाटतें कीं, श्रीसमर्थकृत ग्रंथ व श्रीसमर्थांचें विस्तृत, तत्कालीन व सर्वथैव विश्वसनीय असें चरित्र जर उपलब्ध व्हावयाचें असेल तर तें कल्याणांच्या च परंपरेंत उपलब्ध होईल ! काय आमचें नशीब असेल तें खरें !

[ ८१ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांची शिकवण

## धडा तेरावा

### स्वरूपीं विश्रांतीस जावें

**शिष्या येकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें ।**
**तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ॥ ५-६-५८**

श्रीसमर्थांचे ग्रन्थ, त्यांचीं कागदपत्रें व त्यांचें चरित्र यांच्या सहाय्यानें विद्यमान श्रीसांप्रदायिकांनीं व श्रीसमर्थाभिमानियांनीं आपला चरित्रक्रम ठरविला पाहिजे, वर्तनाचे कांहीं नियम ठरवून आपल्या आचाराविचाराला आळा घातला पाहिजे व अशा नियमबद्ध पांच पंचवीस रामदासांकितांनीं नेमकें धोरण आंखून जुटीनें श्रीसमर्थसेवा आरंभिली तर श्रीसमर्थांना आनंद होईल, इत्यादि शिकवण आपण दहाव्या धड्यांत पाहिली व या शिकवणीचा मूळ पाया म्हणजे **गुरूचे ठायीं अनन्यता** होय, हा हि निश्चय अकराव्या शिकवणींत झाला. प्रश्न असा आहे कीं, श्रीगुरुचरणीं अशी अनन्य भक्ति जडण्यास व दृढावण्यास काय करावें ? त्याचा विचार या शिकवणींत करावयाचा आहे.

श्रीसमर्थ तर सांगतील च, ग्रन्थराजांत नसलेली देखील एकादी गोष्ट जाणावी अशी इच्छा झाल्यास श्रीसमर्थ **अंतरीं च अंतरीं समजावितीं**, असा दासविश्रामधामकर्त्यांचा अनुभव आहे, पण आज मनांत असें येतें कीं, हा प्रश्न श्रीसमर्थशिष्यवर स्वानुभवदिनकरकर्ते तिसगांवमठपति **दिनकरस्वामी** यांना विचारावा, गुरुचरणीं चित्त जडण्यास कोणता उपाय करावा, कोणत्या मार्गानें जावें, ती वाट त्यांना पुसावी. गुरुभक्तिरसाचा केवळ अर्णव असा स्वानुभवदिनकरासारखा अप्रतिम सांप्रदायिक ग्रन्थ दुसरा नाहीं ! प्रस्तुत प्रश्नाचें उत्तर त्या ग्रन्थांत च शोधलें पाहिजे.

गुरूचे ठायीं पूर्ण निष्ठा जडण्यास मुख्य उपाय म्हणजे **सद्गुरुस्वरूपचिंतन** होय. सकाळ संध्याकाळ किंवा स्वतःस अनुकूल अशा वाटेल त्या शांत वेळीं शुद्ध, शुचिर्भूत होऊन, सर्व मनोवृत्ति आवरून धरून, सर्व मनोवृत्तींचा श्रीसद्गुरुचरणीं लय करून, तें एक च तेवढें ध्यान नेत्रापुढें व मनापुढें आणून, ते आणि आपण, सद्गुरु व सच्छिष्य, त्यांचे चरण आणि आ॰

पळें मस्तक, फार तर एवढ्या च द्विपुटीचें स्मरण ठेवून, सद्गुरुस्वरूपाचिंतनांत मग्न होऊन जाण्याचा अभ्यास केला पाहिजे.

सद्गुरूचें लक्षूनि ध्यान । करावें यथाविधी आवाहन ।
देऊनि मंत्रयंत्रोक्त आसन । अर्घ्यविधि करावा ॥ स्वा. दि. ५[१/१८]
निजभावें चरणक्षाळण । करूनि विध्युक्त द्यावें आचमन ।
मधुपर्कादि पूजाविधान । सद्गुरूसी करावें ॥ १९ ॥
देऊनि पीतांबरपरिधान । स्वर्णमंडित यज्ञोपवीतधारण ।
मस्तकीं मुगुट कर्णभूषण- । युक्त कुंडलें घालावीं ॥ २० ॥
कंठीं माळा नवरत्नांचिया । पदक साजिरें येकावळिया ।
नाना परिमळ पुष्पयातींचया । माळा हार झुबुक ॥ २१ ॥
भुजीं केयुरें करीं कडलगें । करांगळीं मुद्रिका संयोगें ।
पवित्रें रामनामांकित अव्यंगें । रत्नखचित सुवर्ण ॥ २२ ॥
कटीं कटसूत्र रत्नखचित । रुणझुणित क्षुद्रघंटान्वित ।
तोडर चरणीं मिरवत । कामकाळावरी ॥ २३ ॥
दिव्यांबराचीं परिधानें । पदरीं झालर मोतियें रत्नें ।
जाळिया गुंफोनि सुमनें । परिधान करावया ॥ २४ ॥
मस्तकीं धरावें येकछत्र । ऊष्णनिवारणार्थ आतपत्र ।
निशाणें पताका व्यजनपत्र । विजनार्थ चामर ॥ २५ ॥
भाळीं केशरगंध रेखूनि चांगलें । वरी कस्तुरी अक्षताबिंदुलें ।
सर्वांगीं धुपेल मर्दूनि चर्चिलें । मळयकृष्णागर ॥ २६ ॥
कर्पूरयेळामिश्रित उदक । धूप दीप खाद्य नैवेद्य संम्यक ।
नाना याती फळें अनेक । समर्पावीं सद्गुरुपुढां ॥ २७ ॥
षड्रसान्वित चतुर्विध अन्नें । सद्गुरूसी देऊनि भोजन ।
नाना परिमळद्रव्यें मिश्रित करून । विडा द्यावा श्रीगुरूसी ॥ २८ ॥
मग पंचारती करूनि वाद्यमेळीं । मस्तकीं समर्पावी पुष्पांजुळी ।
प्रदक्षणा सारूनि बद्धांजुळी । साष्टांगेंसीं दंडवत ॥ २९ ॥
अहो सद्गुरूसी कीजे जो जो उपचार ।
तो थोडा चि गमे मज साचार ।
कां जे शाश्वतासी नाशिवंताचा आभार ।
कायसा तऱ्ही देइजे ॥ ३० ॥
परंतु आपुलिये आवडीची जाती । वाटतसे रिकामेपणाची खंती ।
म्हणौनि नाना उपचारसंपत्तीं । सद्गुरुसमर्थ पुजावा ॥ ३१ ॥

अशा रीतीनें सद्गुरूची यथासांग मनसोक्त पूजा केल्यावर गुरुचरित्रांतील एक एक प्रसंग आठवून त्याचें मनन करण्यांत चित्तवृत्ति इतकी गुंग होऊन जावी कीं, काळाचें मुळीं च भान राहूं नये. मनानें तो तो प्रसंग जणूं प्रत्यक्ष पहावा ! मनाला ती परिस्थिति आणि तो काळ भासावा ! श्रीसमर्थांचे बावीस पिढ्यांच्या पूर्वीचे पूर्वज बेदरप्रांतांतून गंगेच्या दक्षिणतीरीं हिंवऱ्यास कसे आले, तेथें त्यांनीं साठ गांवें कशीं मिळविलीं, गंगेच्या उत्तरतीरीं हिंवऱ्यापासून तीन कोसांवर पड पांढर पडली होती तेथें जांबगांव कसें वसविलें, इत्यादि सर्व पूर्वकथा आठवाव्या, सूर्याजीपंत आणि राणाबाई यांच्या दिव्य मूर्ति आठवून त्यांच्यापुढें लोटांगणें घालावीं, श्रेष्ठांचा जन्मकाळ आठवावा,

**गिरिकंधरें मज आवडतीं । घरें मंदिरें मज नावडतीं ।**
**हनुमानरूपें मी नरवानराकृति । नरनारायण निर्धारें ॥** स. प्र. १–२७ ॥
**मुख्य प्राणनाथ मी सर्वव्यापक । मजला प्रिय येक श्रीरघुनायक ।**
**काय रे उगे चि पाहतां विश्वलोक । रघुनाथस्मरणें करा रे ॥ २८ ॥**
**सर्व माया मिथ्या बाजिगारी । काय तुह्मी हे मानिली आहे खरी ।**
**आत्माराम मी येक सत्य चराचरीं । नित्य शाश्वत निरंजन ॥ २९ ॥**
**मज पुनीत करणें रे श्रीकृष्णातीरा । अखंड व्यापक मी चराचरा ।**
**मज नावडे संसारपसारा । आश्रम सर्व हि श्रमरूप हे ॥ ३१ ॥**
**जय जय राम ह्मणा रे स्वानंदें । आत्मविचार पाहा रे ब्रह्मानंदें ।**
**काय भुललां अहां रे विषयानंदें । परमानंदें गर्जा रे ॥ ३२ ॥**

इत्यादि द्वितीय पुत्राचे वेळीं समर्थमातेला लागलेले डोहळे ऐकावे, टळटळित दुपारां बरोबर श्रीरामजन्मकाळीं स्वयें नारायण समर्थ अवतरले ती वेळ टळूं देऊं नये, जन्मल्यापासून तों वयाच्या अकराव्या वर्षापर्यंतची प्रत्येक वर्षाची नारायणाची मूर्ति आठवावी व बाळलीला पहाव्या आणि ऐकाव्या, त्या अडगळीच्या खोलींतलें तें विश्वाच्या चिंतेंत मग्न झालेलें रूप तर मुळीं च विसंबूं नये, स्वानुभवदिनकराच्या सोळाव्या कलापाच्या चवथ्या किरणांत जो अनुग्रहप्रसंग वर्णिला आहे तो आठविण्यांत किती तरी काळ जावा,

**गौतमीचा उत्तरतीरीं जांबेसी । ग्रामलेखनाधिकार पितयासी ।**
**पिता गोदेसी गेला स्नानासी । तवं नवल वर्तलें मागें ॥ ४६ ॥**
**निजगृहीं असतां नारायण । तवं दूतवेषें आला येक वानरगण ।**

तेणें परम क्लेशीं करून । बाह्य प्रदेशासी नेलें ॥ ४७ ॥
वय तरी वर्षा अकरांचें । परंतु पदरीं जन्मांतरपुण्य साचें ।
योगभ्रष्ट तेणें निजवृत्तीचें । चळण न घडे कदापि ॥ ४८ ॥
दूतें झोले देत बाह्य प्रदेशीं । नेलें तेणें नारायण भयभीत मानसीं ।
होऊनि पाहे तवं दृष्टीसी । अपूर्व कौतुक देखिलें ॥ ४९ ॥
मेघःश्यामरूप क्षत्रीवेषें । सिबिकेमाजीं बैसलीं स्त्रीपुरुषें ।
सभंवतें निजगण यथासंतोषें । उभे असती दोहीं भागीं ॥ ५० ॥
तवं यासी नेऊनि पुढें उभें केलें । पिता कोठें आहे ह्मणोनि पुसिलें
रघुपुतिभाषा वाक्य बोलिलें । आणि वेष हि तैसा चि ॥ ५१ ॥
येणें पितृवर्त्तमान सांगितलें । तवं प्रभूनें जवळीं पाचारिलें ।
मस्तक कुरवाळूनि येक पत्र दिधलें । निजकरें नारायणासी ॥ ५२ ॥
निजमुद्रांकित पत्र करीं लाधतां चि। अवस्था पालटली नारायणाची ।
थरथरां कांपत तेणें सर्वांगाची । वेंगडी वळली ॥ ५३ ॥
वाचा जातसे बेंबळपणें । हांसे रडे नाचे सत्राणें ।
शब्द बोलवेना निर्बळपणें । उगा चि टकमकां पाहतसे ॥ ५४ ॥
आंग कांपतसे थरथरां । विस्मयें दाटलासे सैरा ।
घामेजोनि अति घाबिरा । रडे पडे आक्रंदें ॥ ५५ ॥
क्षणें हांसे क्षणें रडे । उड्या मारी क्षणें पडे ।
इतुकियामाजीं निजनिवाडें । कौतुक देखे निजदृष्टीं ॥ ५६ ॥
तवं मूर्ति देखिली घवघवीत । मेघःश्याम प्रभा लखलखित ।
वामांगीं जानकी शोभत । पाठीसीं सौमित्र भरत ॥ ५७ ॥
तया सेजीं उभा शत्रुघ्न । पुढें उभा वीर हनुमान ।
अकस्मात वांहाटुळी येऊन । इतुकें देखे तत्काळीं ॥ ५८ ॥
ऐसें देखेना जवं अकस्मात । तवं श्रीरामें मस्तकीं ठेऊनि कृपाहस्त ।
महावाक्य उपदेशूनि त्वरित । हनुमंतासी निरविलें ॥ ५९ ॥
ते समई दिग्मंडळ दणाणिलें । तेणें नारायणाचें सर्वांग थरारिलें ।
ह्मणे काय ब्रह्मांड कोसळलें । मजवरी ये काळीं ॥ ६० ॥
ह्मणोनि थरथरां असे कांपत । तेणें दांतखिळी बैसों पाहात ।
सभंवतें टकमकां अवलोकित । तवं भुभुकार देखिला ॥ ६१ ॥
इतुकियामाजीं अकस्मात । विज्जुसारिखें लखलखित ।
निजांगीं दिव्य वस्त्र वेष्टित । सीतनिवारणार्थ ॥ ६२ ॥
वस्त्र रंगाथिलें अति मनोहर । आरक्त शोभा मंडित सुंदर ।
हुर्मुजीसरिखें सपरिकर । दिव्य तेजें विलसे ॥ ६३ ॥

**सव्य करीं पत्र राममुद्रांकित । वाम करीं अर्द्धचंद्र बाण राम देत ।**
**-इतुकियामाजीं तत्काळ जाली गुप्त । राममूर्ति निजांगें ॥ ६४ ॥**
**इतुकें जवं क्षणमात्रें हों न सरे । तवं नारायणासी पडलें अंधारें ।**
**वाचा स्तब्ध होऊनि येक संवत्सरें । निजसमाधीं तटस्त ॥ ६५ ॥**

असें तें तटस्थ ध्यान आपण तटस्थ होऊन सारखें पहात रहावें, नंतर तेथून चित्त काढून लग्नसमारंभासाठीं आसनगांवीं जावें, ब्राह्मणमुखींचे 'सावधान' शब्द ऐकतां च ते निसटले तसें आपण हि त्यांच्या पाठोपाठ गंगेच्या काठां-कांठानें पंचवटीपर्यंत जावें, त्यांच्या बरोबर टाकळीस बारा वर्षें पुरश्चरणांत क्रमावीं, उद्धवमाता सती जावयास आली असतां तिनें जी एकोणवीस वयाची तेजस्वी मूर्ति पाहिली ती आपण हि पहावी, पुरश्चरण संपवून त्यांच्या बरोबर भरतखंडांतील सर्व यात्रा आपण हि कराव्या, परत पैठणास यावें, बरोबर चोवीस वर्षांनीं पुन्हां जांबेस जावें, 'माझा नारोबा आला कीं काय' हे मातुःश्रींच्या तोंडचे शब्द ऐकावे, त्यांनीं ज्या मुखावरून हात फिरविला तें मुख न्याहाळून पहावें, मातुःश्रींना दिव्य दृष्टी देणारें भूत

**सर्वां भूतांचें हृदय । नाम त्याचें रामराय ।**
**रामदास नित्य गाय । तें चि भूत गे माय ॥**

त्या भूताचें आपण हि स्मरण करावें, स्मरण करीत करीत च कृष्णाकांठीं शहापुरास जावें, सतीबाईची परीक्षा पहावी, त्या प्रांतांत सर्वत्र जेथें श्रीस-मर्थ जातील तेथें आपण हि मागोमाग जावें, शहापुरच्या डोंगरांतील दग-डावर बसावें, चंद्रगिरीच्या गुहेंत जावें, कळंब्याची घळ पहावी, मसूरला उत्सवांत असावें, अंगापूरच्या डोहांत उडी मारतांना कंबरेला धरून आपण हि डोहांत जावें, चरेगांवच्या जंगलांत खालीं ठेवलेली मूर्ति कशी उचलत नाहीं तें आपण हि पाहून आपली खात्री करून घ्यावी, मूर्तीची चाफळास स्थापना करतांना आपण संनिध असावें, मंदिर बांधूं लागावें, दऱ्याखोरीं, डोंगर पालथे घालावे, 'जाला समाचार रघुनाथजीस श्रीसमर्थ विदित करीत' तो सुद्धां आपण ऐकावा, शिवराज भेटावयास आले तर आपण तेथें नेमकें हजर असावें, हेळवाकची घळ असो नाहीं तर शिवत-रची असो, अवघड स्थळ असो कीं सोपें असो, आपण त्यांचा पिच्छा सोडूं चि नये, अहोरात्र संनिध असावें, कल्याणादि शिष्य सेवा करीत ती आपण करावी, चंची आणून द्यावी, केळीं सोलून द्यावीं, स्नानाचें पाणी उपसून द्यावें, छाट्या धुवाव्या, वाळत घालाव्या, पाणी भरावें, पूजेची तयारी करावी,

भोजनास बसवावें, प्रसाद ग्रहण करावा, बिछाना घालावा, पाय चेपावे, पाणी आणून द्यावें, पाहतील तिकडे पहावें, जातील तिकडे जावें, ह्मणतील तें करावें, न ह्मणतां च मनोगत जाणून सेवेंत तत्पर असावें, आणि एकांत, निवांत, प्रशांत वेळ पाहून चरणावर जें मस्तक ठेवावें तें ' ऊठ ' ह्मटल्याशिवाय उठूं च नये !

हे सर्व प्रसंग आठवावे, प्रत्यक्ष पहावे, अनुभवावे ! अशा चिंतनांत जाणारा काळ तेवढा च सत्कारणीं लागला, असें समजावें. कोणी अभागी ह्मणतील, काय हा काळाचा अपव्यय, ह्मणोत बिचारे ! पण गुरुभक्त असें च ह्मणेल कीं,

**धन्य तो चि काळ धन्य ते चि वेळ ।**
**अंतरीं दयाळ आठवला ॥ १ ॥**

गुरुचरणाची एकदां गोडी लागली ह्मणजे कोण काय ह्मणेल याची पर्वा वाटेनाशी होते. आपल्या च नादांत असणारा गुरुभक्त इकडे तिकडे पहात च नाहीं ! डोळे असून तो पहात नाहीं, कान असून ऐकत नाहीं आणि तोंड असून बोलत नाहीं !

**माझा गुरु सद्गुरु रामदास । सर्वत्र जो पूर्णपणें उदास ।**
**त्याचे पदीं मी विनटोनि गेलों । आतां पुढें फार कशास बोलों॥**

अशी त्याची वृत्ति बनते. तो मौन धारण करितो. एका दृष्टीनें तो मोठा घमें-डखोर बनतो.

**जन्मांतरीं आह्मीं केलें पुण्य थोर । भेटला उदार गुरुराज ॥६५-१८॥**
**गुरुराजें थोर नवल पैं केलें । मी माझें चोरलें दिल्हें मज ॥ १९ ॥**
**दिल्हें मज माझें स्वरूप ठाईंचें । वोझें अनादीचें उतरिलें ॥ २० ॥**
**उतरिलें ह्मणों तरि जैसें तैसें । असोनियां नसे नवल हें चि ॥ २१ ॥**
**नवल हें चि थोर श्रीगुरुस्वामीचें । उत्तीर्ण तयाचें कोणें होणें ॥ २२ ॥**

या च आपल्या आनंदांत तो चूर असतो ! दुनियेकडे तो पहात नाहीं, पण सहजगत्या त्याची लोकांकडे नजर गेली तर तो गालांतल्या गालांत हंसत असतो. कां हंसत असतो कोण जाणे, आपण केवढे भाग्यवान् ह्मणून त्यास आनंद होत असतो, कां कोण हे अभागी लोक ह्मणून इतरांची त्यास कींव येत असते, कां काय, कांहीं सांगतां येत नाहीं. इतकें खरें कीं, तो आपल्या ठिकाणीं संतुष्ट असा दिसत असतो; असो.

गुरुभक्तीची अशी गोडी लागण्याला कांहीं तरी पूर्व पुण्याई लागते,

ब्रह्मसुखाप्रमाणें गुरुभक्तिप्रेम हि अवर्णनीय असतें. तें कसें असतें हें सांगतां येत नाहीं, असें ह्मणतात. असें सांगतात कीं, त्यापुढें सर्व ऐहिक सुखें फिकी पडतात. इतकी त्याच्यांत काय अपूर्वता आहे हें जरी आपणांस समजलें नाहीं, तरी गुरुभक्तांच्या चेष्टा पाहून गुरुप्रेमांत कांहीं तरी जादु असली पाहिजे खास, असें आपणांस अनुमान होतें. गुरुचरित्रांतील अगदीं सामान्य गोष्टी असतात, पण त्यांचें नुसतें स्मरण गुरुभक्ताचें हृदय प्रेमानें उचंबळून सोडण्यास पुरेसें होतें, असें आपण पहातों. त्यांत काय विशेष असतें कोण जाणे, पण असें होतें खरें. त्याचें रहस्य आपणांस समजणार नाहीं, पण गुरुभक्ताचें मन गुरुभक्त जाणतो. साधूस साधूवेगळा दुसरा जसा कोणी ओळखूं शकत नाहीं, तद्वत् च

**गुरुभक्तास वोळखतो कोण । गुरुभक्तावेगळा ॥ २०-३-२५**

असें ह्मणावयास हरकत नाहीं. हें कसें खरें असतें, तें मनास पटविणारा एके ठिकाणीं एक संवाद ऐकला तो सांगतों. आपले गुरु अमक्या प्रसंगीं अमक्या डोंगरांत अवघड अशा निर्जन स्थळीं एका दगडावर बसले होते, असें ऐकिल्यामुळें एक गुरुभक्त त्या दगडाच्या दर्शनास निघाले असतां त्यांच्या एका स्नेह्यानें त्यांना ह्मटलें कीं, आपण वृथा जीव धोक्यांत कां घालतां, तेथें जाऊन आपण पहाणार तरी काय, एक दगड च ना ! हे येथें पुष्कळ दगड पडले आहेत, ते च पहा ! दोघे निकट स्नेही खरे पण एकाच्या गुरुप्रेमानें भारावलेल्या अंतःकरणाची दुसऱ्याच्या ठणठणित कोरड्या पाषाणवत् मनाला परीक्षा करतां आली नाहीं.

**या सद्गुरूचें कैसें उत्तीर्ण होईजे ।**
**उत्तीर्ण होणें न दिसे ह्मणउनि लाजे ॥ ध्रु० ॥** प. २२२
**सद्भावें जरि तनु मनु धन अर्पिजे ।**
**तरि तें माझें कल्पितां चि भवीं बुडिजे ॥ १ ॥**
**कांहीं अर्पूं जरि देहसंपदा ।**
**तरि निवेदिले देह च्याऱ्ही स्वामीच्या पदा ॥ २ ॥**
**कांहीं दुजेपणें जरि कल्पावें ।**
**भजतां चि सर्व भिन्न पडावें ॥ ३ ॥**
**आतां उगें चि मौन्य धरावें ।**
**ह्मणिजे जणों जालें सर्व स्वभावें ॥ ४ ॥**
दिनकर ह्मणे **नवल पाहिलें ।**
**निःशब्दपणें मौन शब्दासी आलें ॥ ५ ॥**

असे दहा वीस आत्मतृप्त श्रीरामदासांकित गुरुभक्त श्रीसमर्थसेवेचें व्रत पतकरून श्रीचरणीं तन मन धन अर्पण करितील तर श्रीसंप्रदायाचें उज्वल रूप त्वरित प्रगट होईल. या संप्रदायाची दीक्षा घेणारा उत्कट गुरुभक्त पाहिजे, त्याची श्रीचरणीं अनन्य भक्ति पाहिजे, ही तर पहिली मुख्य गोष्ट होय. ती ज्यांनीं हस्तगत केली असे एकनिष्ठ गुरुभक्त **संशोधन, प्रकाशन,** आणि **जीर्णोद्धार** हीं कामें अंगावर घेतील तर आज जें कार्य होत आहे, त्याच्या शतपट अधिक कार्य होईल. नवविधाभक्तीपैकीं कोणत्या हि भक्तिप्रकाराचें जें महत्त्व तें च या तिन्ही कार्यांचें आहे. संशोधन, प्रकाशन आणि जीर्णोद्धार हीं कार्यें श्रीसमर्थांच्या शिकवणीप्रमाणें च, नवविधाभक्तींत येतात. श्रवणकीर्तनादि भक्तींत जो आनंद आहे तो च आनंद संशोधनादि कार्यांत आहे. संशोधनांत सर्वत्रश्रीसमर्थांना पहावें, प्रत्येक मठांत, मठांतील प्रत्येक वाडांत, पोथींत, कागदांच्या तुकड्यांत त्यांचें रूप पहावें, प्रकाशनांत तर त्यांचें स्वरूप ओतप्रोत भरलेलें आहे आणि जीर्णोद्धाराचें कार्य त्यांना अत्यंत प्रिय असल्यामुळें त्यांचा त्या कार्याला पूर्ण आशीर्वाद आहे! तेव्हां हीं सर्व कार्यें सांप्रदायिकांनीं जुटीनें करावयास नकोत काय? धागा तुटून माळेचे मणि जसे विस्कळित व्हावे, तद्वत् महाराष्ट्रांत सर्वत्र विखुरलेले श्रीरामदाससेवक यापुढें एकत्र होऊन श्रीसमर्थकार्जीं आपले देह झिजवून संप्रदायाला धन्य करितील काय?

**गुरु माझी माये गुरु माझी धाये ।**
**गुरुविण काये जाणों आह्मी ॥ ध्रु० ॥**
**आह्मी नेणों कांहीं श्रीगुरुवांचूनि ।**
**सगुणीं निर्गुणीं गुरुनाथ ॥** अ. ११५-१
**गुरुनाथीं सेवा तो चि पैं व्यापार ।**
**होतसे अपार जोडी तेथें ॥ २ ॥**
**जोडियेलें तीर्थ तीर्थां शिरोमणी ।**
**अखंडित धणी गुरुगृहीं ॥ ३ ॥**
**गुरुगृहा जाणें तें चि तीर्थाटण ।**
**तनु मनु अर्पण तें चि दान ॥ ४ ॥**
**दान दिल्हें सर्व गुरुदेवापाईं ।**
दिनकरा **नाहीं दुजा भाव ॥ ५ ॥**

अशा अनन्य भावानें श्रीसमर्थांची सेवा करण्यास कोणी आरंभ करितील काय?

[ ८२ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांचा सुंदर मठ कोणता ?

( १ ) श्रीरामदाससंप्रदायाचें संशोधन पुष्कळ झालें असें कोणाला वाटत असेल तर खुशाल वाटो, पण खरी स्थिति अशी आहे कीं, श्रीसमर्थ-चरित्रांतील किती तरी प्रसंग अजून आपणांस कळावयाचे आहेत व किती तरी कोडीं उलगडावयाचीं आहेत व त्यासाठीं झालें आहे त्यापेक्षां शतपट संशोधन व्हावयास पाहिजे. हे सर्व प्रसंग आणि कोडीं हीं सारखा च महत्त्वाचीं आहेत, कारण श्रीसमर्थचरित्रांतील सर्व च भाग गुरुभक्ताला सारखे प्रिय असणार. परंतु कोणा कोणाला कांहीं कारणांमुळें कांहीं विशिष्ट प्रश्नांचें महत्त्व विशेष वाटत असतें. त्या प्रश्नांचीं उत्तरें आपणांस लवकर मिळावीं म्हणून ते उतावीळ झालेले असतात. पण आपणांस सर्व च प्रश्न सारख्या महत्त्वाचे असल्यामुळें यथावकाश सर्वांचा च विचार करावयाचा आहे, त्यांत त्यांच्या हि प्रश्नांची वेळ केव्हां तरी येणार च आहे; असो.

( २ ) आज एक लहानसा प्रश्न मनांत असा आला आहे कीं, श्रीसमर्थांच्या मठांपैकीं एका मठाला **सुंदर मठ** म्हणत, तर तो सुंदर मठ कोणता ? सुंदर मठ नांवाचा दुसरा कोणता निराळा मठ नसून सुंदर मठ म्हणजे चाफळचा च मठ होय असें मी कित्येक वर्षे समजत होतों.

**परंतु येकवचनी देव येक । जेणें सोडिले देव अनेक ।**
**सेवाहीन मी सेवक । त्याचा म्हणवी ॥ १ ॥**
**समर्थे अंगिकार केला । नाना संकटीं रक्षिला ।**
**त्याचिया अन्नें पिंड वाढविला । जन्मवरी ॥ २ ॥**
**मारुतीसारिखे सेवक । तेथें मी मानवी रंक ।**
**नवल सामर्थ्याचें कौतुक । काये सांगों ॥ ३ ॥**
**समर्थ आणि दीनानाथ । वैभवें समर्थाहून समर्थ ।**
**जेणें माझे मनोरथ । पूर्ण केले ॥ ४ ॥**
**जें जें मनें अभिळासिलें । तें तें समर्थे पुरविलें ।**
**मज दीनास वाढविलें । मर्यादेवेगळें ॥ ५ ॥**
**समर्थानें समर्थ करावें । तरी च समर्थ म्हणवावें ।**
**त्रैलोक्यास पहिलें टाकें सामर्थ्य त्याचें । ६ ॥**

अजिक्य रजनीचर माजले । देव कारागृहीं घातले ।
ह्मणोनी वैकुंठीहून पातले । देव सोडवावया ॥ ७ ॥
देवमात्र जाजावला । ह्मणोनी कैपक्षी पावला ।
भुवनकंटक निर्दाळिला । दशमुख शत्रु ॥ ८ ॥
जिहीं त्रैलोक्य जिंकिलें । त्यास मर्कटाहातीं मारविलें ।
भुवनत्रय आनंदविलें । दाशरथीनें ॥ ९ ॥
देवाचे बंद सोडविले । देव स्वस्थानीं स्थापिले ।
प्राणीमात्र आनंदविले । रामराजें ॥ १० ॥
बिभीषणास दिधली लंका । सुरवराची फिटली शंका ।
समर्थें रामदास रंका । नवाजिले[1] ॥ ११ ॥
सुंदर मूर्ति सुंदर गुण । सुंदर कीर्ति सुंदर लक्षण ।
सुंदर मठीं देव आपण । वास केला ॥ १२ ॥
गिरिकंदरीं सुंदर वन । सुंदर वाहाती जीवन ।
त्यामधें सुंदर भुवन । रघुनाथाचें ॥ १३ ॥
सुंदर पाहोन वास केला । दास संनिध ठेविला ।
अवघा प्रांत चि पावन केला । कृपाळुपणें ॥ १४ ॥
वावी पोखरणी झरे । टांकी विशाळ सुंदरें ।
ठांई ठांई विशाळ मनोहरें । स्थळें निर्मिलीं ॥ १५ ॥
कडे कपाटें दरे दर्कुटें । पाहों जातां भय चि वाटे ।
ऐसे स्थळीं वैभव दाटे । देणें रघुनाथाचें ॥ १६ ॥
अंतर्निष्ठ अखंडध्यानी । संनिध रामवरदायनी ।
विश्वमाता त्रैलोक्यजननी । मूळमाया ॥ १७ ॥

या गोड प्रकरणाकडे वाचकांचें पूर्वी लक्ष गेलें नसेल तर आतां तरी त्यांनीं तें मननपूर्वक वाचावें, अशी प्रार्थना आहे. हें पूर्वी अप्रकाशित असलेलें प्रकरण मालेंतील तिसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत सहजगत्या दिलें तेव्हां, सुंदर मठ ह्मणून चाफळच्या मठाहून भिन्न एकादा मठ असेल, अशी मला शंका हि आली नाहीं. वरील ओव्यांपैकीं १२ ते १५ ओव्यांत जें वर्णन आहे, तें चाफळला लागत नाहीं, असें हि नाहीं. पाहों जातां भय चि वाटे । हें १६ व्या ओवींतलें चरण वाचून शंका यावी व कदाचित् त्यावेळीं आली असली तरी, आज नाहीं पण त्या काळीं भय च वाटावें, अशी कदाचित् त्या वेळची वनश्री असेल, असें मी माझ्या मनाचें समाधान करून घेतलें

1 नावाजिले.

असलें पाहिजे. संनिध रामवरदायनी । या शेवटच्या ओवींतील चरणाकडे मात्र त्या वेळीं जावें तसें लक्ष गेलें नाहीं, हें खरें.

प्रतापगिरीचे ठाईं । आदिशक्ती विराजते ॥

ती रामवरदायनी माता चाफळला कांहीं जवळ नाहीं, हा विचार च त्या वेळीं सुचला नाहीं. सुंदर मठ ह्मणजे चाफळचा मठ असें मनानें घेतल्यामुळें, इतका बारीक विचार करण्याचें कारण च पडलें नाहीं.

(३) सुंदर मठ ह्मणजे चाफळचा मठ नसावा अशी अंधुक शंका प्रथम

समर्थें चाफळअधिष्ठानीं श्रीराम संस्थापिले ।
मग सुंदर मठीं समर्थांचे रहवे जालें ।
नाना गिरिकंधरीं दासविहिरे निर्मिले ।
नाना मठ करविले लोकोद्धारा ॥

ही समर्थप्रतापांतील सातव्या समासाची दुसरी ओवी वाचून आली. चाफळास रामाची स्थापना झाल्यावर समर्थ सुंदर मठीं रहावयास गेले, ह्मणजे सुंदर मठ कोठें दुसरीकडे होता कीं काय, असें नुसतें मनांत आलें.

(४) पुढच्या च समासाची दुसरी ओवी वाचून, आलेली शंका दुणावली. ती ओवी अशी:—

समर्थें सुंदर मठीं गणपति केला ।
दोनी पुरुष सिंधुरवर्ण अर्चिला ।
सकळ प्रांतासी मोहछह दाविला ।
भाद्रपदमासपर्यंत ॥

हल्लींचा महाराष्ट्र समजतो कीं, गणपति-उत्सव विशेष प्रमाणावर आपण सुरू केला, पण श्रीसमर्थांनीं च गणपतिमहोत्सवाचा हि उपक्रम केला होता; असो. ही दोन पुरुष उंचीची गणपतीची मूर्ति चाफळास कोठें नाहीं, कधीं होती असें हि कोठें वर्णन नाहीं व कोणी तसें सांगत हि नाहींत. चाफळमठाहून भिन्न असा सुंदर मठ होय, असें निर्विवाद वाटूं लागले, पण हा सुंदर मठ कोणता हें कांहीं कळेना. खरोखर च तो फार सुंदर असला पाहिजे. चाफळच्या वनश्रीला हि लाजविणारा असा हा सुंदर मठ असला पाहिजे. तेथें पुन्हां श्रीराम, मारुति, गणपति हे असले पाहिजेत. मठाच्या जवळपास

बावी पोखरणी झरे । टांकी विशाळ सुंदरें ॥

असलीं पाहिजेत.

अजिंक्य रजनीचर माजले । देव कारागृहीं घातले ।
ह्मणोनी वैकुंठीहून पातले । देव सोडवावया ॥ ७ ॥
देवमात्र जाजावला । ह्मणोनी कैपक्षी पावला ।
भुवनकंटक निर्दाळिला । दशमुख शत्रु ॥ ८ ॥
जिहीं त्रैलोक्य जिंकिलें । त्यास मर्कटाहातीं मारविलें ।
भुवनत्रय आनंदविलें । दाशरथीनें ॥ ९ ॥
देवाचे बंद सोडविले । देव स्वस्थानीं स्थापिले ।
प्राणिमात्र आनंदविले । रामराजें ॥ १० ॥
बिभीषणास दिधली लंका । सुरवराची फिटली शंका ।
समर्थें रामदास रंका । नवाजिले[1] ॥ ११ ॥
सुंदर मूर्ति सुंदर गुण । सुंदर कीर्ति सुंदर लक्षण ।
सुंदर मठीं देव आपण । वास केला ॥ १२ ॥
गिरिकंदरीं सुंदर वन । सुंदर वाहाती जीवन ।
त्यामधें सुंदर भुवन । रघुनाथाचें ॥ १३ ॥
सुंदर पाहोन वास केला । दास संनिध ठेविला ।
अवघा प्रांत चि पावन केला । कृपाळुपणें ॥ १४ ॥
बावी पोखरणी झरे । टांकी विशाळ सुंदरें ।
ठाईं ठाईं विशाळ मनोहरें । स्थळें निर्मिलीं ॥ १५ ॥
कडे कपाटें दरे दर्कुटें । पाहों जातां भय चि वाटे ।
ऐसे स्थळीं वैभव दाटे । देणें रघुनाथाचें ॥ १६ ॥
अंतर्निष्ठ अखंडध्यानी । संनिध रामवरदायनी ।
विश्वमाता त्रैलोक्यजननी । मूळमाया ॥ १७ ॥

या गोड प्रकरणाकडे वाचकांचें पूर्वी लक्ष गेलें नसेल तर आतां तरी त्यांनीं तें मननपूर्वक वाचावें, अशी प्रार्थना आहे. हें पूर्वी अप्रकाशित असलेलें प्रकरण मालेंतील तिसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत सहजगत्या दिलें तेव्हां, सुंदर मठ ह्मणून चाफळच्या मठाहून भिन्न एकादा मठ असेल, अशी मला शंका हि आली नाहीं. वरील ओव्यापैकीं १२ ते १५ ओव्यांत जें वर्णन आहे, तें चाफळला लागत नाहीं, असें हि नाहीं. पाहों जातां भय चि वाटे । हें १६ व्या ओवींतलें चरण वाचून शंका यावी व कदाचित् त्यावेळीं आली असली तरी, आज नाहीं पण त्या काळीं भय च वाटावें, अशी कदाचित् त्या वेळची वनश्री असेल, असें मी माझ्या मनाचें समाधान करून घेतलें

1 नावाजिले.

असलें पाहिजे. संनिध रामवरदायनी । या शेवटच्या ओवींतील चरणाकडे मात्र त्या वेळीं जावें तसें लक्ष गेलें नाहीं, हें खरें.

प्रतापगिरीचे ठाईं । आदिशक्ति विराजते ॥

ती रामवरदायनी माता चाफळला कांहीं जवळ नाहीं, हा विचार च त्या वेळीं सुचला नाहीं. सुंदर मठ म्हणजे चाफळचा मठ असें मनानें घेतल्यामुळें, इतका बारीक विचार करण्याचें कारण च पडलें नाहीं.

(३) सुंदर मठ म्हणजे चाफळचा मठ नसावा अशी अंधुक शंका प्रथम

समर्थें चाफळअधिष्ठानीं श्रीराम संस्थापिले ।
मग सुंदर मठीं समर्थांचे रहवे जालें ।
नाना गिरिकंधरीं दासविहिरे निर्मिले ।
नाना मठ करविले लोकोद्धारा ॥

ही समर्थप्रतापांतील सातव्या समासाची दुसरी ओवी वाचून आली. चाफळास रामाची स्थापना झाल्यावर समर्थ सुंदर मठीं रहावयास गेले, म्हणजे सुंदर मठ कोठें दुसरीकडे होता कीं काय, असें नुसतें मनांत आलें.

(४) पुढच्या च समासाची दुसरी ओवी वाचून, आलेली शंका दुणावली. ती ओवी अशी:—

समर्थें सुंदर मठीं गणपति केला ।
दोनी पुरुष सिंधुरवर्ण अर्चिला ।
सकळ प्रांतासी मोहछह दाविला ।
भाद्रपदमासपर्यंत ॥

हल्लींचा महाराष्ट्र समजतो कीं, गणपति-उत्सव विशेष प्रमाणावर आपण सुरू केला, पण श्रीसमर्थांनीं च गणपतिमहोत्सवाचा हि उपक्रम केला होता; असो. ही दोन पुरुष उंचीची गणपतीची मूर्ति चाफळास कोठें नाहीं, कधीं होती असें हि कोठें वर्णन नाहीं व कोणी तसें सांगत हि नाहींत. चाफळमठाहून भिन्न असा सुंदर मठ होय, असें निर्विवाद वाटूं लागले, पण हा सुंदर मठ कोणता हें कांहीं कळेना. खरोखर च तो फार सुंदर असला पाहिजे. चाफळच्या वनश्रीला हि लाजविणारा असा हा सुंदर मठ असला पाहिजे. तेथें पुन्हां श्रीराम, मारुति, गणपति हे असले पाहिजेत. मठाच्या जवळपा स

बावी पोखरणी झरे । टांकी विशाळ सुंदरें ॥

असलीं पाहिजेत.

कडे कपारें दरे दर्कुटें । पाहों जातां भय चि वाटे ॥

असें तें स्थळ असलें पाहिजे. प्रतापगडच्या जवळपास कोठें तरी हें रम्य ठिकाण असावें.

(५) असें हें रम्य स्थान कोणतें? हा सुंदर मठ कोणता? या प्रश्नाचें उत्तर कागदपत्रांच्या नवव्या भागानें दिलें. लेखांक २६ हें खरोखर च फार महत्त्वाचें पत्र आहे. तें दत्ताजी त्रिमलांनीं दिवाकरांना लिहिलेलें आहे. त्यांत शिवसमर्थांच्या भेटीचा एक मोठा चमत्कारिक प्रसंग दिलेला आहे. दत्ताजीपंत लिहितात:—

> राजश्री छत्रपती यजमान कर्नाटकातून स्वारी करून श्री रामदासस्वामींच्या दर्शनास सज्जनगडासी आले ते समई श्रीस प्रार्थनायुक्त विनंति केली की श्री नी पूर्वी बिरवाडीचे मुकामी श्री सिवथरी प्रांती असतां मधे माहानदी माहापूर आणी अकस्मात रात्री पलंगापासी येऊन चमत्काररूपे दर्शन दिल्हे कितेक चित्तीं होतें ते चि आसीर्वाद दिल्हे दुसरे दिवसी सिवथर प्रांतीं सुंदर मठी भेटी जाली

(६) सुंदर मठ ह्मणजे शिवतरचा मठ याविषयीं आतां शंका उरत नाहीं. आज हि तें स्थान अत्यन्त रमणीय आहे, मग त्या वेळीं तर त्याचा सुंदरपणा अवर्णनीय असला पाहिजे. सुंदर मठ ह्मणजे शिवतरचा मठ ही कल्पना होण्यापूर्वी च या मठाचें आपण मागें जें एका लेखांकांत वर्णन केलें आहे, त्यांत त्यास आपण पृथ्वीवरील स्वर्ग ह्मटलें आहे, इतकी त्याची अनुपम रमणीयता आहे. पण, समर्थ हि ज्या मठाला सुंदर ह्मणत त्याची आज काय दशा झाली आहे! तो काळ हि गेला व रायगडच्या सांनिध्यामुळें जें महत्त्व आलें होतें तें स्थानमाहात्म्य हि उरलें नाहीं आणि आतां कोणाला जरूर हि राहिली नाहीं. कालमहिमा गेला, स्थानमाहात्म्य उरलें नाहीं व महंतपणाचें सामर्थ्य कोणांत नाहीं! मग दुर्दशा न होईल तर दुसरें काय होईल?

(७) शिवतर हें स्थान श्रीसमर्थांना हि फार प्रिय होतें, असें दिसतें. तेथें त्यांचा रहिवास पुष्कळ होत होता. आपणांस याची पूर्वी कल्पना नव्हती. बखरींत या स्थानाचा कोठें उल्लेख नाहीं.

**मग सुंदर मठीं समर्थांचे रहवे जालें ।**

असें प्रतापांत गिरिधर ह्मणतात आणि शक १५९७ व १५९८ या दोन सालांत श्रीसमर्थ शिवतरीं रहात होते ही गोष्ट कागदपत्रांवरून हि सिद्ध होत आहे. कागदपत्रांतील लेखांक १५ व १६ हीं श्रीशिवछत्रपतींचीं महिपतगडच्या व सज्जनगडच्या हवालदारांना आज्ञापत्रें आहेत, त्यांत छत्रपती ह्मणतात "**श्री रामदास गोसावी सिवतरीं राहताती.**"

( ८ ) चरित्रग्रन्थांतील माहितीला कागदपत्रांचें प्रत्यन्तर मिळालें किंवा कागदपत्रांवरून सिद्ध होणारी गोष्ट चरित्रग्रन्थांत हि दिलेली आढळली ह्मणजे श्री चरित्राचें चिंतन करणाऱ्याच्या मनाला जो आनंद होत असतो तो अवर्णनीय होय. लेखांक २६ तील वर जो थोडासा उतारा आला आहे त्यावरून असें दिसतें कीं, एकदा श्रीशिवछत्रपति **बीरवाडीस** होते व श्रीसमर्थ **शिवतरीं** होते, बीरवाडी व शिवतर यांच्या मध्यें जी नदी आहे तिला महापूर आला होता, असें असतां श्रीसमर्थ एकाएकीं रात्रीं शिवराज निजले होते तेथें पलंगापाशीं प्रगट झाले व छत्रपतींच्या चित्तांत होते ते च नेमके मनोरथ पूर्ण होतील ह्मणून आसीर्वाद देऊन अदृश्य झाले आणि मग दुसरे दिवशीं उभयतांची शिवतरीं प्रत्यक्ष भेट झाली. ही जी तत्कालीन कागदपत्रांतील माहिती तिला समर्थप्रतापांत बरोबर प्रत्यन्तर आढळतें.

**शिवराजें शिवतरीं चमत्कार देखिले ।**
**करतळस्फोटक स्मरणें तात्काळ शमले ।**
**स्वप्नीं समर्थ प्रसाद देऊनि गेले ।**
**महा नदी उतरूनियां** ॥ स. प्र. ३–६५

या ओवींत ज्या प्रसंगाचा उल्लेख केला आहे तो च प्रसंग २६ व्या लेखांकांत वर्णिलेला होय, याविषयीं कांहीं तरी शंका वाटते काय ?

( ९ ) प्रसंग फार महत्त्वाचा आहे. गुरुभक्तांचीं मनें त्यानें उल्हसित होणार आहेत. श्रीसमर्थप्रतापासारख्या अत्यन्त विश्वसनीय चरित्रग्रन्थांत त्याचें वर्णन आलें असून तत्कालीन कागदपत्रांनीं त्याची यथार्थता सिद्ध झाली आहे. त्याच्या सत्यतेविषयीं शंका घेण्याला कांहीं कारण नाहीं, आणि ह्मणून च सांप्रदायिकांना आशा करण्याला जागा झाली आहे. प्रत्यक्ष

श्रीशिवछत्रपतींनीं ती घडलेली गोष्ट स्वमुखें दत्ताजीपंतास सांगितली ! तरी हि तिजविषयीं शंका घेण्या इतका कोण पापी असेल ! प्रसंग खरा आहे; त्याचा अर्थ लावण्यांत चिकित्सक मनानें वाटेल तेवढें कौशल्य लढवावें ! इतकी गोष्ट निर्विवाद आहे कीं, एकदा छत्रपती बीरवाडीस असून श्रीसमर्थ शिवतरीं होते व मध्यें महानदीस महापूर आला असतां श्रीसमर्थांनीं एका-एकीं रात्रीं छत्रपतींना चमत्काररूपें दर्शन दिलें ! या वर्णनावरून इतकें उघड होत आहे कीं, श्रीसमर्थांचा स्थूल देह एका ठिकाणीं राहून अनेक ठिकाणीं प्रगट होई. आतां वरुणगांवची ती गोष्ट खरी मानल्यावांचून कोठें सोय आहे ?

ऐका कोण्ही येक कृष्णातीरीं वरुणग्रामीं ।
समर्थ पातले सद्गुरुस्वामी ।
आतां आमंत्रणें सांगों आह्मी तुह्मी ।
प्रीतिभांडणें सकळांचीं ॥ स. प्र. १४-२९

समस्तांची येक अवस्था ।
समस्तांची येक आस्था ।
आतां कैसी करावी व्यवस्था ।
समर्थस्वामी विचारिती ॥ ३० ॥

आज्ञा घरींचीं आमंत्रणें घेतलीं ।
येकाचीं येकासी कळों नाहीं दिधलीं ।
घरोघरीं पुणें वणें घातलीं ।
बोलावणीं आलीं मागें पुढें ॥ ३१ ॥

समर्थें येका दुबळ्या भक्तासी लाभ दिधले ।
तक्र आंबिल जेऊनि स्वानंदें बैसले ।
इकडे घरोघरीं आज्ञा ठाईं गेले ।
श्रीहनुमानस्वामी समर्थ ॥ ३२ ॥

ज्या त्यासी वाटे समर्थ आपुले घरीं ।
येकांतभोजनें सारिती बरीं ।
तांबुल घेताती मंचकावरी ।
सुमनशैय्या पादसंव्हनें ॥ ३३ ॥

मुख्य प्राणनाथ निधान ।
समर्थस्वामीचें रूप महिमान ।

**भाविकासी भावासारिखा देव फळद्रूप आपण ।**
**संकल्प विकल्प जाण न धरावा ॥ ३४ ॥**

श्रीसमर्थांच्या अनिरुद्ध संचाराला जेथें स्थल मर्यादा घालूं शकत नाहीं, तेथें कालाची तरी कितपत आडकांठी असूं शकणार ? प्रत्यक्ष एका घरीं असून जर ते अनेकांच्या घरीं जात, तर ते १५४० त मात्र होते आणि आतां १८४० त नाहींत, असें कोणत्या तोंडानें ह्मणावें ? १८४० त हि दुबळ्या भक्ताचे कोड पुरविण्याला त्यांना काय प्रत्यवाय आहे? प्रत्यवाय त्यांना नाहीं, हरकत आह्मा पाप्यांची आहे ! त्यांचे कडून ना नाहीं, ना आमची आहे ! ते अधीर झालेले आहेत, आमच्या च ठिकाणीं दर्शनेच्छा तितकी तीव्र उत्पन्न झाली नाहीं ! काय करावें !

**येथें बोल नाहीं सद्गुरूसी ।**
**हें अवघें आपणापासीं ॥**

तो आपल्या वरचा शब्द उडण्याची कधीं तरी वेळ येईल काय ?

( १० ) सरते शेवटीं, आणखी एका श्रीसमर्थकृत अप्रकाशित प्रकारणांत सुंदर मठाचा उल्लेख आला आहे, तें प्रकरण देऊन हा लेख संपवूं. तें प्रकरण टांकळीमठांतील ११ व्या बाडांत व डोमगांवमठांतील १४ व्या बाडांत आढळलें.

॥ श्रीराम ॥

**यथायोग्य घालावें वय । अन्वय प्रसंग चुको चि नय ।**
**स्थूळ स्थूळ सूक्ष्माचें कार्य । चमत्कारें ॥ १ ॥**
**सूक्ष्में स्थूळ राखावें । उभय भागें मिळोनि जावें ।**
**तरी च भक्त ह्मणवावें । कांहीं येक ॥ २ ॥**
**क्षणा भक्त क्षणा अभक्त । क्षणा वेक्त क्षणा अवेक्त ।**
**क्षणा शक्त क्षणा अशक्त । हें तों बाश्कळ ॥ ३ ॥**
**वायकोळ वायकोळ । कळकळ कळकळ ।**
**भेदाभेद चळवळ । निरंतर ॥ ४ ॥**
**निरंतर आंतरला । चेवोनि मागुता चेवला ।**
**आवघा गलबला चि केला । आयुष्याचा ॥ ५ ॥**
**येकें येकासी सेविलें । येकें येकासी अभिळासिलें ।**
**येकें येकासी दृढ धारिलें । सावकास ॥ ६ ॥**
**येकें येकासी केलें सख्य । येकें येकासी दिलें सौख्य ।**
**येकें येकासी दिधलें मुख्य । वंचिलें नाहीं ॥ ७ ॥**

ऐसा आंतर स्नेह बळकट । अखंड लागोनि गेली चट ।
विचारें तरी आंतरपट । उडोनि गेला ॥ ८ ॥
कळहो होऊनि तुटला । आनंद आनंदीं मिसळला ।
नुस्ता भक्त चि उरला । देव कोठें ॥ ९ ॥
हद जाली सीमा जाली । प्रचित प्रचीतीसी आली ।
कैसी.आनंदवेळ वाहिली । सुंदर मठीं ॥ १० ॥
दोनी मठ येक चि जाले । दोनीं मठीं येक चि चाले ।
मननसीळ निवाले । येणें शब्दें ॥ ११ ॥
भक्ती सकळांसी आहे मान्य । आंतरनिष्ठ परम धन्य ।
दास ह्मणे अनन्य । कोणासी असो ॥ १२ ॥

प्रपंच हा स्थूल आहे व परमार्थ सूक्ष्म होय, मनुष्यानें विचार करून प्रपंच आणि परमार्थ हीं दोन्हीं चालवावीं, तर च स्वतःस विवेकी ह्मणवावें, नाहीं पेक्षां क्षणांत केवळ परमार्थाच्या गोष्टी करावयाच्या तर दुसऱ्या क्षणांत प्रपंचाच्या भाराखालीं अगदीं दडपून जावयाचें, हें शुद्ध बाष्कळपणाचें लक्षण होय, घटकेंत व्यर्थ बडबड करावयाची तर घटकेंत मोठी कळकळ दाखवावयाची, घटकेंत हातपाय गाळून थंड होऊन पडावयाचे तर पुन्हां घटकेंत गरम होऊन उद्योगास लागण्याचा आविर्भाव आणावयाचा, ह्मणजे आयुष्याचा नुसता खेळखंडोबा होय. मनुष्याला कांहीं तरी एक धोरण पाहिजे, कोठें तरी त्याचा दृढ भाव असावा, कोणावर तरी विश्वास लागतो, कशावर तरी निस्सीम प्रेम पाहिजे, तर च त्याच्या हातून कांहीं लोकोत्तर कार्य होईल. अशी एकनिष्ठ, कर्तृत्ववान्, अनुभवी मंडळी श्रीसमर्थांच्या निशाणाखालीं सुंदर मठीं जमली होती, ह्मणून त्यांच्या हातून पराकाष्ठेचे भगीरथ उद्योग झाले ! त्या काळीं राजकारण आणि धर्मकारण, रायगडची शक्ति आणि शिवतरची युक्ति एक झालीं होतीं, धर्म आणि राज्य हीं वेगळीं न राहतां त्यांचा समास झाला होता, चहुंकडे धर्मराज्य झालें होतें. प्रपंच हा असा करावा आणि परमार्थ हा असा चालवावा, अशी भक्ति असावी, भक्ति तर सर्वमान्य आहे च, पण ज्ञानाची कोटी कांहीं विशेष होय.

( ११ ) अशी या बारा ओंव्यांची गोळाबेरीज आहे. ती जर बरोबर असेल तर, त्या काळीं महाराष्ट्रानें

कैसी आनंदवेळ वाहिली । सुंदर मठीं ॥

य ची वाचकांनीं कल्पना च करावी .

[ ८३ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांचे शिवराम

आपणा सर्वांस पूर्वीपासून माहीत असलेले शिवराम एक च. ते मोगलाईतील कल्याणी येथील **पूर्णानंदांचे शिवराम** होत. कल्याणीस त्यांचा कवितासंग्रह इतका आहे कीं, त्यापैकीं एक दशांश सुद्धां छापला गेला नाहीं! नंतर अलिकडे रामदासी संशोधनापासून ठाऊक झालेले दुसरे शिवराम ह्मणजे **कल्याणांचे शिष्य** आपचंदमठपति शिवराम होत. आतांपर्यंत प्रकाशित झालेल्या श्रीसांप्रदायिक वाङ्मयावरून त्यांचा हि थोडा फार परिचय अलिकडे झाला आहे. आज वाचकांस तिसऱ्या शिवरामांची ओळख करून द्यावयाची आहे. हे तिसरे शिवराम ह्मणजे खुद्द **श्रीसमर्थांचे शिष्य** होत.

दुसऱ्या कांहीं कारणानें, इंदुरबोधनमठांतील चवथें बाड वाचीत असतां त्यांत एक डफगाणें आढळलें. हें चवथें बाड फार महत्वाचें आहे. तें माझ्या पदरीं अनायासें पडलें, पण त्यासाठीं कांहीं हि, अर्थात् मला देतां आलें असतें इतकें, द्रव्य पडलें असतें तरी तें मी मोठ्या आनंदानें दिलें असतें, इतकें तें बाड महत्वाचें व मला प्रिय असें आहे. याचें कारण इतकें च कीं तें सबंध बाड **श्रीसमर्थशिष्य उद्धव** यांच्या हातचें आहे, असें माझ्या मनानें ठरविलें आहे व त्यांत श्रीसमर्थांची अप्रकाशित अशी किती तरी कविता आहे ! वर द्रव्याचा उल्लेख केला, पण तो नसता केला तरी चाललें असतें. द्रव्य कितीसें पुरें पडत असते ? द्रव्यानें साधत नाहीं तें दुसऱ्या कशानें तरी होतें, तेव्हां द्रव्याची कथा कशास हवी ! असो. प्रस्तुत तें डफगाणें वाचून मनांत असें आलें कीं, हे शिवराम श्रीसमर्थांचे शिष्य असावेत. आधीं तें गाणें ऐका आणि आपणांस हि मजप्रमाणें वाटतें कीं नाहीं, तें सांगा.

इंदुरबोधन ] ( १ ) डफगाणें [ बाड ४

**देवें लग्न केलें नाहीं । ह्मणउनी पोर जालें नाहीं ।**
**पोराचें हि लग्न नाहीं । ह्मणउनी बरें ॥ १ ॥**

पोर होउनी मेलें नाहीं । सुन होउनी मेली नाहीं ।
तीसी पोर जालें नाहीं । ह्मणउनी बरें ॥ २ ॥
आणी कन्या ते हि नाहीं । अथवा विधवा जाली नाहीं
तिला पोर जालें नाहीं । ह्मणउनी बरें ॥ ३ ॥
पोराला हि पोर नाहीं । पोरासाठीं कर्ज नाहीं ।
कर्जासाठीं व्याज नाहीं । ह्मणउनी बरें ॥ ४ ॥
व्याजासाठीं दिवाण[1] नाहीं । दिवाणाचा दंड नाहीं ।
दंडासाठीं मालें[2] नाहीं । ह्मणउनी बरें ॥ ५ ॥
माल्यासाठीं विदेश नाहीं । दांत विचकणें हि नाहीं ।
करुनी द्या हो कांहीं नाहीं । ह्मणउनी बरें ॥ ६ ॥
मागण्यासाठीं येंठील[3] नाहीं । ह्मणउनी प्राण देणें नाहीं ।
येकासाठीं येक नाहीं । ह्मणउनी बरें ॥ ७ ॥

इतकें गाणें झाल्यावर शिवरामांना एकदम सद्गुरूंची आठवण झाली.

योगी सर्वस्वें मोकळा । पाहातां त्याची अकळ कळा ।
पाहातां दुनियाहुनी निराळा । सर्वस्वेंसी ॥ ८ ॥
धन्य धन्य माहापुरुष । ते चि ईश्वराचे अंश ।
शुकासारिखे उदास । ह्मणती त्यांसी ॥ ९ ॥

नाहीं पेक्षां हें वर्णन दुसऱ्या कोणाला लागतें ?

शिवरामाला तारिलें । जन्मापासुनी मुक्त केलें ।
भक्त लोक मुक्त केले । रामराजें ॥ १० ॥

रामदासें असतें ह्मणजे शंका च राहिली नसती.

वर रघुनाथाचा खरा । पुन्हां जन्म नाहीं खरा ।
सारासार विचार बरा । याकारणें ॥ ११ ॥
उदासीनतेचें धेंमशांन[4] । ऐसें करूं शके कोण ।
दया जगदीशाची पूर्ण । तरी च होये ॥ १२ ॥
दया दास्यत्वें घडते । दास्यीं बुधी च अडते ।
तरी ते कैसी सांपडते । ईश्वरकृपा ॥ १३ ॥

---

१ दिवाणी दाव्यांचा निकाल करणारे सरकारी अधिकारी. २ एखाद्याला दंड झाला असतां तो देण्यासाठीं किंवा एकाद्याचा नातेवाईक तुरुंगांत पडला असतां तो सोडविण्यासाठीं, किंवा जप्त झालेली जमीन जप्तींतून खुली करण्यासाठीं, खांद्यावर नांगर टाकून आपलें गाऱ्हाणें सांगत खेडोपाडीं जी भीक मागावयाची तिला मालें ह्मणतात. ३ ओशाळवाणें. ४ लयलूट.

**देवी कृपा संपादणें । विश्वलोकीं धन्य होणें ।**
**ऐसें** शिवराम ह्मणे । **प्रचीतीनें** ॥ १४ ॥

हें गाणें वाचून, तुह्मांस नाहीं वाटत हे शिवराम श्रीसमर्थांचे शिष्य असावेत ? मला तसें वाटलें, ह्मणून प्रत्यंतरासाठीं **श्रीसमर्थप्रताप** हातीं घेतला. कांहीं कोठें आडलें, कांहीं मनांत आलें, ह्मणजे **प्रतापाची** कांस धरावी. त्यानें मनाची समजूत केली नाहीं, असें सहसा होत नाहीं. कितीदां त्या ग्रन्थाची थोरवी वर्णन करून सांगावी ! वाचकांना कंटाळा यावयाचा. दुसऱ्या कोणत्या हि चरित्रग्रन्थांत श्रीसमर्थांचें स्वरूप इतकें प्रतिबिंबित झालेलें नाहीं ! संशोधनकार्यांत दुसऱ्या कोणत्या हि चरित्रग्रन्थाची इतकी मदत झाली नाहीं ! खुद्द श्रीसमर्थग्रन्थांची गोष्ट च वेगळी, पण ते वगळले तर सर्व रामदासी ग्रन्थमालेंत इतका अप्रतिम दुसरा ग्रन्थ नाहीं ! मी या ग्रन्थाची वारंवार ही काय स्तुति करीत असतो, तें पाहण्यासाठीं तरी निदान प्रत्येकानें एकवार **श्रीसमर्थप्रताप** ग्रन्थ वाचावा, अशी माझी प्रार्थना आहे. डफगाणें वाचून शिवराम हे श्रीसमर्थांचे शिष्य दिसतात तें खरें काय, ह्मणून **प्रतापास** विचारिलें आणि **प्रतापानें** लागलीं च सांगितलें

**शिवराम नामा समर्थसंगें । कितेक दिवस अंतरंगें ।**
**पुढें पुढें जगदोद्धारणप्रसंगें । तेलंगणप्रांते आज्ञापिला** ॥स.प्र.$\frac{१०}{६९}$

इदुरबोधन तरी तेलंगणांत च मोडतें, तेव्हां इंदुरबोधनमठांतील बाडांत शिवरामांचें गाणें सांपडावें, हें ठीक च होय.

शिवराम हे श्रीसमर्थशिष्य होत, त्यांचें च हें डफगाणें, पुष्कळ वर्षें ते श्रीसमर्थांच्या जवळ च होते व शेवटीं शेवटीं त्यांच्या आज्ञेवरून ते तेलंगणप्रांतांत जगदुद्धारार्थ संचार करिते झाले, इतकें ठरलें. चवथ्या बाडांत त्यांचें जसें एक डफगाणें आढळलें, तशी त्यांची आणखी कांहीं कविता इंदुरबोधनमठांतील इतर बाडांत असावी व पूर्वीं जी कांहीं कविता पूर्णानंदांच्या शिवरामांची ह्मणून कदाचित् वाटली असेल ती यांची च असेल, अशा विचार मनांत येऊन त्या दृष्टीनें पुन्हां येकवार मठांतील बाडें चाळलीं त्यांत शिवरामांचीं पदपदांतरें वगैरे एकोणविस आढळलीं. तीं येथें उतरून न घ्यावीं तर पुन्हां त्यांचा योग केव्हां येणार आहे, अशी शंका मनांत येऊन, वाचकांना काय वाटेल याचा फारसा विचार न करितां, तीं सर्व पदें येथें

---

१ प्रतीतीवांचून बोलावयाचें नाहीं हा तर मुख्य रामदासी बाणा च दिसतो.

देण्याचें ठरविलें आहे. वाचकांनीं क्षमा केली पाहिजे. इफगाणें धरून एकंदर वीस पदें झालीं. पुढील पदांचीं नांवें मी ठरविलीं आहेत.

इंदुरबोधन ] **( २ ) वाईट संगति** [ बाड २५

ढसंगणांमधें[1] राहे । त्यासी ते चि येत आहे ।
अबध फार वाणी । कांहीं केल्या न जाये ।
उधट शब्द तोंडीं । क्षणंक्षणां येत आहे ।
इंद्रियस्मरणं ते । फार उच्चारीत जाये ॥ १ ॥ ध्रु० ॥
ऐसीयाचा संग खोटा । स्वहितासी येतो तोटा ।
मिळेना कांहीं पोटा । संगें होतो करंटा ॥ १ ॥
हात हि खरकटे । पाये ते हि खरकटे ।
नाक हि खरकटें । डोळे ते हि खरकटे ।
तोंड हि खरकटें । वोंठ ते हि खरकटे ।
जीभ हि खरकटी । दात ते हि खरकटे ॥ २ ॥
मांड्या हि खरकट्या । पोटऱ्या हि खरकट्या ।
खातो हि वुरशानें । रोट्या चावी मोठ्या मोठ्या ।
आंबील वरपतां । मिशा होती खरकट्या ।
कांदे हि कचकावी । दाढी हाले हनुवट्या ॥ ३ ॥
आंग हि खरकटें । पाठी पोट खरकटे ।
दंड हि खरकटे । केस ते हि खरकटे ।
अपान खरकटें । पुढील हि खरकटें ।
नेसतें लंगोटें हि । बहुत चि खरकटें ॥ ४ ॥
संगतीची अंगलगे[2] ते हि सर्व खरकटी ।
पाहा हो तेणें गुणें ढुंगी लागली लंगोटी ।
लाविल्या लागेना हो दीक्षा त हि गोमटी ।
घुसीनें उकररिलें जेथें तेथें धुळी मोठी ॥ ५ ॥
शिवरामा आवडेना ऐसा संग वोंगळु ।
शिकविले नायेके चि कांहीं भिजेना खळु ।
बुधी त्याची धड नाहीं जैसा कांद्याचा नळु ।
प्रत्ययें पाहों जातां वास येतो वोंगळु ॥ ६ ॥

---

१ चांडाळचौकडींत. २ स्नेही, आश्रित, वगैरे.

### इंदुरबोधन ] ( ३ ) यमयातना [ बाड २४

कां रे रिकामा ध्यासील कामा। चिंतिसी रामा पुरवी कामा॥
कां कां कां तां कां ऐसें केलें ॥ ध्रु ॥
येमाचामा होसील नेमा। जाचिती सीमा सांडुनी कीं मा ॥२॥
यातना नाना कंपिति जाणा। तेव्हां आणा वाहासी कोणा ॥३॥
तप्तगोळ देती शूळ। कवच खोळ सर्वांग ज्वाळ ॥ ४ ॥
शस्त्राचे मार तेथें अपार। तेणें विदार होतें शरीर ॥ ५ ॥
अक्षोभ नर्क तेथ संपर्क। तुझा अचुक तेव्हां तूं रंक ॥ ६ ॥
हस्ति येवढे तेथील किडे। तुझे तुकडे करिती रोकडे ॥ ७ ॥
गीध घारी माहामारी। काकफेरी दंश भारी ॥ ८ ॥
कांहीं गांठी पुण्यकोटी। येम भेटी चुकति मिठी ॥ ९ ॥
शिवरामाचा स्वामी साचा। तो तूं वाचा आणिसी ना कां॥१०॥

### इंदुरबोधन ] ( ४ ) अल्पासाठीं भांडण [ बाड २५

जाईजणे वस्तीसाठी झोंबी घ्यावी। फजिती करावी आपुली ही॥
आपुली फजिती जनाचें हि हांसें। करावें काईसें अल्पासाठीं॥२॥
अल्पासाठीं कळहो कां हो माजवावा। तंटा का करावा लोकामधें
लोकामधें भंड उभंड चि होतें। मग चर्फडितें मनामध्यें ॥ ४ ॥
मनामधें पहिलें चि समजावें। शिवराम भावें सांगतसे ॥ ५ ॥

### इंदुरबोधन ] ( ५ ) संसार [ बाड २४

तटका तोडावा संसाराचा। माया मोहाचा।
धोका खंडावा अंतरीचा। जन्मांतरीचा ॥ धृ० ॥
लेकी जावाई आई। पुत्र सुना ते हि ॥ १ ॥
पिता जामात कांता। नातु पुतणे चुलता ॥ २ ॥
आजी पणजी नाती। नातु पणतु चुलती ॥ ३ ॥
नाना इष्टमित्रांचा। संगति सोबतीचा ॥ ४ ॥

---

१ नश्वर, क्षणभंगुर, अशाश्वत.

दास दासी ते पशु । गांव मिरासी सोसु ॥ ५ ॥
धनें धान्य वसनें । रत्नें नाना भूषणें ॥ ६ ॥
वेगीं उदास व्हावें । देवा भजावें भावें ॥ ७ ॥
सत्य सांगतों भाई । अंतिं येईल डाई ॥ ८ ॥
जन्मासी नाहीं येणें । तेणें विचार घेणें ॥ ९ ॥
शिवरामाला कांहीं । मायाजंजाळ नाहीं ॥ १० ॥

इंदुरबोधन ] (६) स्वहिताचा मार्ग [ बाड २४

अरे अरे मनुजा । देहे नाहीं हा दुजा ।
दुजा तिजा पाहा वोजा । प्राप्त नव्हे हितकाजा ॥ ध्रु ॥
लक्ष चौऱ्यासी फेरे । जाले उदंड घेरे ।
संख्या नाहीं येरझारे । त्रास न मनिसी कां रे ॥ १ ॥
काक कुकुट जंबुके । शुणी सूकर उलुके ।
सरड मार्जेर बेडुके । होसी वृश्चिक भक्षके ॥ २ ॥
धड चर्मक तूं होसी । डोहोर मांग होतोसी ।
हलालखोर जालासी । कां रे वीट न मनिसी ॥ ३ ॥
व्याघ्र सिंह जालासी । हस्ति घोडे होतोसी ।
रणामधें पडतोसी । मीमीपणें उडतोसी ॥ ४ ॥
सुंदरपणें दंडतोसी । वाईटपणें अडतोसी ॥
चोखटपणें उडतोसी । फजितपणें पडतोसी ॥ ५ ॥
गद्यें पद्यें करितोसी । सद्यें पापें धरितोसी ।
ज्याचें त्याचें हरितोसी । मीमीपणें मरतोसी ॥ ६ ॥
वटवट गटपट करितोसी । झटपट लटपट धरितोसी ।
हटतट उधट होतोसी । लटिकी खटखट कां करिसी ॥ ७ ॥
ठोसे कां रे करितोसी । भल्या ऐसा दिसतोसी ।
मेंदापरी दिसतोसी । भोंदुपणें कां करिसी ॥ ८ ॥
विद्यावंत ह्मणविसी । आत्मतत्त्व नेणसी ।
ज्ञात्या ऐसा दिसतोसी । अज्ञानाहूनि हीण होसी ॥ ९ ॥
फुकट वचनें वदतोसी । वचना ऐसा न चलेसी ।
न चले तरी आपटसी । आपटसी तरी सांपडसी ॥ १० ॥

---

१ डाव, जय.

गांटेपणें फिरतोसी । भल्यामध्यें शिरतोसी ।
बाहेरमुद्रा दिसतोसी । कां रे लाज न धरिसी ॥ ११ ॥
पाप्या नष्टा चांडाळा । खळा खोट्या खनाळा ।
नस्ता नस्ता अडताळा । पाहे बरा पडताळा ॥ १२ ॥
जरी तूं हरिसेवा करिसी । तरी तूं भवसागरीं तरसी ।
वचन हें जरी मनीं धरिसी । शिवरामा सरता होसी ॥ १३ ॥

इंदुरबोधन ] ( ७ ) सद्गुरूचा ध्यास [ बाड १०

स्वामीवीण परदेशीं । करूं मी कैसी ॥ ध्रु० ॥
वेळ कठीण फारसी । कोण निरसी ॥ १ ॥
कोण्ही नाहीं आह्मासी । कोण दुख निरसी ॥ २ ॥
खंति वाटते तैसी । जैसी चक्रवाकासी ॥ ३ ॥
लोटेना दिवानिशी । ध्यास अहर्निशीं ॥ ४ ॥
सोसिला दुखरासी । आतां नाहीं आस्वसी[२] ॥ ५ ॥
उच्चाट मानसीं । जावें कोणे ठायासी ॥ ६ ॥
ठाव चरणापासीं । दावा शिवरामासी ॥ ७ ॥

इंदुरबोधन ] ( ८ ) सद्गुरूची भेट [ बाड १०

निजधनाची लाधली ठेवी । रंक पावले राज्यपदवी ॥ १ ॥
आलया आंगें चि होईजे देव । कोंदाटला ब्रह्मकटाव ॥ ध्रु० ॥
भवसिंधूचें जळ आटलें । संसाराचें मूळ तुटलें ॥ २ ॥
काळाची वेळ चुकली । आनंदाची लुटी फावली ॥ ३ ॥
जे मायेनें जन्म दाविला । ते मायेचा ठाव पुसिला ॥ ४ ॥
रामदासा शिवराम भेटला । थोर संदेह तुटला ॥ ५ ॥

इंदुरबोधन ] ( ९ ) उदासीनता [ बाड २४

माझें मंगळधाम गेलें । तेव्हां आवघे चि विरंग जालें ॥ ध्रु० ॥
मज भूषण कासया । माझी तुटली सर्व माया ॥ १ ॥

१ स्वछंदानें. २ आसोस, इच्छा.

नलगे आसन वसन । न मने जनीं संभाषण ॥ २ ॥
नाना गंधें परिमळ । नाना पुष्पें हेममाळ ॥ ३ ॥
नाना सुगंधेल तेलें । नलगे लोकीं आर्त केलें ॥ ४ ॥
नाना अनेक भूषणें । नानापरीचीं वहनें ॥ ५ ॥
शिवराम तो उदास । पाहे राघवाची आस ॥ ६ ॥

इंदुरबोधन ] ( १० ) रामावतार [ बाड १० व ३३

धन्य अयोध्यानगरी । सप्तपुरीमाजी थोरी ।
प्रगटला अवतारी । रघुवीर वेषधारी ॥ ध्रु० ॥
रविवंशीं अवतरला । वंशा दीपक जाला ।
सुरवर स्तविति याला । शेष वर्णितां श्रमला ॥ १ ॥
कार्याकारण अवतारी । नामें बहु जन तारी ।
येकवचनी व्रतधारी । त्रैलोक्येदुःख अपहारी ॥ २ ॥
घननीळ शामप्रभा । कोटी मदनाचा गाभा ।
शरचाप घेउनि उभा । बरवी मुखकमळीं शोभा ॥ ३ ॥
शांत सुंदर्य रूपाचा । न कळे महिमा याचा ।
शिवरामांकित स्वामीचा । न कळे पार चि याचा ॥ ४ ॥

इंदुरबोधन ] ( ११ ) रामाची प्रार्थना [ बाड २४

भळभळ फळफळ हळहळ जाली ।
कळकळ तळतळ तळमळ आली ॥ १ ॥
काये रे रघुराया । निववी माझी काया ॥ ध्रु० ॥
चरफड चरफड फडफड होते । तडपड तडपड चिंता सुटते ॥२
भवपंचानन हा अतिदारुण । भेडवी पूर्ण सोडवी येथून ॥ ३ ॥
षडरिपूनें वपु तप्त चि होते । भये बहु फार विरोनि जातें ॥ ४ ॥
हुरहुर चुरचुर चुरमुर मोठी । खरखर हरहर मरमर मोठी ॥ ५ ॥
न धरे हा धीर न करी निष्ठूर तूं कृपा कर । मी अति किंकर ॥६॥
दीनजनरक्षण भक्तविभूषण । तूं मज दूषण निरसुन भूषण ॥ ७ ॥
हर अपरांपर त्याचें तूं अंतर । सीतळ फार हलाहल केलें ॥ ८ ॥
मजवरि निष्ठुर कां धरिलें दुरी । अंतर फार दिगांतर जालें ॥९॥
दाटुनि कंठ उबस ची पोट । घोटुनि घोट चि गलानीस केलें॥१०
शिवराम विराम दिवानिशीं चिंतन ।
तूं तन मन धन हें चि मना तूं ॥ ११ ॥

संग्रह

इंदुरबोधन ] ( १२ ) रामाचा धांवा [ बाड २५

धांवे रे पावें राघवा रामा । तुजवीण कोण सोडवी आह्मां ।
गेला रे गेला धांवे श्रीरामा । करुणामूर्ती आत्मयारामा ॥ ध्रु० ॥
ब्रह्मयाची संतती रावण हा ब्रह्मा न ये कामा ।
विष्णु तरी हा सत्वगुणी सोडवीना आह्मा ।
देवांमध्यें देव महादेव ध्यातो तुह्मा ॥ १ ॥
इंद्र चंद्र वरुण कुबेर येमां बंधन केलें ।
मंगळमूर्ती आणी भगवती यातें बहु गांजिलें ।
कुबेर खंडेराये सटवाईतें बहु मारिलें ॥ २ ॥
नवग्रहांतें बेड्या गणियेश रासभाते राखे ।
येम बारी इंद्र फुल्लारी अंबा द्वारीं थिके ।
वायो झाडी अग्नी लुगडी घेउनी उभा काखे ॥ ३ ॥
चंद्र छत्रधारी सूर्य दिवटा उभा द्वारीं ।
अग्नी घरीं पाक करी काचे ह्मणउनी मारी ।
ब्रह्मा जोसी तिथीवारासी सीव तो दैवत घरीं ॥ ४ ॥
त्रिगुणातीता तूं रघुनाथा धांवण्या धांवसी ।
तूं देवांसी सोडविसी पैकों भविष्यासी ।
कैवारासी कै बा येसी शिवस्वामीपासी ॥ ५ ॥

इंदुरबोधन ] ( १३ ) राम पावला [ बाड २४

पाहा राम माझा पाहा राम माझा नाडळे तुळणा यासी दुजा ॥ ध्रु ॥
त्रिदश देव ते दुःख ते पावले रावणें घातले बंदिखानीं ।
धांवण्या धांवला सीघ्र तो पावला । आणि उठावला सांग कोणी ॥
पाषाण तारिले मारिले उठविले नगरीचे घातले ते विमानीं ।
भक्त चिरंजीवी चंद्र तो सूर्य तो भूमि तो शेष तो तेविमानीं ॥ २ ॥
निर्गुण निश्चयो पाववीतो जयो । होतसे वीलयो पंचभूता ।
आत्मनिवेदनी स्थिति ते उन्मनी हे दया दे ह्मणी शिवरामा ॥ ३ ॥

इंदुरबोधन ] ( १४ ) रामनाममहिमा [ बाड २४

श्रीराम रामा अगम्य तव नाममहिमा ।
निगमागमा न कळे सीमा रामा ॥ ध्रु ॥

विधिहर सिणले स्तवनें स्तवितां अहिरसना त्या चिरल्या रे ।
योगी मुनिजन मननें करितां । वाणी च्यारी त्रिरल्या रे ॥ १ ॥
गणिका गौतम अबळा विकळा । स्तविति तव गुण वाणी रे ।
ध्रुव प्रल्हाद स्मरति तूंते अजामेळ वाचे आणी रे ॥ २ ॥
प्रत्यक्ष शिळा तरल्या कोण्या अवतारीं हें नाहीं रे ।
सहस्र नामें अनंत नामें रामेवीण पाही रे ॥ ३ ॥
भूगोळ जाळी करील होळी । तें विष सीतळ केलें रे ।
चटका चुटका शंकराला उमेसी हि लाधलें रे ॥ ४ ॥
असंख्य भक्त स्मरणें तरले । उरले नाहींत कोण्ही रे ।
होती ते हि तरति जगतीं । शिवरामें हि त्या स्मरणी रे ॥ ५ ॥

इंदुरबोधन ] ( १५ ) रामनामजप [ बाड १०

जाला प्रातःकाळ मोठा साधीं पर्वकाळ ।
रामनाम करी सुकाळ । सर्वकाळ जप करी ॥ ध्रु० ॥
जपतां राम सर्व हि काळ । मग तुज काये करील काळ ।
पडतां अवघड काळ । विपरीत काळ न देखसी ॥ १ ॥
तो म्या देखिला श्रीराम । सर्व सुखाचा आराम ।
तेणें गेला भवभ्रम । सर्व तम मावळला ॥ २ ॥
दक्षिणेसी लक्ष्मण भरत आणि शत्रुघ्न ।
करीं चामर दोघे जण । तो जगजीवन देखियेला ॥ ३ ॥
अयोध्येसी सिंहासनीं । जनकाची नंदिनी ।
माता जया अंजनी । तो कर जोडुनी उभासे ॥ ४ ॥
जपतां राम सर्व हि काळ । मग तुज काय करील काळ ।
ह्रदईं राम सर्व हि काळ । शिवरामाहीं धरिलासे ॥ ५ ॥

इंदुरबोधन ] ( १६ ) कृष्णलीला [ बाड २१

रांगत नवनीत खातो । वांकुलिया दावितो ।
मटमट मिटक्या देतो । चटक्या त्या वाजवितो ॥ १ ॥
नाटकलीळाधारी । सत्य चि हा अवतारी ।
चळवळ चळवळ भारी । नाना खेळ प्रकारी ॥ ध्रु० ॥
निथळला दधिगोळा । चाउनि वेळोवेळा ।
टाळेंसी डसतां बाळा । चघळितो अवलीळा ॥ २ ॥

आहा आहा आहा करितो । पाहा पाहा पाहावितो ।
कित्या घरीचें हवि तो । घेतो नाना चवी तो ॥ ३ ॥
टपटप धावती अबळा । उचलुनि घेती सबळा ।
दाम चि देती अबळा । झेलुनि खेळविती सबळा ॥ ४ ॥
धावोनि देती दाम । परि हरि तो निःकाम ।
पाववितो निजधाम । पुराण पुरुषोत्तम ॥ ५ ॥
शिवरामाचा स्वामी । व्यापक अंतर्यामी ।
घडतां भक्ति नवमी । निरसी नाना उर्मी ॥ ६ ॥

इंदुरबोधन ] **( १७ ) कथारंग** [ बाड २४

कथारंग माजे कथारंग माजे टाळ मृदांग कल्लोळ-गाजे ॥ ध्रु ॥
ब्रह्मनिरूपणें वस्तुसी पावणें साकल्य सांगणें अर्थ लोकां ।
अंतरें उमजती विवेकें समजती प्रत्ययें बुजती अर्थ नीका ॥१॥
जीव तो कोण तो ऐक्य तो खुण तो बाणे । वस्तु शाश्वत कशी ।
मिथ्या माया कशी या पां दोहीसी वर्म जाणे ॥ २ ॥
सगुण निर्गुण वस्तुसी पावणें भक्ती हे लावणें भाविकाला ।
बुडत्या तारणें मृत्य त्या मारणें प्रत्ययें सोडणें नेमकाला ॥ ३ ॥
लक्ष चौऱ्यासी फिरती जीव ते होती ते मुक्त ते भक्तियोगें ।
आत्मनिवेदनीं पाविजे उन्मनी । उन्मनीतीत ते शिवरामा ॥ ४ ॥

इंदुरबोधन ] **( १८ ) नृत्य** [ बाड २४

थै त थै थै थै थै त थै थै थै नाचत आहे । खुळ खुळ घुळ
घुळ रुण झुणु गुण गुणु नेपुर वाजत जाये ॥ १ ॥
रंगी नाचत आहे कुमर गौरीचा ।
संगीत रंगें रंगित रागे धमक नृत्याचा ॥ ध्रु ॥
तींगी थां धींगी था त्रींगी थों धींगी था दींगी दींगी तग थो ताथा ।
दीं दां दी दां कुकुथ कनक झ्यक ऋत कीटत कीटकत कीटक
थैया ॥ २ ॥
झ्यंकीट कीर टण णणं तकीट कीरट झ्यकीट थैया ।
धीं धीं धीमीकीट झ्यं झ्यं झ्यणकीट झेणतकतकीट कथैया ॥ ३ ॥
पदक झळकत कुंडल तळपत माळ रुळत बहु ढाळें ।
मुद्रिका करकंकण केयूर नवरत्नें कीळ नीळें ॥ ४ ॥

कटिसूत्रें बहु रत्नजडितें चमक धमक बहु शोभा ।
दिव्यांबर बहु अंबर सुंदर तडक दामिणी गाभा ॥ ५ ॥
गरगर भ्रमतां थरक चमकतां चमक झमकतां थाके ।
गमक धमकतां कीळा झळकतां वीजु तळपतां फाके ॥ ६ ॥
किन्नर अप्सर गायेक ते वर सुरवर थंकीत होती ।
विधि हरिहर नित्य निरंतर तत्पर नृत्य पाहाती ॥ ७ ॥
औघड तें पद प्रास दोहोडे सरीगमपद्नीस जेथें ।
सप्तस्वरें बहु राग मूर्छनी शिवरामा लये तेथें ॥ ८ ॥

इदुरबोधन ] ( १९ ) वादन [ बाड २४

कसा ताळ पाहा कसा ताळ पाहा । लावितो थोर तो चटक माहा ॥ ध्रु ॥
डोलवी मस्तकें साधवीतो तुके वचन अमोळिकें गुंफवीतो ।
मृदांग झटपटी ताळ तो लटपटी । कवित्वें खटपटी मात्रुकानें ॥१॥
रुद्र विणा सीव झणत्कारती झलुरी सप्तस्वरें करी आळवितो ।
सारमंडळ चंग कमोच उपांग काच आले रंग तानमानें ॥ २ ॥
नृत्य ते घर्घरी नेत्रन्यासें करी हस्तन्यासें परी थरक दावी वग्त्रन्यासें
पहा भृन्यासें ते माहा संगीतेंसी आहा थक थेयां ॥ ३ ॥
यक्ष गण गंधर्व सीध चारण सर्व शंकरादि पर्व सेविताती ।
गणपति अपूर्व शारदा तत्पुर्व मतारूप दात्रुत्व सर्वदेहीं ॥ ४ ॥
अकळ त्याची गती विकळ होती मती चपळ ते जगतीं वेष्टिताती ।
शिवरामा गती शुध रामीं रती पाववी प्रचीती निश्चयेंसी ॥ ५ ॥

इंदुरबोधन ] ( २० ) आत्मचरित्र [ बाड १०

पोटीं बसला दावेदार । रोग बळकावला थोर ।
गोळा होईना जर्जर । कांहीं केल्या ॥ ध्रु ॥
अवघीं नाना यत्न केले । नाना रस ते हि दिधले ।
परी ते सर्व व्यर्थ गेले । कांहीं केल्या ॥ १ ॥
वरें होणार टळेना । येत्न वैद्याचा चालेना ।
आतां कासावीस मना । तां कां व्हावें ॥ २ ॥
ईश्वराची इच्छा थोर । तैसा चालतो व्यापार ।
पंचभूतिक जर्जर । नाशिवंत ॥ ३ ॥

सत्यस्वरूपीं राहावें । नित्यानित्य विचारावें ।
शिवराम ह्मणे भावें । साधकासी ॥ ४ ॥

या शेवटच्या पदाचें नांव आत्मचरित्र ठेविलें आहे, कारण त्यावरून असें दिसतें कीं, शिवरामांना पोटाचें कांहीं दुखणें झालें असावें व पुष्कळ उपचार करून हि कांहीं गुण आला नसावा. ' ईश्वराची इच्छा ' !

सर्व पदें सरस आहेत. शिवरामांची कविता सारी इतकी च असेल, असें वाटत नाहीं. त्यांची आणखी किती तरी कविता असली पाहिजे. मला तर असें वाटूं लागलें आहे कीं, श्रीसमर्थांचे जेवढे ह्मणून महंत होते, मी शिष्य ह्मणत नाहीं, त्या सर्वांची कांहीं ना कांहीं कविता असली पाहिजे. शिवरामांचा तेलंगणांत कोठें तरी मठ हि असला पाहिजे. अजून शोध नाहीं. कल्पनेला संशोधनक्षेत्र केवढें अफाट दिसतें ! तें प्रत्यक्ष नजरेखालून जाण्यास किती तरी जन्म पाहिजेत !

धुळें–१८४० मार्गशीर्ष शु. २

---

[ ८४ ]

श्रीराम

# श्रीसमर्थांच्या मठांतील राजपुरुष

श्रीसमर्थांनीं स्वतः लिहिलेलें असें आतांपर्यंत एक च पत्र उपलब्ध आहे. तें कागदपत्रांतील लेखांक १ होय. त्यावरून शक १५९६ त श्रीसमर्थ हेळवाकच्या घळींत होते, हें सिद्ध आहे. पुढील दोन वर्षे ते शिवतरला रहात होते, असें दिसतें. लेखांक १३ हें खुद्द श्रीशिवछत्रपतींचें १५९७ च्या भाद्रपदांतील पत्र आहे, त्यांत कोड नलवाडा मौजे पारमाची तर्फ सिवतर येथें श्रीसमर्थ येऊन राहिलियाउपरी त्यांनीं रामनगर पेठ वसवावयाची आज्ञा केली, असें ह्मटलें आहे. तसें च लेखांक १५ व १६ हीं १५९८ श्रावण शु. १० चीं शिवछत्रपतींचीं पत्रें असून त्यांत महाराज ह्मणतात कीं ' श्री रामदास गोसावी सिवतरीं राहताती '. यावरून हें उघड होतें कीं, १५९७ व १५९८ त श्रीसमर्थ शिवतरीं राहत होते. ते सज्जनगडावर रहावयास १५९९ त आले, असें एकंदर कागदपत्रांच्या पुराव्यावरून दिसतें.

जनप्रवाद असा आहे कीं, श्रीशिवछत्रपतींच्या वतीनें एक मनुष्य नेहमीं श्रीसमर्थांजवळ असे व तो प्रत्यहीं राजे यांना सद्गुरूंची दिनचर्या कळवीत असे. १५९९ च्या पूर्वी असा कोणी मनुष्य असे किंवा नसे, हें नक्की सांगण्याला मार्ग नाहीं, पण १५९९ पासून तों १६२९ पर्यंत, किंबहुना शाहु छत्रपती यांनीं १६३२ त श्रीगंगाधरस्वामी यांना संस्थानीं आणले तोंपर्यंत, मठांत राहण्यासाठीं छत्रपतीकडून कोणा ना कोणा सेवकाची नेमणूक होत असे, असें दिसतें. श्रीरामसंस्थानास जें इनाम असे त्याची व्यवस्था पाहणें, श्रीरामनवमीच्या उत्सवाचा जमाखर्च ठेवणें, नूतन इमारती बांधणें किंवा इतर कामें चालू करणें, जीर्णोद्धाराचीं कार्यें हातीं घेणें, मठांतील एकंदर लिहिण्याचें काम करणें, मठांतील सर्व हकिकत राजास कळविणें, इत्यादि कामें त्या सेवकाकडे सोंपविलेलीं असत.

हे जे सेवक होते, ते कोण कोण, केव्हां केव्हां होते हें जाणणें अगत्याचें आहे. त्यापासून संशोधनाला पुष्कळ मदत होणार आहे.

लेखांक १७ हें १५९९ भाद्रपद व. २ चें दत्ताजी त्रिमलांचें सातारचे सुभेदार महादाजी सामराज यांस पत्र होय. तसें च लेखांक १८ हें त्या च मित्तीचें त्यांचें कोलचे सुभेदार वेंकाजी रुद्र यांस पत्र आहे. त्या त्या सुभ्यांत गांवगन्ना श्री कडे ज्या इनाम जमिनी दिलेल्या होत्या त्यांचा उल्लेख करून शेवटीं दोन्ही पत्रांत ह्मटलें आहे कीं, ‘ इनामाचे खटपटेकारणे येक ब्राह्मण राजश्री साहेबी हुजुरून दिला आहे त्याची सनद अलाहिदा चालिली आहे. ’ या दोन पत्रांत येक ब्राह्मण दिल्याचा उल्लेख आहे तर लेखांक १९ त येक कारकून ठेविल्याचें ह्मटलें आहे. लेखांक १९ चें पत्र सदर मित्तीचें च असून त्यांत दत्ताजी त्रिमलांनीं श्रीशिवछत्रपतींच्या आज्ञेवरून रामनवमीच्या उत्सवाची मोईन करून दिलेली आहे. त्या पत्राच्या शेवटीं शेवटीं ह्मटलें आहे कीं, ‘ सदरहु खर्चाकारितां राजश्री साहेबी येक कारकून ठेविला असे. ’

हीं दोन्हीं पत्रें श्रीशिवछत्रपतींच्या कारकिर्दीतील होत. जी व्यवस्था श्रीशिवछत्रपतींनीं ठेविली होती, ती च श्रीशंभुछत्रपतींनीं हि पुढें चालविली. लेखांक ३८ हें १६०२ कार्तिक शु. ७ चें खुद्द शंभु छत्रपति यांचें कऱ्हाडचे देशाधिकारी व देशलेखक भानजी गोपाल यांस पत्र होय. त्यांत राजे लिहितात: ‘ इनामाचे खटपटेस येक **लिहिणार ब्राह्मण** पेशजी तीर्थस्वरूप रा-

जश्री कैलासवासी स्वामीने दिल्हा त्याची सनद अलाहिदा होती त्याप्रमाणे ता साल गुदस्तां चालिले असेल हाली तेणे प्रमाणे लिहिणार देविला असे '. त्या च प्रमाणें लेखांक ३४ त शंभु छत्रपतींनीं नित्यनैमित्तिक चालविण्यासाठीं जी मोईन करून दिली तिच्या शेवटीं ते ह्मणतात, 'श्रीकडे सेवेसी **येक हरकारा** हुजुरून पहिल्यापासून दिल्हा आहे त्यास वेतन तागाईत साल गुदस्ता पावत होते हाली हि **हरकारा** श्रीकडे देविला असे.'

या ब्राह्मणांचीं, कारकुनांचीं व हरकाऱ्यांचीं शेकडों पत्रें छत्रपतींना गेलेलीं असलीं पाहिजेत.

या ब्राह्मणांचीं, कारकुनांचीं व हरकाऱ्यांचीं नांवें दिलेलीं नाहींत. श्रीसमर्थांच्या मठांत असलेल्या राजसेवकांपैकीं नांवानें माहित असलेले पहिले सेवक ह्मणजे **राघो शंकर** हे होत. त्यांचा उल्लेख १६१४ अधिक भाद्रपद व. ७ च्या लेखांक ७८ त आला आहे. सदरहु लेखांक ह्मणजे **रामचंद्र नीळकंठ अमात्य** यांचें भानजी गोसावी यांना पत्र होय. श्रीसमर्थांच्या मठीं आपण स्वतः असावें, तसें शक्य नसेल तर आपल्या वतीनें तरी कोणी असावें, अशी इच्छा निष्ठावंत सांप्रदायिकाला आज हि होतें, मग त्या काळची कथा काय सांगावी. आज चाफळास किंवा सज्जनगडास पूर्वस्मृतींशिवाय काय उरलें आहे! तरी देखील आज हि त्या स्थळांकडे मन इतकें ओढ घेतें, मग ज्या काळीं तें पूर्व वैभव तेथें पूर्णपणें नांदत होतें, त्याकाळीं ज्याला त्याला चाफळास रहावें, सज्जनगडीं जन्म कंठावा, असें वाटत असेल यांत काय नवल आहे! अशी अवस्था **रामचंद्र नीळकंठांची** झाली होती! ते केवढे हि मोठे असले, तरी श्रीसमर्थांच्या घरची लेखकवृत्ती त्यांनीं मोठ्या कौतुकानें व अभिमानानें मिळविली होती. सदरहु ७८ च्या लेखांकांत ते ह्मणतात, 'श्रीजवळील **लेखकवृत्ती** आह्मी मागोन घेतली आहे मुतालकीस **राघो शंकर** ठेविला,' वगैरे. हे राघो शंकर या कामावर १६२८ पर्यंत होते, असें दिसतें. पुढें ते कोठें निघून गेले त्याचा पत्ता रामचंद्र नीळकंठांना नव्हता. राघो शंकर निघून गेल्यावर या कामावर रामचंद्र नीळकंठांनीं आपले प्रत्यक्ष मामा **हरि दादाजी** यांची नेमणूक करून घेतली. या बाबतींत त्यांनीं लेखांक १६५ चें पत्र **मातुःश्री आकामहाराज** व लेखांक १६६ चें **दिवाकर गोसावी** यांना पाठविलें होतें. आकामहाराजांच्या पत्रांत अमात्य ह्मणतात, 'राजश्री दिवाकर गोसावी यांच्या विद्यमानें श्रीकडील लिहिणियाचा हुदा वतनी आह्मास करून दिल्हा *** आह्मी मुतालिकीस राघो

शंकर ठेविला होता सांप्रत कालीं त्याचें कांहीं वर्तमान कलत नाहीं अशास श्रीजवली आह्मी लेखनवृत्तीचा हुदा करून घेतला तो निमित्य कीं श्रीच्या पादुकासंनीध आमचे येक माणूस अहिर्णिसी असिले पाहिजे ह्मणून त्यास सांप्रत राघो शंकराचें कांहीं वर्तमान च कलेना याकारितां त्याला दूर करून हाली राजश्री हरी दादाजी लेखनाच्या मामलीयास पाठविले आहेत.' रामचंद्र नीळकंठांची श्रीचरणीं कोण ही निष्ठा ! हरि दादाजी हे त्यांचे मामा होत. त्या च लेखांकांत आकामहाराजांना ते पुढें ह्मणतात, ' तुह्मी जसे श्रीचे सेवेशीं तत्पर असोन श्रीचें अन्न भक्षिता तदनुरूप हरिपंत हे-आमचे मामा आहेत ते ही श्रीची सेवा निष्ठापुरस्कर करून श्रीचें अन्न भक्षितील'. दिवाकरांच्या पत्रांत हि ' श्रीकडील लेखनवृत्तीचा हुदा तुमच्या वियमानें आह्मी वतन करून घेतला ' इत्यादि इतर मजकूर वरीलप्रमाणें च आहे. पुढील लेखांक १६७, १६८, १६९ व ३७६ यांत हि हरि दादाजींचा संबंध आला आहे.

राघो शंकर परवानगीवांचून चालते झाले, याचें नवल वाटतें. लेखांक २४९ हें नारो शंकर सचीव यांचें पत्र असून तें १६५० च्या सुमाराचें आहे. त्यांत राघो शंकरांचा उल्लेख आला आहे. त्यावरून श्रीपादुकां सोडून राघो शंकरांनीं सचीवांचा आश्रय केला होता, असें दिसतें. त्याच्याशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं, पण राघो शंकरांच्या वंशजांचा तपास करणें तर तो कोठें कोठें केला पाहिजे, एवढ्यापुरतें च आपलें पाहणें आहे.

राघो शंकर व हरि दादाजी यांनीं अमात्यांना व छत्रपतींना हजारों पत्रें पाठविलीं असलीं पाहिजेत. श्रीसमर्थांच्या कृपेनें अमात्यांचे वंशज गगनबावड्यास सुखानें नांदत आहेत. या घराण्यांत श्रीरामोपासना पहिल्यापासून चालत आहे, ती आज मित्तीस हि कमी झालेली नाहीं. तेव्हां गगनबावड्यास श्रीसांप्रदायिक कागदपत्रें विपुल असावींत, असें माझें मन सांगत आहे. रायगडच्या दप्तरांत जीं पत्रें असावयाचीं तीं मिळण्याचें आपल्या नशिबीं बहुधा नाहीं ! ' बहुधा नाहीं ' ह्मणतों, ' मुळीं च नाहीं ' असें मुद्दाम म्हणत नाहीं. १७३९ त रायगड किल्ला जेव्हां इंग्रजांचे हातीं गेला, तेव्हां तेथील दप्तर बहुधा विलायतेंत जाऊन पडलें असावें ! तर मग कोणा तरी श्रीसमर्थसंप्रदायसंशोधकाला केव्हां तरी विलायतची हि यात्रा केली पाहिजे, असा याचा अर्थ होत नाहीं काय ?

१८४० मार्गशीर्ष शु. ८

[ ८५ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थशिष्य प्रल्हाद

## मठ कारंजे

## परंपरा, ग्रन्थसंग्रह, कवन वगैरे

(श्रीसमर्थदास)

( १ ) श्रीसांप्रदायिक विविध विषयांपैकीं लेखांक ११ त आपण कारंजे येथील बाळकराम यांच्या मठाची हकिकत देतांना म्हटलें आहे कीं, कारंजास श्रीरामदासी मठ दोन असून फक्त एक च मठ आपणांस पहावयास मिळाला व दुसऱ्या मठाचे अधिपति परगांवीं गेलेले असल्यामुळें त्या मठांतील संग्रह वगैरे आपणांस पहावयास सांपडला नाहीं. त्यावरून कारंजास जाण्याची मला इच्छा झाली व मला या दुसऱ्या हि मठाचें दर्शन घडलें व कांहीं माहिती मिळाली; तथापि मला असें वाटलें व अजून हि वाटतें कीं, आपण स्वतः एकवार पुन्हा कारंजास जाऊन या हि मठाचें दर्शन घ्यावें.

( २ ) या मठाची परंपरा अशीः—

श्रीरामदास—प्रल्हाद—रामचंद्र—माधव—रामकृष्ण

रामकृष्ण यांचे पुत्र: रामचंद्र, नारायण, लक्ष्मण

लक्ष्मण—जनार्दन (विद्यमान)

समर्थप्रतापाच्या दहाव्या समासांत जीं शिष्यांचीं नांवें दिलेलीं आहेत, त्यांत प्रल्हादांचें नांव नाहीं. तसें च बखरींत व इतर हि कोणत्या चरित्रग्रन्थांत त्यांचें नांव आलें असल्याचें मला आठवत नाहीं. त्यामुळें प्रल्हादांचें चरित्र कळण्याला दंतकथेशिवाय साधन नाहीं. असें कळतें कीं, कारंजापासून सहा कोस धामनी नांवाचें खेडें आहे, तेथील भट उपनांवाच्या घराण्यांतील हे प्रल्हाद गोसावी होत. ते गृहस्थाश्रमी होते व वर दिलेली त्यांच्या पासूनची पुढली पुत्र-परंपरा च आहे. प्रल्हादगोसावी धामनीस च रहात. त्यांचे चिरंजीव रामचंद्र गोसावी हे प्रथम कारंजास राहूं लागले. परंपरेंतील पांचवे पुरुष रामकृष्ण गोसावी यांचे मधले चिरंजीव नारायण हे प्रसिद्ध प. हं. वासुदेवानंदसरस्वती टेंभे स्वामी यांचे गुरु होत. यांना उज्जनकर नारायणस्वामी असें म्हणत.

उत्तरवयांत यांनीं संन्यासदीक्षा घेतली होती. शेवटीं शेवटीं यांचें राहणें चाफळ व सज्जनगड येथें असे व सुमारें तेरा चवदा वर्षांमागें चाफळास च श्रीरामापुढें त्यांचे देहावसान झालें. या घराण्यांतील सर्व च पुरुष पूर्णायुषी होते. नारायणस्वामींचे वडील बंधु रामचंद्र गोसावी हे वयाच्या ८५ व्या वर्षी सुमारें दीड दोन वर्षांमागें "देवदर्शनास जाऊन येतो" म्हणून जे सांगून गेले ते परत आले नाहींत !

( ३ ) मठांत कागदपत्रांचा बरा च संग्रह असावा, असें वाटतें, पण त्यासाठीं आपण च केव्हां तरी तसदी घेतली पाहिजे. मठाला मिळालेल्या उत्पन्नाच्या सनदा पुष्कळ आहेत, पण त्याप्रमाणें मठाकडे जमिनी मुळीं च चालत नाहींत ! हल्लीं मठ व मठपति यांची दैना आहे. टेंभेस्वामींच्या शिष्यवर्गानें या मठाकडे थोडें लक्ष पुरवून आपल्या परम गुरूंची सेवा करण्याची ही पर्वणी साधावी, अशी त्यांना माझी नम्र विनंति आहे. टेंभेस्वामी दत्तोपासक होते, तरी पण आपणांस संन्यासदीक्षा देणारे श्रीरामदाससंप्रदायांतील असल्यामुळें गुरुपरंपरेला अनुसरून टेंभे स्वामी श्रीरामदासनवमीचा उत्सव करीत असत, हें त्यांच्या शिष्यसंप्रदायिकांना विदित च आहे.

( ४ ) मला मठांतील पांच कागद पहावयास मिळाले. कागद जीर्ण आहेत व ते मला जसे लागले तसे उतरून घेतले आहेत. त्यांचा आपणांस व इतिहाससंशोधकांना उपयोग व्हावा म्हणून ते येथें देतों.

लेखांक १ ] [ शक १६३६

( सिक्का )

( उर्दुमजकूर ) मानसिंगराजे

चकनामा दर + + + + ऐवज आवरा + + + धामनी सु॥ सन ११२४ अनाम प्रल्हाद गोसावि रामदास वस्ति धामनी मजकूर जमीन + + नजीक कारंज वाट नदीचे किनारा घागडदेपादुयेद्याचे आंबराई पासून मोमीनाचे आंबराई पावेतो चक पो अडीच बिघे कचे + + + + इनाम दिधला आहे + +

---

लेखांक २ ] [ शक १६९५

(फारसी सिक्का )

उर्दुमजकूर

दानपत्र वेदशास्त्रादिसंपन्न राजपूजित राजश्री रामचंद्रबाबा धर्माधिकारी

पा। खडी धामनी स्वामीचे सेवेसी दासानुदास देशमुख व देशपांडे पा। मा। सुा। सन ११८२ कारणें स्वामीजीचे सेवेशी दानपत्र लिहून दिधले ऐसाजे स्वामी थोर सत्पात्र भगवद्भक्त चालविलीयास परम श्रेयस्कर जाणून स्वामीजीस दान सरदेही मोजास टके २ व मजऱ्यास टका १ व भुमी जेतने २ बिघे सुमार १८ व का। मा। आंबापेड १ पृथ्वी व आवा स्थळे नेमणुक बी ता।

१ का। मजकुरी नदीचे पैलतीरी गयालजोशी बन पूर्व दिशेस सिमेस मुंड ममताजी देशमुख कवठलकर जेतन १ बिघे सुमार ९

१ मजरे किनखेड येथे मारुतीचे सन्मुख हस्ती पूर्व दिशेस जेतन १ बिघे ९

---

२

१ आंबा का। मा। भोजा पेड १

सदरहु वृत्ती नेमून दिली आहे तेथील अन्न व सरदेहीचे धन व अच्युत फळे प्रतिवर्षी वंशपरंपरा स्वीकारून दासास अभिष्ट इछीत असावे या वृत्तींत आपला वंशीक कोणी अवरोध करील त्यास श्री कुल॰ दैवताची शपथ्ये असे हे दानपत्र शेवेसी लिहून दिधले सही हस्ते विश्वनाथ जनार्दन देशपा। पा। मा।

सही हस्ते देशमुखान

सटवाजी व गुनाजी नारायेनजी व ममताजी
सखाराम त्रिंबक वाकोजी प्रताप
भिकाजी

छ १० माहे मज पा। (फारशी शिक्का)

गोही

देवजी ठाकरे मोकदम मजरे मा। गोदाजी पाटील मोकदम मा।
शाबाजी पवाडकर मोकदम मजरे सेदपूर रघुनाथ जगजीवन पांड्ये मुकाम मा।

धर्माजी नाईक वाढी मोकदम जयराम शिवदेव पांडिये मा
मजरे तामस
सेभाजी ठाकरे मोकदम मजरे
भाडेगांव

---

लेखांक ३ ] [ शक १६९७

( शिक्का )

(उर्दुमजकुर)

हशमतजंगबहादूर

दानपत्र विवेकवैराग्यसंपन्न बिबी रामचंद्र बावा वलद प्रल्हादबावा रामदासी साकीन कसबे कारंजाबिबी यासी देशमुखदेशपांडे प्रा मजकूर सुहूर सन ११८५ कारने दानपत्र लिहून दिधले ऐसा जे नवाब साहेबकी बले खुद्दायगाजन ब जहागीरदार पा मा यानी स्वामीस रामनवमीचे उत्साहा करितां दरगांवीं येक रुपया सालियाना मुकरर करोन देविला त्यास आपण राजी होऊन हे दानपत्र लिहून दिल्हे असे साला तमाम सदरहु लिहिल्या प्रमाणें ऐवज दाम येक रुपया स्वामीस दरसाल लेकरांन लेकरी पावते करीत जाऊ स्वामीनें उत्सवा करितां + + + + करोन नवाब साहेबाचे सम + + अभिष्ट चिंतन करीत असावे आपले ववशांत जे मुलगे होतील ते ही या दानपत्रास मान्य करोन ऐवज तुम्हास पावता करीत जातील हे दानपत्र लि॥ सही

तेरीख १२ माहे मा॥

बी॥ देशमुखान बीयाबतुन नागनाथदेशपांडे का॥ कारंजाबिबी दानपत्र विवेकवैराग्यसंपन्न रा॥ रामचंद्र बावा वलद प्रल्हाद बावा रामदासी सु॥ ११८५ ता॥ १२ माहे मा॥

देसपा॥

त्रिंबक जगदेवराऊ — भाऊसिंगजी चव्हान

जीवाजी कदम — गोपाळ सावळाजी

---

लेखांक ४ ]

श्रीरामसमर्थ

श्रीरामदासस्वामी संस्थान किल्ले सज्जनगड चाफळ याचे

लक्ष्मणनाम्ना

उत्तमगुणाचा ग्राहक । तर्क तीक्षण विवेक । धर्मस्थापना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ श्रीमान् राजश्री रामचंद्र गोसावी ( ला ) डाचे कारंजे यासी अनेक आसीर्वाद + + + वर्तमान तरी मार्गशिर्ष वद्य + + यानंतरें आपणा क + + + व + + + + चाफळकरा बरा + + मा + + हवर्तमान क्ष + + हुत + + + अेन ब + + समाध + + + + + जालिया नंतरे नागपुरा + + + + + उत्तम आहे देवाकडील का + + + गत्य लवकरि च जावे तो दरबारा + + + असतां देवा ब्राह्मणाची कार्ये नित्यानित्य नुतन कार्ये व जिर्णोध्धार होत च आहेत ऐसियासी ही + मा + न श्रीमंताची उपासना स्थळें आहेत तेथील कार्याविषयीं आनमान नाहीच परंतु यथोन पाठवावयायोग्य ज्ञाता वैराग्य संपन्नता आणी श्रीमंत व कारभारी याणी श्नेह करण्या योग्यता जाणून भेटीसमयीं व श्रीसन्नीध पुर्वोत्तर सर्व हि सांगीतले व येथील सर्व समारंभ दृष्टीनें पाहिला त्याच अन्वये हि पुढें उतरोत्तर चा + + यत्न होऊन या संस्थानी तुमचे हातून सेवा व्हावी आणि या राज्यांत सर्व सांप्रदायीक मंडळीत उत्कर्ष दिसोन यावा ऐसें करावें म्हणुन सांगीतले ते ध्यानांत येऊन आपण मान्य केलेंच आहे त्याचा यत्न कराव येथोन राजश्री आप्पाजीपंत देशमुख वास्तव्य चाफळ हे तेथें आले आहेत त्यांचे हि साहित्य आपणास होईल ते करावे व मठाचे सर्वहि सुखरूप पणाचे वर्तमान सांगितल त्या वरून श्रुत व तेथे + + + नागपुरी चिरंजीव भिमाबु + + रामचि कन्या आहेत त्याची भेट घे + + + ठाई तुम्ही आहात + + + + वीत असावे + + + + आसीर्वाद

---

लेखांक ५ ]

श्रीराम

मित्रवर्य अस्मत् आप्तत्तम परोपकारनिरत वीर धीर गुणगांभीर्य खां साहेब याप्रती

माधव रामदासानुचरकृत आशीर्वाद विशेष

न देखतां तुझिया कृपा ईक्षणा । जगदांध्य पडे नयना ।
सर्व दिशांची गणना । गणी कोण ॥
ज्ञानेसी मावळे विवेक । अनुमात्र न लभे सुख ।
तुज न देखतां मी देख । मूढ मूर्ख होऊनी ठेलों ॥
जे सत्कीर्तीचे पुरुष । ते ईश्वराचे अंश ।
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥
परे वा बंधुवर्गे वा मित्रे इष्टरि वा सदा ।
आपन्ने रक्षितव्यं तु दयेशा परिकीर्तिता ॥
येरव्हीं खा साहेब असा सर्वज्ञ । संकल्प मात्रें कराल
शास्त्र निर्माण । तेथें म्या हें तुम्हा कारणें निरूपण ।
करणें हे पूर्ण बालिशत्व ॥
तव प्रसन्ने मम किं गुणेन । त्वयि प्रसन्ने मम किं गुणेन ।
रक्ते विरक्ते च वरे वधूनां । निरर्थकः कुंकुमपत्रभंगः ॥
लिहिली अर्जी यजमानास । उत्तर येईल आम्हास ।
आज्ञेप्रमाणें सर्वांस । सोडचिठ्ठी मिळेल ॥

( ५ ) ग्रन्थसंग्रह हि मठांत कांहीं असेल व तो हि पाहण्यास आपण च केव्हां तरी आलें पाहिजे. " मीपणनिर्शन " नांवाचें ५८ ओव्यांचें श्रीसमर्थकृत एक छोटेसें प्रकरण माझ्या पाहण्यांत आलें. शक १७०३ तील श्रीमत् दासबोधाची एक प्रत त्रिवड उपनांवाच्या कोणीएकानें लिहिलेली मठांत आहे. गव्हाळ्यांत श्रीसमर्थकृत कांहीं हिंदुस्थानी सवाया आढळल्या त्या मीं उतरून घेतल्या आहेत. मला हिंदुस्थानी भाषा येत नसल्यामुळें वाचनाच्या व शब्द तोडण्याच्या चुक्या माझ्या हातून झाल्या असतील. वाचकांनीं दुरस्त करून या सवाया म्हणाव्या.

सदा प्रसन्न सुस्त्रभाव प्रगट सवो परिराज ।
तृप्त ज्ञान विज्ञान अचल कूटस्थ बिराजे ।
सुखनिधान सर्वज्ञ मान अपमान न माने ।
सारासार सब मिथ्या भ्रम माने ।

फुनी भिद्यंते हृदयग्रंथिको छिद्यंते सब संशय।
कहे **रामदास** सो सद्गुरु चिदानंदघन अद्वय ॥ १ ॥
कब हु हासिके उठे नृत्य करो रोवन लागे।
कब हु गद्गद कंठ शब्द निकसे नहि आगे।
कब हु हृदय उमंग उंचे सुर गावे।
कब हु क आपहृदयमग्न होई जावे।
कहो चितवृत्ती हरे सो लगी सावधान कैसे रहे।
कहे **रामदास** प्रेम लक्षणा भक्ति हे शिष्य सुनहुं सद्गुरु कहे ॥२॥
कोन सो मात पिता सुत कोन कोन अनेक सो कोन अकेला।
पांपी सो कोन पुण्यात्मा कोन कोन गुरु और कोन हि चेला।
अजपु और और कोन मरे और कोन जिवे विरला कोन जात है अलबेला।
कहे **रामदास** जैसे पानीमे लाग तरंग कोठलमठेला ॥ ३ ॥
बिधि भेद निखेदन जाने कछु मन तीं उन्माने कही सो कही।
कछु वेद पुराण किरत नही अनरीत सो टेक गही सो गही।
राम ज्ञाय नही समजी गुरुको मन अपने मन मान लही सुलही।
ये तामस ज्ञान कहे **रामदास** हाट मूरख ताड गही सो गही ॥ ४ ॥
जो करे सो बद विचार करे फल विचार विखे सबजात है।
व्रत संजम नेम सुकर्म करे ये भक्ती भली विधी गाजत है।
परि सर्व हि देव रिसाय मनाय महाबर पाय सो गाजत है।
ये राजस ज्ञान कहे **रामदास** सुखधर्मका राज विराजतु है ॥ ५ ॥
सील संतोख सुबुधी सुलक्षन धीरगंभीर मिलेजत न्यारो।
धर्म दया हृदय अतिकोमल निभे भक्तिकु जानत हारो।
कर्म करे अर्पे प्रभुजीकु नहि फल चाहत सोच उदारो।
यह सात्विक ज्ञान कहे **रामदास** संत सदा भगवंतके प्यारो ॥ ६ ॥

( ६ ) प्रल्हादानुचर म्हणजे पहिले रामचंद्र होत. त्यांनीं केलेलें श्रीसमर्थपर एक पद आहे तें असें:—

रामदास चतुरक्षरि मंत्र पावन लोकांसी।
राम राम स्मरणें पावन संतस्वरूपासी।

राम राम स्मरणें कारण संसृतिनाशासी ।
राम राम स्मरतां बैसे काळाची घासी ॥ १ ॥
मध्यवर्ति शोभे जैसा नक्षत्रीं चंद्र ।
मध्यभागीं सज्जनांत तैसा शोभे नरेंद्र ।
मध्यभागीं स्थानीं प्रगट जाला चतुरवक्त्र ।
मध्यभागीं शोध करितां थकले ब्रह्मादींद्र ॥ २ ॥
दासत्व करुनि प्रसन्न केलें रामास ।
दासबोध ग्रंथ केला जेथें उपनिषधार्थ ।
दारा धन त्यागुनि प्रपंचीं जाले उदास ।
दमन करुनि रागद्वेषी स्वरुपीं अखंड निवास ॥ ३ ॥
सज्जनगडीं निवास ज्याचा तो हा भीमअवतार ।
संत साधु ज्याचे ध्यानीं अखंड तत्पर ।
शुत्ध विमल ज्ञान रक्षुनी स्वधर्म आचार ।
शरणागत अनन्य त्यासी मल्हारदानुचर ॥ ४ ॥

( ७ ) उद्धवसुतकृत श्रीसमर्थांची एक आरती सांपडली. उद्धवसुतकृत श्रीसमर्थचरित्रांत ती आरती कदाचित् आलेली असेल, पण मला आठवत नाहीं व मला ती नवीन वाटली, म्हणून प्रकाशिताचें प्रकाशन करण्याचा संभवनीय दोष पतकरून हि ती आरती येथें देतों.

॥ आरती ॥

दासासी दासबोध । ग्रंथ केला प्रसिद्ध ।
वाचिती ऐकताती । त्याची चुके पुनरावृत्ती ॥ १ ॥
आरती रामदासा । कोटिसूर्यप्रकाशा ।
वोवाळूं पंचप्राण । काया वाचा आणि मन ॥ धृ० ॥
हनुमंतें भेटि दिल्ही । तेणें महिमा वाढली ।
अवतार प्रगटला । बहुजन उद्धरिला ॥ २ ॥
रामदास नाम सार । ऐसा महिमा अपार ।
उद्धवसुत बोले । प्रेमें आनंदें डोले ॥ ३ ॥

[ ८६ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थशिष्यीण अंबिकाबाई

## मठ राशिवडे व वाळवे

## परंपरा, ग्रन्थसंग्रह, कवन वगैरे

( अनुचर )

**अंबिका नामें कोराम्नी विजयपुरीं । वातावर्ती पातली कृष्णातीरीं ।
करवीरप्रांतीं हरिभक्ति बरी । शिष्यसंप्रदायें केली हो ॥**

( १ ) अशी श्रीसमर्थप्रतापाच्या अकराव्या समासाची विसावी ओवी आहे. तिजवरून असें दिसतें कीं, अंबिकाबाई मूळच्या विजापूरच्या राहणाऱ्या असून करवीरप्रांतीं मठ करून होत्या. आक्कामहाराजांचा शिष्यसंप्रदाय नव्हता, पण वेणाबाईचा होता, त्या च प्रमाणें अंबिकाबाईनीं हि शिष्यसमुदाय केला होता. ही श्रीसमर्थांची केवढी थोरवी होय कीं, त्यांनीं अनेक स्त्रियांना हि पूर्ण अधिकारी करून व त्यांना स्वीय साम्य देऊन सद्गुरूचें निरुपमत्व सर्वांच्या प्रचीतीस आणिलें ! असे सद्गुरु आणि असे सच्छिष्य दुरून तरी पहावयास मिळावेत, असें वाटतें.

( २ ) श्रीसांप्रदायिक कागदपत्रांच्या शोधार्थ गगनबावड्यास गेलों असतां सहजगत्या कळलें कीं, त्या प्रांतीं च राशिवड्यास श्रीसमर्थशिष्यीण अंबिकाबाई यांचा मठ आहे. राशिवडे एक लहान खेडें असून कोल्हापुरापासून पांच कोस आहे. अलिकडे तेथील मठाची व्यवस्था श्रीमंत बावडेकर पंत अमात्य सरकार यांचे कडून च होते. तत्पूर्वीं वाळवे येथील मठाकडून या हि मठाची व्यवस्था चालत असे. वाळवे येथील मठांतील विद्यमान मठपति रामचंद्र बळवंत यांच्या कडून राशिवडे व वाळवे या उभय मठांची परंपरा कळली ती अशी:—

श्रीरामदास
|
अंबिकाबाई ( मठ राशिवडे )

आका ऊर्फ भिऊबाई ( मठ राशिवडे ) — काशीबाई ( मठ वाळवे )

शिष्य मल्हारबुवा- गिरिबुवा-व्यंकाजीबुवा-मोरेश्वर-पुत्र बाळाजी-रामचंद्र (विद्यमान)

राशिवडे मठाची निराळी परंपरा नाहीं. वाळवे मठांतील च मठपति राशिवडे मठ चालवीत, व अलिकडे त्या मठाची व्यवस्था पंत अमात्य यांचे कडून होत आहे.

( ३ ) प्रत्यक्ष राशिवड्यास माझें जाणें झालें नाहीं, पण तेथें मठांत कांहीं संग्रह नाहीं, असें बावड्यास च कळलें. वाळवे मठांत गेलों होतों. तेथें हि ग्रन्थसंग्रह असा म्हणण्यासारखा नाहीं. मल्हार बुवांच्या हातचा १६५१ तील श्रीमत् दासबोध आहे. अक्षर सुंदर असून आकार डोमगांव मठांतील सोनेरीरुपेरी प्रतीच्याआकाराचा आहे. प्रत दर्शनीय आहे. तिचा शेवट जशाचा तसा येथें देतों:

स्वस्ति श्रीनृप शालिवान शकें । सोळासें येकावन निकें ।
सौम्य नाम संवत्छर शुभदायकें । दक्षणायण वरशारितु ॥ १ ॥
भाद्रपद मास कृष्णपक्षेसीं । भृगुवासर द्वितीयेसीं ।
तद्दीनि लेखन सिद्धिसी । अनुक्रमें पावलें ॥ २ ॥
अंबिकाबाईस्वामिचिया दासांत । हिन दीन किंकर आनाथ ।
समर्थदयेनें कृतार्थ । होउनि स्मरणि राहिला ॥ ३ ॥
म्हणोन मल्हारीचे हृदयमंदिरीं । भीममूर्ति निरंतरी ।
तद्दपत्वें लेखनाळंकारीं । हस्ताक्षर करविलें ॥ ४ ॥
मंदबुद्धिनें शुद्धाशुद्ध लिहिलें । ते विबुद्धजनी पाहिजे क्षमिलें ।
किं बाळमतीस घडलें । म्हणोनियां ॥ ५ ॥

संपूर्णमस्तु श्रीरघुनाथार्पणमस्तु शुभं भवतु

( ४ ) मठांतील एका जुन्या कागदावर खालील श्लोक आढळला:

श्रीरामदास गुरु अद्वय अंबिकेला ।
तेथोनि ज्ञान पुढती भिउबाइ तीला ।
मल्हार सद्गुरु अम्हा परिपूर्ण ज्ञानी ।
हे गिर्धरा स्तवन मोक्षरूपी म्हणोनी ॥ १ ॥

अर्थात् गिरिबुवाकृत हा श्लोक आहे. त्यावरून, विद्यमान मठपती सांगतात तसें नसून मल्हारबुवांना भिऊबाईचा अनुग्रह होता असें दिसतें.

( ५ ) मठांत कागदपत्रांचा थोडासा संग्रह आहे, त्यांत सांप्रदायिक कागद नऊ आढळले. ते उतरून घेऊन आपणांकडे पाठवीत आहे. त्यांचा जो उपयोग असेल तो आपण व आपले वाचक करतील च.

लेखांक १ ]　　१६७४ चैत्र शुद्ध १०　　[ अस्सल-मोडी

श्री

श्री आई आदी
पुरुष श्री राजाराम
छत्रपती स्वामी कृपा
निधि तस्य जगजी
वन परशराम
प्रतिनिधी

आज्ञापत्र राजश्री पंतप्रतिनिधि ता। मोकदमानी मौजे बावची प्रां पनाळा सु॥ इसने खमसैन मया व अलफ मौजे मजकूर पैकी गंगा जान्हवी समान मातुश्री कासीबाई मठ का। वाळवे यास जमीन ०।१० दाहा बिघे निमे पड व निमे वहीत देविली असे नेमून देणे हे आपले वौशपरंपरें आनभवीतील साल दरसाल ताजे सनदेचा उजूर न धरणे जाणिजे छ ८ जमादिलोवल निदेश समक्ष

राजते
लेखना
वधी

सुरुसुद बार

लेखांक २ ]　　१६७४ कार्तिक वद्य ९　　[ अस्सल-मोडी

श्री

श्री आई आदी
पुरुष श्री राजाराम
छत्रपती स्वामी कृपा
निधि तस्य जगजी
वन परशराम
प्रतिनीधी

आज्ञापत्र राजश्री पंतप्रतिनिधि तां मोकदमानी मौजे रेटरे बु॥ पा। कराड सु॥ सलास खमसैन मया आलफ हरिभक्तपरायेण राजश्री मल्हार गोसावी रामदासी मठ वास्तव्य कसब वाळवे हे थोर सत्पात्र

याचा योगक्षेम चालिला पाहिजे याजकरिता मौजे मजकुरी यांसी इनाम पड जमीन बिघे ३० तीस बिघे देविली आसे तरी सदरहू जमीनीची चतुःसीमा करून आवल दुम सीम तीन प्रतीची जमीन नेमून देणे हे कीर्दी करितील नवीन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रति लेहून घेऊन हे पत्र गोसावीयापासी भोगवटीयासी परतून देणे जाणिजे छ २२ मोहरम निदेश समक्ष

राजते
लेखना
वधी

लेखांक ३ ] १६७५ वैशाख वद्य २ [ अस्सल-मोडी

श्री

श्री आई आदी
पुरुष श्री राजाराम
छत्रपती स्वामी कृपा
निधि तस्य जगजी
वन परशराम
प्रतिनीधी

आज्ञापत्र राजश्री पंतप्रतीनिधि ता। मोकदमानी मौजे रेटरे प्रा। कराड सु॥ सलास खमसैन मया अलफ हरिभक्तपरायेण राजश्री मल्हार गोसावी यांसी पेसजी इनाम जमीन तीस बिघे देविली त्यास तुम्ही जमीनीची लावणी करून देत नाही म्हणून हुजूर विदित जाहाले तरी हे गोष्टी कार्याची नाही हाली देखत आज्ञापत्र सदरहू तीस बिघे जमीनीची लावणी करून वसूल गोसावी याजकडे देणे येविसी उजूर केलिया मुलाहिजा होणार नाही ऐसे पष्ट समजोन जमीनीची लावणी करून वसूल देणे फिरोन बोभाट येऊ न देणे या कामास लोक पा। यासी रुाये २ दोन देणे छ १५ रजब [1]निदेश समक्ष

बार

राजते
लेखना
वधी

१ येथून अक्षर निराळें.

लेखांक ४ ] १६७५ आश्विन वद्य ६ [ अस्सल-मोडी

श्री

राजश्री मानसिंग थोरात ताहा मोकदमानी मौजे गोटखिडी ता। वालवे सुा। आर्बा खमसैन मया अलफ मौजे मजकूर पैकी वेदमूर्ति राजश्री मलार गोसावी मठ वालवे धर्मादाऊ पड जमीन बिघे ०२ दोन देविल आसे तरी दाखऊन देणे वेदमूर्ति आपले मार्फतीने लावणी करतील हे पत्र भोगवटेस देणे नूतनपत्राचा आक्षप न धरणे जाणिजे छ २० मोह जिल्हेज

मोर्तब
सुद

---

लेखांक ५ ] १६८७ कार्तिक वद्य ४ [ अस्सल-मोडी

श्री

श्री धनाईचर
णी तत्पर सीदोजी
सूत सीवाजी थो
रात नीरंतर

आज्ञापत्र राजेश्री सिवाजी थोरात ताहा मोकदमान मौजे सीगाव तां वडगाव सुा। सीत सितैन मया व आलफ मौजे मजकूर पैकी राजश्री मलारबावा रामदासी मठ कसबे वालवे यासी पडजमीन बिघे ०१० दाहा काली इनाम करून दिली आहे तरी सदरहू प्रमाणे जमीन चेतुसिमा करून देणे साल दरसाल नूतनपत्राचा आक्षप न करणे रा छ १६ माहे जमादिलावल मोर्तबसुधं

मोर्तब
सुद

---

लेखांक ६ ] १६९१ आश्विन वद्य ३ [ अस्सल-मोडी

श्री

श्री ०
आई आदि पु
रुष श्री राजाराम
छत्रपति स्वामी कृ
पानिधी तस्य जग
जीवन परशराम
प्रतीनीधी

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव त्रिंबक पंडित प्रतिनिधि ताां मोकदमानी मौजे आकलखोप प्राां पनाला सुाा सबैन मयां आलफ दिल्हे इनामपत्र ऐसे जे गंगाजळ निर्मळ कासीबाई सांप्रदाय रामदासी वास्तव्य मठ वाळवे यानी हुजूर येऊन विदित केले जे श्रीचा उछाह रामनवमीचा चालला पाहिजे त्यास काहीं नूतन इनाम जमीन करून दिल्ही पाहिजे त्यावरून मनास आणून मौजे मजकूर पैकीं पडजमीन बिघे ८१५ पंधरा देविली आसे तरी सदरहू जमीन चतुसीमापूर्वक नेमून देऊन कुलबाब कुलकानु हाली पटी पेस्तरपटी देखील इनाम तिजाई खेरीज हकदार याचे सिष्य परंपरा इनाम चालवणें प्रतिवर्षीं नवीन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची प्रति लेहून घेऊन हे पत्र भोगवटीयास परतोन देणें छ १७ जमादिलाखर [१]निदेश समक्ष

राजते
लेखना
वधी

बार

लेखांक ७ ] १७०१ आश्विन वद्य २ [ अस्सल-मोडी

श्रीशंकर

श्रीविद्याशकरभारति स्वामीकृत नारायण स्मरणान

ताा मोकदमानी मौज बारवे कर्यात कापसी यांसि आज्ञा केली

१ येथून अक्षर निराळें.

ऐसीजे सुा समानीन मया व आलफ गिरी गोसावी रामदासी वालवेकर यांसी धर्मादाव मौज मजकूर पौ भात केली मापे ०॥• आदमण देविले आसे देणे आणि पावतीचा कबज घेणे जाणिजे रा छ १६ माहे शवाल अज्ञेय मुलुसति ²

बार

---

लेखांक ८ ] १७१० माघ शुद्ध ६ [ अस्सल-मोडी

श्री

राजश्रीयाविराजित राजमान्यराजश्री कासी रघुनाथ
स्वामि गो यासी

सेवक श्रीनिवास शामराव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणे विशेष का वालवे येथे श्री रामदासस्वामीचा मठ आहे त्या संस्थानाकडे काचे सरदेशमुखी पौ रुो ५ पाच पावत असतात म्हणोन राजश्री माणकोपंत याणी येथें येऊन सांगितलें त्याजवरून हे पत्र तुम्हास लिहिले असे तरी येविसीची चौकसी करून वालवे येथील सरदेशमुखीचे ऐवजी पाच रुो सालाबाद पावत आलें असतील त्या प्रमाणें मठाकडें पावतें करणें रा छ ५ जोवल सुा तिसा समानीन मया व अलफ बहुतें काय लिहिणे हे विनंति

---

लेखांक ९ ] १७२३ चैत्र शुद्ध १२ [ अस्सल-मोडी

श्री


श्री ०
जीवाजी सु
पुत्रस्य रामरावस्य
धीमतःमुद्र¹ रा++
÷ पती राज++
वर्धिनी

आज्ञापत्र राजश्री रामराव जिवाजी चिटनिवीस ता मोकदमानी मौजे

---

१ येथून अक्षर निराळें. २ मोर्तब अस्पष्ट असल्यामुळें आंतील मजकूर लागत नाहीं.

बोरगाव पो सिरालें सुा इहिदे मया तैन व आलफ हरिभगत परायेण राजश्री गिरीबावा रामदासी मठ काा वालवें यांसी मौजे माार पैकीं वर्षासन सालाबाद रुा ५ पांच पावतात त्यास आलिकडे राजक्रांतांचे दंग्यामुळें दोन तीन सालें ऐवज पावत नाही गावकराकडून नख्ती पावत नाही याज करितां इनाम जमीन देऊन चालविलें पाहिजे म्हणून गोसावी बावानी विनति केली त्याजवरून मौजे माार पैकी नूतन इना(म) जमीन बिघा ८१ येक करार करून देविले असें तरी सदरहू येक बिघा जमीन साडेसात काठीचे हाते वहीत पैकी चतुःसीमा करून देऊन सिष्यपरंपरा चालवणें असल पत्राची प्रति लेहून घेऊन भोगवटियास गोसावियाजवल असल पत्र परतोन देणें दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें जाणिजे छ११ जिलकाद पाा हुजूर




बार

---

( ६ ) दुर्दैव आमचें कीं, अंबिकाबाईची याहून ज्यास्त माहिती मिळाली नाहीं. त्यांचें कांहीं कवन असावें, पण मला उपलब्ध झालें नाहीं, तरी प्रतापांत टिपेंत आपण जें पद दिलें आहे, तें च येथें श्रीचरणीं अर्पण करून हें अल्प वृत्त संपवितों.

मी सद्गुरुघरची सैरी शोभते बरी ॥ ध्रु० ॥ बाइ मज गोल्हाटीं गे राहाणें । तेथुनि श्रीहाटीं मज पाहणें । त्रिकुटशिखरीं येउनि जाणें । बोलत्ये बरी ॥ १ ॥ बाइ मी त्रिगुणीं खेळ खेळते । चतुर्थ गुणीं मी साक्षी होते । सदा मी येते जाते । भय न अंतरीं ॥ २ ॥ स्थूळ सूक्ष्म कारण । चौथा देहे महाकारण । स्थानें क्रीडायाचीं जाण । माजी हे बरी ॥ ३ ॥ आतां मी सर्वांसी ग्रासुनी । मोहातीत क्रीडते अनुदिनीं । निशंक वर्तते हो जनीं । पहा च्यातुरी ॥ ४ ॥ रामदासाश्रय ज्यां केला । ह्मणउनि विलास सर्व हि जाला । अंबी न विसरे गुरुपदाला । प्रतिज्ञा खरी ॥ ५ ॥

१८४१ वर्षप्रतिपदा

[ ८७ ]

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थांची शिकवण

## धडा चवदावा

## श्रीसमर्थांच्या ग्रन्थांचें प्रयोजन

### सावधान सावधान

**देश काळ वर्तमान। सर्व हि अवेवधान।**
**कोणतें विधी विधान। सावधान सावधान॥**

( १ ) निंदकाची स्तुति सर्व साधुसंतांनीं केलेली आढळते, ती उगींच नव्हे. जगांत निंदक असतात, गांवांत निंदक असतात, शेजारींपाजारीं निंदक असतात, म्हणून आपले असतील नसतील ते दोष कळण्याला मार्ग तरी होतो. निंदकानें केलेली निंदा वृथा असली तरी आपणांस तिचा उपयोग Danger Signal सारखा होतो. निंदा करून निंदक आपणांस सावध करीत असतो, आपल्या मार्गांतील खांचखळगे दाखवून आपणांस इशारा देत असतो. खरोखर, निंदकाचे हे जगावर केवढे उपकार म्हटले पाहिजेत ! स्वतःची मानसिक अधोगति पतकरून हि दुसऱ्यांवर उपकार करणाऱ्या निंदकांच्या संबंधानें साधुसंतांनीं जेवढे म्हणून उद्गार काढले आहेत, तेवढे सर्व एकत्र करूं म्हटल्यास खरोखर च एक मोठा ग्रन्थ होईल. त्या सर्वांचें तात्पर्य इतकें च कीं, निंदकासारखा परोपकारी प्राणी या त्रिभुवनांत दुसरा नाहीं ! प्रत्यक्ष आईची योग्यता निंदकापुढें कमी ठरते !

**माता थोर कीं पाहतां जनीं। ते मल काढी पृथक भाजनीं।**
**धन्य माझी निंदक जननी। जिव्हाकरूनि क्षाळिजे॥**

( २ ) निंदकाच्या चांगुलपणाची आज आठवण होण्याचें कारण असें कीं, अशा च एका निंदकाची निंदा वाचून प्रस्तुतचा धडा लिहावा, असा विचार मनांत आला. **श्रीमत् ग्रन्थराज दासबोध** याविषयीं लिहित असतां निंदकानें निंदा केली आहे, ती अशी:

> " सर्व ग्रन्थ अत्यंत अव्यवस्थित आहे. त्यांत एकंदर काय सांगितलें आहे हें च सांगणें कठीण आहे. " ( रामचंद्र भिकाजी जोशीकृत मराठी भाषेची घटना पृष्ठांक २६७ )

दोन ओळींत निंदक सहज निंदा करून गेला, पण त्यानें श्रीसांप्रदायिकांवर हे केवढे उपकार करून ठेवले आहेत. जो जो कोणी आतां यापुढें या निंदकमहात्म्याची निंदा चुकून वाचील तो तो स्वतःस प्रश्न करील कीं, खरोखर

च कां समर्थांचा ग्रन्थ ' अत्यंत अव्यवस्थित ' आहे व ' त्यांत एकंदर काय सांगितलें आहे हें च सांगणें कठीण आहे ' ? ह्या प्रश्नाचें उत्तर देतां यावें म्हणून, या दृष्टीनें प्रत्येकाला दासबोध वाचावा लागणार आहे. हें काय या निंदकाचें थोडे उपकार आहेत ? मी प्रांजलपणें कबूल करितों कीं, आजच्या या धड्याचें सारें श्रेय त्या निंदकाला आहे ! त्यानें निंदा केली नसती तर मला आजचा धडा सुचला नसता ! श्रीसमर्थांची व त्यांच्या ग्रंथाची त्यानें निंदा केली ह्मणून आज दोन तीन महिने आपणांस श्रीग्रन्थांचा सहवास घडला ! तेव्हां आपण हि श्रीसमर्थांचे च शब्दांत असें कां न ह्मणावें कीं,

**धन्य ते निंदक निंदिती सज्जन ।**
**येणें भावें ध्यान घडे त्यांचें** ॥ स्फु. ओ. ४७–७

सज्जनांची निंदा करणाऱ्या निंदकांची धन्य होय, कीं निंदेच्या निमित्तानें तरी त्यांना सज्जनांचें ध्यान घडतें, असा याचा अभिप्रेत अर्थ आहे; पण; आजच्या प्रसंगीं याचा असा हि अर्थ करितां येईल कीं, अशा निंदकांची धन्य होय कीं, त्यानें निंदा केली ह्मणून आपणांस हि सज्जनांचें व त्यांच्या ग्रन्थांचें ध्यान घडलें ! अशा अर्थी, इतर सामान्य निंदकांची एकपट धन्यता तर प्रस्तुत निंदकाची दुहेरी धन्यता होय !

( ३ ) दासबोधाचेंचसें काय, पण श्रीसमर्थांच्या एकंदर ग्रन्थांचें प्रयोजन कोणतें, असा आपणांस प्रश्न आहे. त्याचें आपण जें उत्तर देऊं तें निंदकाला पटेल च अशी मला खात्री नाहीं, किंबहुना पटणार नाहीं अशी च उलट खात्री वाटते, कारण

**जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा ।**
**मत्सर धरी जो पुंसा । तयास तें चि प्राप्त** ॥ १–१–३८

असा न्याय आहे. निंदकाचें समाधान करण्याचें सामर्थ्य ब्रह्मदेवांत हि नसतें, असें ह्मणतात, तेथें आपला पाड तो किती ? पण, निंदकाचें जरी नाहीं, तरी यायोगें इतरांचें समाधान होईल, अशी मला आशा आहे. मी जें काय ह्मणतों तें बरोबर आहे कां कांहीं तरी आहे, याचा प्रत्येकाच्या मनाशीं निश्चय व्हावा, ह्मणून वाचकांना माझी अशी विनंति आहे कीं, अप्रकाशित ग्रन्थ तूर्त बाजूस राहोत, पण त्यांनीं अगोदर या दृष्टीनें आणखी एकदां दासबोध ग्रन्थ वाचावा, श्री श्लोक मनाचे ह्मणावेत व तिसऱ्या भागांत श्रीसमर्थांची जी स्फुट कविता आली आहे ती एकवार दृष्टीखालून घालावी आणि मग मनाला विचारावें, श्रीसमर्थांच्या ग्रन्थांचें प्रयोजन कोणतें ? किंवा अलिकडे प्रत्येकाच्या तोंडीं बसलेला शब्द वापरावयाचा तर, श्रीसमर्थांच्या कवितेचें रहस्य काय ? श्रीसमर्थांच्या ग्रन्थांचें धोरण

ग्रंथ संग्रहालय ठाणे

एका शब्दांत सांगतां येईल काय ? त्यांचें सारें चरित्र कळण्याची, त्यांचे सर्व ग्रन्थ लावतां येण्याची किल्ली कोणती की जी हातीं आली म्हणजे त्यांच्या ग्रन्थभांडारगृहाचीं सर्व कपाटें पटापट उघडलीं जाऊन त्यांत सांठविलेलीं अमोल रत्नें आपल्या हस्तगत होतील !

**ते किल्ली ते कवण । मज करावी निरूपण ।**
**ऐसा श्रोता पुसे खूण । वक्तयासी ॥**

( ४ ) श्रीसमर्थांच्या चरित्राला जेथून आरंभ झाला तेथें च त्यांच्या चरित्राचें आणि ग्रन्थांचें रहस्य आहे, त्यांत च ती किल्ली आहे !

**रामचंद्र धरुनि मनीं । काम क्रोध ताप हरुनी ।**
**सावधान म्हणतां गेला पळोनी । रे गडियानो ॥**

येथून श्रीचरित्राला आरंभ होतो ! या **सावधान** शब्दांत श्रीसमर्थांचें सारें चरित्र येतें ! जगाला सावध करण्यासाठीं स्वत: सावध होऊन, सर्व पाश झुगारून ते निसटले ! ज्या क्षणीं ते निसटले तो क्षण अपूर्व होय ! त्या क्षणीं त्यांना दिव्य दृष्टि प्राप्त झाली, त्यांच्या विशाल दृष्टीला सारें त्रिभुवन दिसूं लागलें, भूतभविष्यवर्तमानकाळाचें त्यांना ज्ञान झालें ! श्रीसमर्थचरित्रात च नव्हे तर एकंदर महाराष्ट्राच्या इतिहासांत हि तो क्षण अपूर्व म्हटला पाहिजे. महाराष्ट्रांतील कर्तव्यमूढ जनतेला जागृत करण्यासाठीं ज्या क्षणीं श्रीसमर्थांनीं घराचा उंबरठा ओलांडला त्या क्षणापासून च महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाला आरंभ होतो. त्या क्षणीं ते स्वत: सावध झाले आणि तेव्हांपासून त्यांनीं आपल्या चरित्रानें आणि आपल्या ग्रन्थांनीं इतरांना सावध केलें, हल्लीं ते करीत आहेत व यावच्चंद्रदिवाकरौ करीत राहतील.

( ५ ) सर्व भरतखंडभर पर्यटण करून देशाची अवनत स्थिति व धर्माला आलेली ग्लानी पाहून त्याचें चित्त कळवळलें. सर्वांना स्वकर्तव्याचा बोध करून जागृत करण्याची त्यांनीं प्रतिज्ञा केली. मुलांना तरुणांना आणि वृद्धांना, स्त्रियांना आणि पुरुषांना, ब्राह्मणांना आणि क्षत्रियाना, वैश्यांना आणि शूद्रांना, राजाला आणि प्रजेला, भाग्यवानाला आणि करंट्याला, सिद्धाला आणि बद्धाला, साधकाला आणि मुमुक्षूला, गुरूला आणि शिष्याला, निस्पृहाला आणि संसारिकाला, विरक्ताला आणि आशाळभूताला, ब्रह्मचारियाला आणि गृहस्थाश्रमियाला, व्यावहारिकांना आणि राजकारणी पुरुषांना, पुण्यवंताला आणि पाप्याला, तुम्हाला आणि आम्हांला, सर्वांना, यच्चयावत् प्राणिमात्राला त्यांनीं ‘ हुश्शार ’ केलें आहे.

**लाहान थोर काम कांहीं । केल्यावेगळें होत नाहीं ।**
**करंट्या सावध पाहीं । सदैव होसी ॥** १२-९-६
**अंतरीं नाहीं सावधानता । येत्न ठाकेना पुरता ।**

**सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ॥ ७ ॥**
**ह्मणौन आळस सोडावा । येत्न साक्षपें जोडावा ।**
**दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ ८ ॥**

असा करंट्याला उपदेश केला आहे.

**शिष्य पाहिजे परम** सावध ॥ ५-३-२५

असें शिष्याचें एक लक्षण दिलें आहे.

सावधपणें **करीत जावा । संसार आपुला** ॥ १२-१०-२

अशी संसारिकाला इशारत दिली आहे. मोठा विरक्त झाला ह्मणून त्यानें कांहीं अंगाला राख लावून, सर्वसंगपरित्याग करून, जगाबाहेर कोठें जावयाचें नाहीं, तर

**विरक्तें** सावध **असावें । विरक्तें शुद्धमार्गें जावें ।**
**विरक्तें झिजोन उरवावें । सत्कीर्तीसी** ॥ २-९-२३

नुसती श्रोत्यांची प्रार्थना करितांना देखील श्रीसमर्थ ह्मणतात

**जे अखंड** सावधान **। जयांस त्रिकाळाचें ज्ञान ।**
**सर्व काळ निराभिमान । आत्मज्ञानी** ॥ १-६-८

व्यवहारांत तरी एरव्हीं यश कोठून येईल ?

**अंतरीं च** सावधान **। उत्तरीं अवेवधान ।**
**सांवरी प्रसंगमान । यावरी विधी विधान** ॥ श्लो. ३२
**येत्न पुरता करी । सदा विचार वीवरी ।**
**चतुर तो परोपरीं । तया सरी मनोहरी ॥ २ ॥**

खुद्द शिवाजीराजांना तरी दुसरा तिसरा कोणता उपदेश होता ? श्रीसमर्थांनीं अंतसमयीं श्री शंभु छत्रपतीस जो उपदेश केला त्यांत त्यांना सांगितलें कीं,

" पूर्वी राजश्रीस ( शिवछत्रपतीस ) राजधर्म व क्षात्रधर्म व **अखंड सावधान** ऐसीं पत्रें पाठविलीं होतीं तीं पत्रें प्रसंगानसार वाचून मनासी आणून वर्तुणूक होईल तरी त्या वचनाचा अभिमान श्री देवासी आहे "(सांप्रदायिक कागदपत्रें ले.४३ )

हें **अखंड सावधान** पत्र कोणतें तें वाचकांना माहीत आहे च.

**कोणाचा भरंवसा न धरावा । आपुला आपण विचार पहावा ।**
**तकवा उदंड धरावा । कांहीं येक विषयीं ॥ १ ॥**

असें तें बारा ओव्यांचें पत्र प्रसिद्ध आहे. त्या पत्राला श्रीसमर्थांनीं च **अखड सावधान** असें नांव दिलेलें आहे. शिवछत्रपतींना पाठविलेल्या या **अखंड सावधान** पत्राचा हवाला देण्यापूर्वीं खुद्द शंभुछत्रपतींना जें पत्र पाठविलें होतें त्यांत तरी

अखंड सावधान असावें । दुश्चीत्त कदापि नसावें ॥

हा च उपदेश होता. हा अखंड सावधानतेचा उपदेश जसा त्यांनीं शंभुशिवछत्रपतींना केला तसा च तो इतरांना हि केला.

अखंड सावधान रे । प्रयोग प्रेत्न मान रे ।
प्रसंग हा तुफान रे । नको चि वेवधान रे ॥ स्फु. श्लो. ८
मनीं धरूनि धारणा । करा बरी विचारणा ।
प्रेत्न मूळ कारणा । अतर्क्य ते विचारणा ॥ २ ॥
बहु विधी विधान हो । परंतु सावधान हो ।
प्रमाण जाण उत्तरें । प्रत्योत्तरें निरोत्तरें ॥ ३ ॥
आहो जना आहो जना । मनें मना विवंचना ।
आरत्र हो परत्र हो । प्रचीत पाववी मोहो ॥ ४ ॥
म्हणे उदास दास हा । बरें पहा बरें पहा ।
करील प्रेत्न जीतुका । तयास लाभ तीतुका ॥ ५ ॥

असा त्यांचा सर्वांना उपदेश होता.

( ६ ) प्रपंचांत काय किंवा परमार्थांत काय मनुष्यानें सावध असलें पाहिजे, अशी त्यांची शिकवण आहे.

आरत्र हो परत्र हो । विचित्र काळसूत्र हो ।
अखंड सावधानता । सभाग्य तो नव्हे रिता ॥ श्लो. १०/२

आरत्र हो परत्र हो, म्हणजे प्रपंच असो कीं परमार्थ असो, उभयत्र **अखंड सावधानता** पाहिजे. जो सावधपणें प्रपंच करील तो च परमार्थ करूं शकेल. प्रपंचाविषयीं बेफिकीर राहून जो परमार्थ करूं म्हणेल तो फसेल, तो दोहोंला हि मुकेल. प्रपंचांतलें भाग्य आणि परमार्थांतलें वैराग्य हीं दोन्हीं साधलीं पाहिजेत. यासाठीं प्रपंच आणि परमार्थ दोन्हीं हि सावधानपणें चालिविलीं पाहिजेत.

प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ १२-१-९
ह्मणौन सावधानपणें । प्रपंच परमार्थ चालवणें ।
ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें ॥ १० ॥
पर्णाळि पाहोन उचले । जीवसृष्टि विवेकें चाले ।
आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काये ह्मणावें ॥ ११ ॥
ह्मणौन असावी दीर्घ सूचना । अखंड करावी चाळणा ।
पुढील होणार अनुमाना । आणून सोडावें ॥ १२ ॥
सुखी असतो खबर्दार । दुःखी होतो बेखबर ।
ऐसा हा लोकिक विचार । दिसत चि आहे ॥ १३ ॥

म्हणौन सर्व सावधान । धन्य तयाचें महिमान ।
जनीं राखे समाधान । तो चि येक ॥ १४ ॥

सर्व सावधान म्हणजे अखंड सावधान. दीर्घ सूचना, अखंड चाळणा, खबर्दार, सर्व सावधान हे चार हि एक च.

( ७ ) भांबावलेल्या जनतेला ताळ्यावर आणण्यासाठीं श्रीसमर्थांचा अवतार झाला. देशाची आणि धर्माची घडी बिघडली होती ती पुन्हां नीट करण्यासाठीं त्यांना जन्म घ्यावा लागला. सर्वांना त्यांनीं सावध केलें. त्यांनीं आपल्या संप्रदायाचें जें लक्षण बांधलें आहे, त्यांत साक्षात् आणि गर्भितार्थानें सर्वत्र सावधानता भरलेली आहे.

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्वविषईं ॥ ११-५-४
चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप ।
अन्याये थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ॥ ५ ॥
जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर ।
नीतिन्यायासी अंतर । पडों च नेदावें ॥ ६ ॥
संकेतें लोक वेधावा । येकूनयेक बोधावा ।
प्रपंच हि सावरावा । येथानशक्तया ॥ ७ ॥
उपाधीसी विस्तारावें । उपाधींत न संपडावें ॥ ९ ॥
दोष देखोन झांकावें । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ १० ॥
नव्हे तें चि करावें कार्यें । दीर्घ प्रेत्नें ॥ ११ ॥
दुसऱ्याचें अभीष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें ।
न सोसे तरी जावें । दिगांतराप्रती ॥ १३ ॥
क्रिया करून करवावी । बहुतांकरवीं ॥ १६ ॥
करणें असेल अपाये । तरी बोलोन दाखऊं नये ।
परस्परें चि प्रत्यये । प्रचीतीस आणावा ॥ १७ ॥
राजकारण बहुत करावें । परंतु कळों च नेदावें ।

अशा या सावधानशिकविणीचा सारखा प्रवाह चालला आहे. त्याचें निंदकाला आकलन होईना, म्हणून तो बरळत सुटला कीं, दासबोधांत काय सांगितलें आहे, तें च सांगतां येत नाहीं ! निंदकानें दासबोधाचा नुसता पहिला समास वाचला असतां किंवा वांचून क्षणभर त्याचा विचार केला असतां तर त्यास कळलें असतें कीं, दासबोधांत एक च विषय नाहीं तर

विविध विषय आहेत. श्रीसमर्थांना लहानांपासून तों थोरांपर्यंत सर्वांना च सावध करावयाचें होतें, तऱ्हेतऱ्हेच्या लोकांचे नाना किंत निवारावयाचे होते, त्यांचे अनेक संशय छेदावयाचे होते, त्यांच्या असंख्य शंका फेडावयाच्या होत्या, त्यांना स्वहिताचा मार्ग दाखवून त्या मार्गाला लावावयाचें होतें ! जो जो कोणी श्रीसमर्थांच्या जवळ गेला, ज्यानें ज्यानें त्यांच्या चरणांचा आश्रय केला, त्याला त्याला ममतेनें कुरवाळून, क्वचित् धाक दाखवून, त्यांनीं सावध केले, त्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें त्यास बोध केला ! यायोगें त्यांच्या शिकवणीला साहजिक च विविधता आली आहे. ही विविधता पाहून निंदकाची दृष्टि तरळली, विविधता ह्मणजे च अव्यवस्था असें मानून तो बरळूं लागला कीं, समर्थांचा सर्व ग्रन्थ अत्यंत अव्यवस्थित आहे !

( ८ ) वरील विवेचनावरून श्रीसमर्थांच्या शिकवणीचें धोरण काय तें वाचकांच्या लक्षांत आलें च असेल. तथापि, अजून हि कोणास शंका असली तर, त्याचें समाधान व्हावें ह्मणून, श्रीसमर्थांनीं आपल्या अवताराचें प्रयोजन एका लहानशा प्रकरणांत स्वमुखें सांगितलें आहे, तें प्रकरण देऊन हा घडा संपवूं.

हुश्शार भाई नो हुश्शार । अवध्यानी असावें खबरदार ।
काळोखें पडताती फार । येकासी येक दिसेना ॥ १ ॥
चोराचे कळप फिरती । अवचिता दगा करिती ।
निजों नका जागवितों राती । मी दिवटा साहेबाचा ॥ २ ॥
हिलालखोर साहेबाचा । नफर आहे इतबाराचा ।
मज राती जागावयाचा । हुद्दा दिधला जी ॥ ३ ॥
मी सारी राती जागतों । अठरा माहालाची खबर घेतों ।
साही नजरेंत राखितों । मनीं धारितों चहुंचें गुज ॥ ४ ॥
मी सकळिकाचें करितों बरें । परी मज न मानिती अहंकारें ।
घोरों लागती झोंपीच्या घोरें । ते समूळ नागवती जी ॥ ५ ॥
जे मजला मानिती । माझ्या विचारें वर्तती ।
ते हरगिस झोला न पावती । न नाडती जी ॥ ६ ॥
जे जे झोंपेनें पीडले । ते ते अवघे चि नाडले ।
यमयातनेस ज्ञुडले । पाहुणेरु ध्यावया ॥ ७ ॥
तेथें मदभरें ज्ञुडले । ते जन्ममरणराहटीं जोडिले ।
सुटका नव्हे चि पडिले । बांधोनिया जी ॥ ८ ॥
अरे जागा स्वरूपीं जागा । मुक्तीचा सोहळा भोगा ।
कर्माकर्म आंगा । लागों चि नेदावें ॥ ९ ॥

अरे हुश्शार हुश्शार हुश्शार । झोंपेनें नाडले थोर थोर ।
म्यां जे जे केले खबरदार । ते ते कडेस पडिले जी ॥ १० ॥
महादेव निजेनें भ्रमला । विख घेऊनि तळमळूं लागला ।
मग म्यां खबरदार केला । तो वाचला दो अक्षरीं ॥ ११ ॥
स्वामी कार्तिक निजेनें भ्रमला । बळें चि परस्त्रिया भोगूं लागला ।
मात्रागमन घडावें त्याला । तो म्यां केला खबरदार ॥ १२ ॥
महाविष्णु निजेनें भ्रमला । परस्त्रीमोहन जोगी जाला ।
तो म्या खबरदार केला । मोह दवडिला शक्तीचा ॥ १३ ॥
ब्रह्मा निजेनें भ्रमला । चोरांनीं समूळ नागविला ।
सकळ धर्म बुडाला । दुकाळु पडला मोठा जी ॥ १४ ॥
तो म्या खबरदार केला । मग बापातें स्मरला ।
तेणें येऊनि चोर मारिला । लंकेचें वित्त दिधलें जी ॥ १५ ॥
नारद अभिमानें निजेला । बायको होऊनि साठी लेक व्याला ।
तो म्या खबरदार केला । तो पावला पहिला वेश ॥ १६ ॥
चंद्रें मानिलें नाहीं मजला । अभिमानें चि निजेला ।
तो क्षयरोगी जाला । नाडला आपले करणीनें ॥ १७ ॥
इंद्रें मानिलें नाहीं मजला । हजार भोकें पडलीं त्याला ।
शुक्रें डोळा फोडूनि घेतला । न मानी मजला ह्मणउनियां ॥१८॥
दक्ष निजेनें भ्रमला । मानिलें नाहीं मजला ।
पूर्व शिरासी मुकला । जाला पैं तो बोकडमुखी ॥ १९ ॥
गुरूनें मानिलें नाहीं मजला । बाईल गमाऊनि बैसला ।
यम निद्रेनें व्यापला । जाला केवळ दासीपुत्र ॥ २० ॥
रावण निजेनें भ्रमला । कुळक्षयो करूनि शोकीं पडला ।
मग म्या खबरदार केला । तो जाला रामरूप ॥ २१ ॥
ऐसे ऐकोनि दृष्टांत । सावध होऊनि कराल स्वहित ।
तरी आपुले फळ भोगाल समस्त । मी हुश्शार करितों जी ॥
मी सांगोन उतराई । कोणास कांहीं मागत नाहीं ।
परोपकारास्तव पाहीं । मी सांगतों जी ॥ २३ ॥
ऐसे दिवटा बोलोनी । घडि घडि हांक देऊनी ।
दास ह्मणे दिवस्यास मानी । तो चि तरेल मोहराती ॥ २४ ॥
ऐसा हा दिवटा । समर्थाचा जाणावा सुभटा ।
जे अनुभविती संसारचोहटा । न येता समर्था ॥ २५॥

या प्रकरणाच्या मननांत मग्न होऊन येथें च थांबावें.

[ ८८ ]

॥ श्रीराम ॥

## श्रीसमर्थप्रताप

व

# अफझुलखानाचा वध

**समर्थें आकारपूर्वक यवनासी मारविलें ।**
**मग चांफळक्षेत्र उभें केलें ।**
**श्रीतुळजामाउलीसी संस्थापिलें ।**
**जाउलीपर्वतीं प्रतापगडीं ॥ स. प्र. १८–३६**

( १ ) श्रीसमर्थप्रतापग्रन्थाची मी आजवर पुष्कळदां स्तुति केलेली आहे व त्या ग्रन्थाची किती हि आणि कितीशं जरी स्तुति केली तरी, माझ्या दृष्टीनें, ती अपुरी च होणार आहे. ती ऐकतांना वाचकांना मात्र जर कंटाळा येत असेल तर, आज योजिल्याप्रमाणें एकवार त्या ग्रन्थाकडे वळून यापुढें त्या ग्रन्थाशीं जें हितगुज करावयाचें तें मनांतल्या मनांत करूं. आजच्या पुरती वाचकांनीं क्षमा करावी.

( २ ) श्री रामदासी ग्रन्थमालेंत आतांपर्यंत जे ग्रन्थ प्रसिद्ध झाले आहेत व प्रकाशनाची वाट पहात सभेच्या संग्रहीं जे ग्रन्थ आहेत, त्या सर्व ग्रन्थांत–अर्थात् प्रत्यक्ष श्री समर्थांचे ग्रन्थ वगळून–माझा अत्यन्त आवडता, मला अत्यन्त प्रिय वाटणारा ग्रन्थ ह्मटला ह्मणजे **श्रीसमर्थप्रताप** ग्रन्थ होय. प्रत्येक श्रीसमर्थाभिमानी सज्जनानें हा ग्रन्थ अवश्य वाचला पाहिजे, इतकें च काय पण, निंदा करण्याला प्रवृत्त होण्यापूर्वीं प्रत्येक निंदकानें हि या ग्रन्थाचें अवलोकन केलें पाहिजे. मला अशी खात्री आहे कीं, या ग्रन्थाच्या वाचनानें निष्ठावंताची निष्ठा दुणावेल व निंदकाची मति पालटेल. श्रीसमर्थचरणीं ज्यांचा पूर्ण भाव आहे, त्यांची बुद्धि दृढ होईल, यांत काय नवल आहे, पण या ग्रन्थाच्या वाचनानें

**पापी ते चि प्रस्तावती । निंदक ते चि वंदूं लागती ॥**

अशी मी हमी देतों. श्रीसमर्थांचें यथार्थ रूप, सगुणरूप व निर्गुणरूप, श्रीसमर्थांचें अंतर्बाह्य सत्स्वरूप आपण पहावें, अशी ज्याला तळमळ वाटत असेल त्यानें श्रीसमर्थप्रतापग्रन्थाचा ध्यास घ्यावा !

२४

**त्यांचे सर्व हि मनोरथ पुरती ।**
**सद्गुरुसमर्थप्रतापें ॥**

असा या ग्रन्थाचा महिमा आहे ! या ग्रन्थाच्या श्रवणमनननिदिध्यासानें भक्ताच्या हृदयांतरीं श्रीसमर्थांचें स्वरूप प्रकट होईल ! श्रीसमर्थचरित्रांतील सर्व कोडीं या ग्रन्थाच्या सहाय्यानें उलगडतील ! ग्रन्थ नुसता वाचून भागणार नाहीं.

**हें आहाच पाहातां नातुडे ॥**

ग्रन्थाचें मनन झालें पाहिजे ! ग्रन्थ वेदांतपर नाहीं, केवळ चरित्रपर आहे, हें खरें, पण तरी मनन पाहिजे. " लपावें अती आदरें रामरूपीं । " त्याप्रमाणें ग्रन्थांतील प्रत्येक ओवीच्या आड श्रीसमर्थ दडून बसले आहेत ! आणि ह्मणून नुसती ओवी वाचून कार्य होणार नाहीं, तर ओवीच्या मागें, ओवीच्या आंत, जेथें श्रीसमर्थ आहेत तेथें दृष्टि पोचविली पाहिजे. कॉलेजांतील माझे सहाध्यायी, ज्यांच्या सुस्वभावाबद्दल माझें तेव्हांपासूनचें प्रेम अजून कायम आहे, ज्यांच्या निष्कपटपणाबद्दल मला वाटणारा आदर, जगाला दिसणाऱ्या त्यांच्या चारित्रामुळें यत्किंचित् हि कमी झाला नाहीं, ते माझे मित्र **प्रो. गोविंद चिमणाजी भाटे** या दृष्टीनें एकवार श्रीसमर्थप्रतापाकडे पाहण्याची तसदी घेतील काय ?

( ३ ) या ग्रन्थाचें इतकें महत्त्व काय आहे, त्याचे कर्ते कोण, त्यांच्या वचनांचें प्रामाण्य किती, ते केव्हां होऊन गेले वगैरे माहितीसाठीं **प्रतापाची** प्रस्तावना पहावी. त्या सर्व गोष्टी पुनरपि आज सांगण्याचा हेतु नाहीं व आवश्यकता हि नाहीं. आज इतकें च ह्मणतों कीं जों जों या ग्रन्थाचें मनन होईल तों तों श्रीसमर्थ प्रकट होतील ! जे एकाला दिसणार नाहीं, तें कदाचित् दुसऱ्याला दिसेल ! जें मला कळणार नाहीं, तें तुह्मांस कळेल ! आणि तसें च आज झालें आहे. या लेखाच्या मथळ्यावर दिलेल्या ओवीचा अर्थ माझ्या लक्ष्यांत आला नव्हता, तो दूरच्या एका श्रीसमर्थभक्ताला सुचला आहे, आणि तो च अर्थ बरोबर आहे, असें मला वाटतें. **पेडणें–गोवा** येथून श्रीगुरुभक्तिपरायण **दत्तात्रेय तुकाराम पणशीकर** यांचें एक पत्र आलें आहे, त्यांत ते ह्मणतातः—

" आपण प्रसिद्ध केलेल्या श्रीमद्गिरिधरकृत श्रीसमर्थप्रताप ग्रन्थाच्या १८ व्या समासांतील २६ व्या ओवीच्या प्रथमचरणांतील आकारपूर्वक या

शब्दावर आपली टीप अशी आहे– ' आ आहे पूर्वी ज्याच्या अशा यवनासी, ह्मणजे आयवनासि, ह्मणजे यच्चयावत् यवनासी. ' आपण केलेल्या या अर्थाविषयीं मला आलेली शंका जिज्ञासाबुद्धीनें आपणांस कळवीत आहे, त्याबद्दल आपलें मत उत्तरीं कळेल अशी आशा आहे. माझ्या मतें ' **आकारपूर्वक यवनासी ' ह्मणजे ' ज्याच्या नांवाचें पहिलें अक्षर आ आहे अशा यवनासी ह्मणजे आफझुलखान यासी '.** आपण केलेला अर्थ फार व्यापक आणि ह्मणून च अशक्यसा वाटतो. शिवाय मी केलेला अर्थ प्रसंगाला अनुसरून व संदर्भाला धरून आहे. मी ह्मणतों तो अर्थ बरोबर असेल तर आफझुलखानाच्या वधप्रसंगीं महाराज श्रीसमर्थांच्या दर्शनास आले असतां

अखंड चि सावधान । **बहुत कार्ये करावी सूचना ।**

असा महाराजांचा गौरव करून त्यांना १८ व्या दशकाच्या ६ व्या समासांतील उपदेश केला, अशी जी सर्वतोमुखीं आख्यायिका प्रसिद्ध आहे, तिला गिरिधरांच्या ओवीचा प्रत्यंतर सबळ पुरावा मिळत आहे. जाउली, प्रतापगड, आफझुलखानाचा वध, तुळजामाउलीची संस्थापना, या अन्योन्यसंबद्ध चार हि गोष्टींचा एका च ओवींत समावेश झाल्यामुळें माझा अर्थ खरा आहे, असें निःसंशय वाटूं लागतें. आकारपूर्वक यवन म्हणजे आफझुलखान, अशा प्रकारची सांकेतिक भाषा लिहिण्याचा प्रकार पेशवाईच्या वेळच्या पत्रांतून हि दृष्टीस पडतो, जसें– सकारनामक म्हणजे सखाराम बापु, रकारनामक म्हणजे रघुनाथराव इत्यादि. ह्या ओवींतील **मारविलें** ह्या प्रयोजक क्रियापदावरून जो अर्थ ध्वनित होत आहे, तो तर फार च महत्त्वाचा आहे. मागें बऱ्या च वर्षांपूर्वी ज्ञानप्रकाशाच्या एका जुन्या अंकांत शिवाजीमहाराजाना उद्देशून कल्याणस्वामींचें म्हणून छापलेलें एक ओवीबद्ध पत्र वाचल्याचें मला पक्कें आठवतें. त्याचें साल किंवा अंक मला स्मरत नाहीं, पण त्यांतील प्रत्येक चरणाचें आद्याक्षर घेऊन ओळीनें वाचल्यास " अफझुलखान निघाला सावध असा " असें किंवा अशा अर्थाचें तें वाक्य होत होतें. प्रस्तुत ओवीवरून तर आतां

---

१ दहा पांच वर्षांमागें मिरजेकडील कोणी एकानें श्रीशिवछत्रपतींचें एक जुनें चरित्र छापलें होतें, त्यांत सदरहु ओवीबद्ध पत्र टिपेंत वाचल्याचें मला आठवतें. आद्याक्षरांवरून ' विजापुराहून सरदार निघाला ' असा अर्थबोध होत होता.

या प्रकरणीं श्रीसमर्थांकडून महाराजास सल्ला मिळाली होती हें स्पष्ट च होत आहे. अर्थात् यावरून आफझुलखानाच्या वधापूर्वीं च श्रीसमर्थ व श्रीशिवछत्रपति यांची भेट झाल्याचें ऐतिहासिक सत्य निर्विवादपणें सिद्ध होत आहे. आतां हें ऐतिहासिक सत्य प्रो. भाटे, रा. चांदोरकर वगैरेंना किलपत रुचेल, ही गोष्ट वेगळी. एकंदरींत विचार करितां सदरहु ओवींतील आकारपूर्वक यवन म्हणजे आफझुलखान असावा असें मला निःसंदेह वाटतें. ओवीचा सरळ अर्थ असा--' समर्थांनीं आफझुलखानास मारविलें मग चाफळक्षेत्राची प्रतिष्ठा वाढविली व जावळीनजीकच्या प्रतापगडावर श्रीतुळजाई देवीची स्थापना केली. ' याविषयीं आपलें मत कळवावें. शिवसमर्थांच्या प्रथम भेटीविषयीं चाललेल्या वादांत आतां आपलें ठाम मत काय झालें आहे तें हि कळविण्यांत यावें. श्रीशिवकाव्य रचण्यास मी घेतल्यामुळें त्या भेटीचा निश्चित काल समजण्याची मला फार आवश्यकता आहे; इत्यादि ''

( ४ ) या अर्थाविषयीं मला शंका वाटत नाहीं. तो इतिहासाशीं सर्वथैव जुळता आहे व तो **दत्तात्रयपंत पणशीकर** यांना सुचला ही त्यांच्यावर श्रीसमर्थांची मोठी कृपा होय, असें मला वाटतें. श्रीसमर्थप्रतापग्रन्थाचा इतक्या आस्थेनें अभ्यास करणारे पणशीकरांसारखे श्रीसमर्थभक्त महाराष्ट्रांत आहेत, हें पाहून मला आनंद वाटतो. प्रो. भाटे वगैरेंच्या संबंधानें पणशीकरांनीं जी काळजी दाखविली आहे तिचें कांहीं कारण नाहीं, कारण प्रो. भाटे व त्यांच्या संप्रदायाची मंडळी यांच्या पेक्षां आपणांस सत्याची काळजी जास्त आहे. कोणास काय वाटेल किंवा कोणाचें स्वास्थ्य बिघडेल या विवंचनेपेक्षां आपणांस यथार्थ ज्ञानाची अपेक्षा जास्त आहे. आपणांस श्रीसमर्थांना पहावयाचें आहे, ते जसे होते तसे अगदीं हुबेहुब, आपणांस त्यांना पहावयाचें आहे, त्यांचें सत्स्वरूप ओळखावयाचें आहे. असें करीत असतां कोणाच्या सुखस्वप्नाची पर्वा करण्याचें आपणांस कांहीं कारण नाहीं. प्रो. भाट्यांच्या त्या पुस्तकाचा आपणांस केव्हां तरी यथास्थित समाचार घ्यावयाचा च आहे, पण तत्पूर्वीं मधून मधून त्या पुस्तकांतील विचित्र विधानांची थोडथोडी शहानिशा होत गेली तर वावगें होणार नाहीं. खरोखर, प्रो. भाटे, रा. जोशी वगैरे सकारण आणि अकारण निंदकांचे आपणांवर हे उपकार नाहींत काय, कीं ते आपणांस श्रीसमर्थस्वरूपीं सारखे जागवीत आहेत ?

( ५ ) पणशीकरांनीं वरील ओवीचा जो अर्थ केला आहे, तो सरळ आणि सुसंगत आहे. आफझुलखानाचा वध १५८१ त झाला, त्या च सुमारास चाफळक्षेत्राचा हि महिमा महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं झाला व प्रतापगडावर देवीची स्थापना १५८३ त झाली. प्रतापगडचा किल्ला मोरो त्रिमल १५७८ त बांधतात आणि त्यावर श्रीसमर्थ देवीची स्थापना १५८३ त करितात आणि प्रो. भाटे आणि त्यांचे सांप्रदायी म्हणतात कीं १५९४ पर्यंत शिवसमर्थांची मुळीं भेट च नाहीं ! चाफळचें देवालय बांधण्यास १५७१ त सुरवात झाली तेव्हां

समर्थआज्ञा पुसे शिवराजा ।
श्रीरघुनाथदेवालय मी बांधेन वोजा ।
समर्थ ह्मणती शिष्यसमुदाय माझा ।
देवालयें करवीन अनंत हस्तें ॥ स. प्र. १९–१६

तरी प्रो. भाटे १५९४ ला च चिकटून बसणार ! प्रो. भाट्यांच्या धाष्टर्याचें मला एक मोठें नवल वाटतें. त्यांनीं आपलें तें अलौकिक पुस्तक गेल्या सालीं प्रसिद्ध केलें तेव्हां श्रीसमर्थप्रताप प्रकाशित होऊन सहा वर्षें होऊन गेलीं होतीं. एकादें निराळें विचित्र मत दडपून देण्यापूर्वीं तत्संबंधाचें पूर्वींचें सर्व वाङ्मय पाहणें व त्यांतील विरुद्ध सिद्धांतांची वाट लावणें हें प्रामाणिक टीकाकाराचें कर्तव्य होय, असें मी समजतों. पण श्रीसमर्थप्रतापसूर्याकडे प्रो. भाट्यांना पाहवलें हि नाहीं. हनुमंतस्वामिकृत बखरीविषयीं भाटे केवढें अकाडतांडव करितात, पण बखर १७१५ तील तर प्रताप १६५१ पूर्वींचा, असें असतां प्रतापाची उपेक्षा प्रो. भाट्यांनीं करावी, याचें कारण अज्ञान किंवा अप्रामाणिकपणा याहून निराळें कोण काय सांगणार ? या सर्व साधनांची वाट लावण्याची प्रो. भाटे यांची तऱ्हा ठरून गेलेली आहे. 'आपल्या आराध्य दैवताचें देव्हारें माजविण्याकरितां' 'रामदासांच्या शिष्यांनीं श्रद्धाबुद्धीनें लिहिलेलें हे सर्व ग्रन्थ होत,' 'त्यांत ऐतिहासिक व विचिकित्सक बुद्धि कमी आहे.' तात्पर्य,

आपण तुरुक गुरु केला ।
शिष्य चांभार मेळविला ॥

अशा एकाद्या गुरूचा किंवा शिष्याचा प्रो. भाट्यांना आधार दिला पाहिजे, तेव्हां त्यांचें समाधान होईल ! असो.

( ६ ) प्रो. भाव्यांशीं आज आपणांस कांहीं विशेष कर्तव्य नाहीं. ऐतिहासिक दृष्टीनें श्रीसमर्थप्रताप ग्रन्थाची योग्यता फार मोठी आहे. गिरिधरांनीं श्रीसमर्थांना प्रत्यक्ष पाहिलें होतें व त्यांच्या सांनिध्यांत कांहीं काळ घालविला होता. इतका प्रमाणभूत चरित्रग्रन्थ आतांपर्यंत दुसरा उपलब्ध नाहीं. सदरहु ग्रन्थांत सर्वत्र श्रीसमर्थ व्यापून उरले आहेत व श्रीसमर्थांना आपण पहावें अशी ज्या वाचकांना इच्छा असेल त्यांनीं श्रीसमर्थप्रतापाची कांस धरावी, अशी माझी आग्रहाची विनंति आहे.

---

[ ८९ ]

॥ श्रीराम ॥

# राघवदासकृत वेदमनोगत

( नारायण रामदासी–मसूर )

( १ ) मी गेल्या वैशाखांत बाहे, वाळवे, ब्रह्मनाळ, या भागांत फिरावयास गेलों होतों. वाळव्यास मठांत च उतरलों होतों. आपल्या चैत्राचे अंकांत **श्रीसमर्थशिष्यीण अंबिकाबाई**, मठ वाळवे, यांची हकिकत आलेली पाहिली. आणखी कांहीं जास्त माहिती मिळाल्यास मिळवावी ह्मणून चवकशी केली. मठपति मठांत नव्हते, परंतु त्यांचे चिरंजीव रघुनाथबुवा यांनीं मठांतील सर्व पोथ्या दाखविल्या. त्यांत **राघवदासकृत वेदमनोगत** ह्मणून एक ग्रन्थ होता.

( २ ) ग्रन्थाचे अध्याय अकरा असून ओवीसंख्या २६९९ आहे. पहिला अध्याय नमनाचा आहे, दोन ते चार असे तीन अध्याय कर्मकांडाचे आहेत, पांच ते सात असे तीन उपासनाकांडाचे आहेत, पुढचे तीन ह्मणजे आठ ते दहा ज्ञानकांडपर आहेत व शेवटच्या अकराव्या अध्यायास ' पूर्ण अध्याय ' असें नांव आहे.

( ३ ) शेवटच्या अध्यायांत गुरुपरंपरा दिलेली आहे ह्मणून कांहीं ओव्या उतरून घेतल्या, त्या अशा:—

ईश्वर जाणिवेचा अहंकार । धरी तरी तो गुरूचा किंकर ।
यालागीं गुरुपद थोर । श्रोतीं साचार मानावें ॥ ९ ॥
ह्मणोनि परंपरेचें स्मरण । असावें हें शिष्यलक्षण ।
ज्यासी परंपरेचें नाहीं ज्ञान । त्यासी आत्मज्ञान न बाणे ॥१०॥
म्हणोनि परंपराकथन । कीजेल पूर्वी कोण कोण ।
मूळ गुरु आदिनारायण । त्यासी च म्हणणं महा विष्णु ॥ ११ ॥
तो चि विष्णु वेश । धरूनि जाला हंस ।
हंसें उपदेश ब्रह्मदेवास । केला असे सनकप्रश्नीं ॥ १२ ॥
ब्रह्मदेवें वशिष्ठाप्रत । उपदेशिलें ज्ञान निरुत ।
वशिष्ठें श्रीरामरायाप्रत । ज्ञान बोधित गुह्य जें तें ॥ १३ ॥
श्रीरामें बोधिलें आत्मज्ञान । कलींत रामदासा कारण ।
ज्याचा प्रताप अति गहन । भगवं निशाण हुरमुजी ॥ १४ ॥
रामदासी ऐसें म्हणणं । असें जें तें त्यापासून ।
त्यांनीं अंबिकाबाईलागून । आत्मज्ञान बोधियेलें ॥ १५ ॥
चवदा शिष्य जालिया वरत । अंबिकाबाईस ज्ञानयुक्त ।
श्रीरामदासस्वामी समर्थ । महामंत्राप्रत उपदेशिती ॥ १६ ॥
ब्रह्माभ्यास करितां बरी । जाली पूर्ण साक्षात्कारी ।
मग ती जगामाझारीं । पिशाच्चपरी राहतसे ॥ १७ ॥
परि दासबोधनिरूपण । करितां बोलूं लागे ज्ञान ।
जेणें संशयखंडण । म्हणती शास्त्रज्ञ धन्य असे ॥ १८ ॥
विरक्ति अंगीं वाड । बोलणं सिद्धान्त जाड ।
नाहीं धनमानाची चाड । न धरी भीड राजाची ॥ १९ ॥
चरम दशा पावली तींत । जैसा कां वदे वेदांत ।
तिची कथा आद्यंत । लिहितां ग्रन्थ दुजा होय ॥ २० ॥
त्या अंबिकाबाईनें पुढें । भिमाका प्रति ज्ञान गूढ ।
बोधियेलें निवाड । जाहली निचाड प्रपंचीं ॥ २१ ॥
पुढें भीमाबाई यांनीं । मल्हारबोधा शिष्य करूनि ।
वाल्मिकक्षेत्र कृष्णातटणीं । मठ करूनि राहिली तेथें ॥ २२ ॥
त्या मल्हारबावापासून । गिरिबावाप्रति ज्ञान ।
पावलें त्याचे शिष्य तीन । बरीं नामाभिधानें कथिजेती ॥२३॥

१ महाराज, झाला असता दुसरा ग्रन्थ तर आह्मांवर मोठे उपकार झाले असते. २ वाळवे.

एक व्यंकाजी बावा द्वितीय । काशीबाई रामीं तन्मय ।
तिसरा मी येक रंक होय । सेवुनी पाय असे पै ॥ २४ ॥
कृष्णातीर म्हैसाळ कुलकर्णीवृत्ति ।
शुद्ध ब्राह्मण ऋग्वेदी आश्वलायनसूत्री ।
तैतिलायनशाखी विश्वामित्रगोत्री । उपनामोक्ति विभूते ॥ २५॥
रामदासी जगप्रवाही । परी स्वरूपसांप्रदायी ।
अलक्षमुद्रा ब्रह्मीं राही । वाक्य तें हि प्रज्ञानं ब्रह्म ॥ २६ ॥
सीतारामामारुती उपासन । जीविका भिक्षा कोरान्न ।
जेणें जालों मी पावन । ब्रह्मनिरंजन ऐक्यत्वें ॥ २७ ॥

( ४ ) ग्रन्थाचा रचनाकाल शेवटीं दिला आहे तो असा:—

विरोध संवत्सर सत्राशें त्रासे येक सष्टी ।
माजी श्रावण शुद्ध षष्ठी ।
कन्येशीं गुरुशीं कृष्णातटीं ।
वाल्मीकक्षेत्रीं रामदासमठीं समाप्त ग्रंथ ॥ ५२ ॥

राघवदास म्हणे ग्रन्थ । कर्ता श्रीराम असे येथ ।
त्याचा त्याप्रती मी अर्पित । रघुवीर समर्थ म्हणवुनी ॥ ५३ ॥
इति श्री वेदमनोगत ग्रन्थ । वेदाचा जो मतितार्थ ।
गुरुपरंपरा ग्रन्थतात्पयार्थ । येकादशाध्यायांत कथियेला ॥ १ ॥

यांतील ' सत्राशें त्रासे येक सष्टी ' हे शब्द असे च आहेत, पण त्यांचा अर्थ काय ? शके १७७३ त विरोध संवत्सर होता व त्या शकांतील हा ग्रन्थ असावा, असें मला वाटतें. परंतु आपणांस किंवा आपल्या वाचकांपैकीं कोणास निराळा अर्थ सुचल्यास तो प्रसिद्ध व्हावा.

( ४ ) आपल्या तर्फे या मठीं कोणी गेले होते तेव्हां त्यांच्या पाहण्यांत हा ग्रन्थ आला नव्हता, असें कळतें. म्हणून मुद्दाम वरील टांचण करून पाठवीत आहे. मठांत सदरहु ग्रन्थाच्या दोन प्रती आहेत । पण एक प्रत अगदीं च अव्यवस्थित असून तिचीं पानें एकमेकांला चिकटलेलीं आहेत. फाटतील या भीतीनें तीं सोडविण्याचे भरीस मी पडलों नाहीं. आपण स्वतः एकवार या प्रांतीं येऊन जास्त शोध केला पाहिजे.

[ ९० ]

श्रीराम

# श्री शिव छत्रपति व वासुदेव गोसावी

शिवराज वासुदेवमहंतासी पाही ।
अति दर्शनलालसांसी श्रेष्ठासी वियोग नाहीं ।
येऱ्हवीं कोण्हासी हि समर्थवियोग न सोसवे कांहीं ।
ध्यानीं मनीं चिंतनीं सर्वदां ॥

( १ ) अशी श्रीसमर्थप्रतापाच्या नवव्या समासांतील पंचावन्नावी ओवी आहे, तिचा अर्थ काय ? शेवटचे दोन चरण त्यांतल्या त्यांत सोपे आहेत. येऱ्हवीं कोणाला हि समर्थांचा वियोग मुळीं च सहन होत नसे, ज्याच्या त्याच्या ध्यानीं मनीं चिंतनीं सर्वदां श्रीसमर्थ असत. येऱ्हवीं सहन होत नसे, येऱ्हवीं म्हणजे नाहीं पेक्षां. अर्थात् ज्या स्थितींत वियोग सहन होत असे, त्या स्थितीचें वर्णन पहिल्या दोन चरणांत असलें पाहिजे. हें ध्यानांत ठेवून त्या चरणांचा अर्थ केला पाहिजे. पाही ह्मणजे मानीत. श्रीसमर्थदर्शनाची अति लालसा झाली ह्मणजे वासुदेवमहंतांचें दर्शन झालें तर प्रत्यक्ष श्रीसमर्थांचें च दर्शन झालें असें वाटून श्रीसमर्थवियोग झाला असें वाटत नसे, अशी वासुदेवमहंतांविषयीं श्रीशिवछत्रपतींची भावना होती. वासुदेवमहंत सनिध असले ह्मणजे श्रीसमर्थ संनिध असल्यासारखें शिवराजास वाटे. फक्त वासुदेवमहंतांच्या सांनिध्यांत त्यांना समर्थांचा वियोग सह्य होई, एरव्हीं नाहीं. असा या ओवीचा अर्थ आहे. दुसरा कोणता हि अर्थ संभवत नाहीं. इतकी वासुदेव महंतांची योग्यता होती. श्रीसमर्थांच्या बरोबरीची त्यांची योग्यता होती, असा अर्थ या ओवींतून निघतो व तशा अर्थाची स्पष्ट ओवी प्रतापांत दुसरीकडे आहे हि.

( २ ) प्रतापाच्या दहाव्या समासांत श्रीसमर्थांच्या महंतांची नांवें दिलेलीं आहेत, त्यांत आद्यस्थान वासुदेवांना देऊन गिरिधर ह्मणतात:—

वासुदेव नामा अनुष्ठानी ।
समर्थप्रतिमा ह्मणती जनीं ।
उत्कट परमार्थ विस्तारूनि ।
समर्थचरणीं लीन राहे ॥ १०-१४

लोकांत वासुदेवांना श्रीसमर्थांची प्रतिमा ह्मणत. एकटे शिवछत्रपति च नव्हत तर तत्कालीन सारा समाज वासुदेवमहंतांना दुसरे समर्थ च मानीत.

( ३ ) त्या वासुदेवमहंतांची कांहीं थोडी माहिती वाचकांना आहे च. रामदासी मालेंतील तिसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत ज्या कण्हेरीमठाची त्रोटक हकिकत दिलेली आहे, तो च वासुदेवमहंतांचा मठ होय. वासुदेवपंडित केवढे विद्वान् व त्यांची संप्रदायांत योग्यता केवढी, पण आज त्यांच्या मठाची कोण दुर्दशा झालेली आहे ! आम्ही मठाचा जो थोडा भाग झाडून पाहिला त्यांत जो थोडा केर हातीं लागला त्याची कल्पना कागदपत्रांचे भागांत वाचकांस केव्हां तरी करून देऊं. तत्संबंधीं आमचें संशोधन अजून पुरें झालेलें नाहीं !

( ४ ) अशा श्रीसमर्थस्वरूपी वासुदेवांना १६०२ च्या कार्तिक शु. ७ स शंभु छत्रपति सनद करून देतांना पूर्वीं कैलासवासी शिव छत्रपतींनीं करून दिलेल्या दोन सनदांचा अन्वय दर्शवितात. ( सांप्रदायिक कागदपत्रें–लेखांक ५५९ ). ती शंभु छत्रपतींनीं करून दिलेली सनद, या च ठिकाणीं वाचावयास मिळावी ह्मणून पुनरुक्तीचा दोष पतकरून येथें देतों.

श्री

( राजश्री वासु )देव गोसावी

स्वस्ति श्री राज्याभिशेक शक ७ रौद्र संवंछर कार्तिक शुध सप्तमी भोम्यवासरे क्षत्रियेकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति याणी राजेश्री विनायेक उमाजी देशाधिकारी व देशलेखक प्रांत पुणे यास आज्ञा केली ऐसी जे राजेश्री गोसावी वास्तव्ये मठ मौजे कन्हेरी ता। नीरथडी प्रगणे मजकूर यास इ(नाम) जिराईत व बागाईत मौजे मजकुरी आहे बा। सनद राजेश्री कैलासवासी

(एषा श्री शिवराजेंद्रमुख्यामात्यस्य सत्यधृक् ॥ मुद्रा मोरेश्वरस्यास्तां भद्रा सद्रागदायिनी)

स्वामी ( बा ता )

| | |
|---|---|
| कदीम जिराईत हाा सनद छ २५ जिल्हेज सन इहिदे सबैन अलफ जमीन कास रुके नव ८९ | किा सनद छ २० रबिलोवल सन तिसा सबैन मुा पनाला पुष्पवटिकेस व बाग करावया बिघे ८११ वजा मौजे माडिरदेव पाा वाई तेथे देविले बिघे ८४ बाकी मौजे मजकूरी देविले आहेत बिघे अगर जवळां पैकी देणे बिघे सात ८७ |

येकूण इनाम जमीन जिराईत कास रुके नव व बागाईत बिघे सात रास तागाईत साल गुदस्ता-चालत आले आहे हाली हि तेणे प्रमाणे देविले असे साल मजकुरापासून दर हर साल देत्त जाणे प्रतिवरसी ताजे सनदेचा उजूर करीत नव जाणे सदरहु जमीन कुलबाब व कुलकानु देखील दिधली असे दुमाले करणे तालीक लेहोन घेऊन असल राजेश्रीयासी फिराऊन देणे लेखनालंकार

रुजु सुरुनीवीस

मर्या
दयं विज
यते

( ५ ) चंद्र २५ जिल्हेज सन इहिदे सबैन अलफ म्हणजे अधिक वैशाख व. १२ शके १५९३. तेव्हां प्रो. भाटे व ब्राह्मण्याला विटलेले त्यांचे समानधर्मी मित्र यांना एक असा सवाल करावासा वाटतो कीं,

( श्री ) वासुदेवगोसावी यांची श्रीसमर्थांच्या बरोबरीची ही योग्यता,

( रा ) शिवछत्रपतींची त्यांच्या ठायीं असलेली निष्ठा व

( म ) समर्थांचा व त्यांचा गुरुशिष्यसंबंध

या गोष्टी विचारांत घेतां, त्या वासुदेवांना शिव छत्रपती १५९३ त सनद करून देतात पण समर्थांना मात्र १५९४ पर्यंत भेटत सुद्धां नाहींत, याविषयीं तुमचें मन किंचित् संशयित तरी होतें कां, कां त्या मताला घट्ट चिकटून बसावेंसें अजून तुम्हांस वाटतें ?

( ९१ )

# कल्याणांचें तें सांकेतिक पत्र

( १ ) मागील लेखांक ८८ यांत ज्या सांकेतिक पत्राचा उल्लेख करण्यांत आला आहे, त्या पत्राच्या प्रती बंदर राजापुर येथील संस्कृतग्रन्थसंग्रहालय व संस्कृतपाठशाळा यांचे सहकारी व्यवस्थापक वेदमूर्ति रघुनाथ कृष्ण पाटणकर व जळगांवचे रा. हिरा रामा खरादी, यांचे कडून आल्या आहेत. दोहोंत पाठभेद आहेत. पाठांतरांसह तें पत्र येथें देतों:—

**विवेकें करावें कार्यसाधन । जाणार नरतनु हें जाणोन ।**
**पुढील भविष्यार्थीं मन । रहाटों चि नये ॥ १ ॥**
**चालों नये असन्मार्गीं । सत्यता बाणल्या अंगीं ।**
**रघुवीरकृपा ते प्रसंगीं । दासमाहात्म्य वाढवी ॥ २ ॥**
**रजनीनाथ आणि दिनकर[1] । नित्यनेमें[2] करिती संचार ।**
**घालिताती येरझार । लाविलें भ्रमण जगदाशा ॥ ३ ॥**
**आदिमाया मूळभवानी । हे चि[3] जगाची स्वामिनी ।**
**येकांतीं विवंचना[4] करोनी । इष्टयोजना करावी ॥ ४ ॥**

पत्रांतला मजकूर हि बोधप्रद आहे पण सर्व चरणांचीं आद्याक्षरें व शेवटचीं दोन चरणें एकदम वाचलीं म्हणजे, **विजापुरचा सरदार निघाला आहे, एकांतीं विवंचना करोनी । इष्टयोजना करावी,** असा त्यांत इषारा दिलेला आहे.

( २ ) हा संकेत फारसा गूढ नाहीं, पण खुद्द श्रीसमर्थांच्या कवितेंतील कांहीं कांहीं स्फुट कविता सांकेतिक असावी, असें मला पुष्कळ वर्षांपासून वाटत आहे, पण संकेत उमगत नसल्यामुळें त्याचा उल्लेख करण्याचें मी आजवर धाष्टर्य केलें नाहीं व आज हि केवळ ओघानें च माझी ही कल्पना येथें नमूद करीत आहे. समर्थांच्या कित्येक स्फुट प्रकरणांत कांहीं निराळा अर्थ आहे काय, म्हणून मी कित्येक वेळां कांहीं कांहीं स्फुट प्रकरणांकडे सारखा पहात राहतो. उदाहरणार्थ

---

१ दिवाकर. २ निशिदिनीं. ३ हें तों जगताची स्वामिणी । ४ विवेक धरूनी.

बहुत तान लागली । तनु विशेष भागली ।
सुरंग तो विरंगला । प्रसंग रंग भंगला ॥ स्फु. श्लो. ५४-१
कठीण वेळ पातली । तनु विशेष श्रांतली ।
तगबगीतसे मना । कराल भेटि जीवना ॥ २ ॥
सुगंध नीर गारसें । दिसेल काय फारसें ।
घळाळ वोतितां बरें । नये मनास दुसरें ॥ ३ ॥
कळकळीत हा पळु । कवी बहुत वीकळु ।
कळवळोनि पोळला । दयाळ राम बोळला ॥ ४ ॥

हें काय, श्रीसमर्थांना किंवा एकाद्या शिष्याला एकदां केव्हां तरी खूप तहान लागली होती, त्याचें केवळ वर्णन आहे, कां त्यांत कांहीं गूढार्थ आहे ? इत्यादि कित्येक स्फुट प्रकरणें, श्लोक वगैरे पाहून मनांत विचार येतो. वाचकांनीं हि अशा प्रकरणांचा विचार करावा. त्यांचा उत्तान अर्थ विशेष महत्त्वाचा दिसत नाहीं, आणि म्हणून च गूढार्थाची शंका येते.

( ३ ) वर जें कल्याणांचें सांकेतिक पत्र दिलेलें आहे तें दहा पांच वर्षांमागें ' विहारी ' नांवाच्या वर्तमानपत्रांत व ' विजापूरच्या आदिलशाहीचा शेवट ' या पुस्तकांत प्रसिद्ध झालें होतें, पण हें पत्र कोणास, कोठें सांपडलें, तें किती जुनें आहे, तें हल्लीं कोणाच्या संग्रहीं आहे, वगैरे माहिती प्रकाशित झाली पाहिजे, असें वाटतें.

---

[ ९२ ]

# श्रीसमर्थ व केशवस्वामी यांचा पत्रव्यवहार

भागानगरचे केशवस्वामी व श्रीसमर्थ यांच्यांत झालेलीं पत्रोत्तरें प्रसिद्ध आहेत, परंतु त्यांत कांहीं पाठांतरें आढळल्यामुळें तीं येथें एकवार देतों. डोमगांवमठांतील दुसऱ्या बाडावरून तीं घेतलीं आहेत व पन्नासाव्या बाडांतील पाठभेद टिपेंत दिले आहेत.

## श्रीसमर्थांस पत्र लिहिलें केशवस्वामीनें

वों नमो जी सच्चिदानंदा । पदत्रयस्वरूपशुधा ।
बीजतरु उगवे [1] वृंदा । स्वयें आमोदा परिमळेंसीं ॥ १ ॥

---

१ ' उगवे वृंदा ' ऐवजीं ' अरविंदा '

त्या स्वादांबृताची चाखोटी । तूं चि चेवी तुझा पोटीं ।
ते निरसोनियां दिजे भेटी । स्वानंददृष्टि अवलोकनें ।। २ ।।

श्रीरामदासा परम सखया । स्वानंदपान्हा गुरुवर्या ।
केशवें विज्ञप्ती त्याहावया । हें चि कारण ।। ३ ।।

**समर्थें उत्तर दिल्हें**

पदातीत वाक्यार्थ शोधी समाधीं ।
स्वरूपाव जो निर्विकल्पावबोधीं ।
जये ऊगमीं जन्म नाहीं जिवासी ।
मिळे दास त्या संगमीं केशवासी ।। १ ।।

पत्र व त्याचें उत्तर दोन्ही किती गोड आहेत ! केशवांना श्रीसमर्थांविषयीं केवढा हा आदर व त्यांच्या भेटीविषयीं कोण ती आतुरता ! पंचायतनांत समर्थांना वडिलांच्या जागीं मानीत. केशव त्यांना गुरुवर्य म्हणत आहेत. केशवस्वामीप्रमाणें ज्या कोणाला श्रीसमर्थांच्या भेटीची तळमळ वाटेल त्याला समर्थांचें हें च उत्तर समजावें !

**जये उगमीं जन्म नाहीं जिवासी । मिळे दास त्या संगमीं सच्छिष्यासी ॥**

[ ९३ ]

# भालगांव व डोमगांव मठांचा संबंध

डोमगांवचा मठ म्हणजे कल्याणस्वामींचा मठ होय. इतर कित्येक मठांतील व डोमगांवच्या मठांतील जीं कागदपत्रें पाहण्यांत आलीं आहेत, त्यावरून असें दिसतें कीं डोमगांवमठाविषयीं इतर मठांना विशेष आदर वाटत असे. हें अगदीं साहजिक होतें. आतांपर्यंत जीं साधनें प्रकाशित झालीं आहेत त्यावरून आपल्या सर्वांच्या निदर्शनास आलें आहे कीं, श्रीसमर्थांच्या सर्व शिष्यांत कल्याणांची योग्यता विशेष होती ! निकटचा किंवा दूरचा किंवा कसला च त्यांना स्वार्थ नव्हता, सारा अभिमान अगदीं गळून गेला

१ स्वानंदाची. २ चाखवटी. ३ रुची. ४ निरखूनि. ५ स्वानंदकंदा.

होता, एका सद्गुरुचरणसेवेवांचून त्यांना दुसरें तिसरें कांहीं दिसलें च नाहीं. श्रीसमर्थांच्या पश्चात् उद्धव, दिवाकर, भास्कर, भानजी, रामाजी वगैरे शिष्यांत, केवळ गैरसमजुतीमुळें कां होईना, पण जो प्रेमकलह उत्पन्न झाला होता, त्यापासून अगदीं अलिप्त राहून उभय पक्षांस कल्याणस्वामींनीं कशा समजुतीच्या गोष्टी सांगाव्या, हें आपण प्रकाशित कागदपत्रांवरून पाहिलें च आहे. अशी च निस्पृह वृत्ति कल्याणांच्या पश्चात् डोमगांवच्या गादीवर जे पुरुष बसले होते त्यांची होती. या सर्व कारणांमुळें डोमगांव मठांतील पुरुषांविषयीं इतर मठांना विशेष आदर वाटावा, हें अगदीं साहजिक आहे.

ही च गोष्ट सिद्ध करणारें एक पत्र येथें देतों. भालगांवमठपति खंडेराव यांनीं तें डोमगांवमठपति भिमाजी व रामाजी यांना मुद्गलांच्या निधनासंबंधानें लिहिलेलें दिसतें. मुद्गलांची निधनतिथि १६७१ ज्येष्ठ शु. १४ आहे, तेव्हां हें पत्र ज्येष्ठ वद्यांतलें किंवा आषाढांतलें आहे. दोन्ही मठांचा हा संबंध लक्षांत यावा म्हणून जरूर तेवढी दोन्ही मठांची परंपरा दर्शवून तें पत्र खालीं देतों.

डोमगांवपरंपरा

रामदास
|
कल्याण
|
मुद्गल
|
भिमाजी — रामाजी

भालगांवपरंपरा

रामदास
|
त्रिंबक
|
हरिहर
|
खंडेराव

पत्र अस्सल असून बाळबोधींत सुंदर अक्षरांनीं लिहिलेलें आहे.

श्री रामदासां कल्याण

स्वामी

श्रीगुरुभजनैकनिष्ठ विमळअंतःकरण रघुपतिदया गृहणार्त बंधुवर्य परमप्रिया विराजित राजेश्री भीमाजीगोसावि व रामचंद्रगोसावि यांप्रति खंडोबानाम्नां कृतानेक नमस्कार विनंति उपरि आपणाकडिल पत्र आलें तेथें लिहिलें होतें कि श्री परंधामवासि जाले तेणें करून

बहुत आसमाधान जालें तें ह्रदयवासि परस्परें साक्ष आसे ते तों ब्रह्मानंदघन परंतु देहसमंधेक उर्मि आवरत नाहि त्या समयिं च येत होतों येथें जो आवरोध जाला तें सविस्तर राजेश्री नारायेणबावा निवेदितिल त्याजवरून विदित होइल उपासनेचा अभीमान श्रीस आसे आपण खेद टाकुन त्यांचा पादुकांचा ध्यास करणें सर्व निर्वाह ते चीं करितिल कांहि चींता न करणें आम्हास हि तुम्हावेगळें अन नाहि बहुत बहुत प्रकारें आपलें शरिर रक्षणें अशनि भाषणी वस्त्रग्रहणी परस्छळि स्वस्छळि सावध आसणें लोकीकी प्रकार अनेक जाले आहेत श्रीचे दयेकरून सर्व कल्याण चि होईल तुह्मी तो विवेकी सुज्ञ आसां बहुत काय लीहिणें वर्षाकाळानंतरें श्रीस्छळास येतों वारंवार साकल्यलेखन करणें लोभ न टाकणें हे विनति

राजेश्री बाजीराय देशमुख व भवानीराय व माधवराय देशमुख यांप्रति आशिर्वाद उपेरी तुम्ही श्रीस्छळि वडीलावडीली स्वामीचें संस्छान रक्षीलें आतां जें भजन कराल तें समर्थास बहुतसें मान्य आसे तुम्ही जे परमार्थरक्षणी ध्वजा आसां आम्ही समाचार ऐकतां च यावें परंतु येथील वर्तमान रा। नारायेण गो। निवेदीतां विदित होईल बहुत काय लिहिणें हे सुचना

बाह्य मायना व आंतील विचार, आस्था, प्रेम उपदेश वगैरे अंतर्बाह्य लक्षणांमुळें जुन्या पत्रव्यवहारांत जो मोहकपणा असतो, तो या हि पत्रांत आहे व इच्छा आहे कीं, त्यांतील भक्तिप्रेम आपल्या सर्वांच्या अंतरीं उतरावें. श्रीसमर्थ प्रत्यक्ष असतां अभाविकाच्या ठिकाणीं हि भाव उत्पन्न झाला असेल ! पण खंडोबा ग्वाही देतात, **आतां जें भजन कराल तें समर्थास बहुतसें मान्य आसे.** या वचनाचा सर्व संप्रदायिकांनीं विचार करावा.

॥ श्रीराम ॥

# श्री सांप्रदायिक विविध विषय

## द्वितीय खंड

# सूची

( पहिला अंक लेखांकाचा व दुसरा अंक पृष्ठाचा )

### अ


अंगलाई–६२

अंगापूर–गुरुतीर्थ ५८–८

डोहांतून मूर्ति काढल्या ६२–२५

अनंत मौनी–आत्मारामशिष्य ६४–३५

अप्पाराव–आत्मारामशिष्य ६४–३६

अफझुलखान–वधासंबंधीं ८८

अंबिका–आत्मारामशिष्या ६४–३७

अंबिकाबाई–श्रीसमर्थशिष्यीण ८६ व ८९

अयोध्या–तीर्थयात्रा ५८–५

अरुणाचल—तीर्थयात्रा ५८–५

अवधूतात्मजसुहृद–कृत कृष्णावर पद ७६–१०९

अश्वत्थभट्ट—आत्मारामशिष्य ६४–३७


### आ


आकलखोप—८६–१७४

आकारपूर्वक यवन—श्रीसमर्थांनीं मारविला ८८–१८५

आणाजीबावा भालकीकर—श्रीकल्याणशिष्य, मठ भातंबरें ७१–९० व ७८–११५

आणाप्पास्वामी नीलंगेकर—श्रीसमर्थशिष्य ६८–८२ व ७६

आत्माराम महाराज—दासविश्रामधामकर्ते ६४–३३, वर नरसोबांचें पद ७९–१२४

आदिनारायण—८९-१९१
आदिशक्ति भुवनेश्वरी—तीर्थयात्रा ५८-५
आनंद—आणाप्पांचें समर्थांनीं ठेवलेलें नांव ७६-१०८
आनंदतनय—यांची नीलंगे मठांत कविता ७६-१०९
आनंदमूर्ति—श्रीकल्याणशिष्य ७१-९२
आनंदराव हवालदार—श्रीशिष्य ६८-८२
आपचंद—मठांतील गळांठा ८०
आपाजीपंत देशमुख—८५-१६५
आवंढ्या—तीर्थयात्रा ५८-५

## इ

इंदूर बोधन—मठांत उद्धवांच्या हातचें वाड ८३-१४५
इंदूराव घाडगे—चाफळास देणगी ६७-६५
इसण्णा—आत्मारामशिष्य ६४-३७

## उ

उडपी—तीर्थयात्रा ५८-५
उद्धव गोसावी—६४-३३,६८-८२,९३-१९९
उद्धवसुत—कृत समर्थांची आरती ८५-१६८
उंब्रज—गुरुतीर्थ ५८-८
उमापती—आत्मारामशिष्य ६४-३७
उमाबाई चव्हाण—चाफळमठास देणगी ६७-६५

## ए, ऐ

एकनाथ—कृत रुक्मिणीस्वयंवर नीलंगे मठांत ७६-१०९
ऐतवडेकर—चाफळमठास देणगी ६७-६५

## क

कण्हेरी ५८-८;९०-१९४
कन्याकुमारी—तीर्थयात्रा ५८-५
कमळप्पा—आत्मारामशिष्य ६४-३७
करंजे—गुरुतीर्थ ५८-८
कराड ८६-१७१।७२
कलबरगा ६४-३३,३७

कल्याणस्वामी ६८-८२;९३-१९८।९९
क्रुत पद रामोपासनेवर ७५
यांचें सद्गुरुपदीं स्थान ६०-२१
यांचें सांकेतिक पत्र ९१
स्तव ७३
कल्याणी—पूर्णानंदांचें गांव ८३-१४५
कॅंबे—तीर्थयात्रा ५८-५
कामाक्षी बनशंकरी—तीर्थयात्रा ५८-५
कावेरी रंगनाथ—तीर्थयात्रा ५८-५
काशी—तीर्थयात्रा ५८-५
काशाबाई—मठ वाळवे ८६-१७१,१७४;८९-१९२
कासप्पा—आत्मारामशिष्य ६४-३६
कासी रघुनाथ ८६-१७५
किनखेड ८५-१६३
कुडाळकर देशपांडे ६८-८२
कुंभारगांवकर—चाफळला देणगी ६७-६५
कृष्णदासमुद्गल—कृत रामायण नीलंगेमठांत ७६-१०९
कृष्णाजी—या नांवाचे तिघे आत्मारामशिष्य ६४-३६।३७
केज—गुरुतीर्थ ५८-८
केडगांव ६०-८
केशव—कल्याणशिष्य ७३-९५
केशवराव—आत्मारामशिष्य ६४-३६
केशवस्वामी—भागानगरकर ९२-१९७।९८
कोनुर—गुरुतीर्थ ५८-८
कोल्हापुर—तीर्थयात्रा ५८-५
कोहेर—नीलंगेमठाखालील मठ ७६-११२

## ख

खंडेराव—भालगांवमठपति ९३-१९९
खंडेराव जगन्नाथ-चाफळला देणगी ६७-६५

ग

गंगाजी कोनेर—कृत पद नीलंगेमठांत ७६–१०९
गजेन्द्रमोक्ष—रामदास ( ? ) कृत ७६–११०
गयालजोशी—वन ८५–१६३
गवराई—मुसळरामांचा मठ ६९–८४
गिरी—तीर्थयात्रा ५८–५
गिरी गोसावी—श्रीसमर्थशिष्य ६८–८२
गिरीबावा—मठ वाळवे ८६ व ८९
गिरेम्मा—आत्मारामशिष्य ६४—३७
गोकर्ण—तीर्थयात्रा ५८–५
गोटखिडी ८६–१७३
गोदाजी पाटील मोकदम ८५–१६३
गोंदवले ६०–१८
गोपाळपंत शहापूरकर—श्रीसमर्थशिष्य ६८–८२
गोपाळ सावळाजी ८५–१६४
गोविंद चिंतामणी–कृत सुलोचनागहिंवर ७६–१०९

घ

घुळे–येथील पाटलास दृष्टांत ७८–११७
घृष्णेश्वर–तीर्थयात्रा ५८–५

च

चंदना–आत्मारामशिष्य ६४–३७
चंद्रराव मोरे–यांचें पत्र ६३–२९
चरेगांव–गुरुतीर्थ ५८–८
चरेगांवकर–यांच्या चाफळला देणग्या ६७—६५
चाफळ–गुरुतीर्थ ५८–८
—येथें रामाची स्थापना ६२–२५; ८८–१८५
चाफळखोरें–वर्णन ६६–४२
—संस्मरणीय वस्तु ६६
चिमाबाई आका–श्रीसमर्थशिष्यीण ६८–८२

छ

छत्रपति शिवाजी महाराज–वाघिणीची गोष्ट ६५–३८

## ज

जगज्जीवन परशुराम प्रतिनिधी-शिक्का ८६
जगन्नाथ—तीर्थयात्रा ५८-५
जनार्दन—कल्याणांचे शिष्य ७३-९५
जयराम शिवदेव पाडिये ८५-१६४
जयवंत—एक उत्तम कवि, कदाचित समर्थ ७६-१११
जयवंत गोसावी वराडकर—समर्थशिष्य ६८-८२
जाउळी ६३-३०;८८-१८५,१८७
जांब—गुरुतीर्थ ५८-८
जिजाबाई ६५-४०
जीवाजी कदम ८५-१६४
ज्वालामुखी—तीर्थयात्रा ५८-५

## ट

टांकळी—गुरुतीर्थ ५८-८

## ड

डोमगांव—गुरुतीर्थ ५८-८
—मठ ९२ व ९३

## त

तंजावर—गुरुतीर्थ ५८-८
ताई—आत्मारामशिष्या ६४-३६
तिसगांव—गुरुतीर्थ ५८-८
तुळजापूर ५८-८; ६३-२९
तुळजा भवानी ६३-२५; ८८-१८५, १८७
त्रिमलसुत-कृत पदें निलंगे मठांत ७६—१०९
त्रिंबक-मठ भालगांव ९३—१९९
—समर्थशिष्य ६८-८२
त्रिंबक जगदेवराव ८५-१६४
त्रिवड-दासबोधाची प्रत लिहिणारे ८५-१६६
त्र्यंबक-तीर्थयात्रा ५८-५

## द

दत्ताजी त्रिमल ८२-१४०; ८४-१५८
दत्तात्रय-कल्याणबंधु ६०—२१
दादेगांव-गुरुतीर्थ ५८—८
दासविश्रामधाम ६४-३३
दिगंबर—कल्याणशिष्य ७३-९५
दिनकर—श्रीसमर्थशिष्य ६८—८२
दियानतराव-ऊर्फ मुरार जगदेव ६७-५९
दिवाकर ८२-१४०; ८४-१५९; ९३—१९९
दिवाकरपंत पदकी—आत्मारामशिष्य ६४—३८
देवजी ठाकरे मोकदम ८५-१६३
देवदास—समर्थशिष्य ६८—८२
द्यानतराव—ऊर्फ दियानतराव ६७-५४
द्वारका—तीर्थयात्रा ५८—५

## ध

धर्माजी नाईक मोकदम ८५-१६४
धामणेरकर—चाफळला देणगी ६७-६५
धामनी—प्रल्हादांचें गांव ८५-१६१
धोंडरी—मुसळरामांच्या गोष्टीचें गांव ६९-८४

## न

नरसोबा—आत्मारामशिष्य मठ भालकी ७८-११५
—यांची कविता ७९-१२१।२३
—यांची परंपरा ५८-११५
नरहरि—कल्याणशिष्य ७३-९५
नरहरि—तीर्थयात्रा ५८-५
नागनाथ—तीर्थयात्रा ५८-५
नागनाथ देशपांडे—कसबे कारंजाबिबी ८५-१६४
नारायण—टेंभेस्वामींचे गुरु ८५-१६१
नारायणराव घोरपडे—चाफळला देणगी ६७-६५
नारायणराव मंठाळ—आत्मारामशिष्य ६४-३६

नारायेनजी व ममताजी ८५-१६३
नाशिक—तीर्थयात्रा ५८-५
निगडी—गुरुतीर्थ ५८-८
निरंजन गोसावी—समर्थशिष्य, तेगूर प्रां कितुर ६८-८२
निलंगे—आण्णाप्पांचा मठ ७६-१०५
—गुरुतीर्थ ५८-८
नीरथडी ९०-१९४
नीलकंठ—समर्थशिष्य ६८-८२

प

पंडितराम सिरसाळकर—कृत शिवरात्रिकथा ७६-१०९
पंढरपुर—तीर्थयात्रा ५८-५
पनाळा ८६-१७१,१७४;९०-१९५
परशराम लक्ष्मण—चाफळला देणगी ६७-६५
परळी वैजनाथ—तीर्थयात्रा ५८-५
पक्षतीर्थ—तीर्थयात्रा ५८-५
पाटण—गुरुतीर्थ ५८-८
पाडळीकर—चाफळला देणगी ६७-६५
पांडुरंगभट्ट—आत्मारामशिष्य ६४-३६
पादुकाख्यान—आण्णाप्पांचें चरित्र ७६-१०६
पाली—गुरुतीर्थ ५८-८
पिलाजीबावा—समर्थशिष्य, कोकण ६८-८२
पुरंदर विठ्ठल—कृत कानडी पदें निलंगेमठांत ७६-१०९
पुरुषोत्तम—कल्याणशिष्य ८०-१२८
—कृत कल्याणांची आरती ८०-१२८
प्रतापगड ६२-२५;६३-२८।२९;८८-१८५,१८७
प्रतापसिंह छत्रपति—चाफळला देणगी ६७-६४
प्रल्हाद—समर्थशिष्य, मठ कारंजे ८५

ब

बाजीराव घोरपडे ६७-५४

बाजीराव देशमुख ९३-२००
बापु रामदासी—गडावर अस्त ७८-११६
बारवे—कयांत कापशी ८६-१७४
बावची-प्रां पनाळा ८६—१७१
बाळकराम-समर्थशिष्य ६८-८२; ८५-१६१
बाळाजी बाजीराव-चाफळला देणगी ६७—६४
बाळा-आत्मारामशिष्य, सुलतानपुर ६४-३८
बाहे—गुरुतीर्थ ५८-८; ८९-१९०
बोरगांव ८६-१७६
ब्रह्मदेव ८९-१९१
ब्रह्मनाळ-गुरुतीर्थ ५८-८; ८९-१९०

भ

भक्तिरत्नावली-नीळंगे मठांत ७६-१०९
भगवंतराव त्रिंबक-प्रतिनिधी ८६-१७४
भद्रगिरी-तीर्थयात्रा ५८-५
भवानी जाधव-देणगी ६७-६५
भवानीबाई—आत्मारामशिष्या ६४-३७
भवानीराय—देशमुख ९३-२००
भाऊसिंगजी भठ्ठाण ८५-१६४
भागानगर—केशवस्वामींचें ९२-१९७
गुरुतीर्थ ५८-८
भातंबरें-मठ ७१-९१
भानजी ९३-१९९
भानुदास—समर्थशिष्य ६८-८२
भार्गव—तीर्थयात्रा ५८-५
भालगांव—५८-८; ९३-१९८
भास्कर ९३—१९९

भिउबाई ८६-१७०
भिकाजी ८५-१६३
भिमाका-अंबिकापरंपरा ८९-१९१
भीमराव-नाना तंजावरकर समर्थशिष्य ६८-८२
भीमराव-आत्मारामशिष्य ६४-३७
भीमाजी-डोमगांवपरंपरेतील ९३-१९९
भीमाशंकर-तीर्थयात्रा ५८-५

## म

मध्वनाथ-कृत कविता निलंगेमठांत ७६-१०९
मन्नारगुडी ५८-८; ६८-८२
मम रामदास-आत्मारामकृत ८०-१२७
मल्हार गोसावी-अंबिकापरंपरा ८६ व ८९
मसूर-गुरुतीर्थ ५८-८
महादाजी सामराज ८४-१५८
महाबळेश्वर-तीर्थयात्रा ५८-५
महिपती-आत्मारामशिष्य ६४-३६
माजगांव-गुरुतीर्थ ५८-८
माणकेश्वर-तीर्थयात्रा ५८-५
माणकोपंत ८६-१७५
माणदेशीं महादेव-तीर्थयात्रा ५८-५
माणिकप्रभु-नरसोबासमकालीन ७८-११५
मातापुर-तीर्थयात्रा ५८-५
माधव—कृत गजगौरी निलंगेमठांत ७६-१०९
माधव—रामदासानुचर ८५-१६६
माधवनंदन—कृत अनसूयाचरित्र निलंगेमठांत ७६-१०९
माधवराव देशमुख ९३-२००
माधवराव बल्लाळ—चाफळला देणगी ६७-६५
मानगांवकर—चाफळला देणगी ६७-६५
मानसिंग थोरात—८६-१७३

मानसिंग राजे ८५-१६२
मार्तंडभट्ट—आत्मारामशिष्य ६४-३६
मिरज—गुरुतीर्थ ५८-८
मीनाक्षी जोगेश्वरी—तीर्थयात्रा ५८-५
मीपणनिरसन—समर्थकृत ८५-१६६
मुंड ममताजी—देशमुख कवठलकर ८५-१६३
मुद्गल—डोमगांवमठांतील ९३-१९९
मुनि गोसावी अनंत—समर्थशिष्य ६८-८२
मुनीराम भोळाराम वेंगरूळकर—समर्थशिष्य ६८-८२
मुसळराम—६९; ६८-८२
मेघःश्याम—कृत कविता निलंगेमठांत ७६-१०९
मेरु गोसावी ६८-८२
मोरेश्वर अमात्य—शिक्का ९०-१९४
मोरोपंत—कृत स्फुट कविता निलंगेमठांत ७६-१०९

य

यशवंतराव जाधव—चाफळला देणगी ६७-६५
येक्किहाळी—आत्माराममहाराजांचा मठ ६४-३३

र

रघुनाथ जगजीवन पांड्ये ८५-१६३
रघुनाथ वडगांवकर—चाफळला देणगी ६७-६५
रंगनाथ गुरुबाई—वाघिणीचें पद ६५-४०
रंगोपंतदादा मेढे—हनुमंतस्वामींचे कारभारी ६७-४९
रताजीराव चव्हाण—चाफळला देणगी ६७-६५
राघवदास ८९
राघो शंकर ८४-१५९।६०
राजाराम छत्रपति—चाफळला देणगी ६७-६४

रामचंद्र गोसावी ८५-१६५
रामचंद्र नीळकंठ अमात्य ८४-१५९
रामचंद्र प्रल्हाद—मठ कारंजाबिबी ८५-१६४
रामचंद्रबावा धर्माधिकारी ८५-१६२
रामदास ८९-१९१;९२-१९८;९३-१९९
रामदासपंथक्रमसार—सेवेचे चार प्रकार ५९-१६
रामराव जिवाजी चिटणीस ६७-६५;८६-१७५
रामवरदायनी ६२ व ६३
रामाजी—मठ डोमगांव ९३-१९९
रामेश्वर—तीर्थयात्रा ५८-५
रायगड-गुरुतीर्थ ५८-८
राशिवडे ८६-१६९।७०
रुक्मिणीबाई-आत्मारामशिष्या ६४-३६
रेटरे बुा-पाा कराड ८६-१७१।७२
रोकडाराम-वराड ६८-८२

## ळ

लक्ष्मणदास पुणेकर-चाफळला देणगी ६७-६५
लक्ष्मणस्वामी-चाफळमठपति ८५-१६५

## व

वडगांव-गुरुतीर्थ ५८-८; ८६-१७३
वरप्रसाद-नरसोबांचा एक ग्रन्थ ७८-११९
वरुण-गुरुतीर्थ ५८-८
वाकोजी प्रताप ८५-१६३
वामन-कृत कविता निलंगे मठांत ७६-१०९
वासुदेव नाईक-आत्मारामशिष्य ६४-३६
वासुदेव बावा कण्हेरीकर-समर्थप्रतिमा ६८—८२; ९०—१९३
वासुदेवानंदसरस्वती टेंभे स्वामी ८५—१६१

वाळवे ८६ व ८९
विठोजी सुर्वे—व्याघ्रगड, चाफळला देणगी ६७—६५
विठोबा नाईक—आत्मारामशिष्य ६४–३६
विठोबा बरेगाल–आत्मारामशिष्य ६४—३८
विनायक उमाजी देशाधिकारी–यांस शंभुछत्रपतींचें पत्र ९०–१९४
विष्णुकांची—तीर्थयात्रा ५८–५
विष्णु गो ढवळे—चाफळला देणगी ६७–६५
विष्णुदासभाई गुजर—चाफळला देणगी ६७–६५
वेंकाजी रुद्र—कोलचे सुभेदार ८४–१५८
वेणाबाई मिरजकर—६८–८२
—त्यांचे ग्रन्थ निलंगेमठांत ७६–१०९
वेदमनोगत—राघवदासकृत ८९
व्यंकटराव पाटणकर—चाफळला देणगी ६७–६५
व्यंकटराव राजे घोरपडे—चाफळला देणगी ६७–६५
व्यंकाजी ८९–१९२

## श

शंकरभट्ट—आत्मारामशिष्य ६४–३६
शडिंब ६४–३३,३७
शंभु छत्रपति—चाफळला देणगी ६७–६४;९०–१९४
शहाजी महाराज—चाफळला देणगी ६७–६४
शाबाजी पवाडकर—मोकदम सेदपूर ८५–१६३
शामकल्याण ६१
शाहापुर—गुरुतीर्थ ५८–८
शाहापुरकर बाई—समर्थशिष्या ६८–८२
शाहु छत्रपति—चाफळला देणगी ६७–६४
शिक्का—मोरेश्वर अमात्यांचा ९०–१९४
शिंगणवाडी—जवळच्या रानांत वाघीण ६५–३९
शिंगणापुर—तीर्थयात्रा ५८–५
शिरगांव—गुरुतीर्थ ५८–८

शिरडी ६०-१८
शिरवळ-गुरुतीर्थ ५८-८
शिराळें-गुरुतीर्थ ५८—८
शिवकल्याण ६१—२२
शिवकवच—निलंगे मठांतील ग्रन्थ ७६—१०९
शिवकांची-तीर्थयात्रा ५८—५
शिव छत्रपति ६४-३३; ६७-६४; ९०-१९३, १९५
शिवतर—गुरुतीर्थ ५८—८
—प्रांतांत सुंदरमठ ८२—१४०
शिवप्पा—आत्मारामशिष्य ६४-३७
शिवराम-आत्मारामांचे आजे गुरु ८०-१२५
—आपचंदमठपति कल्याणशिष्य ८३-१४५
शिवराम-पूर्णानंदांचे ८३-१४५
—कृत बोधसुधाकर वगैरे निलंगे मठांत ७६-१०९
शिवराम-समर्थांचे ८३
शेषोपंत खुलासे पोतदार-चाफळला देणगी ६७-६५
श्रीधर-कृत प्रकरणें निलंगेमठांत ७६-१०९
श्रीनिवासभट्ट—आत्मारामशिष्य ६४-३६
श्रीनिवास शामराव ८६-१७५
श्रीपती—आत्मारामशिष्य ६४—३७
श्रीशैल-तीर्थयात्रा ५८-५

## स

सखाराम त्रिंबक ८५—१६३
सखारामसुत—कृत रुक्मिणीस्वयंवर ७६-१०९
सज्जनगड—गुरुतीर्थ ५८-८
—देवीची स्थापना ६२-२५
—लोकगीत ७२
सटवाजी व गुणाजी ८५-१६३
संतमाळा—कल्याणकृत ६०

संताजी घोरपडे—चाफळला देणगी ६७-६५
सप्तशृंग—तीर्थयात्रा ५८-५;६३-३२
सप्तसमासी—समर्थकृत अप्रकाशित प्रकरण ५९-१५
संभाजी ठाकरे—मोकदम ८५-१६४
समर्थ ८८-१८८;९२-१९७;९३-२००
—कृत एक पद ८०-१२५
—कृत पांगुळ ७०
—कृत रामाची आरती ८०-१२६
—ग्रन्थांचें प्रयोजन ८७
—तीर्थयात्रा ५८
—नरसोबांचें एक पद ७९-१२४
—मठांतील राजपुरुष ८४
—वाघिणीची गोष्ट ६५-३८
—शिकवण घडा १० वंद ५९-९
घडा ११ गुरूचे ठायीं अनन्यता ६०-१७
घडा १२ नामस्मरण ७४-९७
घडा १३ स्वरूपीं विश्रांतीस जावें ८१-१२९
घडा १४ सावधान सावधान ८७-१७७
—शिष्य ६८
—शिष्य शिवराम ८३
—साद्यन्त चरित्र कोण जाणतो ७७
—सांप्रदायाचा इतिहास ६४-३३
—सांप्रदायिकांचे चार प्रकार ५९-१०
—सुंदर मठ ८२
सिराले—८६-१७६
सामराज-कल्याणांचे शिष्य ६१-२२
सींगाव ८६-१७३
सीवाजी सीदोजी थोरात-शिक्षा ८६-१७३
सुब्रह्मणी फणीवर-तीर्थयात्रा ५८-५
सोरटी सोमनाथ—तीर्थयात्रा ५८-५

स्वप्नमंदोदरी—आण्णाप्पाकृत ७६—११०

### ह

हरि दादाजी—रामचंद्र नीळकंठांचे मामा ८४–१५९
हरिहर—भालगांवमठांतील ९३—१९९
हरीभाई गुजर–चाफळला देणगी ६७–६५
हरेश्वर–तीर्थयात्रा ५८–५
हशमतजंगबहादुर ८५—१६४
हिंगोल—तीर्थयात्रा ५८–५
हिमकेदार–तीर्थयात्रा ५८–५
हेळवाक–गुरुतीर्थ ५८–८

REFBK-0001803
REFBK-0001803

... ग्रंथ ... ठाणे
दा. क्र. 9603
... शाखा ... भाग

॥ श्रीराम ॥

# श्री रामदास आणि रामदासी ग्रन्थमाला

| | | किंमत |
|---|---|---|
| (१) | **श्रीमत् दासबोध** ( आवृत्ति ४ थी ) कापडी | २—०—० |
| | श्रीमत् दासबोधांतर्गत श्रीसमर्थचरित्ररूप **प्रस्तावना** | ०—५—० |
| (२) | **श्री समर्थांचीं दोन जुनीं चरित्रें** .... | १—०—० |
| (३) | **श्री रामदासांची कविता** .... .... | २—०—० |
| (४) | **श्री रामीरामदासांची कविता** .... | २—०—० |
| (५) | **श्री श्लोक मनाचे** ( आवृत्ति ४ थी ) .... | ०—८—० |
| (६) | **श्री स्वानुभवदिनकर** .... .... | १-१२-० |
| (७) | **श्री दासविश्रामधाम**(४खंडांपैकींखंड१।२।३तयार) | १०—०—० |
| (८) | **श्री समर्थप्रताप** .... .... | ०-१२-० |
| (९) | **श्री संप्रदायाचीं कागदपत्रें** .... .... | ३—०—० |
| (१०) | **श्री करुणाष्टकें,** कागदी बांधणी १। रु. कापडी बांधणी १॥ रु. | |
| (११) | **श्री समर्थांचीं लघुकाव्यें** ( तयार करावयास घेतलीं आहेत) | |
| (१२) | **श्री सीतास्वयंवर** .... .... | ०-१०-० |
| (१३) | **श्री रामदासपंथक्रमसार** ( शिलक नाहीं ) | |
| (१४) | **श्री निवृत्तिराम** ... .... .... | १—०—० |
| (१५) | **श्री सांप्रदायिक विविध विषय,** प्रथम खंड .... | १—८—० |
| (१६) | **श्री दिनकरांची स्फुट कविता** .... .... | १—८—० |

वरील ११ व १३ व्या भागांखेरीज बाकींच्या १४ भागांची एकंदर किंमत रु. २९—७ होते, परंतु तयार असलेले सर्व भाग घेऊन पुढील भाग घेण्याचें आश्वासन देणारांस मालेचे **कायम ग्राहक** समजून त्यांना वरील १४ भागांची किंमत फक्त रु. २६।८६ पडेल. पाठविण्याचा खर्च वेगळा.

☞ व्यापाऱ्यांस मूळ किंमतीवर शेंकडा २० टक्के कमिशन मिळेल.

**मुंबईतील एजन्टः—परचुरे पुराणीक आणि मंडळी, बुकसेलर्स** माधवबाग, मुंबई.

**चिटणीस—सत्कार्योत्तेजक सभा—धुळें.**